# कृष्ण परमात्मा

7



श्रीपरमानंदस्वामी

“ज्याप्रमाणे सर्व अंगांना शुद्ध रक्ताचा पुरवठा करणाऱ्या खुद्द हृदयालाही कार्यरत रहाण्यासाठी त्या शुद्ध रक्ताची आवश्यकता असतेच आणि त्यासाठी त्या हृदयातीलच शुद्ध रक्त हृदयाला पुरविण्याची व्यवस्था जशी परमेश्वराच्या नियतीत निसर्गानेच करुन ठेवलेली आहे, त्याचप्रमाणे सर्वांना खऱ्या व शुद्ध प्रेमाचा अनुभव देणाऱ्या कृष्णालाही त्या प्रेमाची आवश्यकता होतीच. अशा खऱ्या प्रेमाचा अनुभव त्याला कोणी आणून दिला की नाही? कृष्णाचेच शुद्ध प्रेम घेऊन कोणीतरी तेच प्रेम भक्तिभावाने कृष्णाला अर्पण केले की नाही ? ”

कोमल
प्रकाशन



# कृष्णपरमात्मा

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकाला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे.

ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते.

मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कृष्णपरमात्मा


## लेखक : श्रीपरमानंदस्वामी

प्रस्तुती : प्रतिमा आठवले

pratimathavale@gmail.com


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन १८ मार्च २०१८





नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून

उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गुज

# कृष्ण परमात्मा

## भाग ७


**श्री.अविनाश मोरेश्वर लिमये**

**एम.एस्सी.**

**उर्फ**

**श्रीपरमानंदस्वामी**



**सर्व हक्क स्वाधीन :**

सौ.अनुपमा अविनाश लिमये

१३, नवलकर बिल्डिंग, न.चिं.केळकर रोड,

दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८

दूरध्वनी : ०२२ - २४३६ १५१४

मोबाईल : ९९६९८ ७६८५०


## अनुक्रमणिका

३४. द्रौपदीचा निर्णय

३५. अर्जुन-द्रौपदी सहजीवन

३६. इंद्रप्रस्थ निर्माण

३७. धर्मराजाची द्‌युतात हार

३८. पुनश्च द्‌युत

३९. द्रौपदीची अवहेलना आणि तिचे लज्जारक्षण

४०. कृष्णभक्त भीष्म

४१. कौरव-पांडव युद्ध



# द्रौपदीचा निर्णय

धर्मराजाचे बोलणे चालू असताना सर्वांच्याचठायी एक प्रकारची गंभीरता निर्माण झालेली होती. त्यामुळे धर्मराजाचे बोलणे संपल्यावरही गांभीर्याचेच वातावरण पसरून राहिले होते. अर्थात प्रश्नही तसाच गंभीर होता ही गोष्ट जरी खरी असली, तरी धर्मराजाच्या बोलण्याने परिस्थितीतील ताण अधिकच वाढला होता, एवढे मात्र खरे. धर्मराजा सम्यक बोलण्याचा आव जरी आणत होता तरी तो वरपांगीच होता हे स्पष्टपणे जाणवत होते. त्यामागील धर्मराजाचा हेतूही स्पष्टपणे दिसतच होता. कळत नकळतपणे तो द्रौपदीवरती एक प्रकारचा दबावच आणीत होता आणि सर्व पांडवांशीच विवाह करण्याचा फक्त एकच मार्ग तो द्रौपदीसाठी मोकळा ठेवीत होता. 'द्रौपदीच्या भावनेला महत्त्व आहे' हे एकीकडे मानभावीपणाने मान्य करीत असताना त्या भावनेचा विचार मात्र द्रौपदीने करावा असे जेव्हा धर्मराजा म्हणत होता तेव्हा 'आम्ही त्याचा विचार करणार नाही' असेच जणू त्याला सुचवायचे होते. 'आमच्या कुटुंबात सामावले जाण्याची जबाबदारी द्रौपदीची आहे. पण तिला सामावून घेण्यासाठी आम्ही आमची चौकट मात्र बदलणार नाही' हेही धर्मराजाने अगदी स्पष्टपणे निर्देश करून सांगितले होते. पांडवांच्या कुटुंबाचे ऐक्य राखण्याच्या जबाबदारीचे ओझेही धर्मराजा खुशाल द्रौपदीवरतीच टाकत होता. त्याच्या बोलण्यातील हा भावार्थ सर्वांच्याच लक्षात आला. अर्थातच अर्जुनाला तो मानवला नाही व कुंतीलाही तो तेवढासा आवडला नाही. पण धर्मराजाच्या बोलण्याला प्रतिवाद करण्याचे धैर्यबळ काही त्यांनी दाखवले नाही. इतर पांडवांनी मात्र सोयीस्कररीत्या मौन पाळण्यालाच पसंती दिली.

द्रौपदीने अपेक्षेने आधी अर्जुनाकडे पाहिले. अर्जुनाच्या नजरेतील अगतिकता द्रौपदीला जाणवली. नंतर तिने कुंतीकडे पाहिले असता तिच्या नजरेतही 'द्रौपदी आता तूच आमचे हे कुटुंब वाचव' असाच दयनीय भाव द्रौपदीला दिसला. शेवटी द्रौपदीने कृष्णाकडे पाहिले असता तिच्या लक्षात आले की कृष्ण तिच्याकडे अत्यंत प्रेमभऱ्या दृष्टीने पहात होता. कृष्णाच्या नजरेत द्रौपदीविषयी कोणत्याही प्रकारच्या दयेचा वा सहानुभूतीचा भाव नव्हता, तर कृष्ण द्रौपदीकडे अत्यंत विश्वासपूर्ण भावाने पहात होता. कृष्णाठायी द्रौपदीविषयी अत्यंत खात्री होती आणि तीच त्याच्या दृष्टीत प्रतिबिंबीत होत होती. द्रौपदीही अत्यंत प्रेमभावाने कृष्णाकडे पहात

होती. दोघांचीही नजर नजरेला मिळाली आणि त्यांची मनेही एकमेकांना कळली. कृष्णाने हलकेच त्याची मान संमतीदर्शक अशी हलवली, जी फक्त द्रौपदीच्याच लक्षात आली. कृष्णाची ती प्रेमखूण द्रौपदीला मनोमनी समजली. तिने क्षणभरच तिचे नेत्र मिटून घेतले आणि तिच्याठायीचा कृष्णाविषयीचा प्रेमभाव व श्रद्धाभाव एकवटून आला. पुढच्याच क्षणाला तिने नेत्र उघडून सर्वांवरती एक दृष्टीक्षेप फिरवला आणि द्रौपदीच्या मुखातून धीरगंभीर व अत्यंत स्पष्ट असे शब्द बाहेर पडू लागले.

“सर्वप्रथम मी कुंतीमातेला नम्रभावाने प्रणिपात करून तिचे आशीर्वाद मागून घेते. त्याचप्रमाणे धर्मराज, भीम व अर्जुन या ज्येष्ठ पांडवांना नमस्कार करून नकुल व सहदेव यांना अभिवादन करते. या सर्वांच्या शुभेच्छा माझ्या पाठीशी सदैव असाव्यात हीच नम्र विनंती. खरे तर, एका स्त्रीच्या दृष्टीने तिचा विवाह हा सर्वात महत्त्वपूर्ण असा क्षण आहे. कारण स्वतःच्या मातापित्यांचे घर सोडून ती तिच्या पतीचा हात धरून त्या पतीच्या कुटुंबात, म्हणजे तिच्या स्वतःच्याच हक्काच्या घरी कायमच्या वास्तव्यासाठी येत असते. तिच्यासाठी आता पतीचे कुटुंब हेच तिचेही कुटुंब असते आणि पतीची सेवा करून त्याच्या सर्व कुटुंबाचे हित व स्वास्थ्य राखणे, हे तर तिचे कर्तव्यकर्मच असते. माझ्या भाग्यानेच मला अर्जुनासारखा पती व असे कुटुंब लाभत आहे की ज्या कुटुंबामध्ये ऐक्य हे विशेषत्वाने स्थायीभाव आहे. त्या भाग्यापासून मी मुळीच वंचित होऊ इच्छित नाही. त्याचबरोबर या माझ्या कुटुंबाचे ऐक्यही माझ्यामुळे कायम राहील हे बघण्याची जबाबदारीही माझीच आहे आणि तिचा मी स्वीकारही करते. आपल्या या कुटुंबात मी प्रेमाने अगदी सहजपणे सामावून जाईन असा मला पूर्ण विश्वास आहे. परंतु त्यासाठी तुम्ही सर्वांनी मला सहकार्य करावे आणि मला प्रेमाने तुमच्यामध्ये सामावून घ्यावे अशी मी तुम्हा सर्वांनाच नम्रभावाने विनंती करते.

अहो धर्मराज, तुमचे तुमच्या मातेवरील व बंधूंवरील असलेले प्रेम मी जाणून आहे. मातेचे मनःस्वास्थ्य व कुटुंबाचे हित याचाच तुम्ही नेहमी विचार करीत असता आणि त्याचीच काळजी तुम्हाला सदासर्वकाळ असते हेही मला ठाऊक आहे. म्हणूनच माझ्याठायी तुमच्याविषयी अत्यंत आदराची भावना आहे. स्वधर्माचरणातील तुमची तत्परता आणि आग्रह आणि त्यासाठी सर्वाचा त्याग करण्याची असलेली तुमच्या मनाची तयारी, ही तर एक अनन्यसाधारण व अत्यंत दुर्मिळ अशी गोष्ट आहे. म्हणूनच तुमच्या सज्जनत्वाची सर्वत्र विशेष ख्याती आहे. तुमचे सर्व बंधूही तुमच्याच संस्कारात वाढलेले आहेत आणि सर्वच बाबतीत ते तुम्हालाच अनुसरणारे आहेत, हेही मी जाणून आहे. असे पती जर मला लाभणार



असतील तर माझ्यासाठी त्याहून दुसरी कोणतीही भाग्याची गोष्ट असणे शक्यच नाही.

अहो धर्मराज, पती हा तर आपल्या पत्नीचे रक्षण व पालनपोषण करणारा आणि तिला सतत आधार देणारा असतो हे आपणही जाणूनच आहात. माझ्या आधारासाठी, रक्षणासाठी व पालनासाठी जर मला पाच पराक्रमी पुरूष लाभत असतील, तर मी तरी माझ्यासाठी ते वरदानच मानेन. त्यामुळे आपल्या पाचही जणांना पती म्हणून स्वीकारण्यात मला आनंदच होईल आणि मला तो माझा गौरवच वाटेल. माझ्याठायी आणखीन एका गोष्टीची पूर्ण खात्री आहे की तुमच्यासारख्या सत्प्रवृत्तीच्या जनांचे मन हे पूर्णतः निर्मळ व स्वच्छ असते. त्याठिकाणी कोणतेही विकार नसतात. त्यामुळे तुमच्या मनामध्ये माझ्याविषयी कोणतीही वासना असणे शक्यच नाही. माझ्याकडे तुम्ही वैषयिक नजरेने पहातच नसल्यामुळे माझ्याकडून तुम्ही विषयसुखाची अपेक्षा करीत नसणारच, याचाही माझ्याठायी पूर्णपणे विश्वास आहे. केवळ मातेला अजाणतेपणाने दिलेला शब्द पूर्ण करण्याच्या हेतूनेच तुम्ही माझ्याशी विवाह करू इच्छित आहात, हे नक्की! तुमच्याठायी दुसरा कोणताही विचार किंवा हेतू नाही हे मी निश्चितपणे जाणून आहे. तुम्हाला माझ्याशी पतीपत्नीचे फक्त नाते जोडावयाचे आहे आणि केवळ मातेला दिलेल्या शब्दाची पूर्तीच करावयाची आहे. आपला हा शुद्ध व स्वच्छ हेतू मी ओळखून असल्यामुळेच माझे मनही निःशंक आहे. त्यामुळे अर्जुनासह तुम्हा सर्व बंधूंशी पती म्हणून पत्नीचे नाते जोडण्यामध्ये मला कोणतीही मानसिक अडचण अशी नाहीच. माझ्यासाठी तो एक सन्मानच आहे, अशीच माझ्या मनाची धारणा आहे.

अहो धर्मराज, तुम्ही धर्माचरण जाणत असल्यामुळे पत्नीधर्माची जाणही तुम्हाला असणारच. पतीची व कुटुंबाची सेवा करणे हे जसे पत्नीचे कर्तव्यकर्म आहे तसेच तिच्याठायी, पतीसाठी सर्व समर्पणाचा भावही असतो. तो भाव मात्र केवळ एकाच पुरूषाविषयी संभवतो. नाहीतर, तो अधर्मच ठरेल. परंतु तुमच्या स्वच्छ व स्पष्ट भूमिकेमुळे आणि त्यामागील शुद्ध हेतूमुळे आता माझ्यासाठी तीही अडचण अजिबात शिल्लक राहिलेली नाही. तुमच्या पत्नीकडून असे अधर्माचरण घडावे असा विचारही तुमच्या मनात येणे कधीही शक्यच नाही. तुम्ही त्यापासून मला परावृत्तच कराल आणि माझ्या धर्माचरणासाठीच मला प्रवृत्त करून सहाय्यभूतही व्हाल, याची मला पूर्ण खात्री आहे. तुमच्यावरच्या या विश्वासानेच मी तुम्हा पाचही जणांचा एकाचवेळी पती म्हणून स्वीकार करण्याचे धाडस करीत आहे. त्यामुळे माझी व कदाचित माझ्याबरोबर तुम्हा सर्वांचीच जनामध्ये केवढी तरी अवहेलना होणार आहे, हे तुम्हीही जाणून असालच. कारण सामान्य जन आपल्या

या निर्णयामागील आपले शुद्ध मन व शुद्ध हेतू कधीच जाणू शकणार नाहीत. पण म्हणूनच त्यांची काहीही पर्वा करण्याचे आपल्याला कारणच नाही. त्यातूनही लोकनिंदा सहन करण्याचे मनोबळ माझ्याठायी आहेच आणि तसेच ते तुमच्याठायीही असेलच, असा मला पूर्ण विश्वास आहे. माझा निर्णय व निश्चय झालेलाच आहे. आता तुम्हीही तसाच निर्णय घ्यावा आणि मला तुमच्या कुटुंबात सामावून घ्यावे, अशी मी तुम्हाला विनंती करते.”

द्रौपदीचे आर्जवी व निश्चयात्मक बोलणे यांचा सर्वांच्याच मनावर चांगलाच प्रभाव पडला आणि त्यांची मने थोडावेळ भारीत झाल्यासारखीच झाली. द्रौपदीच्या बोलण्यामध्ये भावना व बुद्धी यांचा सुंदर व अनोखा संगम इतक्या सहजतेने झालेला होता की कोणालाही दुसरा काही विचारच सुचेना. सर्वचजण त्यांच्या नकळतपणे द्रौपदीच्या बोलण्याशी केव्हा व कसे सहमत झाले, हे त्यांच्याही लक्षातच आले नाही. द्रौपदीच्या स्वरामध्ये जेवढी मार्दवता होती तेवढीच तिच्या बोलण्यामध्ये एक प्रकारची आर्तताही होती. सर्वांविषयीचा आदर जसा द्रौपदीच्याठायी होता तशीच तिच्या स्वतःच्या भूमिकेशीही ती ठाम होती. द्रौपदीच्या सौंदर्याने पांडव जेवढे आकर्षित झाले होते त्यापेक्षा तिच्या प्रगटलेल्या या व्यक्तिमत्त्वाने सर्व पांडव अधिक आकर्षित झाले. कुंतीच्या नेत्रातून तर द्रौपदीविषयीचा केवढातरी कौतुकभावच वहाताना दिसत होता. परंतु खरा आनंदित झाला होता, तो अर्थातच कृष्णच! द्रौपदीने तिचे बोलणे थांबल्यावरती हळूच एकदाच कृष्णाकडे पाहिले. तिला कृष्णाचे प्रेमाने भरून आलेले नेत्र दिसले आणि त्यातच द्रौपदीला सर्व सर्व पावले. परंतु खरा प्रभावित झाला होता तो धर्मराजच! द्रौपदीच्या बोलण्याने त्याच्या ठिकाणचा सद्भाव पुन्हा एकवटून वर आला होता. त्यामुळेच त्याला द्रौपदीच्या बोलण्यातील तथ्यही जाणवले. त्याचे मन वासनेकडे झुकत होते, हे धर्मराजाच्याही लक्षात आले होते. पण द्रौपदीच्या बोलण्याने जागे झालेल्या त्याच्या विवेकाने त्याच्या मनाला सावरून पुन्हा योग्य मार्गावर आणले होते आणि आता त्याचे मन योग्य दिशेने विचार करायलाही लागलेच होते. धर्मराजाच्या मनात द्रौपदीविषयी अत्यंत कौतुकाचा भाव निर्माण झाला. द्रौपदीकडे पहाण्याची एक वेगळीच दृष्टी त्याच्याठायी निर्माण झाली होती. त्याच भावाने धर्मराजाने बोलावयास सुरुवात केली.

“हे द्रौपदी, तुझ्या बोलण्यातून तुझ्यातील सुसंस्कारीत मनाचे जे दर्शन झाले त्याचे मला अत्यंत कौतुक तर वाटत आहेच, पण माझ्याठायी तुझ्याविषयी एक प्रकारची आदराची भावनाही निर्माण झालेली आहे. तुझी सम्यक विचारसरणी ऐकून मला खरेच अत्यंत तोष झाला आहे. एखाद्या गोष्टीचा सर्व अंगाने योग्य तो

विचार करून निर्णय घेताना योग्य तो समतोल राखण्याची तुझी वृत्ती, अत्यंत प्रशंसनीयच आहे. या तुझ्या स्वभावाने तू आमच्या सर्वांचीच मने जिंकली आहेस याविषयी माझ्या मनात जराही शंका नाही. कुंतीमातेलाही तुझ्या बोलण्याने विशेष समाधान झालेले आहे, हेही मला जाणवत आहे.

हे द्रौपदी, माझ्या स्वधर्माचरणाविषयी जागृत असताना मी खरे तर तुझ्या स्वधर्माचरणाला विसरतच होतो. परंतु तू मला त्याची आठवण करून दिलीस, हे बरे झाले. माझे स्वधर्माचरण राखत असताना तुझ्या स्वधर्माचरणासाठी तुला साहाय्यभूत होणे हेही माझे कर्तव्यकर्मच आहे. नव्हे, तो तर माझा स्वधर्मच आहे. त्यामुळे तुझी माझ्याकडून असलेली अपेक्षाही अगदी योग्यच आहे. तुला तुझ्या स्वधर्मापासून च्युत करून तुझ्याकडून अधर्माचे आचरण घडणार नाही याची काळजीही मीच घेतली पाहिजे, हे तुझे म्हणणेही अत्यंत रास्तच आहे.

द्रौपदी, मनाचा शांतपणा व बुद्धीचा समतोल राखून तू घेतलेला हा निर्णय अत्यंत सम्यक आहे. त्यामुळे सर्वांनाच त्यांचा त्यांचा स्वधर्म राखता येणार आहे आणि योग्य ते आचरण करणे शक्य होणार आहे. तुझ्या निर्णयानुसारच सर्व काही होईल असे मी तुला आम्हा सर्वांच्याच वतीने आश्वासन देतो. अर्जुन हाच तुझा संबंधाने पती राहील व आम्ही बंधू हे केवळ तुझ्याशी नात्याने पती म्हणून राहू. अर्थात तुझे पालन व रक्षण करण्याची जबाबदारी आम्हा सर्वच बंधूंची राहील, हे निश्चित आणि ती जबाबदारी आम्ही कोणत्याही परिस्थितीत, वेळप्रसंगी अगदी आमचे प्राणही पणाला लावून पार पाडूच पाडू. हे मी तुला आम्हा सर्व बंधूंच्या वतीने व आमच्या मातेच्या साक्षीने वचन देत आहे.

हे द्रौपदी, मला तुझ्या बोलण्यातील एका गोष्टीचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे, आमच्याठिकाणी तुझ्याविषयी कोणतीही वासनात्मक दृष्टी नाही याचा तू धरलेला भरवसा. खरे सांगायचे झाले तर, आमच्याठिकाणी तुझ्याविषयी अजिबात वासनात्मक दृष्टी नव्हतीच असे म्हणण्याचे धाडस, मी तरी करू शकणार नाही. तुझ्या सौंदर्याची व व्यक्तिमत्त्वाची भुरळ आमच्या मनाला पडली असण्याची शक्यता मी तरी नाकारू शकत नाही. परंतु एक गोष्ट मात्र तेवढीच खरी आहे की तुझ्या मधुर पण तेवढ्याच तेजस्वी वक्तव्यातून जे तुझ्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष अंग प्रगट झाले, त्यामुळे माझे मन निश्चितच स्वच्छ व निर्मळ झालेले आहे. आता माझे मन तुझ्याविषयीच्या फक्त आदराने व कौतुकानेच भरलेले आहे. आमच्या कुटुंबात यापुढे केंद्रस्थान तुलाच राहिल आणि त्यामुळेच आमच्या कुटुंबाचे ऐक्यही पूर्णपणे टिकून राहिल अशी खात्री आम्हा सर्वांचीच झालेली आहे. तसेच ते होवो व तसेच ते राहो एवढीच माझी प्रार्थना त्या परमेश्वराच्या चरणी आहे.”

धर्मराजाचे बोलणे संपले आणि सगळीकडे फक्त शांतताच पसरून राहिली. परंतु त्या शांततेत आता कोणत्याही प्रकारचा तणाव नव्हता, तर ती शांतता अत्यंत सुखद जाणवत होती. अर्थातच सर्वात जास्त सुखावली ती कुंतीच! द्रौपदीच्या बोलण्याने कुंतीच्या ठायी आशा निर्माण झालेली होती, पण धर्मराजाच्या बोलण्याने कुंती एकदम निश्चिंत झाली. तिने तिच्या इतर पुत्रांकडे पाहिले असता सर्वांच्याच चेहऱ्यावरचे समाधान तिला दिसले. अर्जुन हा अर्थातच अधिक आनंदित झालेला होता. कुंती मग क्षणाचाही विलंब न लावता द्रौपदीच्या जवळ आली आणि तिने द्रौपदीला जवळ घेऊन द्रौपदीच्या मस्तकाचे प्रेमाने अवघ्राण केले. द्रौपदीने कुंतीला वाकून नमस्कार केला आणि त्यानंतर एकेकाच्या जवळ जाऊन सर्व पांडवांनाही अभिवादन केले. सर्वांचे आशीर्वाद घेऊन द्रौपदी जेव्हा कृष्णाच्या जवळ आली, तेव्हा कृष्णाने तिचे दोन्ही हात हातात घेऊन तिचे अभिनंदन केले. कृष्ण व द्रौपदी यांचे नेत्र क्षणभरच एकमेकांना मिळाले खरे, पण तेवढ्या वेळातच कृष्णाच्या मुखावरून ओसंडून नेत्रातून वहाणारा आनंद द्रौपदीने पाहिला आणि तिला अत्यंत कृतकृत्य वाटले. कृष्णाने जेव्हा द्रौपदीच्या नेत्रात पाहिले तेव्हा त्याला तेथे दिसले ते फक्त अश्रू, अश्रू आणि केवळ अश्रूच!”

सगुण प्रेमभक्तीचे गायन करीत असताना नारदाचे अंतःकरणही नारायणाच्या सगुणप्रेमाने भरून आले आणि त्याचे शब्दही अस्पष्ट होत होत अखेर थांबलेच. नारदाच्या दाटून आलेल्या कंठातून बाहेर पडणे जणू त्या शब्दांना शक्यच होईना आणि मग ते शब्दही नारदाठायी दाटून राहिलेल्या सगुणप्रेमात जराही आवाज न करता अलगदपणे विरघळूनच गेले. पण नारदाच्या भक्तीगायनाचे श्रवण करीत असलेल्या लक्ष्मीठायीच्या सगुण प्रेमभक्तीचा भाव मात्र एवढा दाटून आला की त्या भावाला शब्दरूपाने बाहेर येणे भागच पडले.

“अरे नारदा, या द्रौपदीने तर कमालच केली. कुंतीसह सर्वच पांडवांची मने तर तिने राखलीच, पण मुख्य म्हणजे तिने कृष्णाच्या अंतःकरणाला प्रसन्नता दिली ही माझ्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. किंबहुना ‘द्रौपदीने सर्वांची मने राखून स्वतःचे ध्येय प्राप्त करून घेतले आणि ते करीत असताना सर्वांचा मान राखून स्वतःचे स्वत्वही कायम ठेवले’ याच गोष्टीने कृष्ण द्रौपदीवरती प्रसन्न झाला असणार, याची मला तरी पूर्ण खात्री आहे. द्रौपदीने मुख्यतः धर्मराजाला उद्देशून जे बोलणे केले त्यातून तर तिच्याठायीचे केवढे तरी बुद्धिचातुर्यच प्रगट झाले. एवढेच नव्हे, तर तिने जे धर्मराजाच्याही सद्भावाला आवाहन करून जागृत केले, त्याला तर दुसरी तोडच नाही. त्यामुळे द्रौपदीने धर्मराजासह सर्वांचीच मने जिंकली यात



नवल ते काय? अर्थात धर्मराजानेही स्वतःला वेळीच सावरले आणि त्याने द्रौपदीचे म्हणणे मान्य करून त्याला संमती दिली, यासाठी मला धर्मराजाचेही कौतुक वाटत आहे. अर्थात द्रौपदीच्या मुद्देसूद बोलण्यापुढे धर्मराजाचेही काही चालले नाही हे जरी खरे असले तरी सर्व कळूनही धर्मराजाने स्वतःच्या मनाचा हट्ट धरून न ठेवता तो सोडला ही गोष्टही साधी नाही, तर तीही विशेषच आहे. कारण स्वतःची चूक कळून आल्यानंतरही ती त्वरित सुधारण्यासाठी जसे धैर्यबळ लागते तसाच मुळात मनाचा चांगुलपणाही असावा लागतो, ही गोष्टही तितकीच खरी आहे. धर्मराजाच्या सज्जन वृत्तीमुळेच हे घडले असे मला निश्चितपणे वाटते. कारण सज्जनात जसे कमतरतेचे दोष आहेत तसेच चांगलेपणाचे गुणही आहेतच ना! आणि नेमके तेच गुण धर्मराजाठायी अगदी योग्य वेळी वर आले म्हणूनच त्या सर्व प्रसंगाचा शेवट सर्वांनाच सुखकर झाला, ही गोष्ट अगदी खरीच आहे. या सर्वांमध्ये कोण हरले आणि कोण जिंकले यापेक्षा द्रौपदीचा विजय झाला ही गोष्ट मात्र नक्की! सर्वात महत्त्वाची गोष्ट द्रौपदीने हा विजय एकटीनेच मिळवला. ना तिला अर्जुनाचे साहाय्य झाले ना तिला धर्मराजाची वा आणखीन कोणाची प्रत्यक्ष मदत झाली. अगदी कृष्णही तेथे केवळ साक्षीरूपानेच होता हे खरेच आहे. होय ना?

हे नारदा, द्रौपदीने तिच्या मनातील भावबळाने व बुद्धीच्या कौशल्याने तिच्या विवाहासंबंधीचा केवढा तरी मोठा तिढा सोडवला, ही गोष्ट खरी आहे. पण त्यामुळे सर्व काळजी दूर झाली असे मला तरी वाटत नाही. द्रौपदीचा वैयक्तिक पातळीवरचा प्रश्न जरी सुटला तरी इतर काही महत्त्वाचे प्रश्न शिल्लक राहिलेच होते आणि आणखीनही काही प्रश्न पुढे उभे रहाणारच होते हेही निश्चितच होते. मुख्य म्हणजे, द्रौपदीचे मातापिता व इतर कुटुंबीय मंडळी यांना हा पाच पतींचा प्रस्ताव मानवणे व त्यांनी तो स्वीकारणे हे केवळ कठीणच नव्हे, तर जवळ जवळ अशक्यच होते. त्यांची समजूत पटणेही अवघडच होते. त्याचप्रमाणे पांडवांच्या बाजूनेही अडचण होतीच. जरी काही कारणामुळे पांडवांनी हस्तिनापुर सोडले असले तरी मला वाटते पुन्हा त्यांना तेथे परत जावे लागले असणारच आणि तेव्हा त्यांचीही पंचाईत झाली असणारच ना? कारण त्यांच्याही संबंधितांना ही जगावेगळी पाच पतींची गोष्ट कशी काय मान्य झाली असती? मला तरी ते अशक्यच वाटते. कारण नैतिकतेचा हा प्रश्न नेहमीच पांडवांचा पिच्छा पुरवणार होता. तेव्हा या सर्व अडचणींतून द्रौपदीने आणि आता तिच्यासंगे असलेल्या पांडवांनीही कसा व काय मार्ग काढला असणार हाच खरा प्रश्न माझ्या मनाला सतावीत आहे. अर्थात स्वतः कृष्ण त्यांच्या बरोबर असल्यामुळे तसे काळजीचे काही कारण नव्हतेच.

हे नारदा, परंतु मला खरी काळजी वाटत आहे ती एकाच गोष्टीची की द्रौपदीने तरी हे पाच पतींचे गणित कसे सोडवले असणार आणि प्रत्यक्षात कसे जमवले असणार याची. कारण अत्यंत जगावेगळी घडलेली ही गोष्ट योग्य प्रकारे निभावून नेता येणे, ही साधी गोष्टच नाही. त्यासाठी केवळ बुद्धीचे चातुर्य कामाला येणे हे शक्यच नाही. तेथे केवढे तरी भावबळ व विवेकच हवा. कारण 'नात्याचे पती' व 'संबंधाचा पती' असे म्हणणे सोपे आहे, पण प्रत्यक्षात तसा फरक वागण्यात करता येणे फारच कठीण आहे. ती तर एक तारेवरील कसरतच होईल आणि मग योग्य तो समतोल राखता येणे अवघडच होईल. कारण नाते व संबंध यातील फरक दर्शवणारी ही सीमारेषा कोणी ठरवायची आणि कोणी काढायची? तो फरक तर अत्यंत सूक्ष्मच आहे. त्यामुळे त्या सीमारेषेचे उल्लंघन कळत नकळतपणे होण्याची शक्यता तर अधिकच आहे. बरे, इतर पांडवांची फक्त सेवा करण्याचे जरी द्रौपदीने ठरवले तरी त्यावेळी प्रत्यक्ष शारीरिक जवळीक ही होणारच आणि मग त्या सीमारेषेचे उल्लंघन होण्याची शक्यताही साहजिकपणे वाढणारच. खरेच, द्रौपदीने एक गुंता सोडवताना दुसरा गुंता निर्माण केला असे तर झाले नाही ना? मला तर द्रौपदीची फारच काळजी वाटायला लागली आहे आणि तिची दयाही येऊ लागली आहे. नारदा, कृपा करून माझ्या मनातील ही विचारांचा होऊ पहाणारा गुंता तो होण्याच्या आधीच तू माझ्या विचारांत योग्य ती सुसूत्रता आण बघू. त्याशिवाय माझ्याकडून श्रवणभक्ती घडण्याची जराही शक्यता नाही."

लक्ष्मीच्या मनाची अवस्था जरी थोडीशी केविलवाणी झाल्यासारखी दिसत असली तरीही तशी ती अवस्था मुळातील द्रौपदीविषयीच्या कळवळयातून निर्माण झालेली होती ही गोष्ट नारद जाणून होता. त्यामुळे लक्ष्मीच्या मनाची अस्वस्थता त्वरित दूर व्हावी या हेतूने नारदाने तिच्याशी लागलीच बोलण्यास सुरुवात केली.

"हे लक्ष्मी, तू द्रौपदीची व्यथा केवळ समजतच नाही आहेस तर ती व्यथा तू अनुभवीतही आहेस, आणि ते अगदी साहजिकही आहे. कारण तुझ्या अंतःकरणातील भावपूर्ण अवस्थेचेच ते लक्षण आहे. परंतु एक मूलभूत व महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव की भक्तिभावातील व्यथा या मनाला अधिकच बलवान व धैर्यवान करतात. त्या अवस्थेतही मन हे पूर्णपणे शांत असते. त्याठायी कोणत्याही प्रकारची चलबिचल नसते. बुद्धीठायीचा बोधही जागृत असतो. त्यामुळेच अडचणीतूनही मार्ग हा दृष्टोत्पत्तीस येतोच आणि त्या मार्गाने विवेकाने जाऊन मन परिस्थितीतून सुखरूपपणे बाहेर येतेच. एवढेच नव्हे, तर प्रसंगाच्या निमित्ताने ईश्वरी माहात्म्यच अधिक अनुभवाचे होते आणि शेवटी सांगायला एकीएक ईश्वराच्या भक्तीचा



आनंदच शिल्लक रहातो. द्रौपदीनेही हाच अनुभव घेतला आणि तिला तिच्याठायी कृष्णाच्या अस्तित्वाचीच जाणीव हळूहळू होऊन वाढू लागली.

हे लक्ष्मी, द्रौपदीला कृष्ण हा प्रत्यक्षपणे तिच्या जीवनात हवा होता. पण पुढे जीवनातील प्रत्यक्ष अनुभवाने तिच्या लक्षात आले की कृष्ण हा बाह्यांगाने प्रत्यक्ष जीवनात असणे, नेहमीच शक्य होईल असे नाही. अर्थात तसे व्हावे म्हणून द्रौपदीचा सततचा प्रयत्न असेच. परंतु जर तसे घडू शकले नाही तर सुरुवातीला द्रौपदीला निश्चितच वाईट वाटत असे किंवा ती निराश व उदासीनही होत असे. काहीवेळा तर तिला कृष्णाचा रागही येत असे. पण जेव्हा द्रौपदीला वस्तुस्थिती हळूहळू लक्षात येऊ लागली तेव्हा मात्र, प्रत्यक्ष परिस्थितीत स्वतःच बळ घेऊन त्यातून मार्ग काढणे हे द्रौपदीला भागच पडू लागले आणि तिला त्यात हळूहळू यशही येऊ लागले. त्यामुळेच द्रौपदीलाही तिच्या मनात भरून राहिलेल्या व बुद्धीठायी निश्चयाने स्थिर होऊन राहिलेल्या कृष्णाचे अस्तित्व जाणवू लागले. द्रौपदीने तिच्या विवाहासंबंधीचा घेतलेला निर्णय हा जणू तिला पुढे येणाऱ्या अनुभवाची सुरुवातच ठरली.

हे लक्ष्मी, कृष्णाने द्रौपदीच्या अर्जुनाशी योजलेल्या विवाहात जेव्हा अशा अडचणी आल्या की त्यावर प्रत्यक्ष कृष्णाचाही काही इलाज चालेना आणि बाह्यांगाने द्रौपदीसाठी काही मदत करणेही त्याला शक्य होईना, तेव्हा द्रौपदी अजिबात डगमगली नाही किंवा तिने कोणालाच दोषही दिला नाही, म्हणजे अगदी कृष्णालाही दिला नाही. द्रौपदीच्या एक गोष्ट अचूकपणे लक्षात आली की आता तिचाच निश्चय होणे आणि तिनेच निर्णय घेणे आवश्यक आहे. कृष्णाची योजना पूर्ण करण्याची जबाबदारी आता पूर्णपणे तिचीच आहे, हे द्रौपदीने बरोबर ओळखले आणि शांतपणे व थोड्याशा चातुर्याने कृष्णाचा संकल्प सिद्धीस नेला. खरेच, तू म्हटल्याप्रमाणे कोणालाही हरल्याची जाणीव होऊ न देता द्रौपदीने सर्वांना जिंकूनच घेतले. पण या विजयाचे श्रेय मात्र तिने सर्वस्वी कृष्णालाच दिले, ज्याच्या प्रत्यक्ष साक्षीतच हे सर्व घडले आणि म्हणून कृष्णालाही द्रौपदीच्या या भावबळाचाच अत्यंत आनंद झाला. कारण कृष्णाने द्रौपदीच्या मनाद्वारे तिच्या अंतःकरणात पदार्पण केल्याचेच ते शुभलक्षण होते. अर्थातच कृष्णाच्या अस्तित्वाने द्रौपदीचे सर्व अंतःकरणच व्यापून रहाण्यासाठी आणखीन बराच काळ जाणे व जीवनातही अजून बऱ्याच परिस्थितीला सामोरे जाऊन अनुभव घेणे आवश्यक व बाकी राहिले होतेच. परंतु द्रौपदीने तिच्या पुढील जीवनात असा अनुभव घेतला हे मात्र नक्की! त्याचबरोबर कृष्णाला प्रत्यक्ष जीवनात बाह्यांगानेही ठेवण्याचे आटोकाट प्रयत्नही द्रौपदीकडून अगदी सहजपणे घडत असत. द्रौपदीच्या कृष्णावरील व्यक्तिगत प्रेमाचे व भक्तिभावाचेच ते लक्षण होते.

हे लक्ष्मी, तुला वाटते त्याप्रमाणे द्रौपदीचा विवाह प्रत्यक्ष होण्यासाठी अजूनही काही अडचणी शिल्लक होत्या, ही गोष्ट खरीच आहे. परंतु मुख्य तात्त्विक अडचण दूर झाल्यामुळे इतर अडचणी दूर करणे हे सहज शक्य होते. कारण मुळात द्रौपदीचा विवाहाचा निश्चय हा ठाम झालेला होता. अर्थात त्याही अडचणी तशा साध्या नव्हत्याच. पहिली सर्वात मोठी अडचण म्हणजे द्रौपदीच्या मातापित्यांची संमती मिळवणे. कृष्णाने व द्रौपदीने त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलून त्यांची योग्य ती समज करून दिली. तशी त्यांची समजूत पटणे तर शक्यच नव्हते. परंतु द्रौपदीच्या निश्चयापुढे तिच्या मातापित्यांचाही नाईलाजच झाला आणि त्यांनी मग द्रौपदीच्या पाठीशी उभे रहाण्याचा निर्धार केला. त्यांच्या इतर नातेवाईक व संबंधितांचा विरोध हा अपेक्षित व साहजिकच होता. परंतु द्रुपदाला त्या सर्वांकडे दुर्लक्ष करण्यावाचून दुसरे गत्यंतरच नव्हते आणि तसेच त्याने निश्चयपूर्वक केलेही.

हे लक्ष्मी, पांडव तर निदान त्यावेळी तरी त्यांच्या सर्व आप्तमंडळींपासून दूरच झालेले होते आणि प्रत्यक्ष व्यासांची, अप्रत्यक्ष संमती त्यांनी प्राप्त करून घेतलेली होती. त्यामुळे पांडवांसाठी तरी तशी काहीच अडचण नव्हती. मुख्य म्हणजे स्वतः कृष्ण जातीने पांडवांच्या बरोबर होता आणि त्यांना सक्रिय साहाय्य करीत होता. एवढेच नव्हे, तर उभय पक्षांमधील मध्यस्थाची भूमिकाही कृष्ण अत्यंत चोखपणे बजावीत होता. त्यामुळे द्रौपदीचा सर्व पांडवांशी विवाह विधीपूर्वक व्यवस्थित पार पडला. अर्थात प्रत्यक्ष विवाह लावणाऱ्या विप्रांनाही निश्चित काय विधी करावा याचा संभ्रम पडलाच. कारण अशा प्रकारचा विवाह जगाच्या इतिहासातही प्रथमच होत होता. त्यामुळे त्या विवाहाला शास्त्राधार असा नव्हताच आणि म्हणून त्या विप्रांच्या मनाचा गोंधळ होणेही साहजिकच होते. परंतु त्यावेळीही कृष्णानेच पुढाकार घेऊन त्या विप्रांशी धर्मशास्त्राविषयी सविस्तर चर्चा केली आणि त्यातून योग्य तो मार्ग काढलाच. कृष्ण हा धर्मशास्त्रातील गाभाच जाणत असल्यामुळे त्याने धर्मशास्त्राचा लावलेला अर्थ त्या विप्रांना पटला आणि तो मान्य करणे त्यांनाही भागच पडले.

पांडवांनी विवाहानंतर कुठे जावे असा प्रश्न होताच. परंतु कृष्णानेच पांडवांना हस्तिनापुरलाच परत जाण्याची आग्रहाची सूचना केली. बऱ्याच विचारांती धर्मराजासह सर्व पांडवांना ती सूचना मानवली आणि कुंती आणि द्रौपदी यांच्यासह सर्व पांडव हस्तिनापुरला परत आले. पांडवाच्या पुनरागमनाचा सर्वात अधिक आनंद कोणाला झाला असेल तर अर्थातच तो भीष्मांना झाला. पांडवांच्या सज्जनत्वाची पूर्ण जाणीव असलेल्या भीष्मांचा पांडवांवरती विशेषच लोभ होता, ही गोष्ट खरीच होती. बाह्यांगाने मात्र, तसे ते एरव्ही जरी दाखवत नसले तरीही त्यांचा आनंद लपून राहिला नाहीच. मग धृतराष्ट्रालाही वरकरणी का होईना पण आनंद झाल्यासारखे दाखवून पांडवांचे स्वागत करावेच लागले. पांडवांचा सदैव



दुःस्वास व द्वेष करणारा दुर्योधन मात्र केवळ नाराजच झाला असे नाही, तर तो मनातून अत्यंत चिडलाही. कारण पांडव त्या लाक्षागृहात निश्चितच जळून मरण पावले असणार याची खात्री बाळगून असणाऱ्या दुर्योधनाचा कुटील डाव उधळला गेला होता आणि त्याने आखलेले सर्व मनसुबेही धुळीला मिळाले होते. परंतु दुर्योधनाच्या ठायीची सूडाची आग अजूनही तशीच धगधगत होती. पांडवांना पूर्णपणे नेस्तनाबूत करण्याचा त्याचा निश्चय कायम होता. फक्त त्यासाठीच्या कारणाची तो वाट पहात होता आणि त्याला नेमके ते कारण द्रौपदीच्या रूपाने मिळाले.

धृतराष्ट्राने पांडवांचे पुनरागमन झाल्याच्या निमित्ताने एक स्वागत समारंभ योजला होता. त्यावेळी दुर्योधन नाईलाजानेच व केवळ एक औपचारिकता म्हणून हजर राहिला होता. त्यावेळेस जेव्हा त्याची नजर द्रौपदीवरती गेली तेव्हाच तो तिच्या सौंदर्यावर भाळला आणि मनातून घायाळ झाला. कर्णाने त्याला आधीच तशा कल्पना दिलेली होतीच. दुर्योधनाने मुद्दामहून पुढे होऊन द्रौपदीशी लघळपणा दाखवून थोडीशी लगट करण्याचा प्रयत्न केला. परंतु द्रौपदीने तेजस्विता दाखवून जेव्हा त्याची योग्य जागा दाखवून दिली तेव्हा त्याच्याठायीच्या रागाच्या अग्नीत तेलच पडल्यासारखे झाले आणि त्याचा राग भडकलाच. तेव्हाच दुर्योधनाने द्रौपदीचा नक्षा व ताठा पूर्णपणे उतरवण्याचा मनातल्या मनात जणू चंगच बांधला. द्रौपदीने जणू नकळतपणे सापाच्या शेपटीवरतीच पाय ठेवला होता आणि सापाने फणा वर करून विषारी फुत्कार टाकला होता. दुर्योधनाला आता पांडवांचे वर्मस्थान सापडले होते आणि पांडवांचा छळ करण्याचे आणखीन एक कारण त्याच्या हाती लागले होते. त्यासाठी लागणारे दूषित मन व त्या जोडीला बुद्धीची हुषारी या दोनही गोष्टी तर दुर्योधनाच्या ठायी आधीपासूनच होत्या. पांडवांवर पुढे येऊ घातलेल्या संकटांच्या मालिकेची ही जणू नांदीच झालेली होती."

नारदाचे बोलणे ऐकता ऐकता लक्ष्मीच्या मुखावर दुःखाची व एक प्रकारच्या भीतीचीच छाया पसरत होती आणि ते नारदाच्याही लक्षात आल्यावाचून राहिले नाही. तेव्हा लागलीच नारदाने त्याचे बोलणे थोडेसे प्रयत्नपूर्वकच आवरते घेतले आणि तो लक्ष्मीकडे साभिप्राय नजरेने पहात राहिला. नारदाचे ते पहाणे लक्ष्मीच्याही लक्षात आले. लक्ष्मीने बराच वेळ प्रयत्न करूनही तिला काहीही बोलता येणे शक्य होत नव्हते. पण तिने शेवटी प्रयत्नपूर्वक बोलावयास सुरूवात केलीच, कारण न बोलणेही तिला शक्य होत नव्हतेच.

"अरे नारदा, द्रौपदी तिच्या जीवनातील अत्यंत संघर्षमय प्रसंगातून सुखरूपपणे व यशस्वीरित्या बाहेर पडली याचा आनंद मला होतोय न होतोय तोच, तू द्रौपदीच्या पुढील जीवनातील संकटाचे सूतोवाच केलेसच. त्यामुळे माझ्याठायी

एक प्रकारची उदासीनता व थोडीशी भीतीही निर्माण झालीच. अर्थात असे संकटाचे प्रसंग जेव्हा द्रौपदीच्या जीवनात आले असतील तेव्हा द्रौपदी कृष्णाच्या मार्गदर्शनाने व तिच्या भावबळाने त्या प्रसंगातून तरून गेली असणारच, याची मला पूर्ण खात्री आहे. पण नारदा, माझी तुला एक नम्र विनंती आहे. एकदम संकटासारख्या कठीण व दुःखद प्रसंगाचे वर्णन करण्याच्या आधी तू मला काही सुखद व आनंदाचे प्रसंग सांगण्याचे करशील की नाही? जीवन म्हणजे सुखदुःखाच्या प्रसंगांची एक मालिकाच आहे आणि सुखानंतर दुःख व दुःखानंतर सुख अशीच जर क्रमवारी असेल तर मला वाटते, आता काही सुखाच्या प्रसंगांचा क्रम निश्चितच आहे. होय की नाही? माझ्याठायी तर द्रौपदीचे तिच्या सर्व पतींशी संबंध, त्यातूनही अर्जुनाशी तिचा असलेला विशेष संबंध, कुंतीचे व तिचे नातेसंबंध या सर्वांविषयी ऐकण्याची उत्सुकता, अत्यंत शिगेला पोहोचलेली आहे. कारण द्रौपदीने तिच्या जीवनात घेतलेला हा विशेष व थोडासा विचित्रच असा निर्णय प्रत्यक्ष अमलात आणताना तिचे केवढे तरी कौशल्यच पणाला लागलेले असणार, याची मला अगदी खात्री आहे. शांत मनाने व कौशल्याने सर्व करून द्रौपदीने सर्वांनाच तोष दिला असणार हेही नक्कीच आहे. पण मला ते अगदी सर्व सर्व जाणून घ्यायचे आहे.”

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारद अगदी मोकळेपणाने हसला आणि त्याने कौतुकाने मान डोलावली. क्षणभरच नारदाने त्याचे नेत्र मिटून घेतले, पण फक्त क्षणभरच! त्याच्याठायीही द्रौपदीच्या कौतुकाचा भाव होताच आणि द्रौपदीचे कौतुक हे तर कृष्णाचेच माहात्म्य होते, हे जाणून असलेल्या नारदालाही मग स्वस्थ रहावलेच नाही आणि त्याच्या मधुर वाणीतून सगुण प्रेमभक्तीचे माहात्म्य प्रगट होऊच लागले.

“हे लक्ष्मी, कृष्णाच्या प्रेमळ सहवासामुळे व कृष्णाच्या सांगण्याच्या प्रभावामुळे द्रौपदीच्या ठायी शांतपणा व निश्चयात्मकता हे दोन्ही गुण उतरले होते. तेच तिच्या स्वभावाचे वैशिष्ट्यही होऊन राहिले होते. द्रौपदीने तिच्या सौंदर्याने सर्व पांडवांची मने आधीच वश करून घेतली होतीच. परंतु तिच्या या विशेष स्वभावामुळे सर्व पांडवांवरती द्रौपदीचाच प्रभाव रहात असे. द्रौपदीने ठरवलेला निर्णय हाच अंतिम समजून सर्वजण त्याप्रमाणेच वागत असत. द्रौपदीचे मन राखण्यातच सर्व पांडवांना धन्यता वाटत असे. अर्थात तीही सर्वांशीच मिळून मिसळून वागत असे आणि सर्वांच्या अडचणीही समजून घेत असे. प्रत्येकाच्या स्वभावाचा अभ्यास करावयास द्रौपदीला मुळीच वेळ लागला नाही. प्रत्येकाच्या स्वभावाचे वेगळेपण तिने अगदी अचूक हेरलेले होते आणि त्या त्या प्रमाणे



प्रत्येकाशी वागून ती सर्वांनाच तोष देत असे. सर्व पांडवांशी एकदम पत्नी म्हणून न वागता एकावेळी एकाच पांडवाशी सहवास करण्याचा निर्णयही तिनेच अत्यंत विचारपूर्वक घेतला. एवढेच नव्हे, तर वर्षाचा काळ पाच जणांमध्ये समसमान वाटून देऊन, प्रत्येकाबरोबर साधारण सव्वादोन ते अडीच महिने रहाण्याचे द्रौपदीनेच ठरवले. त्याचप्रमाणे द्रौपदी जेव्हा रजःस्वला असेल त्यावेळी ती स्वतंत्रपणे एकटीच राहिल असाही निर्णय द्रौपदीने स्वतःच घेतला. मुख्य म्हणजे सर्व पांडवांनी द्रौपदीच्या निर्णयाला एकमुखाने व आनंदाने संमती दिली. कुंतीलाही त्याचे अत्यंत समाधान झाले. कारण तिला जी नेहमी तिच्या पुत्रांच्या ऐक्याची काळजी वाटत होती, ती तिची काळजी द्रौपदीने मोठ्या कौशल्याने दूर केली होती.

हे लक्ष्मी, कुंतीशीही अत्यंत मोकळेपणाने संबंध निर्माण करण्यामध्ये द्रौपदी यशस्वी ठरली. अर्थात त्याचे तेवढेच श्रेय कुंतीलाही द्यावयास हवे. जसे कन्या परक्याचे धन आहे असे म्हटले जाते, तसेच आपल्या घरात आलेली सून हे आपले धन असते ही गोष्टही तितकीच खरी आहे. नेमकी हीच गोष्ट कुंती जाणून होती. त्यामुळे तिने द्रौपदीकडे स्वतःची पोटची कन्या याच दृष्टीने पाहिले आणि तसेच वागवलेही. कुंतीने स्वतःच्या व्यक्तिगत जीवनात अत्यंत हालअपेष्टा सहन केल्या होत्या. परंतु त्याची झळ द्रौपदीला लागणार नाही किंवा तशी वेळ द्रौपदीवरती येणार नाही याची कुंती अत्यंत काळजी घेत असे. द्रौपदीच्याही भावना जाणून घेऊन कुंती तिला नेहमीच सामावून घेत असे. त्यासाठी वेळप्रसंगी कुंती स्वतःमध्येही बदल करण्यासाठी तयार असे. हे तिच्या स्वभावातील वेगळेपण निश्चितच आगळे व दुर्मिळही होते. अर्थात द्रौपदीकडूनही कुंतीला तेवढाच योग्य प्रतिसाद मिळत असे ही गोष्टही तेवढीच महत्त्वाची आहे. कुंतीचा योग्य आदर राखून व कुंतीने आत्तापर्यंत जीवनात अनुभवलेल्या कष्टांची जाणीव ठेवून द्रौपदी कुंतीशी प्रेमाने व सेवाभावाने वागत असे. कुंतीच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्याला द्रौपदी नेहमीच अग्रक्रम देत असे व तशी काळजीही घेत असे. थोडक्यात म्हणजे, कुंती व द्रौपदी यांते नाते हे सासू व सून यापेक्षा माता व कन्या असेच असल्याचे दिसत असे आणि याचे सर्वांनाच अप्रूप वाटत असे.

* * * * *

# अर्जुन-द्रौपदी सहजीवन

हे लक्ष्मी, मला माहित आहे की अर्जुन व द्रौपदी यांचे संबंध कसे असतील हे जाणून घेण्याची उत्सुकता तुझ्याठायी जास्तच असणार. कारण द्रौपदीच्या सर्वांशी असलेल्या नात्यापेक्षा तिचे अर्जुनाशी असलेले नाते अधिक जवळचे होते. अर्जुनाचे मन प्रथमपासूनच द्रौपदीवरती जडलेले होते. द्रौपदीच्या व्यक्तिमत्त्वाचा त्याच्यावरती झालेला तो प्रभाव होता. त्यातूनही द्रौपदीशी विवाह करण्याची सूचना व योजना खुद्द कृष्णाकडूनच आलेली असल्यामुळे अर्जुनाची द्रौपदीकडे पहाण्याची दृष्टी, अगदी पहिल्यापासूनच वेगळी होती. कृष्णाचे व द्रौपदीचे अगदी खास नातेसंबंध आहेत हे अर्जुनाच्या लक्षात आलेले होतेच. ते संबंध काय व कसे आहेत हे जाणून घेण्याची एक प्रकारची उत्सुकताच अर्जुनाच्याठायी होती. विशेषतः द्रौपदीने विवाहासंबंधी जो व ज्याप्रकारे निर्णय घेतला त्याचे अर्जुनाला अत्यंत कौतुक वाटले. त्यावेळी द्रौपदीकडून जे बुद्धीकौशल्य प्रगट झाले आणि तशाही परिस्थितीत द्रौपदीने जे स्वतःचे स्वत्व राखले, त्याने तर अर्जुनाच्याठायी द्रौपदीविषयी एक प्रकारचा आदरच निर्माण झाला होता.

द्रौपदी मात्र अर्जुनाकडे पहिल्यापासूनच कृष्णाच्या दृष्टीतूनच पहात होती. कृष्ण व अर्जुन यांच्या मैत्रीचे तिला विशेष कौतुक वाटत होते. तिच्या दृष्टीने तीच गोष्ट अधिक महत्त्वाची होती. अर्थात अर्जुनाचा असाधारण पराक्रम व त्याचा सरळ साधा स्वभाव याचीही जाणीव व कौतुक द्रौपदीच्या ठायी होतेच. त्याचबरोबर कृष्णाचा मित्र असला तरी अर्जुन कृष्णाचे माहात्म्य जाणत नव्हता हे द्रौपदीच्या लक्षात आले होते आणि अर्जुनाच्या साठी त्याच्या कुटुंबाची चौकट व त्यांचे ऐक्य याचे महत्व अग्रक्रमाने होते, हेही द्रौपदीला कळून चुकले होते. पण या सर्व गुणदोषांसह द्रौपदीने अर्जुनाला आपला म्हटले होते आणि जीवनात सदैव त्याची साथ देण्याचा तिचा निर्धार कायम झालेला होता. त्याचबरोबर अर्जुनाला कृष्णाचे माहात्म्य व खरे महत्त्व कळावे, असेही द्रौपदीला अगदी मनापासून वाटत होते. पण द्रौपदीने अर्जुनाशी स्वतःहून तसा विषय काढणे योग्य ठरले नसते हे द्रौपदी जाणून होती. म्हणून द्रौपदी तशी योग्य संधी मिळण्याची वाट पहात थांबली होती आणि तशी संधी तिला एकदा मिळालीही.

एकदा एकांतात अर्जुन व द्रौपदी बसले असताना त्यांचा एकमेकांशी प्रेमळ सुखसंवाद होत होता. द्रौपदी सेवाभावाने अर्जुनाला सुखवीत होती तर अर्जुन प्रेमभावाने द्रौपदीला खुलवीत होता. उभयतांच्या मनावरील सर्व ताण बाजूला झालेला होता आणि त्यांची मने अगदी अगदी हलकी फुलकी झालेली होती. मनाच्या अशा अत्यंत मोकळया अवस्थेत असताना अर्जुन अचानक द्रौपदीशी बोलू लागला.



“अगं द्रौपदी, माझ्या मनात एक प्रश्न वारंवार येत असतो आणि कित्येक दिवसांपासून तो प्रश्न तुला विचारावा असे माझ्या मनात आहे. अर्थात तो प्रश्न विचारण्यामागे माझ्या मनात कोणताही खास हेतू नाही. निर्हेतुकपणे का होईना, पण माझ्या मनात एक उत्सुकता मात्र जरूर आहे आणि मला वाटते की एखादा प्रसंग घडून गेल्यानंतर त्याविषयी अधिक मोकळेपणे विचारणे व बोलता येणे शक्य असते. प्रसंग अर्थातच आपल्या विवाहाचाच आहे हे तू ओळखले असशीलच. कारण तू अत्यंत बुद्धीमान व चतुरही आहेस हे मी जाणून आहे. आपल्या विवाहाच्या वेळी एक क्षण तर असाच आला होता की हा विवाह होणे शक्यच दिसत नव्हते. मी तरी त्याची आशा जवळ जवळ सोडलीच होती. एवढेच नव्हे, तर मी तुलाही माझ्याशी विवाह करण्याच्या बंधनातून मोकळे केले होते. तुझ्या पाठीशी सर्वभावाने उभे रहाणे मला शक्य होत नव्हते आणि मी कुठेतरी कमी पडत होतो, हे मला जाणवत होते. परंतु तू मात्र धीर न सोडता तुझ्या भूमिकेशी ठामही राहिलीस आणि तेवढ्याच कुशलतेने सर्वांची मने वळवून अनुकूलही करून घेतलीस. प्रसंगामध्ये निर्णायक क्षणी तू सर्वांवर मात केलीस आणि सर्वकाही तुझ्या मनाप्रमाणे करवून घेतलेस. तेही अगदी शांतपणे व मनाचा समतोल कुठेही अजिबात ढळू न देता. खरे तर, तुझ्या विवाहाचा ‘पण’ जिंकून मी तुला वरले होते. पण प्रत्यक्ष आपला विवाह झाला तो मात्र केवळ तुझ्या प्रयत्नाने, ही गोष्ट खरीच आहे. तुझ्याकडून तो एक पराक्रमच घडला असेच म्हणावे लागेल आणि त्याचे मला अत्यंत कौतुकच आहे.

द्रौपदी, परंतु त्या प्रसंगात तू जे धर्मराजाशी बोलणे केलेस आणि स्वधर्माचरणाविषयीचे तू जे वक्तव्य केलेस, ते तर अगदी बिनतोड होते. त्या तुझ्या भूमिकेचा मान राखणे धर्मराजालाही भागच पडले आणि त्याने अगदी स्वखुशीने तुझ्या निर्णयाला त्याची संमतीही दिली. मी तुला खरेच सांगतो की तो एक चमत्कारच घडला, असेच म्हणावे लागेल. कारण धर्मराजा हा त्याच्या स्वधर्माचरणाविषयी नेहमीच एवढा आग्रही असतो की बऱ्याच वेळेला त्याचा तो हट्टच होऊन बसतो आणि ती सर्वांचीच डोकेदुखी होऊन रहाते. परंतु तू मात्र धर्मराजाला त्याचा आग्रह किंवा दुराग्रहच म्हणा, पण तो सोडायला लावलास याचे मला राहून राहून अत्यंत आश्चर्यच वाटत आहे. हे सर्व तुला कसे काय जमले हाच माझ्याठायी मोठा प्रश्न आहे. शास्त्राचा एवढा अभ्यास तू केलेला आहेस की काय? आणि केलास तरी कधी? कोणी तुला एवढे शिकवले?

द्रौपदी मला एक गोष्ट निश्चितपणे ठाऊक आहे की तुझ्यावरती कृष्णाचा अत्यंत प्रभाव आहे. तुझ्या मनामध्ये त्याच्यासाठी एक वेगळेच स्थान आहे. तेव्हा तू जे धर्मराजाशी अगदी एवढे शास्त्रशुद्ध बोलत होतीस त्या मागेही कृष्णच असावा

अशी दाट शक्यता मला तरी वाटते. कारण अशा तऱ्हेचे बोलणे करण्यात कृष्ण अगदी तरबेज आहे. खरे तर, कृष्ण कोणत्याही विषयावर बोलण्यात पारंगत आहे. त्याला कोणत्याही विषयाचे वावडे असे नाहीच. विषय कोणताही असो, कृष्ण त्यावरती एवढ्या स्पष्टपणे व अधिकारवाणीने बोलतो की ऐकणाऱ्यावरती त्याचा तात्काळ प्रभाव पडतो आणि त्याचे म्हणणे ऐकणारा मान्यही करून बसतो. असा अनुभव मी स्वतः अनेक वेळेला घेतलेला आहे. तुझे तेव्हाचे बोलणे ऐकत असताना मला म्हणूनच सारखी कृष्णाच्या बोलण्याचीच आठवण येत होती. तुझ्या बोलण्यावरती पडलेली कृष्णाची छाप मला अगदी स्पष्टपणे दिसत होती. तुझे बोलणे अगदी कृष्णाच्या तोडीचे होते. मला तरी असे निश्चितपणे वाटते की धर्मराजाशी बोलणे होण्याआधी तुझे नक्कीच कृष्णाशी बोलणे झालेले असावे आणि जे तुला कृष्णाने सांगितले असेल तेच बोलणे तू धर्मराजाशी केले असावेस. होय ना?”

अर्जुनाचे बोलणे ऐकताना द्रौपदीला सुरूवातीला थोडीशी गंमतच वाटत होती. परंतु नंतर मात्र ती हळूहळू थोडीशी गंभीरच होत राहिली. त्यामागे अर्जुनाच्या प्रश्नापेक्षा तिला झालेले कृष्णस्मरण हेच कारण अधिक होते. त्याचबरोबर या प्रश्नाच्या निमित्ताने अर्जुनाशी कृष्णाच्या संबंधाने बोलायला मिळणार या विचारानेही द्रौपदीला मनातून बरे वाटले. कारण याच संधीचीच तर ती एवढे दिवस वाट पहात होती. कृष्णासंबंधी ऐकण्यासाठी अर्जुनाचे मनही अनुकूल अवस्थेत आहे हे द्रौपदीने ओळखले आणि मिळालेल्या संधीचा योग्य उपयोग करून घेण्याच्या उद्देशाने तिने अर्जुनाशी बोलावयास सुरुवात केली.

“अहो नाथ, माझ्यावरती कृष्णाचा प्रभाव आहे हे तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे. किंबहुना माझ्यावरती केवळ कृष्णाचाच प्रभाव आहे असे म्हणणेच अधिक योग्य ठरेल. त्याचे मूळ कारण कृष्णाचा प्रेमळ व मोकळा स्वभाव हे जरी असले तरी माझ्याठिकाणी कृष्णाविषयी अत्यंत प्रेम व श्रद्धा आहे, ही गोष्ट खरी आहे आणि तीच महत्त्वाची आहे. कृष्णाचे रूप व गुण आणि त्याचा दिलखुलास स्वभाव यामुळे त्याच्याविषयी प्रेम निर्माण होणे हे तरी अगदी सहजच आहे. परंतु त्याने मला त्याचे सख्यत्व देऊ केले हे मात्र माझे भाग्यच आहे. त्यामुळे मला कृष्णाला अगदी जवळून पहाण्याची संधी मिळाली. माझ्या जीवनातील अनेक गोष्टींविषयी मी कृष्णाशी अगदी मोकळेपणाने व निःसंकोचपणे बोलत असे आणि कृष्णही त्यानिमित्ताने माझ्याशी केवढे तरी बोलणे करीत असे. त्यावरून माझ्या हळूहळू लक्षात येऊ लागले की कृष्णाच्या मनात सर्वांविषयीच अत्यंत निरपेक्ष असे प्रेम आहे आणि त्याच्या बुद्धीच्याठिकाणी योग्य व अयोग्य याची यथार्थ जाणीव आहे. सर्वांच्या खऱ्या हिताचे तेच योग्य आहे आणि ते हर प्रयत्नाने साध्य करणे हेच ते



सत्कर्म आहे, याविषयी कृष्णाची निःसंशय खात्री आहे आणि याच निश्चयाने व खात्रीने तो त्याचे प्रत्यक्ष जीवन जगत असतो. ही गोष्ट जेव्हा माझ्या लक्षात आली तेव्हा तर माझ्या अंतरात कृष्णाला एक अनन्यसाधारण स्थान प्राप्त झाले. एवढेच नव्हे, तर कृष्णाचे स्थान माझ्या जीवनातही प्रत्यक्ष असावे असा माझा निश्चयच झाला आणि तसाच ध्यासही मला लागला. माझ्या या ध्यासाची निश्चिती व खात्री जेव्हा कृष्णाला पटली तेव्हा कृष्णाने माझ्यासाठी फक्त तुमचेच नाव सुचवले आणि त्यातूनच कृष्णाला तुमच्याविषयी निश्चित काय वाटत आहे हे माझ्या पूर्णपणे ध्यानात आले. तुमच्याही व्यक्तिगत जीवनात कृष्णाला तसेच मुख्य स्थान असल्याचेच ते लक्षण आहे, हे माझ्या लक्षात आले. मग माझ्याही मनात तुमच्याविषयी एकदम एक प्रकारची आपलेपणाची भावना निर्माण झाली आणि माझ्या जीवनात मला तुम्हीच जोडीदार हवेत, हा माझा निश्चयच होऊन राहिला. पुढील सर्व योजना व व्यवस्था कृष्णानेच केली आणि त्याने ती कशाप्रकारे केली असेल, हे तुम्हीच ओळखू शकाल. कारण तुम्हीही कृष्णाच्या अत्यंत जवळचे आहात आणि कृष्णाचे व्यक्तिमत्त्व तुम्हीही जाणून आहात.”

द्रौपदीच्या या बोलण्यावरती अर्जुनाने मोकळेपणाने हसून मान डोलवली. परंतु तो काही बोलला मात्र नाही. कारण द्रौपदीचे बोलणे ऐकण्यात तो अगदी तल्लीन झालेला होता. द्रौपदीकडून आणखीन बरेच काही ऐकण्याची त्याची उत्सुकता अधिकच वाढली होती. अर्जुनाच्या या स्वस्थ बसण्यामागील हेतू द्रौपदीच्याही लक्षात आलाच आणि मग तिनेही वेळ न लावता पुढे बोलावयास सुरुवात केली.

“हे नाथ, परंतु तुम्ही ‘पण’ जिंकल्यानंतर आपला प्रत्यक्ष विवाह होण्यामध्ये अचानकपणे अडचणी निर्माण झाल्या आणि त्यामध्ये स्वधर्माचरणासारखा नाजूक व अत्यंत महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आणि त्या प्रश्नाचा अधिकाधिक गुंता होऊन तो वाढतच राहिला. शेवटी निर्णय घेण्याची सर्व जबाबदारी माझ्या एकटीवरतीच आली. तुम्हीही मला तुमच्या वचनातून मोकळे केले होतेत. त्यामुळे तर माझ्यावरील जबाबदारी अधिकच वाढली. अशावेळी मी कृष्णाशी बोलणे केले खरे, परंतु त्यानेही कोणतेही निश्चित मार्गदर्शन न करता सर्व निर्णय माझ्यावरतीच सोपवला. त्याने मला फक्त संभाव्य परिस्थितीची जाणीव करून दिली आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कृष्णाने मला असे निःसंदिग्ध आश्वासन दिले की कोणत्याही परिस्थितीत माझ्याबरोबर प्रत्यक्ष राहून तो मला जीवनात साथ देत राहिल. माझ्यादृष्टीने कृष्णाचे हे आश्वासन लाख मोलाचे आहे. कारण कृष्णविरहीत जीवनाची मी कल्पनाच करू शकत नाही ही गोष्ट खरी आहे.

नाथ, पण आता खरी कसोटी माझीच होती. मीही कृष्णाने मला दिलेल्या दृष्टीने सर्व गोष्टींचा सर्वांगाने विचार केला आणि माझ्या मनाचा हळूहळू निश्चय होऊ लागला. त्यासाठी मी कृष्णाचे अंतःकरण प्रमाण मानले. त्याच्या अंतःकरणातील व्यथा माझ्या लक्षात आली. आपल्या दोघांचा विवाह व्हावा असे कृष्णाला अगदी त्याच्या अंतःकरणापासून वाटत होते आणि त्यासाठी त्याने केवढे तरी प्रयत्न केले होते. पण आता त्याच्या अंतःकरणातील उर्मीची पूर्ती करण्याची जबाबदारी माझी आहे आणि अशावेळी मी मुळीच कमी पडता कामा नये, याची जाणीव मला झाली. आपला विवाह जर झाला नसता तर कृष्णाला वाईट तर निश्चितच वाटले असते. पण तो माझ्यावर मुळीच रागावला नसता किंवा जराही नाराज झाला नसता याची मला पूर्ण खात्री होती. पण आपला विवाह झाल्यानंतर जे समाधान कृष्णाला झाले असते आणि जो आनंद कृष्णाच्या मुखावरती दिसला असता, तोच पहाण्याची मला उत्कंठा लागून राहिली. त्याच्यासाठीच मी आर्त झाले आणि त्यातूनच मला भावबळ मिळाले. पण एक खरी गोष्ट मी तुम्हाला सांगते की प्रत्यक्ष तुमच्या घरी तुमच्या भेटीसाठी येत असताना ‘काय बोलावे’ किंवा ‘कसे वागावे’ याविषयी मी काहीच ठरवले नव्हते किंवा त्यासंबंधी काही विचारही केलेला नव्हता. कारण अशा प्रसंगामध्ये तसा काही विचार करणे किंवा त्यासंबंधी कोणाला काही विचारणे शक्यही नव्हते आणि आवश्यकही नव्हते. त्यावेळेस सर्व गोष्टी उत्स्फूर्तपणेच घडल्या. अशा वेळेस आधीच ठरवलेले वागणे किंवा कोणीतरी सांगून पाठ केलेली वचने मुळीच कामाला येत नाहीत.

हे नाथ, ज्यावेळेस धर्मराज त्यांच्या स्वधर्माचरणाचा आग्रह धर्मशास्त्राचा आधार घेऊन धरू लागले त्या वेळेस, मला माझे स्वधर्माचरणही दिसू लागले. एक स्त्री म्हणून आणि एक पत्नी म्हणून माझेही स्वधर्माचरण म्हणून आहेच, हे माझ्या लक्षात आले. स्त्री असले तरी मीही एक मनुष्यच आहे. माझेही स्वत्व आहेच आणि ते मी राखलेच पाहिजे हे मला जाणवू लागले. किंबहुना दुसऱ्याच्या स्वत्वाचा मान राखताना स्वतःचे स्वत्वही आपणच राखले पाहिजे आणि जो स्वतःच्या स्वधर्माचरणाविषयी आग्रही असतो, त्याने दुसऱ्याच्या स्वधर्माचरणाचा आदर राखलाच पाहिजे. नाथ, असे विचार जेव्हा माझ्या मनात अचानकपणे येऊ लागले, तेव्हा मलाही त्याचे आश्चर्यच वाटू लागले आणि मी कृष्णाकडे एक दृष्टीक्षेप टाकला. तेव्हा कृष्णही माझ्याकडेच एकटक नजरेने पहात होता असे मला आढळले आणि माझ्या एकदम लक्षात आले की माझ्या मनात अचानक उद्भवलेल्या या विचारांचे मूळ तर कृष्णाठायीच होते. आतापर्यंत माझा कृष्णाशी अनेक कारणाने व निमित्ताने जो वारंवार संवाद घडला होता त्याचाच परिपाक म्हणून, या विचारांचे मूळ



माझ्या अंतर्मनात खोलवर रूजलेले होते आणि तेच विचार तेव्हा माझ्या मनात बळावले होते.

अहो नाथ, माझ्या मनाची ही अवस्था कृष्णाला नक्कीच जाणवली असणार आणि माझ्याठिकाणी निर्माण झालेल्या भावबळाची खात्रीसुद्धा त्यालाच वाटली असणार. कारण कृष्णाच्या नजरेत माझ्याविषयीचा पूर्ण विश्वास मला दिसला आणि त्याने संमतीदर्शक अशी हलकेच मान हलवली. माझा आत्मविश्वास पूर्णपणे जागा होण्यासाठी तेवढे एकच कारण आवश्यक व पुरेसे होते. त्यानंतर मग मी धर्मराजाशी कसे मुद्देसूद बोलणे केले आणि त्यांना माझा मुद्दा कसा पटवून दिला, हे माझे मलाही ठाऊक नाही. कृष्णप्रेमाचे बळ माझ्याकडून बोलवून घेत होते आणि कृष्णाच्या संवादातून प्राप्त झालेला बोधच माझ्याकडून प्रगट होत होता. त्यात माझे म्हणून म्हणवण्यासारखे काहीच नव्हते. माझ्या अहंकाराला तर तेथे जराही वावच नव्हता. माझे त्यावेळचे बोलणे तुम्हाला जरी बिनतोड वाटत असले तरी ते कृष्णाच्या तोडीचे असणे कधीही शक्यच नाही. कारण कृष्णाला या सर्व जगात तोडच नाही. त्याच्यासारखा एकमेव तोच, हे सत्यच आहे. फक्त आपण त्याची जोड जरी घेतली, तरी आपल्याकडूनच केवढा तरी पराक्रम घडू शकतो ही गोष्ट सत्य आहे. परंतु त्यामागील प्रेरणा व बलस्थान कृष्णाचेच असते. खरे माहात्म्य हे त्याचेच आहे, ही गोष्ट अगदी खरीच आहे हे मी माझ्या अनुभवाने तुम्हाला सांगते. तुम्ही त्यावर विश्वास ठेवा आणि तुम्हीही कृष्णावरती तशी श्रद्धा ठेवून वागाल तर तुम्हालाही तसाच अनुभव येईल, याची तुम्ही खात्री बाळगा.”

बोलता बोलता कृष्णस्मरणाने द्रौपदीचे अंतःकरण भरून आले आणि ती एकदम निःशब्द झाली. द्रौपदीचे बोलणे ऐकता ऐकता अर्जुन तर एवढा चकित होत होता की द्रौपदीच्या बोलण्यावरती काहीही प्रतिक्रिया व्यक्त करणे त्याला शक्यच होईना. परंतु थोड्यावेळाने तो भानावर आला तेव्हा त्याच्या लक्षात आले की द्रौपदी त्याच्याकडे प्रेमाने व एकटक नजरेने पहात होती. अर्जुनाने स्वतःला सावरले. अर्जुनाने द्रौपदीचा एक हात प्रेमाने आपल्या हातात घेतला आणि दुसऱ्या हाताने तिचा तो हात प्रेमाने थोपटीत राहिला. द्रौपदीविषयीचा केवढातरी कौतुकाचा भाव अर्जुनाच्या नेत्रातून वहात होता. मग त्यालाही स्वस्थ बसून रहाणे शक्य होईनासे झाले आणि अर्जुनाने थोड्याशा औत्सुक्यानेच बोलावयास सुरूवात केली.

“अगं द्रौपदी, तू जेव्हा कृष्णाविषयी बोलतेस ना, तेव्हा ते ऐकताना मला नवल तर निश्चितच वाटते. पण त्याचबरोबर एक गोष्ट माझ्या लक्षात आली आहे की तुझी कृष्णाकडे पहाण्याची दृष्टी काहीतरी वेगळीच आहे. खरे तर, कृष्ण हा माझाही अत्यंत जवळचा व जिवलग मित्र आहे. तो इतर सामान्यजनांपासून निश्चितच वेगळा आहे, ही गोष्ट माझ्याही नक्कीच लक्षात येते. परंतु कृष्णाचे हे

वेगळेपण निश्चित कशात आहे हे मलाही सांगता येणार नाही. त्याच्या सहवासात मनाला बरे वाटते आणि त्याच्याशी बोलले असता मन मोकळे होऊन हलकेही होते, ही गोष्ट तर माझ्या अनुभवाची व खरीच आहे. त्याचे ते सांगणे हे माझ्या हिताचे असते हेही मला कळते, परंतु त्याप्रमाणे मी नेहमी वागतोच असेही नाही. कारण काहीवेळा माझ्या कौटुंबिक मर्यादा येतात, तर काहीवेळा माझ्या स्वभावाच्या मर्यादा येतात आणि मग माझ्याकडून काहीतरी वेगळेच वागणे घडते. त्याचा मला मनस्तापही होतो आणि त्रासही होतो. अशावेळी कृष्णच मला मानसिक आधार व बळ देत असतो. प्रत्येक प्रसंगी मी अगदी हक्काने कृष्णाकडेच जातो आणि तोही मला अत्यंत प्रेमाने जवळ घेऊन माझ्या मनाच्या ठिकाणी पुन्हा नवीन जोम व उत्साह निर्माण करतो. कृष्णाच्या या माझ्यावरील प्रेमाचे मला नेहमीच अप्रूप व नवलही वाटत असते. परंतु माझी मजल त्यापुढे काही जात नाही.

अगं द्रौपदी, परंतु तुझे कृष्णाशी असलेले संबंध अधिक जवळचे आहेत ही गोष्ट मला जाणवते आणि त्याचेच फळ म्हणजे तुला प्राप्त झालेले हे मनोबळ आहे, ही गोष्टही माझ्या निश्चितपणे लक्षात आलेली आहे. तुझ्यासाठी तर कृष्ण हाच अंतिम आहे ही गोष्ट तर अगदी स्पष्टपणे दिसते. त्याच्या इच्छेसाठी व शब्दासाठी तू इतर कशाचीही पर्वा करणार नाहीस आणि वेळप्रसंगी इतर सर्व नातीही तू बाजूला करू शकशील, याची तर मला खात्रीच वाटते. ही गोष्ट तर तू आत्ताच आपल्या विवाहाच्या प्रसंगी सिद्ध करून दाखवली आहेस. आपल्या विवाहाला असलेला प्रत्यक्ष तुझ्या मातापित्यांचा व इतर नातेवाईकांचा विरोधही तू बाजूला केलास आणि लोकनिंदेचीही पर्वा केली नाहीस. ही गोष्ट तुझ्याकडून, माझ्यावरील प्रेमापेक्षा कृष्णावरील प्रेम व श्रद्धा यांच्यापोटीच घडली आहे, हे मला वाटते तूही मान्य करशील. अर्थात मला त्यात कमीपणा वाटत नाही तर तो मी माझा बहुमानच समजतो. कारण ज्या कृष्णावर तुझी श्रद्धा आहे त्या कृष्णानेच हा माझ्यावर दाखवलेला विश्वास आहे. त्या विश्वासाला पात्र ठरण्याचा मी नेहमीच प्रयत्न करीन आणि त्यातूनच जर कधीकाळी मी कमी पडलो तर तू व कृष्ण मला निश्चितच सांभाळून घ्याल, याची मला पूर्ण खात्री आहे.

द्रौपदी, तुझे जे कृष्णाशी काहीतरी आगळे वेगळे संबंध आहेत ना, तेच मला जाणून घ्यायचे आहेत. त्याविषयीच माझ्याठिकाणी अत्यंत कमालीची उत्सुकता आहे. या कृष्णाचे वेगळेपण मलाही कळावे, असे मला अगदी मनापासून वाटते. ते नीटपणे न कळल्यामुळेच काहीवेळा माझ्या मनाचा गोंधळ उडालेला आहे आणि त्यामुळे घडणाऱ्या माझ्या चुकीच्या वागण्यामुळे मी कृष्णापासून त्या त्या वेळी मनाने दूरही गेलो आहे. अर्थात तो दुरावा मला सहन न झाल्यामुळे किंवा खरे तर कृष्णालाच तो दुरावा सहन न झाल्यामुळे त्याने मला प्रेमाने पुन्हा पुन्हा जवळ



घेतले आहे. पण हा 'पुन्हा पुन्हा' शब्दच धोकादायक आहे. कारण एकदा चूक घडूनही मला सुधारण्याची संधी मिळाली तरी मन कृष्णापासून पुन्हा दूर जाण्याची शक्यता ही शिल्लक रहातेच आणि ती शक्यताच मला नको असून ती कायमची दूर करायची आहे. परंतु म्हणजे मी निश्चित काय करायचे हे मात्र माझ्या लक्षातच येत नाही. तेव्हा तूच आता याच्यावर तुझ्या अनुभवाने प्रकाश टाक आणि मला हे कृष्णाचे विशेषत्व म्हणा किंवा माहात्म्य म्हणा, पण समजेल अशा शब्दात सांगशील तर बरे होईल.

द्रौपदी, आणखीनही एक गोष्ट माझ्या मनात अजूनही घर करून आहे आणि त्याचा सल माझ्या मनाला अधून मधून टोचत असतो. माझ्याशी विवाह करण्याचा निर्णय घेताना तू तुझ्या आप्तस्वकीयांच्या मतांची व मनांची पर्वा केली नाहीस. परंतु मी मात्र माझ्या कुटुंबियांची मने सांभाळण्याला प्राधान्य दिले. त्यांच्याविषयीच्या कर्तव्यकर्माला अग्रक्रम देताना तुझ्या भावनांचा काहीच विचार केला नाही. त्यांच्यासाठी मी तुलाही सोडायला तयार झालो होतोच. ही निश्चितच माझ्या मनाची कमकुवतता आहे आणि या नातेसंबंधाचे दडपण जोपर्यंत माझ्या मनावर आहे, तोपर्यंत माझे मन कायमचेच दुर्बल रहाणार आहे. पण प्रश्न असा आहे की या नात्यांचे व त्यांच्याविषयीच्या कर्तव्यकर्माचे मनावरील ओझे कमी तरी कसे करावे? या प्रश्नाचे योग्य उत्तर अजूनही मला सापडलेले नाही आणि प्रश्न सोडवण्याची रीतही अजून मला कळलेली नाही. परंतु तुला मात्र या सर्व गोष्टी अगदी सहजपणे जमलेल्या दिसत आहेत. त्याचे रहस्य मला सांगण्याचे करशील का? नाहीतर, मी मनामध्ये कुठेतरी दुर्बल राहीन आणि पुढे कधीतरी ऐनवेळी एखाद्या प्रसंगात मी पुन्हा मनाने कमी पडेन आणि माझे स्वत्व गमावून बसेन."

बोलता बोलता अर्जुन एवढा भावूक झाला की त्याचे द्रौपदीलाही नवलच वाटले. अर्जुनाचे असे रूप ती पहिल्यांदाच पहात होती. पण ते पाहून द्रौपदीच्या मनाला एक प्रकारचे समाधानही वाटले. कारण त्या निमित्ताने तिला तिच्या अत्यंत प्रिय असलेल्या कृष्णाविषयी अधिक बोलण्याची संधी मिळाली होती आणि तिच्यासाठी तर त्यापेक्षा दुसरी अशी आनंदाची कोणतीही पर्वणीच नव्हती. द्रौपदीच्याठायी कृष्णमाहात्म्याबरोबरच कृष्णप्रेमही दाटून आले आणि कृष्णप्रेमाने युक्त झालेल्या द्रौपदीने अत्यंत प्रेमाने अर्जुनाचे मस्तक कुरवाळून हळुवारपणे ती त्याच्या केसातून हात फिरवत राहिली. द्रौपदीच्या त्या प्रेमळ स्पर्शाने अर्जुनाचे मन अतिशय सुखावले आणि तो द्रौपदीच्या अधिक जवळ आला. द्रौपदीनेही त्याला थोडावेळ तसेच राहू दिले. पण थोड्यावेळाने तिने अर्जुनाला तेवढ्याच प्रेमाने दूर केले आणि त्याच्या नजरेशी नजर मिळवून ती त्याच्याकडे पहात राहिली.

द्रौपदीच्या प्रेमळ नजरेतील मार्दवता व सात्त्विकभाव अर्जुनाला जाणवला. त्यामुळे द्रौपदीच्या प्रेमळ नजरेने व स्पर्शाने उत्तेजित न होता अर्जुनाचे मन शांत झाले. अर्जुनाच्या मनाची ही अवस्था द्रौपदीच्या लगेचच लक्षात आली आणि तिने अर्जुनाशी तिच्या मधुर वाणीने हळूहळू बोलावयास सुरुवात केली.

"कृष्णाच्या सहवासात जे मी अनुभवले आणि जे मला जाणवत राहिले त्यामुळेच मला कृष्णाकडे पहाण्याची दृष्टी प्राप्त झाली, ही गोष्ट अगदी शंभर टक्के खरी आहे. त्याच अनुभवाने माझ्या लक्षात आले की कृष्णाचे वेगळेपण हे त्याच्या अंतःकरणाच्या विशुद्ध अवस्थेमुळे आहे. त्याच्या अंतःकरणाच्याठायी सर्वांविषयी आपलेपणा व मुख्यतः समभाव आहे. कोणाशीही बोलताना व वागताना स्त्री-पुरूष, श्रीमंत-गरीब, उच्च-नीच असा कोणताही भेदभाव कृष्णाकडून कधीही होतच नाही. सर्वांच्या दुःखाविषयी कृष्णाच्याठायी कळवळा आहे आणि त्यांच्यावरील दयेपोटी त्यांना सर्व तऱ्हेची प्रत्यक्ष मदत करण्यास कृष्ण सदैव तत्पर असतो. दीन-दुबळ्यांना रक्षण देऊन आधार देणे कृष्णाकडून अगदी सहजपणे घडते. मुख्य म्हणजे, हे सर्व करण्यासाठी ज्या आत्मशक्तीची जरूरी असते ती कृष्णाठायी नित्य जागृत असते, ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. कृष्णाचे हे आत्मबळ हेच त्याचे विशेषत्व आहे आणि या त्याच्या आत्मशक्तीलाच कृष्ण नेहमी 'ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव' असे संबोधित असतो. अर्थात 'ईश्वर व त्याच्या अस्तित्वाची जाणीव' हा अनुभवच काय, हे शब्दसुद्धा आपल्यासारख्या सामान्यांसाठी एक गूढच आहे. पण माझ्यापुरते मी हे कोडे सोडवले आहे. माझ्यासाठी 'ईश्वर किंवा त्याचे अस्तित्व' म्हणजे फक्त कृष्णच आहे. कारण ही संज्ञा जर अंतःकरणाच्या अनुभवाचे वर्णन करणारी असेल तर माझ्या दृष्टीसमोर तरी एकीएक कृष्णच उभा रहातो. ही माझी अंधश्रद्धा नसून माझ्या स्वानुभवातून झालेला हा माझा निश्चय आहे. ईश्वरी तत्त्व म्हणजे काय हे मला माहित नाही, परंतु त्या ईश्वरी तत्त्वाचा आविष्कार म्हणजे कृष्णच होय, अशी माझी दृढ श्रद्धा आहे.

हे नाथ, कृष्णाचे अंतःकरण तर प्रेमस्वरूपच आहे. त्याच्याठायी असलेल्या सर्वांविषयीच्या अकारण प्रेमाचे तेच एकमेव मूळ कारण आहे. कृष्णाच्या विशुद्ध अंतःकरणातील शुद्ध प्रेमाचा अनुभव घेताना एक गोष्ट निश्चितपणे जाणवते की हे प्रेम सर्व नात्यांच्या परते आहे. त्या प्रेमाला कोणत्याही व्यावहारिक नात्याचा स्पर्शही नसल्यामुळेच ते प्रेम निरपेक्ष असते आणि म्हणूनच शुद्धही असते. अशा त्या कृष्णप्रेमालाच ईश्वरीप्रेम म्हणणे अधिक योग्य ठरेल. कृष्णप्रेम अनुभवताना कृष्णाच्या रूपाने आपले जणू ईश्वराशीच नाते जोडलेले आहे आणि त्या ईश्वरी प्रेमाचाच अनुभव आपण घेत आहोत, असाच भाव आपल्या मनात निर्माण होतो.



त्या प्रेमाच्या केवळ स्मरणानेही आपले मनोबळ केवढेतरी वाढते याचा मी नेहमीच अनुभव घेत असते. या मनोबळामुळेच कोणत्याही प्रसंगात त्या प्रसंगाची आपल्यावर मात न होता आपण त्या प्रसंगातून सहजपणे असे बाहेर पडतो, की त्या प्रसंगाच्या परिणामाचा लवलेशही आपल्या मनात शिल्लक रहात नाही.

अहो नाथ, कृष्णाच्या या विशुद्ध अंतःकरणातून या संसाराविषयीचे ज्ञानही अगदी यथार्थपणे प्रगट होते. संसारातील सर्व नाती व संबंध आणि त्यासंबंधीची कर्तव्यकर्मे यांची जरूरी व मर्यादा याविषयीचे अत्यंत सुस्पष्ट असे विश्लेषण जेव्हा प्रसंगा-प्रसंगातून कृष्णाकडून घडते, तेव्हा तर या संसाराकडे पहाण्याची आपली दृष्टीच बदलते आणि योग्य ती दृष्टी आपल्यालाही प्राप्त होते. त्या दृष्टीने संसाराकडे पाहिले असता सर्व काही स्पष्ट दिसू लागते. त्यामुळेच कर्तव्यकर्माचे रूपांतर कधीच मोहात होत नाही आणि कर्तव्यकर्माच्या मर्यादाही लक्षात आल्यावरती मन त्या कर्तव्यकर्मात गुंतून न रहाता, लागलीच मोकळेही होते. मनावरती कर्तव्यकर्माचे कोणत्याही प्रकारचे ओझे असे रहातच नाही. अर्थात त्यासाठी केवळ बुद्धीबळ उपयोगाला येत नाही तर तेव्हा केवढे तरी मनोबळच आवश्यक असते आणि तेच बळ कृष्णप्रेमाने प्राप्त होते, हे मी माझ्या अनुभवाने अगदी खात्रीपूर्वक सांगते. आपले खरे कर्तव्यकर्म काय व केवढे आहे आणि ते कोठपर्यंत करायचे आहे हे ठरवण्यासाठी आपण जेव्हा कृष्णाचे अंतःकरण प्रमाण मानतो, तेव्हा मग काहीच अडचण येत नाही. त्यावेळेस मग आपल्या अशुद्ध मनातील कोते विचार व आपल्या अशुद्ध बुद्धीची अपुरी समज तेवढ्या वेळेपुरती तरी सहजपणे बाजूला होते आणि योग्य निर्णय घेऊन योग्य कृती करण्याचे धैर्यबळ आपल्याला प्राप्त होते. कृष्णाला अपेक्षित अशा आपल्या आचरणाने कृष्णाला केवढातरी आनंद होणार आहे हा विचारच एवढा सुखद असतो की मग त्यासाठी आपण इतरांच्या मतांची वा होणाऱ्या परिणामांची कोणतीही तमा बाळगत नाही. कृष्णाच्या विशुद्ध अंतःकरणाला तोषविणे आणि त्याच्या मुखावरील प्रसन्नता पहाणे यातच आपल्याला सर्व आनंद प्राप्त होत असतो.

नाथ, कृष्णाच्या बाबतीत आणखीन एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे आणि ती म्हणजे, जरी कृष्ण सर्वांवरती सारखेच प्रेम करीत असला तरी त्याच्या प्रत्यक्ष प्रेमाच्या असलेल्या व्यक्तींना कृष्ण त्याच्या अधिक जवळ पहातो आणि साहजिकच तो त्यांच्याकडून अपेक्षाही अधिकच बाळगतो. कृष्ण स्वतः ज्या आत्मबळाने जीवन जगत असतो ते आत्मबळ त्याच्या प्रेमीजनांनीही प्राप्त करून घ्यावे, असेच कृष्णाला नेहमी वाटत असते. एवढेच नव्हे, तर त्यासाठी तो नित्य प्रयत्नशीलही असतो. ते आत्मबळ प्राप्त होण्यासाठी प्रत्येकाठायीची आत्मशक्ती, जी तत्त्वतः प्रत्येकाच्या ठिकाणी आहेच, ती जागृत होऊन मनापर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक असते हे कृष्ण जाणून आहे आणि म्हणून कृष्ण त्याचाच आग्रह धरीत असतो. कृष्ण जरी

आपल्याला प्रत्येक प्रसंगात साथ देत असला तरी त्यामुळे आपण परावलंबी तर होत नाही ना, याची कृष्णाला अत्यंत काळजी वाटत असते. त्याच्या प्रेमीजनांनी स्वावलंबी व्हावे असेच कृष्णाला नेहमी वाटत असते आणि तसेच त्याचे सांगणेही असते. कृष्णाच्या आपल्यावरील असलेल्या खऱ्या प्रेमाचेच हे लक्षण आहे. नाही का?

नाथ, एक गोष्ट तुम्हाला स्पष्टपणे व मोकळेपणे सांगते की मी आता जे काही तुमच्याशी बोलते आहे, त्यात माझी बुद्धी किंवा माझे ज्ञान अजिबात नाही. कारणा कारणाने व प्रसंगा प्रसंगाने कृष्ण जे काही माझ्याशी आजपर्यंत बोलत आला आणि त्यातून जे काही मला जाणवले, तेच मी स्मरणाने तुम्हाला आता सांगत आहे एवढेच! त्यातील ईश्वर, आत्मशक्ती, आत्मबळ इत्यादी शब्द मी कृष्णाच्या मुखातून वारंवार ऐकत असते आणि म्हणूनच त्या शब्दांचा उच्चार माझ्याकडून बोलताना घडला. त्या शब्दांचा निश्चित अर्थ तुम्हाला सांगणे मलाही शक्य होणार नाही. तो तुम्हाला फक्त कृष्णच सांगू शकेल. परंतु त्या शब्दातील भावार्थ मात्र मला निश्चितपणे जाणवतो आणि त्याच्या खरेपणाविषयीही माझी पूर्ण खात्री पटलेली आहे. माझ्यादृष्टीने तो भावार्थ एवढाच आहे की आपल्या खऱ्या प्रेमाच्या नात्याची एकच व्यक्ती आहे आणि ती म्हणजे कृष्ण! कृष्णच आपले खरे हित जाणतो आणि तेच तो सांगतही असतो. तेव्हा कृष्णाला धरून रहाण्यातच आपले हित आहे आणि त्याला केवळ प्रेमानेच धरणे शक्य आहे. पण त्यासाठी आपल्याला इतर सर्व गोष्टी सोडणे आवश्यक आहे आणि त्याच्या प्रेमानेच ते शक्य होईल, असा माझा ठाम विश्वास आहे. या सर्वांमध्ये आपल्या भाग्याने आपल्याला एका गोष्टीची अत्यंत अनुकूलता आहे की मुळात कृष्णानेच आपल्याला अत्यंत प्रेमाने धरून ठेवलेले आहे आणि कोणत्याही परिस्थितीत तो आपल्याला अंतर देणार नाही, ही गोष्ट त्रिवार सत्य आहे. कारण कृष्ण आहेच तसा! तेच कृष्णाचे ब्रीद आहे आणि तोच त्याचा धर्मही आहे."

द्रौपदीचे बोलणे ऐकताना अर्जुनाला सुरूवातीला जरी नवलाई वाटत होती तरी हळूहळू त्याच्याकडून ऐकणे मनःपूर्वक घडू लागले होते. आपण काहीतरी वेगळेच ऐकत आहोत असे वाटत असतानाच द्रौपदीचे बोलणे खरे आहे, असेही त्याला कुठेतरी जाणवू लागले होते. त्याच्या मनाकडून विचारही घडू लागले आणि तेच विचार त्याच्या बोलण्यातून सहजपणे प्रगट होऊ लागले.

"अगं द्रौपदी, तुझे म्हणणे अगदी बरोबरच आहे. तुझ्या सांगण्यातील तथ्य माझ्याही लक्षात येत आहे. कृष्ण आपल्या उभयतांनाही त्याच्या अत्यंत जवळ



पहातो ही गोष्ट खरीच आहे. मलाही ते निश्चितपणे जाणवतेच. परंतु तू कृष्णाच्या अधिक जवळची आहेस हे तर मला स्पष्टपणे दिसत आहे. कारण तू कृष्णाला तुझ्या अधिक जवळ पहातेस. कृष्ण केवळ तुझ्या मनातच आहे असे नव्हे, तर तो तुझ्या अंतरात आहे हे नक्की. म्हणूनच तू कृष्णाविषयी एवढ्या आपलेपणाने व आत्मविश्वासाने बोलू शकतेस. पण मला तसे शक्य होत नाही. कारण कृष्ण जरी माझ्या मनात निश्चितपणे असला तरी तो केवळ मनातच आहे ही गोष्टही खरीच आहे. परंतु माझ्या मनात इतरांनाही स्थान आहे. तुझ्या मनात मात्र कृष्णच एकमेव आहे. त्याशिवाय दुसरे कोणीही तेथे नाही आणि असलेच तरी प्रत्यक्ष प्रसंगात ते सर्व अगदी सहजपणे बाजूला सरते आणि केवळ कृष्णप्रेमाचेच प्राधान्य उरते. मला वाटते हाच तुझ्या व माझ्यातील अत्यंत मूलभूत असा व मोठाच फरक आहे.

द्रौपदी एक गोष्ट मला कबूल करायलाच हवी की माझ्या मनात माझ्या मातेला प्रथम स्थान आहे आणि त्यानंतर माझा ज्येष्ठ बंधू धर्मराज याला स्थान आहे. माझी माता कुंती ही आमच्या कुटुंबातील केंद्रस्थान आहे आणि ते कोणत्याही परिस्थितीत तसेच अबाधित रहाणार आहे. त्याचप्रमाणे धर्मराजा हा ज्येष्ठ बंधू या नात्याने आमच्या कुटुंबाचा प्रमुख आहे. त्यामुळे आमचे सर्व कौटुंबिक व वैयक्तिक निर्णयही धर्मराजाच्या संमतीनेच होत असतात. सर्व कुटुंबाची, सर्वांच्या व्यक्तिगत हिताची काळजी धर्मराजाच घेत असतो आणि त्याच्यावरती आम्हा सर्वांचाच विश्वास आहे. त्याचे सर्वच निर्णय, नेहमीच सर्वांना मान्य होतातच असे नाही. परंतु तरीही आम्ही सर्वच जण धर्मराजाच्या मताचा व निर्णयाचा आदर करतो. तसेच संस्कार आमच्या मातेने आमच्यावर केलेले आहेत आणि आता तशीच आम्हाला सवयही जडलेली आहे. अशा परिस्थितीत जरी मी कृष्णाला माझ्या मनात प्रथम स्थान दिले तरी ते तसे स्थान प्रत्यक्ष जीवनात कृष्णाला देता येणे मला शक्य होईल, असे मला तरी वाटत नाही. त्यामुळे तुझीही थोडीशी पंचाईतच होणार आहे. कारण माझ्या या भूमिकेमुळे कृष्णाला आपल्या प्रत्यक्ष जीवनात प्रथम स्थान घेता येणे शक्य होणार नाही आणि त्याचे तर तुला निश्चितच वाईट वाटणार, हे मी जाणून आहे. पण त्यासाठी माझाही नाईलाजच आहे. तरी तू माझ्यावर राग न धरता मला सांभाळून घेण्याचे मात्र कर, म्हणजे झाले."

अर्जुनाने मोकळेपणाने बोलून त्याची भूमिका स्पष्ट केली. अर्जुनाच्या मनाची मर्यादा व त्याचे कारण या दोन्ही गोष्टी द्रौपदीच्या आधीच लक्षात आल्या होत्या. फक्त त्या अर्जुनाच्या मुखातून निःसंदिग्धपणे प्रगट झाल्या एवढेच! परंतु त्यामुळे द्रौपदी नाराज मात्र मुळीच झाली नाही. अजुनाची अगतिकता द्रौपदीच्या निश्चितच लक्षात येत होती आणि त्यामुळे तिच्याठिकाणी अर्जुनाविषयी सहानुभूतीच होती. अर्जुनाच्या मनात कृष्णप्रेम असूनही केवळ परिस्थितीमुळे त्याचा नाईलाज होत

आहे, हेही द्रौपदी जाणून होती. अर्जुनाविषयी तिच्याठायी अत्यंत आपलेपणाच होता. अर्थात त्याचे मूळ तिच्याठायी असलेल्या कृष्णप्रेमात व कृष्णाने तिला दिलेल्या दृष्टीत होते. त्याचीच परिणती म्हणजे द्रौपदी मनातून अत्यंत शांत होती आणि तरीही अर्जुनाशी बोलण्याची आतुरता तिच्याठायी होतीच. कारण अर्जुनाची मनःस्थिती द्रौपदीला कळली होती आणि त्याच्याशी बोलणे अत्यंत आवश्यकच आहे हे तिने अचूक ओळखले होते. त्यामुळेच द्रौपदीने अर्जुनाशी शांतपणे बोलावयास सुरुवात केली.

"अहो नाथ, तुम्ही मनावरती कोणत्याही प्रकारचे दडपण मुळीच घेऊ नका. कृष्णामुळे खरे तर मनावरचे सर्व ताण नाहीसे होऊन ते अत्यंत हलके फुलके होते. तसे पाहिले तर, संसारातील कर्तव्यकर्मे हीच आपल्या मनावरील ताण वाढवीत असतात. कारण त्यांचे ओझेच आपण नेहमी आपल्या मनावरती बाळगीत असतो आणि त्या ओझ्याखालीच आपले स्वतःचे अस्तित्वही दबले जाऊन ते हरवलेही जाते. आपण कोणाच्या तरी नात्याचे कोणीतरी आहोत, एवढेच आपल्याला नित्य जाणवत रहाते आणि त्यामुळे आपण आपली खरी ओळखच विसरून जातो. एक व्यक्ती म्हणून आपल्या प्रत्येकाचे एक स्वतंत्र अस्तित्व आहे ही गोष्टच आपल्या लक्षात येत नाही. पण ती गोष्ट हीच मूलभूत सत्य आहे हे अगदी खरेच आहे आणि नेमकी त्याचीच जाणीव आपल्याला करून देण्याचा, कृष्णाचा सततचा प्रयत्न असतो. अर्थात हे त्याच्याकडून आपल्यावरील आत्यंतिक प्रेमापोटीच सहजतेने घडत असते, ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. आपली खरी ओळख आपल्याला कळून आपल्याठायीचे स्वत्व जागे होईल आणि त्या स्वत्वाने जर आपण आपले जीवन जगू तरच आपले जीवन खऱ्या अर्थाने आनंदाचे होऊन त्या जीवनाचे सार्थक होईल, हे फक्त केवळ कृष्णच त्याच्या स्वानुभवाने जाणून आहे. कृष्ण आपल्यासारख्यांना त्याचे मानतो एवढेच नव्हे, तर आपल्याला त्याच्यासारखे करण्याचा प्रयत्न करतो हे खरे तर, त्याचे आपल्यावरील उपकारच आहेत. ही गोष्ट कायमची लक्षात ठेवा आणि केवळ त्याचदृष्टीने कृष्णाकडे पहात रहा. त्यातूनही आपल्यावरील कृष्णाच्या प्रेमाचे स्मरण आपल्याला राहील तर आपल्या मनावर कोणताही ताण न येता ते सदा सर्वदा मोकळे राहील आणि त्या प्रेमाची जाणीव आपल्याला आपले जीवन जगण्यासाठी नित्य प्रेरणादायी ठरेल.

अहो नाथ, जीवनातील एका महत्त्वाच्या गोष्टीकडे कृष्ण वारंवार निर्देश करीत असतो. त्याच्या स्वानुभवाने हे तो नेहमीच सांगत असतो की जीवन हे बाह्यांगाने नेहमीच बदलत रहाते. मनुष्यामध्ये शारीरिक बदल होत असतात, तसेच सभोवतालच्या परिस्थितीतही सतत बदल घडतच असतात. पण त्या बदलांनुसार जर मनाच्या अवस्थेत बदल झाला नाही तर मन एका जागीच अडकून बसते व

अडूनही रहाते. मनाच्या या दुर्बलतेमुळेच प्रत्यक्ष वस्तुस्थितीशी जमवून घेणे त्या मनाला शक्यच होत नाही. त्याचीच परिणती म्हणून मन सदैव दुःखी व त्रासलेले रहाते. पण तेच मन, जर मागील जीवनात गुंतून न रहाता आताच्या परिस्थितीनुरूप राहील तर त्याच मनाला प्राप्त परिस्थितीला मोकळेपणाने सामोरे जाणे सहज शक्य होईल.

नाथ, जीवनातील नाती व त्यातील संबंधही खरे तर असेच बदलत असतात. परंतु ती गोष्ट जर आपल्या लक्षात आली नाही तर त्याचे दुष्परिणाम आपल्यालाच भोगावे लागतात. एका स्त्रीच्या बाबतीत तर अशी नाती तिच्या विवाहानंतर सहजपणे बदलत रहातात आणि ती सर्व संबंधितांना अगदी सहजपणे मान्यही होतात. ती स्त्री तिचे माता-पिता, बंधू-भगिनी ही सर्व नाती मागे सारून पतीचा हात धरून पतीच्या जीवनात प्रवेश करती होते आणि तिचे पुढील सर्व जीवन एकमेव पतीशीच जोडलेले रहाते. एवढेच नव्हे, तर पतीची असलेली सर्व नाती ही त्या पत्नीचीही होऊन रहातात. असे असले तरी पती व पत्नी यांचेच नाते, हे त्यांच्या पुढील जीवनाचा पाया व आधारभूत असते. कारण ते नाते केवळ शारीरिक नाही तर भावनिकही असते. त्यांच्या नात्यातील सामंजस्य, एकमेकांवरचा भरवसा, परस्परांच्या भावनेविषयी आदर व कदर आणि मुख्य म्हणजे सर्व प्रसंगात एकमेकांना दिलेली मनःपूर्वक साथ या सर्वांमुळेच त्यांचे नाते यशस्वी ठरते आणि त्यांचे जीवन खऱ्या अर्थाने आनंददायी होऊन रहाते.

नाथ, परंतु विवाहानंतर स्त्रीप्रमाणे पुरूषाच्या जीवनातही त्याच्या नातेसंबंधाचे प्राधान्य बदलले तरच वैवाहिक जीवन, आत्ताच म्हटल्याप्रमाणे सुखासमाधानाचे होणे शक्य आहे ही गोष्ट सत्य आहे. पुरूषही त्याच्या जीवनातील मातापिता व बंधूभगिनी यासारख्या नात्यात भावनेने गुंतून न रहाता त्याच्या पत्नीशीच भावनेने पूर्णपणे जोडला जाईल, तरच पती व पत्नी यांची खरी जोडी जमेल आणि त्यांच्या संसारात गोडी निर्माण होईल. नाहीतर ही इतर नाती, मग ती पतीची असोत नाहीतर पत्नीची असोत, पतीपत्नीच्या संसारात नेहमीच बाधक होतील. परंतु कृष्णासारखी एखादी निःस्वार्थी, निरपेक्ष व उभयतांच्या सारखीच प्रेमाची व्यक्ती जर पतीपत्नी नात्यामध्ये असेल, तर मात्र पती व पत्नी यांची जोडी नक्कीच जमेल. कारण कृष्णप्रेमामुळे त्या उभयतांमध्येही निःस्वार्थी व निरपेक्ष असे खरे प्रेम निर्माण होईल. त्या कृष्णप्रेमामुळेच त्या उभयतांची जोडी नुसती जमेलच असे नव्हे, तर त्यांच्या ठायीच्या कृष्णप्रेमामुळे त्यांची जोडी त्या प्रेमाच्या गोडीमुळे रंगेलही. या दृष्टीने विचार केला असता आपल्या उभयतांमध्ये कृष्ण आहे हे आपले केवढे तरी भाग्यच आहे, असेच म्हणावे लागेल. अर्थात आपल्यामध्ये जेवढे कृष्णप्रेम निर्माण होईल तेवढे आपण मनाने एकमेकांच्या अधिक जवळ येऊ ही गोष्ट अगदी खरी आहे. पण आपण एकमेकांच्या जवळ जसजसे येऊ तसतसे इतरांपासून दूर

होणार ही गोष्ट तर साहजिकच आहे ना? कारण हा तर सृष्टीचा नियमच आहे. परंतु एक गोष्ट मात्र निश्चित आहे की आपण खऱ्या अर्थाने व प्रेमाने एकमेकांच्या जवळ येण्यासाठी, आधी कृष्णाच्या अधिकाधिक जवळ जाणे अत्यंत आवश्यक आहे आणि ही जवळीकता आपणापैकी ज्याने त्याने व्यक्तिगतरित्याच साधली पाहिजे ही गोष्ट खरीच आहे. आपल्या सुदैवाने आपणा उभयतांचा जेवढा कृष्ण आवडता आहे त्यापेक्षा जास्त आपण दोघेही कृष्णाला प्रिय आहोत आणि नेमका याच गोष्टीचा आपण उपयोग करून घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे मला तरी अगदी मनापासून वाटते. याविषयी तुमच्या मनाला काय वाटते हे तुम्हीही अगदी मोकळेपणाने मला सांगण्याचे करावे."

* * *

द्रौपदीचे बोलणे गंभीरपणे ऐकत असताना अर्जुनाचा चेहराही अत्यंत गंभीरच झाला होता. सुरूवातीला थोड्याशा चकित मुद्रेने द्रौपदीकडे पहाणारा अर्जुन, नंतर मात्र तिच्याकडे अत्यंत कौतुकाने पहातच राहिला होता. त्यामुळे द्रौपदीचे बोलणे थांबले तरीही त्यावर अर्जुन काहीही बोललाच नाही. किंबहुना, काय बोलावे हेच अर्जुनाला सुचत नव्हते असेच म्हणावे लागेल. द्रौपदीच्या बोलण्यात जशी भावना होती तसेच तिचे बोलणे तर्कबुद्धीलाही अगदी धरून होते. मुख्य म्हणजे, द्रौपदीच्या बोलण्यामध्ये अर्जुनाविषयीचा अत्यंत आपलेपणा व जिव्हाळा होता. त्याचाच स्पर्श अर्जुनाच्या मनाला झाला आणि त्याचेही मन थोडेसे भारावलेच. परंतु द्रौपदीच्या नजरेत अपेक्षेचा भावही अर्जुनाला जाणवला आणि त्याने स्वतःला सावरले. द्रौपदीच्या बोलण्याने अर्जुनाच्या मनातील विचारांनाही चालना मिळाली होतीच. त्याच विचारांना प्रयत्नपूर्वक शब्दरूप देऊन अर्जुन हळूहळू बोलू लागला.

"अगं द्रौपदी, तुझे बोलणे एवढे विचारपूर्वक व निश्चयात्मक असते की ते ऐकतच रहावे असेच वाटते. त्यातून तुझ्याठायीच्या विचारांची निश्चितताच लक्षात येते. तुझे सांगणे एवढे सहज व सोपे असते की ते मला लागलीच पटतेही. तुझ्या बोलण्यात कोठेही ज्ञानाचा आविर्भाव नसतो किंवा कोणाला काही समजावून सांगण्याचा अभिनिवेशही नसतो. परंतु तू ज्या आत्मविश्वासाने बोलतेस त्यामुळे तुझे बोलणे एवढे प्रवाही व प्रभावी होते की ऐकत असताना ते मनाचा ठावच घेते. मग तेथे माझ्या मनाचे दुमत असूच शकत नाही. तुझे विचार लागलीच माझ्या मनाचेही होऊन रहातात आणि तुझ्या सांगण्यातील खरेपणही लक्षात येते. परंतु त्यानंतर थोड्या वेळाने जेव्हा पुन्हा माझे विचार माझ्या मनात वर येतात तेव्हा माझ्या मर्यादाही माझ्या लक्षात येतात. थोडा वेळ मनात एक प्रकारची खंतही निर्माण होते की तुझे म्हणणे खरे असूनही मी तुला साथ देऊ शकत नाही. मला एक



गोष्ट निश्चितच जाणवते की कृष्णाचा जेवढा व जसा प्रभाव तुझ्यावरती झाला आहे, तेवढा व तसा प्रभाव माझ्यावरती झालेला नाही. त्याचे मला वाईटही वाटते. पण त्याला माझाही नाईलाजच झालेला आहे असे म्हणण्यापेक्षा, तुझ्या रूपाने तो इलाज सापडला आहे असेच मी म्हणेन.

द्रौपदी, या विषयावरती माझे व कृष्णाचे तेवढेसे बोलणे होत नाही किंवा होऊ शकत नाही हे मी तुला मागेच सांगितलेले आहे. त्यामुळे कृष्णाची थोरवीही मी नीटपणे समजू शकत नाही ही गोष्ट खरीच आहे. पण तुझ्या बोलण्यात तर मला पूर्णपणे कृष्णाचीच झाक दिसत आहे. तेव्हा तू माझ्याशी नेहमी असेच बोलण्याचे करीत रहा. त्यामुळेच माझ्या मनाला कृष्णाच्या सांगण्यातील खरेपण हळूहळू कळेल. मला थोडा वेळ लागेल खरा, परंतु एक ना एक दिवस मी कृष्णाची खरी थोरवी पूर्णपणे जाणून घेईन असा मला पूर्ण विश्वास वाटतो. तोपर्यंत मात्र, तू मला सांभाळून घेत रहा आणि मला साथ देत रहा. कृष्णाला भेटण्याचे व त्याच्याशी बोलण्याचे पूर्ण स्वातंत्र्य तुला आहे हे तुला सांगण्याची आवश्यकताच नाही. तू कृष्णाला कधीही, कुठेही व केव्हाही खाजगीत भेटून तुझे मन मोकळेपणाने सांगत रहा आणि त्याचे व्यक्तिगत प्रेम व मार्गदर्शन घेत रहा. त्याचा जसा तुला उपयोग होईल तसाच त्याचा लाभ मलाही तुझ्याकडून मिळत राहील."

अर्जुनाच्या बोलण्याचा झालेला तोष द्रौपदीच्या मुखावर स्पष्टपणे दिसत होता. तिने मंदस्मित केले व ती अर्जुनाला म्हणाली,

"हे नाथ, तुमच्याकडून मला अगदी हेच बोलणे अपेक्षित होते. तुमच्या सरळ व साध्या स्वभावाचेच ते लक्षण आहे. तुमच्या मनाचा चांगुलपणा तुमच्या बोलण्यातून अगदी स्पष्टपणे प्रगट होत आहे त्यामुळेच मला केवढा तरी दिलासा मिळालेला आहे. तुम्ही माझ्यावरती जो विश्वास ठेवलेला आहे त्याला मी नेहमीच व पूर्णपणे जागेन, एवढेच आश्वासन मी तुम्हाला देते. कृष्णाची थोरवी तुम्हालाही हळूहळू कळेल आणि योग्यायोग्य जाणून त्याच्या सांगण्याप्रमाणे प्रत्यक्ष वागण्याचे मनोबळही तुम्हाला निश्चितपणे प्राप्त होईल याची मला पूर्ण खात्री आहे.

नाथ, मला तुम्हाला आणखीन एक गोष्ट सांगायची आहे. कौटुंबिक गोष्टींचा तुम्ही मनावरती अजिबात ताण घेऊ नका. तुम्ही प्रसंगोपात्त ज्या ज्या वेळी जी जी भूमिका घ्याल तिला त्या त्या वेळी माझा पूर्ण पाठिंबा असेल आणि माझ्याकडून तुम्हाला पूर्ण सहकार्यही मिळेल याची तुम्ही खात्री बाळगा. मी तुमची पत्नी म्हणजे तुमची सहधर्मचारिणी आहे. त्यामुळे जीवनातील प्रत्येक प्रसंगात तुमची साथ देणे हे तर माझे कर्तव्यकर्मच आहे आणि ते माझ्याकडून अत्यंत आपलेपणाने निश्चितच पार पडेल. त्या बाबतीत तुम्ही अगदी निश्चिंत रहा."

द्रौपदीच्या बोलण्यातील आपलेपणाचा अर्जुनाच्या मनाला सुखद स्पर्श झाला आणि त्याचे मन द्रौपदीच्या प्रेमाने भरून आले. त्याने पुढे होऊन द्रौपदीला अत्यंत प्रेमाने जवळ घेतले आणि द्रौपदीही त्याच प्रेमाने अर्जुनाच्या मिठीत विसावली आणि अतिशय सुखावलीही.”

* * *

बोलता बोलता नारदाचे लक्ष लक्ष्मीकडे गेले आणि लक्ष्मीच्या मुखावरील समाधान पाहून नारदालाही संतोष झाला. लक्ष्मीचे मनही सुखावले आहे हे नारदाने ओळखले आणि थोडावेळ स्वतःचे बोलणे थांबवून नारद लक्ष्मीकडे मिश्किल नजरेने पहात राहिला. नारदाच्या नजरेतील मिश्किलता लक्ष्मीच्याही लगेचच लक्षात आली. तिनेही नारदाकडे पाहून स्मितहास्य केले आणि नारदाशी बोलावयास सुरुवात केली.

“अरे नारदा, तुझ्या नजरेतील भाव मला कळला. अर्जुन व द्रौपदी यांच्यातील प्रेमभावाने माझे मन सुखावले आहे असे जे तुला जाणवले, ते अगदी बरोबर आहे. ती गोष्ट खरीच आहे. कारण त्यासंबंधी माझ्या मनात थोडासा काळजीचा भाव होता ही गोष्ट मला कबूल करावयासच हवी. केवढ्या तरी अडीअडचणी पार करूनच अर्जुन व द्रौपदी यांचा विवाह झाला होता. तेव्हा त्यांचे वैवाहिक जीवन सुखाचे होणे हेच अत्यंत महत्त्वाचे होते. त्यातून विवाहाचा निर्णय घेताना अर्जुन कमी पडला होता. त्यामुळे ती गोष्ट द्रौपदीच्या मनात कुठेतरी रहाण्याची शक्यताही नाकारता येत नव्हती. परंतु द्रौपदी ही एखाद्या सामान्य स्त्रीसारखी वागली नाही याचे मला अत्यंत कौतुक वाटत आहे. अर्थात द्रौपदी ही सामान्य स्त्री नव्हतीच. त्यामुळेच तिने मनात कोणताही किंतु बाळगला नाही आणि तिने अर्जुनाशी अत्यंत आपलेपणाने व प्रेमाने वागून अर्जुनाचे मनही जिंकलेच. याचे सर्व श्रेय द्रौपदीवर झालेले कृष्णाच्या प्रेमाचे व सांगण्याचे संस्कार यांनाच केवळ आहे, ही गोष्ट तर सत्यच आहे. हे अर्जुनाच्याही लक्षात आलेच आणि म्हणूनच त्याने द्रौपदीच्या कृष्णावरील प्रेमाचे व श्रद्धेचे तोंड भरून कौतुकच केले. एवढेच नव्हे, तर अर्जुनाने द्रौपदीला कृष्णाशी प्रेमाचे संबंध ठेवण्यासाठी पूर्णपणे मोकळीक दिली. त्याचा लाभ अर्जुनालाही मिळणारच होता आणि त्याची जरूरी आता अर्जुनाच्याही लक्षात आलेलीच होती. कृष्णाकडे बघण्याची दृष्टी अर्जुनाला द्रौपदीकडूनच मिळणार होती याची खात्री अर्जुनाला पटली होती आणि मुख्य म्हणजे तशा दृष्टीची आवश्यकता अर्जुनाला जाणवू लागलेली होती. अर्जुनाच्या या भूमिकेतून जसा त्याचा द्रौपदीवरचा भरवसा दिसतो तशीच त्याची कृष्णावरील श्रद्धाही दिसते. नाहीतर, कोणता पती त्याच्या पत्नीला दुसऱ्या पुरूषाशी असे प्रेमाचे संबंध ठेवायला

मोकळीक देईल. एवढेच नव्हे, तर त्यासाठी प्रोत्साहनही देईल बरे? मला तरी ती गोष्ट अशक्यच जाणवते. असे होणे तर अत्यंत दुर्मिळच आहे. म्हणूनच मला अर्जुनाचे खास कौतुक वाटते, ही गोष्ट मी प्रांजळपणे कबूल करते.

हे नारदा, परंतु द्रौपदीचे तर मला विशेषच कौतुक वाटत आहे. कारण कृष्णनिष्ठा व पती म्हणून अर्जुनावरील निष्ठा या दोन्हीची तिने जराही गल्लत होऊ दिली नाही. या दोन्हीतील फरक व त्यांची एकमेकांना असलेली पूरकता द्रौपदीने योग्यपणे ओळखली होती आणि तशी तिने साधलीही. कृष्णाच्या प्रेमाचा ईश्वरीभावाने अनुभव घेताना तिने अर्जुनाच्या पतीप्रेमाचाही तेवढ्याच प्रेमाने स्वीकार केला आणि अर्जुनालाही तिने प्रेमाने सुखावले. त्यासाठी द्रौपदीला कोणताही आविर्भाव किंवा कसरत करावी लागली नाही. त्यासंबंधी तिच्या मनाची थोडावेळही व जराही दोलायमान अवस्था झाली नाही. ही गोष्ट असाधारणच आहे, असेच म्हणावे लागेल. स्त्री असूनही स्त्रीत्वाच्या बंधनातूनच द्रौपदी मनाने मोकळी झालेली असल्याचेच ते लक्षण होते. अर्थात ही किमया तिच्याठायीच्या कृष्णप्रेमामुळेच व कृष्णबोधामुळेच झालेली होती हे तर निश्चितच आहे. पण तरीही मला द्रौपदीचे अप्रूप वाटते ते वाटतेच. कारण कृष्णाच्या प्रेमाचा गुण म्हणजे मोकळेपणा व कृष्णाच्या बोधाचा गुण म्हणजे निश्चयात्मकता, हे दोन्ही गुण द्रौपदीच्याठायी पूर्णपणे उतरले असल्याचेच ते द्योतक होते. होय ना?

हे नारदा, परंतु मला आणखीन एका गोष्टीचे मात्र जरूर नवल वाटत आहे. द्रौपदी अर्जुनाला बराच वेळ अनेक गोष्टी समजावून सांगत होती आणि अर्जुनही ते सर्व तेवढा वेळ शांतपणे ऐकून घेत होता ही गोष्ट माझ्या दृष्टीने तरी साधी नाही. ते एक नवलच म्हणावे लागेल. कारण बहुतेक कोणाही पुरूषाला त्याच्यापेक्षा त्याच्या पत्नीला काही जास्त कळते हे, मुळातच मान्य नसते. त्यातूनही जर त्या पत्नीने आपल्या पतीला काही सांगण्याचा प्रयत्न केला तरी तो एवढा वेळ ते शांतपणे ऐकून घेणे शक्यच नाही आणि ऐकल्यावरती तर तो पती त्याच्या पत्नीचे म्हणणे नीटपणे समजावून न घेताच तिच्याशी वादच घालणार, ही गोष्ट तर अगदी सूर्यप्रकाशाएवढी स्वच्छ व स्पष्ट आहे. निदान माझा तरी अनुभव असाच आहे. नारदा, याबाबतीत तुझा काही स्वतःचा अनुभव नाही ही गोष्ट जरी खरी असली, तरी तुझ्यागाठी सर्व जगाचा अनुभव आहे. तेव्हा माझी शंका खरी की खोटी हे तूच ठरव आणि त्याचे निरसनही तूच कर बघू."

असे बोलून लक्ष्मी नारदाकडे मिश्कीलपणे हसून बघत राहिली. नारदालाही लक्ष्मीच्या बोलण्यातील गंमत लक्षात आली आणि त्यानेही मोकळेपणे, पण माफक हसून तिला दाद दिलीच. परंतु लक्ष्मीच्या बोलण्यातील गंमतीपेक्षाही त्यातील मुद्दा

नारदाला अधिक महत्त्वाचा वाटला आणि त्यानेही नेमका तोच मुद्दा पकडून बोलावयास सुरुवात केली.

“हे लक्ष्मी, तू पती-पत्नी नात्यामधील जी गंमत तुझ्या स्वानुभवाने सांगितलीस ती तर बरीचशी खरीच आहे. त्याबाबतीत जरी माझा स्वनुभव नसला तरी माझा या जगाविषयीचा आणि त्यातील सर्वच नातेसंबंधांविषयीचा अनुभव अतिशय दांडगा आहे, हे तुझे म्हणणेही अगदी बरोबरच आहे. पण अशा गमतीजमती या सर्वच नातेसंबंधात थोड्याफार प्रमाणात घडतच असतात. त्याचे मूळ कारण म्हणजे अनेक नातेसंबंधांतून प्रगटणारा या जीवाचा स्वभावच मुळात अत्यंत गमतीशीर आहे. त्यामुळेच अशा गंमती व विनोद या जगात नेहमीच घडत असतात. त्याचा केवढा तरी संग्रह माझ्या अनुभवाच्या खजिन्यात साठवलेला आहे. त्यातील एकेक गोष्ट जर तुला मी सांगत राहिलो तर आपल्याला वेळ तर पुरायचा नाहीच पण आपल्याला या काळसत्तेत जो काही बहुमोल वेळ मिळालेला आहे, तो मात्र वाया जाईल आणि असा वेळ फुकट दवडणे ही गोष्ट आपल्याला मुळीच परवडण्यासारखी नाही. कारण आपल्याला या नारायणाच्या चरित्रातील सगुणकथांचे गायन श्रवण करण्यातच अधिक रस आहे. केवळ त्या कथांमध्येच प्रेमरस एवढा भरलेला आहे की जरा संधी मिळायची खोटी, तो प्रेमरस भरभरून वहायला लागतो हेच खरे. पण तुझ्या गमतीशीर बोलण्यामध्येही एक मुद्दा दडलेला आहेच. त्याविषयी बोलणे मात्र अत्यंत आवश्यक आहे असे मला निश्चितपणे वाटते आणि ते मात्र बोलल्याशिवाय मी रहाणार नाही.

अगं लक्ष्मी, अनेक नातेसंबंधांमध्ये पती-पत्नीचे नाते व संबंध हे विशेष आहेत, ही गोष्ट खरीच आहे. कारण मुळात ते नाते एका वेगळयाच स्तरावरचे आहे. बाकी सर्व नाती, जशी माता-पिता, बंधु-भगिनी वगैरे ही प्रत्येक जीवाला जन्मतःच प्राप्त होतात आणि ती त्याला कायमची चिकटून रहातात. या नातेसंबंधातच तो जीव लहानाचा मोठा होऊन वाढत असतो आणि त्यामुळे या नात्यांविषयी एक प्रकारची कृतज्ञता प्रत्येक जीवाच्या ठायी अगदी सहजपणे असते. या नात्यांविषयी एक प्रकारच्या आदराचीही भावना असते. ‘या नात्यांचे आपल्यावर काहीतरी ऋण आहे आणि आपण त्यांचे देणे लागतो’ असाच भाव सर्वांच्या ठिकाणी असतो आणि ते चांगल्या संस्कारांचेच लक्षण आहे. त्यामुळे या नात्यांमध्ये ‘दुसरा आपल्या हिताचेच सांगत आहे’ अशी श्रद्धा असते आणि ‘त्याप्रमाणे वागणे हे आपले कर्तव्यकर्मच आहे’ अशीही धारणा असते. अर्थात हे सर्व त्या त्या नात्यातील व्यक्तींशी असलेल्या संबंधांवरही अवलंबून आहे. त्या व्यक्तींशी असलेले संबंध जर काही कारणाने दुरावले किंवा बिघडले तर मग ते नातेही, असून नसल्यासारखेच होते. अशा वेळी



त्या नात्याचे बंधनही गळून पडते. मुख्य म्हणजे, या सर्व नात्यांमध्ये वयाचा मोठेपणा किंवा सांसारिक अनुभवाचे असलेले शहाणपण हे संबंधितांवरती एक प्रकारचे दडपणच आणत असते. बहुतेक जण या दडपणाखालीच वावरत असतात आणि स्वतःच्या इच्छा व भावना बाजूला सारून किंवा वेळप्रसंगी मारूनही दुसऱ्यांचे मन जन्मभर राखत रहातात. अशा लोकांचे स्वतःचे असे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कधी घडतच नाही. मग स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होऊन त्याचा अनुभव घेणे अशासारख्या गोष्टी तर दूरच राहिल्या.

लक्ष्मी, काही वेळेला काही जणांना त्यांच्याठायीचे स्वत्व जाणवते आणि ते त्या स्वत्वाने जगण्याचा प्रयत्नही करू पहातात. परंतु परिस्थितीच्या दबावापुढे त्यांना शरणागती पत्करावी लागल्यामुळे त्यांचे स्वत्व ते गमावून बसतात. काहीजण मात्र त्यांच्या स्वत्वाविषयी आग्रही रहातात आणि नात्याचे दडपण झुगारून देऊन कोणत्याही परिस्थितीत त्यांचे स्वत्व राखून त्याप्रमाणेच त्यांचे जीवन जगतात. अशावेळी साहजिकच त्यांना त्यांच्या नातेवाईकांचा रोष पत्करावा लागतो आणि त्यांचे नात्यातील संबंध दुरावतातही. परंतु त्या स्वत्वाचे रूपांतर स्वाभिमानात होण्याचा धोकाही असतो. कारण अभिमान हा कोणत्याही रूपातला असो तो केवळ दोषच आहे असे नव्हे, तर तो घातकही आहे. कारण त्यामुळे स्वतःपेक्षा दुसऱ्याला कमी लेखले जाते आणि दुसऱ्यांच्या भावनांना कःपदार्थ समजून त्यांचा विचारही केला जात नाही. असा स्वाभिमान हा अंती दुराभिमानच ठरतो आणि त्यातील काठिण्य दुसऱ्यांच्या प्रमाणे स्वतःलाही बोचत व टोचत रहाते. थोडक्यात म्हणजे कोणत्याही नात्यात जर प्रेमाचे संबंध नसतील तर कोणीच कोणाचे ऐकतही नाही किंवा ऐकूनही घेत नाही. मग त्याप्रमाणे वागण्याचा तर प्रश्नच निर्माण होत नाही. तेच जर दोन व्यक्तींमध्ये आपलेपणाचे संबंध असतील तर मग त्यांच्यात नाते असले वा नसले तरी चालते. त्यांच्यामध्येच बोलणे व ऐकणे हे दोन्ही घडून खऱ्या अर्थाने विचारांची देवाण घेवाण घडते. त्यानंतरच्या प्रत्यक्ष कृतीनेही त्यांच्यातील आपलेपणा केवळ टिकूनच रहातो असे नाही, तर तो आपलेपणा नित्य वाढतच रहातो.

हे लक्ष्मी, पण या सगळया नात्यांपेक्षा पती-पत्नी हे नाते अत्यंत आगळे वेगळेच आहे ही गोष्ट तर खरीच आहे. एक तर ते नाते जन्मतःच आपसूक निर्माण झालेले नसते तर ते ठरवून निर्माण केलेले असते. उभयतांचे कूळ व संस्कार यांची माहिती करून घेऊन व उभय पक्षांच्या संमतीने हे नाते जुळवले जाते. त्यामध्ये काहीवेळा भावी पती-पत्नींची मनेही समजून घेतलेली असतात आणि विवाहानंतर त्या उभयतांची मने जुळून यावीत, अशी अपेक्षा असते. त्याची मुख्य जबाबदारी केवळ त्या पतीपत्नींवरतीच असते. त्यांचे नातेवाईक त्यांना केवळ साहाय्यभूतच

होऊ शकतात आणि तेही त्या उभयतांची तशी इच्छा असेल तरच! कारण शेवटी मार्गदर्शक व मदतनीस हे बाजूलाच रहातात आणि प्रत्यक्ष जीवनात पती व पत्नी हेच एकमेकांसाठी असतात. तेव्हा त्यांची मने एकमेकांशी जुळणे हीच गोष्ट महत्त्वाची आहे. मने जुळायची तर त्यासाठी मनाठायी विचारांमध्ये व प्रत्यक्ष आचारामध्येही लवचिकताच हवी आणि अशी लवचिकता परस्परांविषयीच्या आपलेपणातूनच निर्माण होऊ शकते. 'आपण एकमेकांचे जीवनातील जोडीदार आहोत आणि या जोडीनेच आपणा उभयतांना सर्व जीवन जगायचे आहे, त्यासाठीच एकमेकांना साथ द्यायची आहे आणि तशीच ती घ्यायचीही आहे' ही जाणीव जर उभयतांच्या मनामध्ये नित्य जागृत असेल तरच पतीपत्नीची अशी जोडी जमू शकते. या जाणिवेचे मूळ एकमेकांवरील प्रेमाच्या गोडीमध्ये आहे. 'प्रेमाची गोडी आहे तरच जोडी आहे आणि जोडी आहे तरच त्या प्रेमाची गोडी आहे' ही मूलभूत गोष्ट जर पती व पत्नी या उभयतांच्या लक्षात आली आणि प्रत्यक्ष प्रसंगात ती गोष्ट त्यांच्या लक्षात राहिली, तरच त्यांचे जीवन एकमेकांना पूरक व सुखकारक होते.

अगं लक्ष्मी, परंतु हे सर्व जरी तत्त्व म्हणून खरे असले तरी पतीपत्नीची अशी आदर्श जोडी सध्याच्या कलियुगाच्या काळात प्रत्यक्षात असणे ही गोष्ट केवळ कठीणच नव्हे तर जवळ जवळ अशक्यच आहे. याला कारण, पती व पत्नी यांचे असलेले भिन्न स्वभाव आणि त्यांच्यावरील आधीपासूनचेच असलेले भिन्न संस्कार. हे स्वभाव व हे संस्कार जर अत्यंत घट्ट झालेले असले तर त्यांच्यात एक प्रकारचा हट्टीपणाच निर्माण होतो आणि त्याचेच रूपांतर व्यक्तिगत अहंकारामध्ये होते. मग फक्त स्वतःचेच म्हणणे व वागणे हेच खरे असे प्रत्येकजण समजून वागत रहातो आणि दुसऱ्याने आपल्या मनाप्रमाणे व मताप्रमाणे जमवून घ्यावे अशी अपेक्षा दुसऱ्याकडून करीत रहातो. भूमिकेच्या अशा ताठरपणामुळेच भिन्न स्वभावांमध्ये आधी घर्षण होते आणि व्यक्तिगत प्रेमाचे वंगण नसल्यामुळे मग त्यातून संघर्षही घडतो. असा संघर्ष टोकाला गेला तर एकमेकांची मने आधी दुरावतात आणि मग कायमची वेगळीही होऊ शकतात. जगाच्या इतिहासात घडलेले असे अनेक प्रसंग उदाहरणादाखल दाखविता येतील. परंतु तो आपल्या अभ्यासाचा किंवा बोलण्याचाही विषय नव्हेच. केवळ तुझ्या माहितीदाखल म्हणूनच मी त्याचा केवळ उल्लेख करीत आहे.

हे लक्ष्मी, पण अर्जुन व द्रौपदी यांची गोष्टच वेगळी होती. त्यांची जोडी प्रत्यक्ष कृष्णाने जमवलेली होती आणि त्याची पूर्ण जाणीव त्या उभयतांच्या ठिकाणी नेहमीच असे. कृष्णाच्या प्रेमाची व्यक्ती या दृष्टीनेच अर्जुन व द्रौपदी एकमेकांकडे पहात असत आणि त्यामुळेच ते एकमेकांना अत्यंत आवडत असत.



कृष्णाने जो आपला भरवसा धरला आहे त्याला जागण्याची जबाबदारी ही आपली आहे याची जाणीव उभयतांच्या ठिकाणी होती, ही सर्वात महत्त्वाची गोष्ट होती. त्यामुळेच केवळ एकमेकांकडून व्यक्तिगत अपेक्षा करीत न रहाता, त्यांच्याकडून कृष्णाची जी अपेक्षा होती त्याचीच पूर्ती करण्यामध्ये ते उभयता सावध व तत्पर असत आणि एकमेकांची अत्यंत काळजी घेत असत. त्यातूनही त्यांच्यापैकी जर कोणी एखादा वेळप्रसंगी कमी पडला तर दुसरा त्याला लगेचच सांभाळून घेत असे आणि त्याची पूर्ती स्वतःहून करीत असे. मुख्य म्हणजे, असे काही मुद्दामहून करण्याचा त्यांच्याठिकाणी कोणत्याही प्रकारचा आविर्भाव नसे तर त्यांच्याठायी असलेल्या कृष्णप्रेमाच्या जाणिवेमुळे व जागृतीमुळे त्यांच्याकडून हे सर्व, अगदी सहजपणे घडत असे. याचीच परिणती म्हणजे अर्जुन व द्रौपदी यांना परस्परांचा सहवास व जवळीकता अत्यंत प्रिय असे आणि त्यांचे सहजीवन हे अत्यंत सुखाचे व समाधानाचे होते.

हे लक्ष्मी, अर्जुन व द्रौपदी यांच्यामधील कृष्णप्रेमाच्या या धाग्यानेच त्यांना आधी कृष्णाशी व म्हणून नंतर एकमेकांशी बांधून ठेवलेले होते आणि या प्रेमाच्या बंधनामुळेच त्यांच्यात अत्यंत मोकळेपणाचे संबंध होते. कृष्णप्रेमाची आवडी हा त्यांच्यातील सामाईक दुवा असल्यामुळे, कृष्ण हा विषय त्यांच्यामध्ये नेहमीच बोलला व चर्चिला जात असे. अर्जुनही द्रौपदीला त्याच्या व कृष्णाच्या मैत्रीतील पूर्वी घडलेले अनेक प्रसंग वारंवार आठवून आठवून, अगदी तपशीलवार सांगत असे. ते मौजेचे प्रसंग ऐकून द्रौपदीच्या मनाची करमणूक तर होईच, परंतु त्याचबरोबर कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक वेगळे वेगळे पैलू तिच्या दृष्टीसमोर येत असत आणि तिच्या मनाला कृष्णाची थोरवी अधिकाधिक जाणवू लागे. अर्जुनाच्या ठिकाणी सुद्धा द्रौपदी व कृष्ण यांच्यातील घडलेल्या प्रसंगाविषयी ऐकण्याची अत्यंत आतुरता असेच आणि तसे तो द्रौपदीला वारंवार विचारीतही असे. त्यावर मग द्रौपदीही कृष्णाविषयी अगदी भरभरून बोलत असे. तिला तर कृष्णाविषयी किती बोलू नि किती नको असेच होऊन राही. परंतु द्रौपदीच्या सांगण्यात मात्र प्रसंगाचा तपशील अगदी माफक म्हणजे आवश्यक तेवढाच असे. त्यापेक्षा प्रसंगाच्या निमित्ताने कृष्णाशी झालेला संवाद आणि त्यातून कृष्णाच्या सांगण्यातून तिला जाणवलेले कृष्णाचे अंतःकरण हेच द्रौपदीकडून जास्त प्रगट होत असे. हा फरक जसा त्या दोघांच्या स्वभावातील होता, तसाच तो त्यांच्या भावातीलही होता ही गोष्ट खरीच आहे. कृष्णाचे व्यक्तिगत प्रेम व मैत्री ही अर्जुनाची मर्यादा होती तर द्रौपदीच्या दृष्टीने कृष्णाचे सांगणे व त्याच्या भावार्थाला महत्त्व अधिक होते. असे जरी असले तरी त्या दोघांचे भाव व स्वभाव हे एकमेकांना पूरक होते हे मात्र निश्चित होते. कारण कृष्ण हा तर त्याचे व्यक्तिगत प्रेम व त्याचे माहात्म्य हे दोन्ही मिळून आहे हेच सत्य आहे. अर्थात ही जाणीव जशी द्रौपदीच्या ठायी होती तशी ती अर्जुनाच्या

ठायी नव्हती ही गोष्ट जरी खरी असली, तरी अर्जुनाठायी असलेले कृष्णाविषयीचे व्यक्तिगत प्रेम हे द्रौपदीच्या उपयोगाला येत होते आणि द्रौपदीच्या ठायी असलेली कृष्णाच्या माहात्म्याची जाणीव, ही अर्जुनाच्याही उपयोगाला येत होती.

हे लक्ष्मी, अर्जुनावरील प्रेमामुळे कृष्णाचे हस्तिनापूरला वारंवार येणे आधीपासूनच होत असे पण आता द्रौपदीमुळे कृष्णाच्या भेटी अधिकच वाढल्या. त्याचा लाभ द्रौपदीलाही आपसूकच होत असे. अर्जुन व द्रौपदीही मुद्दाम कारण काढून द्वारकेला जात आणि कृष्णाला भेटत असत. कृष्ण व अर्जुन यांच्या भेटीमध्ये बऱ्याच वेळा द्रौपदीचा सहभागही असे. त्यावेळी त्यांच्यामध्ये अनेक विषयांवर अगदी मोकळेपणाने बोलणे होत असे. एवढेच नव्हे, तर द्रौपदीला कृष्णाची व्यक्तिगत भेट घेण्याची संधीही मिळत असे. त्यासाठीची अनुकूलताही अर्जुनामुळेच तिला प्राप्त होत असे. कित्येक वेळा अर्जुनच द्रौपदीला कृष्णाची व्यक्तिगत भेट घेण्यासाठी उद्युक्त करीत असे. एवढेच नव्हे, तर त्यासाठी द्रौपदीला निरनिराळे मार्ग सुचवून तिला प्रत्यक्ष मदतही करीत असे. तर काहीवेळा अर्जुनही कृष्णाची व्यक्तिगत भेट घेण्याचा त्याचा हक्क तेवढ्याच आग्रहपूर्वक बजावून घेत असे. द्रौपदीलाही त्या गोष्टीचा राग न येता अत्यंत कौतुक वाटत असे. परंतु त्या दोघांच्या भेटीत काय घडले हे जाणून घेण्याचा प्रयत्न मात्र द्रौपदी कधीच करीत नसे. त्याचप्रमाणे कृष्ण व द्रौपदी यांच्या भेटीत काय घडले याविषयी, अर्जुनही द्रौपदीला काहीच विचारीत नसे. कृष्णावरील प्रेम व श्रद्धा आणि एकमेकांवरील पूर्ण विश्वास यामुळेच कृष्णाचे अस्तित्व हे अर्जुन व द्रौपदी या उभयतांच्या जीवनातील, एकमेव आनंदाचा विषय व कारण होऊन राहिले होते. कृष्णप्रेमाने जुळलेल्या त्यांच्या मनात एकमेकांविषयी कोणताही आपपरभाव तर नव्हताच पण अत्यंत आपलेपणा होता. त्यामुळेच अर्जुन व द्रौपदी यांच्यात कधीही 'मी मी' किंवा 'तू तू' असे होतच नसे. त्यांच्यात 'मी'पणाची भाषा कधीच नसे, तर नेहमी 'आपण असे करूया' किंवा 'आपण जाऊया' अथवा 'आपण असे ठरवूया' अशी 'आपण'भावाचीच भाषा त्यांच्या मुखातून व वागण्यातून अगदी सहजपणे येत असे. कृष्णप्रेमाचीच ती सारी किमया होती हे निश्चित!"

बोलता बोलता नारदाचे बोलणे सहजपणे थांबले आणि तो लक्ष्मीकडे अर्थपूर्ण नजरेने पहात राहिला. लक्ष्मीलाही थोडावेळ काय बोलावे ते सुचेचना. म्हणून तीही थोडावेळ स्तब्ध राहिली खरी, परंतु तसे स्वस्थ बसणेही तिला कठीणच होऊ लागले आणि तिला शब्दांची मदत घेणे भागच पडले.



“अरे नारदा, तू तर बोलता बोलता या जगातील केवढे तरी मूलभूत सत्यच प्रगट करून राहिला आहेस. पती व पत्नी या अत्यंत आगळ्या वेगळ्या नात्यातील रहस्यच तू उलगडून सांगितले आहेस. तुझे सांगणे एवढे यथार्थ आहे की तुला पती-पत्नी या नात्याचा अनुभव नाही असे म्हणण्याचे कोणाला धाडसही होणे शक्यच नाही. किंबहुना प्रत्यक्ष पतीपत्नींनाही जे कळणार नाही किंवा आकलन होणार नाही ते गुज, तू अगदी सहजपणे प्रगट केले आहेस. कारण प्रत्यक्ष संसारात राहून संसार करणाऱ्या पतापत्नींना जी दृष्टी येऊ शकत नाही, ती तुझ्यासारख्या आत्मानुभवी महात्म्यांच्याठायी असते. ईश्वरीभावामुळे त्या महात्म्यांची दृष्टी अत्यंत शुद्ध असते. त्यामध्ये जीवभावाची अशुद्धता अंशमात्रानेही नसते, जी सर्व सामान्य जीवांच्याठायी स्थायीभावाने असते. तू सांगितलेली एक गोष्ट अगदी खरीच आहे की इतर सर्व नात्यांमधील दोन व्यक्तींमध्ये एकरूपता होणे कधीच शक्य नाही. तशी अपेक्षा करणे किंवा तसा प्रयत्न करणे म्हणजे वाळूचे कण रगडून त्यातून तेल काढण्याचा प्रयत्न करणे अथवा मृगजळ सेवन करून तहान भागवण्याचा प्रयत्न करण्यासारखेच आहे. अशी एकरूपता केवळ पतीपत्नी या नात्यामध्येच शक्य आहे किंबहुना, अशी एकरूपता अनुभवण्यासाठीच हे नाते निर्माण झालेले आहे असे मला तरी वाटते. परंतु या नात्यामध्येही केवळ वासनापूर्ती एवढीच अपेक्षा राहिली आणि त्याला स्वभावाच्या अहंकाराची जोड मिळाली तर मग त्या नात्यामध्येही अशी एकरूपता अनुभवणे अशक्यच होऊन बसेल. पण भाग्याने जर त्या नात्यामध्येही ईश्वरीभावाची दृष्टी लाभली तर मात्र, पतीपत्नी या नात्यामध्ये एकरूपतेचा अनुभव घेणे शक्य आहे, ही गोष्ट खरी आहे ना? त्यामुळेच अशी संधी अर्जुन व द्रौपदी यांना परमभाग्याने कृष्णाच्या रूपाने मिळाली होती असेच म्हणावे लागेल. कारण कृष्णाचे ईश्वरी प्रेम त्या उभयतांनी व्यक्तिगतरीत्या स्वतंत्रपणे व दोघांनी मिळून एकत्रितपणे अनुभवले होते. यामध्ये कृष्णप्रेमाची महती तर आहेच पण त्यासाठी अर्जुन व द्रौपदी हे उभयताही कौतुकास पूर्णपणे पात्र आहेत, हेही तेवढेच खरे आहे. होय ना?”

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने संमतीदर्शक मान डोलावली आणि तो म्हणाला, “अगदी बरोबर! अर्जुन व द्रौपदी हे निश्चितच कौतुकास पूर्ण पात्र आहेत. कारण त्यांनी त्यांना भाग्याने मिळालेल्या संधीचा पुरेपूर लाभ उठवला. वस्तुतः कृष्णाच्या रूपाने अशी संधी अनेकांना उपलब्ध होती. परंतु त्यांना कृष्णाचे प्रेम सहजपणे मिळूनही त्या प्रेमातील ईश्वरीभाव लक्षात न आल्यामुळे त्यांना त्या प्रेमाचे व त्यामुळे अर्थातच, कृष्णाचेही माहात्म्य कळलेच नाही; एवढेच नव्हे, तर त्यांना ते जाणवलेही नाही. काहीजणांना कृष्णप्रेमाचे वेगळेपण थोडेसे लक्षात आले एवढेच!

पण त्यापलीकडे त्यांची मजल जाऊ शकली नाही. ही गोष्ट तशी स्पृहणीय नसली तरी ती वस्तुस्थिती आहेच. कारण त्यासाठी भाग्याने मिळालेल्या संधीचे मूल्य आधी लक्षात येणे अत्यंत आवश्यक आहे आणि मुख्य म्हणजे त्यानंतर प्रयत्नांची जोड देणे ही गोष्टही तेवढीच महत्त्वाची आहे. या प्रयत्नांमध्ये जेवढा बाह्यांगाचा भाग आहे तेवढाच किंवा त्याहीपेक्षा थोडा जास्तच भाग, हा आंतरिक आहे. बाह्य प्रयत्नांमध्ये प्रत्यक्ष भेट, सहवास, प्रेम, सेवा व संवाद या गोष्टींचा जसा समावेश आहे तसा आंतरिक प्रयत्नांमध्ये मनाठायी प्रेमस्मरण, बुद्धीचा निश्चय व चित्ताठायीचा ध्यास या गोष्टी सामावलेल्या आहेत. या अंतर्बाह्य प्रयत्नांच्या परिपाकामुळेच सगुणरूपातील ईश्वराचे प्रेम व माहात्म्य या दोन्हींची जागृती रहाते आणि त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी उद्युक्त होणेही घडते.

हे लक्ष्मी, कोणत्याही नात्यांमध्ये एकरूपतेचा अनुभव येणे शक्य नाही हे तुझे म्हणणे अगदी खरे आहे. त्याला अगदी पतीपत्नी हे नातेही अपवाद नाही ही महत्त्वाची गोष्टही तू लक्षात ठेव. सर्वांना केवळ ईश्वराशीच एकरूप होता येणे शक्य आहे, हे सत्य आहे. कारण सर्व जीव हे तत्त्वतः त्या ईश्वराचेच अंश आहेत आणि म्हणून प्रत्येक जण त्या ईश्वराशीच एकरूप होऊ शकतो. नेमकी हीच गोष्ट अर्जुन व द्रौपदी यांच्या लक्षात आलेली होती. त्यामुळे त्यांनी एकमेकांशी एकरूप होण्याचा प्रयत्न व हट्ट कधीच केला नाही आणि तशी अपेक्षाही धरली नाही. परंतु त्यांच्यामध्ये सामाईक असलेल्या कृष्णाच्या अस्तित्त्वामुळे ते दोघे एकमेकांना अनुरूप होत राहिले. खरे तर, त्यांनी कृष्णाशी एकरूप होण्याचा प्रयत्नही जाणूनबुजून असा कधीच केला नाही. अर्जुनाच्या बाबतीत तर तसा प्रश्नच निर्माण होत नव्हता कारण त्यासंबंधी तो पूर्णपणे अनभिज्ञच होता. कृष्णाचे माहात्म्य जाणून असलेल्या द्रौपदीचा प्रयत्नही कृष्णाला अनुरूप असे होण्याचाच होता आणि त्यासाठीही तिला कृष्णप्रेमाचेच साहाय्य होत असे. कृष्णाच्या अंतःकरणात जे द्रौपदीला स्थान होते व त्याठिकाणी जी द्रौपदीविषयीची प्रतिमा होती, ती कृष्णाच्या द्रौपदीशी होणाऱ्या वागण्याबोलण्यातून अत्यंत स्पष्टपणे प्रगट होत असे. त्यालाच प्रमाण मानून व त्याचाच आधार घेऊन द्रौपदी जीवन जगण्याचा मनापासून प्रयत्न करीत असे. तिच्या त्या प्रयत्नांत प्रामाणिकपणा व सचोटी होती. त्यामुळेच तिच्यामध्ये बाह्यांगाने व आंतरिकही सुधारणा होत राहिली आणि त्याचीच परिणती म्हणजे ती अंतर्बाह्य अशा दोन्ही अंगांनी कृष्णाला अनुरूप होऊन राहिली. हा तिच्या अवस्थेत होत गेलेला बदल आणि त्यातूनच तिने कृष्णाच्या हृदयाशी साधलेली एकरूपता याविषयी पुढील कथाभागात उल्लेख येणारच आहे. त्यावेळेस तुला सर्व काही कळेलच.

हे लक्ष्मी, खरे तर कृष्णाच्याठिकाणी अर्जुनाला सुद्धा स्थान होते. त्याच्याठायी अर्जुनाविषयीचीही एक प्रतिमा होतीच आणि ती कृष्णाच्या अर्जुनाशी



होणाऱ्या वागण्याबोलण्यातूनही प्रगट होत असेच. परंतु अर्जुनाच्या ते लक्षात येत नसे आणि कृष्णही त्याचा आग्रह धरत नसल्यामुळे, अर्जुनाला तसे कधीही जाणवलेच नाही. परंतु अर्जुनाच्या जीवनात द्रौपदीचा प्रवेश झाल्यानंतर मात्र, हे चित्र हळूहळू पण निश्चितच पालटू लागले. द्रौपदी ही अर्जुनाची पत्नी या नात्याने व तिच्या स्वभावानुसारही अर्जुनाशी कृष्णाविषयी संधी मिळेल तेव्हा बोलत राहिली आणि त्या उभयतांच्या कृष्णाशी असलेल्या विशेष संबंधाची आठवण व जाणीव ती अर्जुनाला नित्य करून देत राहिली. त्याचाच परिणाम म्हणजे ती गोष्ट अर्जुनाच्याही लक्षात येऊ लागली आणि लक्षातही राहू लागली. अर्थात तसा प्रत्यक्ष अनुभव घ्यायला अर्जुनाला वेळ लागलाच. तो अनुभवही त्याने पूर्णपणे घेतला की नाही हे त्याच्या पुढील जीवनात घडलेल्या अनेक चित्रविचित्र घटनांवरून तुझ्या लक्षात येईलच. त्यासंबंधी आपण त्या त्या वेळीच बोलणे अधिक योग्य ठरेल."

नारदाच्या बोलण्याचा झालेला प्रभाव लक्ष्मीच्या मुखावरती अगदी स्पष्टपणे दिसत होता. लक्ष्मीच्या मनाचे झालेले समाधान तिच्या मुखावरती पूर्णपणे पसरले होते. तिच्या मनाची झालेली योग्य समजही तिच्याकडे पहाताक्षणीच लक्षात येत होती आणि तीच तिच्या बोलण्यातूनही व्यक्त होऊ लागली.

"अरे नारदा, एकरूपतेविषयी तू माझी योग्य समज करून दिलीस ते बरे झाले. त्यामुळे माझ्या मनात आता कोणत्याही प्रकारचा गोंधळ नाही आणि तसा तो पुन्हा होणार नाही याची योग्य ती काळजीही मी घेईनच. अगदी पतीपत्नीच्या नात्याला व त्यातील प्रेमाला मर्यादा ही आहेच आणि फक्त ईश्वराचेच प्रेम हे अमर्याद आहे हे तुझे सांगणे सत्यच आहे. हे सत्यच जो जाणेल आणि त्या ईश्वराच्या अमर्याद प्रेमाचा अनुभव घेईल, त्याला कोणत्याही नातेसंबंधात कधीही कोणतीच अडचण येणार नाही, हे निश्चित. कारण त्याच्याकडून सर्वांशीच आपलेपणाचे वागणे घडेल पण तो अडकणार मात्र कोणाच्यातही नाही. सर्व रंगातही त्याचा रंग वेगळाच असेल आणि सर्व करूनही तो त्यापासून नामानिराळाच राहील. तो सर्वांचाच आहे असे दिसेल खरे, पण तो जाणिवेने असेल मात्र केवळ ईश्वराचाच. किंबहुना, अंतरातून तो केवळ ईश्वराचाच असल्यामुळे तो सर्वांशी आपलेपणाने पण योग्य त्या मर्यादेत वागू शकेल आणि राहू शकेल. ही मूलभूत गोष्ट आता माझ्या पूर्णपणे लक्षात आलेली आहे आणि मी ती कायमची लक्षात ठेवीनही.

हे नारदा, परंतु एकरूपतेचा विषय सांगत असताना तू जो अनुरूपतेचा उल्लेख केलास तो मात्र मला पटला आणि तो माझ्या चांगलाच लक्षात राहिलेला आहे. पतीपत्नी दोघेही एकमेकांना अनुरूप असणे किंवा होणे आवश्यकच आहे. परंतु ईश्वराशी मात्र एकरूप होऊन रहायचे आहे हे तू सांगितलेले सूत्र अतिशय महत्त्वाचे आहे. ईश्वराशी एकरूप होण्यासाठीही, आधी त्याला अनुरूप होत रहायचे हे तू

सांगितलेले गुजही योग्यच आहे. प्रयत्न हा ईश्वराला अनुरूप होण्यासाठीच करायचा आहे. तोच तर खरा पराक्रम आहे. हे रहस्य प्रगट करून तर तू माझ्यावरती अनंत उपकारच केलेले आहेस. कारण अनुरूप होण्याच्या प्रयत्नातूनच एकरूप होण्याचा ध्यास निर्माण होईल आणि मगच त्या ध्यासाची पूर्ती अगदी सहजपणे होऊन राहील, हे तू अगदी स्पष्ट करून सांगितलेस.

नारदा, हे सर्व अर्जुन व द्रौपदी यांच्या बाबतीत कसे कसे घडत गेले हे जाणून घेण्याची अतिशय उत्सुकताच माझ्याठायी आता निर्माण झालेली आहे. कृष्णप्रेमामुळे अर्जुन व द्रौपदी हे एकमेकांना अनुरूप होत राहिले ही गोष्ट जरी खरी असली, तरी त्यामध्ये त्यांना अडचणी या आल्या असणारच. त्यावर त्यांनी मात कशी केली असेल बरे? काही कौटुंबिक अडचणी या असणारच ना? कारण अर्जुन व द्रौपदी हे मोठ्या व एकत्रित कुटुंबात रहात होते. त्यामुळे अर्जुन व द्रौपदी यांच्यात जरी काही प्रश्न निर्माण झाले नाहीत, तरी कौटुंबिक प्रश्नांची झळ त्यांना लागणारच. त्यातूनच काही मतभेदही निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बरे, प्रत्येक वेळेस काही कृष्णाला भेटणे किंवा त्याचे मार्गदर्शन घेणेही शक्य झालेच नसणार. अशा वेळी अर्जुन व द्रौपदी यांनी त्यांचे ऐक्य कसे टिकवून ठेवले असेल बरे? या सर्व अडचणी येणे अगदी संभाव्य आहे. त्यापुढे माझ्या मनात त्यासंबंधी प्रश्न निर्माण होणे हेही तेवढेच साहजिक आहे. नाही का? अशा वेळी अर्जुन व द्रौपदी यांची मानसिकता निश्चित काय असेल आणि अशा प्रसंगी कृष्णाचीही भूमिका नेमकी कशी असेल हे सर्व श्रवण करण्याची माझी आतुरता, अतिशय वाढून राहिलेली आहे. त्याची पूर्ती करणे हे आता तुझ्याच हातात आहे. म्हणजे खरे तर, हे सर्व तुझ्या अंतरात दाटून राहिलेले आहेच, फक्त ते तुझ्या मनामध्ये आले की मग प्रगट व्हायला क्षणाचाही अवधी लागणार नाही याची मला पूर्ण खात्री आहे. तेव्हा आता तुझ्या अंतर्मुख झालेल्या मनाला बहिर्मुख कर बघू."

लक्ष्मीच्या बोलण्यातून तिची श्रवणाची आतुरता नारदाच्या मनाला स्पर्श करती झाली मात्र, नारदाचे अंतर्मुख झालेले मन बहिर्मुख व्हायला मग जराही वेळ लागला नाही. नारदाचे मन जेव्हा अंतर्मुख अवस्थेमध्ये होते तेव्हा त्याच्या अंतरातील प्रेमसागरात पूर्णपणे बुडालेले होते. त्यामुळे त्याचे मन जरी बहिर्मुख झाले तरी त्याच प्रेमपूर्ण अवस्थेमध्ये होते आणि प्रेमाने ओलेचिंब झालेल्या मनातून एकीएक प्रेमजलच निथळत होते. मनाच्या या आनंदी स्थितीमुळे नारदाकडून कृष्णचरित्रांतील सगुण प्रेमरसाने भरलेल्या आनंददायी कथांचे गायन लागलीच सुरू झालेच.



"हे लक्ष्मी, तुझी आतुरता ही अगदी योग्यच आहे. कारण अंतरात कृष्णाचे प्रेम असणे वेगळे आणि त्या प्रेमाने प्रत्यक्ष जीवन जगणे हे वेगळे. त्या दोन्हीमध्ये बरेच अंतर आहे आणि ते अंतर भरून काढणे यातच त्या प्रेमाची यशस्विता सामावलेली आहे. कारण जीवन हे अनेकांच्यासह जगावे लागते आणि ते बाह्यांगाने अनेकांवर अवलंबूनही असते. मुख्य म्हणजे ही गोष्ट अटळ आहे हे जाणून त्याचा मनाकडून पूर्णपणे स्वीकार करणे घडावयास हवे. कृष्णप्रेमाने युक्त असलेले मन कोणत्याही परिस्थितीत शांत रहाते आणि त्यातून कौशल्याने मार्ग काढून पुन्हा मोकळे रहाते, म्हणजेच पुन्हा कृष्णप्रेमाने युक्त होऊन रहाते. या कृष्णप्रेमामुळे दुसऱ्याला समजून घेणे, समजावून सांगण्याचा प्रयत्न करणे आणि परिस्थितीनुसार तेवढा वेळ जुळवून घेणे अगदी सहजपणे घडते. त्याचा मनावर कोणताही ताण व दडपण नसते. त्या दृष्टीने विचार केला तर द्रौपदी ही अर्जुनापेक्षा जास्त समजूतदार होती, ही गोष्ट खरीच आहे. नाही म्हटले तरी पत्नी म्हणून द्रौपदीनेच समजूतदारपणा दाखवावा, अशी अर्जुनाची मनातून अपेक्षा होतीच. अर्जुनाचे मन ओळखून असलेल्या द्रौपदीला त्या गोष्टीची पूर्ण जाणीव होती. त्यामुळे द्रौपदीही अनेक वेळा अर्जुनाचे मन राखून तिची पत्नीची भूमिका चोख बजावीत असे आणि त्यामुळे अर्जुनाला तक्रारीला जराही वाव मिळत नसे.

लक्ष्मी, कृष्णाचाही प्रत्यक्ष सहभाग किती व कसा असावा याविषयी सुद्धा थोडेसे मतभेद अर्जुन व द्रौपदी यांच्यामध्ये होतेच आणि त्याला कारणही त्यांची स्वभावभिन्नता हेच होते. अर्जुन व द्रौपदी यांच्यातील प्रत्येक गोष्ट कृष्णाला सांगावयासच हवी असे अर्जुनाला मनापासून वाटत नसे. पतीपत्नीमधील काही वैयक्तिक गोष्टी या खाजगीच रहावयास हव्यात, असे अर्जुनाचे अगदी प्रामाणिक मत होते आणि तसे तो उघडपणे बोलून वेळप्रसंगी त्याचा आग्रहही धरीत असे. परंतु द्रौपदीच्या ठायी असलेल्या कृष्णावरील भक्तिभावामुळे तिला तर प्रत्येक गोष्ट कृष्णाला सांगणे हे अत्यंत आवश्यकच वाटत असे. कारण तिच्याठायी कृष्णाला अग्रस्थान होते. कृष्णावरील एकनिष्ठ भावामुळे तिचा तो स्वभावच होऊन राहिला होता. पण त्यामुळे होणारी अर्जुनाची नाराजी जेव्हा द्रौपदीच्या लक्षात आली, तेव्हा मात्र द्रौपदी सावरली आणि तिने तिच्या स्वभावाचा हट्ट न धरता त्याला मुरडच घातली. अर्थात कृष्णाशी व्यक्तिगत बोलून द्रौपदी तिचे मन मोकळे करीत असे आणि कृष्णाचे म्हणणे ऐकून घेऊन त्याने दिलेली दृष्टी प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करीत असे. परंतु अर्जुनाजवळ या गोष्टीची वाच्यता करण्याचा मोह मात्र ती टाळू लागली. त्यामुळे एकीकडे अर्जुनाच्या मनाचेही समाधान होत असे आणि द्रौपदीच्या भावाचीही पूर्ती होत असे. कृष्णप्रेमामुळे हे वागण्याचे कौशल्य द्रौपदीला साध्य झालेले होते, हे ती स्वतः जाणून होती आणि त्यामुळे तिला कृष्णाचे माहात्म्य अधिकच जाणवू लागले होते.

हे लक्ष्मी, सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता तो एकत्रित कुटुंबाचा. सर्व पांडव एकत्र रहात होते आणि त्यांच्यामध्ये योग्य ते सामंजस्यही होते. अर्थात त्याचे मुख्य कारण होते ते म्हणजे सर्व पांडवांचे त्यांच्या मातेवर असलेले आत्यंतिक प्रेम. त्यामुळेच त्यांच्यातील ऐक्य टिकून होते ही गोष्ट तर खरीच होती. कुंती व द्रौपदी यांच्या संबंधातही कोणतीही अडचण अशी नव्हतीच. कुंतीच्या ठायी द्रौपदीविषयी आत्यंतिक आपलेपणा होता आणि तिचे द्रौपदीवर स्वतःच्या पोटच्या मुलीसारखेच प्रेम होते. त्याप्रमाणेच द्रौपदीच्या ठायीसुद्धा कुंतीविषयी अत्यंत आदराची भावना होती. त्यामुळे कुंती व द्रौपदी यांच्यामध्ये नेहमीच मोकळेपणा असे आणि त्यांच्यात कमालीचे सामंजस्य होते. वडीलबंधू या नात्याने धर्मराज हा कुटुंबप्रमुख होता आणि त्याच्या धोरणानुसार व त्याच्या निर्णयाप्रमाणेच कुटुंबातील सर्व मुख्य व्यवहार होत असत. परंतु धर्मराजा हा सज्जन वृत्तीचा असल्यामुळे कुटुंबात कलहाचे असे प्रसंग निर्माण होतच नसत. किरकोळ मतभेद जरी क्वचित प्रसंगी झाले, तरी शेवटी धर्मराजाच्या सांगण्यावरून सर्व गोष्टी सामोपचारानेच घडत असत. असे असतानाही पुढे एकदा धर्मराजाला दुर्बुद्धी झाली आणि त्यामुळे सर्व पांडवांवरतीच अनावस्थेचा प्रसंग गुदरला आणि ते एका दुष्टचक्रातच सापडले. त्या दुष्टचक्रातून सुटून बाहेर पडण्यासाठीही बऱ्याच वर्षांचा काळ जावा लागला. त्यातूनही वाईटातील अधिक वाईट गोष्ट म्हणजे, या सर्वांमध्ये द्रौपदीलाच जास्त झळ सोसावी लागली. तिच्या शारीरिक व मानसिक त्रासांची अगदी पराकोटी झाली आणि कोणाही स्त्रीच्या आयुष्यात कधीही येऊ नये असा दुर्धर प्रसंग द्रौपदीवरती आला. त्यातून ती बिचारी केवळ कृष्णाच्या कृपेमुळेच व तिने दाखवलेल्या विलक्षण धैर्यामुळे सुखरूपपणे पार पडू शकली. परंतु त्या काळात व त्या एका विशिष्ट प्रसंगात पांडवांनी व विशेषतः द्रौपदीने ज्या कष्टांचा व क्लेशांचा अनुभव घेतला त्याचे वर्णन करता येणेही केवळ अशक्यच आहे. पांडवांच्या व द्रौपदीच्या जीवनातील तो अत्यंत कसोटीचा असाच काळ होता. तरीही कृष्णाच्या साहाय्याने व स्वपराक्रमाने पांडव त्यातून तावून सुलाखून निघाले आणि अंतिमतः यशस्वीही झाले.”

* * * * *



# इंद्रप्रस्थ निर्माण

नारदाचे बोलणे ऐकत असताना लक्ष्मीच्या मुखावर आलेले चिंतेचे व काळजीचे भाव नारदाच्या लक्षात आल्याशिवाय राहिले नाहीत. परंतु लक्ष्मीची काही प्रतिक्रिया उमटण्याच्या आतच नारदाने हाताच्या खुणेने तिला थांबवले आणि त्याने पुढे बोलावयास सुरूवातच केली.

"हे लक्ष्मी, तुला काळजी वाटणे आणि तीही विशेष करून द्रौपदीची, हे अगदी साहजिकच आहे. कारण तो प्रसंगही तसाच अत्यंत चिंताकारक होता ही गोष्ट खरीच आहे आणि तो प्रसंग तुला तुझे मन घट्ट करूनच ऐकावा लागणार आहे. परंतु त्या प्रसंगाच्या आधीची पार्श्वभूमीही माहित असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळेच त्या प्रसंगातील गांभीर्यही खऱ्या अर्थाने तुला जाणता येईल आणि द्रौपदीची असहाय्यताही तुझ्या लक्षात येईल. अर्थात प्रसंगाच्या मागची पार्श्वभूमी तपशीलवार व विस्तारपूर्वक न सांगता त्याचे वर्णन मी अगदी थोडक्या शब्दात व आवश्यक तेवढेच करणार आहे. त्यामुळे होणारा काळाचा अपव्यय टाळणे आपल्याला शक्य होईल. कारण द्रौपदीवरती असा कठीण प्रसंग का आला यापेक्षा त्यातून ती ज्या धैर्यबळाने पार पडली, तो विषय अधिक अभ्यसनीय व चिंतनीय आहे.

लक्ष्मी, मी तुला मागे सांगितल्याप्रमाणे दुर्योधनाच्या ठायी पांडवांविषयी कमालीचा द्वेष व मत्सर होता. पांडवांचे होणारे कौतुक ऐकणे ही तर त्याच्या कानांना एक जबरदस्त शिक्षा आहे, असेच त्याला वाटत असे. पांडवांना या जगातून कायमचे नष्ट करण्याचा त्याचा कुटिल डाव फसला त्यामुळे तो आधीच चिडला. त्यातच द्रौपदीने सर्व पांडवांशी विवाह केल्यावर तर त्याच्याठायीच्या क्रोधाग्नीमध्ये तेलच पडल्यासारखे झाले आणि त्याचा राग अधिकच उफाळून वरती आला. पांडवाच्या मागे किंवा काही वेळा प्रत्यक्ष त्यांच्या समोरही दुर्योधन त्यांची निंदा करत असे. परंतु पांडव प्रयत्नपूर्वक शांत रहात असत आणि इतर लोक दुर्योधनाच्या बोलण्याला काडीचीही किंमत न देता, त्याकडे दुर्लक्षच करीत असत. त्यामुळे दुर्योधनाच्या मनाची अस्वस्थता अधिकच वाढली आणि युवराजपद मिळविण्यासाठी तो अधिकाधिक हट्टालाच पेटला. त्याने त्याविषयी धृतराष्ट्राच्या मागे लकडाच लावला. पुत्रमोहाने अंध झालेल्या धृतराष्ट्रानेही मग पांडवांना कुठेतरी दूर पाठवण्याचे ठरवले. त्यासाठी स्वतःच्या मनातील खऱ्या मतलबी हेतूचा कुणालाही पत्ता लागू न देता त्याने एक खासी युक्ती योजिली. हस्तिनापूरहून दूर एक अत्यंत ओसाड निर्जन असा प्रदेश होता. त्याठिकाणी पांडवांनी जाऊन त्या भागाचा विकास घडवून आणावा अशी कामगिरी त्याने पांडवांवर सोपविली. धृतराष्ट्राच्या मनातील अंतस्थ हेतू जाणकारांनी जसा ओळखला तसा तो

पांडवांच्याही लक्षात आलाच. पण धृतराष्ट्राशी नेहमीच आदराने वागणाऱ्या धर्मराजाने धृतराष्ट्राच्या शब्दाचे पालन करणे हे त्याचे प्रथम कर्तव्यकर्म आहे असे मानले. एवढेच नव्हे, तर त्याने धृतराष्ट्राला तसे वचनही दिले. इतर पांडवांना मनातल्या मनात धृतराष्ट्राचा व धर्मराजाचाही रागच आला. परंतु त्यांनीही बाह्यांगाने तसे काहीही न दर्शविता वडीलबंधू या नात्याने धर्मराजाचीच साथ देण्याचे ठरवले.

हे लक्ष्मी, धर्मराजाला त्याच्या स्वभावानुसार म्हणा किंवा त्याच्या तत्वानुसार म्हणा, पण या गोष्टीसंबंधी कोणाशी चर्चा करावी असे वाटलेच नाही. धृतराष्ट्राने भीष्म, द्रोण, विदूर यांच्याशी विचारविनिमय करूनच हा निर्णय घेतला असणार असे धर्मराजाने गृहीतच धरले होते. त्याची खातरजमा करून घेण्याची जरूरीही त्याला वाटली नाही. त्याचप्रमाणे ही गोष्ट कृष्णाशी बोलावी अशी आवश्यकताही त्या धर्मराजाला वाटली नाही. पण ही गोष्ट जेव्हा कृष्णाला अर्जुन व द्रौपदी यांच्याकडून कळली तेव्हा तो स्वतःहून पांडवांच्या भेटीला आला. एवढेच नव्हे, तर धर्मराजाच्या निर्णयामुळे जराशा नाराजच असलेल्या इतर पांडवांची समजूत कृष्णानेच घातली आणि पांडवांच्यासाठी असलेली त्या गोष्टीची उपयुक्तताही कृष्णाने त्यांना समजावून सांगितली. कृष्णाच्या दृष्टीने पांडवांसाठी त्यांचे स्वतंत्र कर्तृत्व दाखविण्याची ती एक सुवर्णसंधी होती. त्यातून पांडवांचे कर्तृत्व व स्वतंत्र वृत्तीच सिद्ध होणार होती आणि पांडवांच्या पराक्रमालाही केवढातरी वावच मिळणार होता. कृष्णाच्या सांगण्याने इतर सर्व पांडवांची नाराजी तर नाहीशी झालीच, पण कृष्णाने धर्मराजाला पाठिंबा दिल्यामुळे धर्मराजालाही समाधान वाटले.

हे लक्ष्मी, कृष्ण केवळ एवढेच करून थांबला नाही तर त्याच्या स्वभावानुसार तो पांडवांच्या प्रत्यक्ष सहकार्यासाठीही धावून गेला. स्वतः पुढाकार घेऊन कृष्णाने त्या भागाच्या विकासाची निश्चित अशी योजना तयार केली आणि त्याच्या मार्गदर्शनाखाली ती योजना पांडवांनी अत्यंत परिश्रमपूर्वक कार्यान्वित केली. थोड्याच काळात त्या ओसाड व वैराण प्रदेशाचे रूपांतर एका सुंदर व सुनियोजित अशा रमणीय नगरीमध्ये झाले. प्रशस्त रस्ते, प्रेक्षणीय असे अनेक महाल व प्रासाद, सुरम्य असे बागबगिचे यांनी सुशोभित दिसणारी ती नगरी 'इंद्रप्रस्थ' या नावाने नावारूपाला आली. त्या नगरीच्या दर्शनाने सर्वांच्याच नेत्रांचे पारणे फिटले. तिचा नावलौकिक धृतराष्ट्राच्याही कानावर गेला आणि त्याने पांडवांचे मनापासून कौतुक केले. एवढेच नव्हे, तर धृतराष्ट्राने दरबारातील सर्व ज्येष्ठ लोकांच्या संमतीने ती नगरी पांडवांच्या स्वाधीन करण्याचा निर्णय घेतला. त्यामागेही त्याचा धूर्तपणाच होता. हस्तिनापूरापासून पांडवांना दूर करून कौरवांना म्हणजेच दुर्योधनाला पूर्ण

हक्क देण्याचाच त्याचा हेतू होता. लहानसा भूप्रदेश पांडवांना देऊन त्यांना वेगळे करण्यात आले आणि बाकीच्या मोठ्या राज्याचे चालकत्व दुर्योधनाला देऊन त्याला युवराजपदही देण्यात आले. या एकाच खेळीत दोन गोष्टी साधल्या गेल्या. पांडवही आपसूक दूर झाले आणि दुर्योधनाचा 'युवराज' होण्याचा मनसुबाही पूर्ण झाला.

हे लक्ष्मी, पराक्रम हा ज्यांचा अंगीभूत बाणा आहे आणि कृष्ण ज्यांचा केवळ पाठीराखा नव्हे तर सहकारीही आहे, अशा पांडवांच्या भरभराटीचा काळ येण्यास वेळ लागलाच नाही. धर्मराजाच्या नीती व न्याय यांना पूर्णपणे अनुसरून असलेल्या राज्यकारभाराचा नावलौकिक सर्वकडे पसरला. आजूबाजूच्या प्रदेशातील अनेकजणांच्या ठिकाणी इंद्रप्रस्थ नगरीचे आकर्षण निर्माण झाले आणि ते सर्वजण स्वतःची घरेदारे सोडून इंद्रप्रस्थ नगरीतच कायम वास्तव्यासाठी आले. तेथेच राहून त्यांनी आपापला व्यवसाय व व्यापारउदीम सुरू केला आणि स्वतःसह त्या नगरीचीही भरभराट घडवून आणली. एवढेच नव्हे, तर इंद्रप्रस्थ नगरीच्या आजूबाजूच्या परिसरात वास्तव्य करून असलेल्या अनेक ऋषीमुनींचीही भेट जेव्हा धर्मराजाने स्वतःहून त्यांच्या आश्रमात जाऊन घेतली, तेव्हा त्या सर्वांनी धर्मराजाला उत्तमोत्तम आशीर्वाद दिले आणि त्याचे शुभचिंतन केले. पांडवांविषयीच्या या सर्व चांगल्या गोष्टी दुर्योधनाच्या कानावर त्याच्या दूतांच्याद्वारे आल्या तेव्हा पांडवांविषयीच्या द्वेषमत्सराने त्याचा नुसता जळफळाटच झाला. परंतु जेव्हा कृष्णाच्या सांगण्यावरून धर्मराजाने राजसूय यज्ञ केला, तेव्हा तर दुर्योधनाठायीच्या असूयेने अगदी वरचे टोक गाठले.

हे लक्ष्मी, राज्यामध्ये जेव्हा सुबत्तेचा व सुखाचा काळ आला तेव्हा कृष्णाने ईश्वराविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी राजसूय यज्ञ करण्याचे सुचविले. ईश्वरावरती पूर्ण श्रद्धा असल्यामुळेच धर्मराजाने कृष्णाच्या सूचनेचा लागलीच स्वीकार केला. एवढेच नव्हे, तर त्यासंबंधीची सर्व सूत्रेही त्याने कृष्णाकडेच सोपवली. कृष्णाच्या अधिपत्याखाली इतर सर्व पांडव उत्साहाने कामाला लागले. कृष्णाच्या सांगण्यावरून धर्मराजाने अनेक ऋषीमुनींची स्वतः त्यांच्या आश्रमात जाऊन भेट घेतली आणि त्यांना राजसूय यज्ञामध्ये सहभागी होण्याची विनंती केली. सदाचरणी व सत्प्रवृत्तीच्या धर्मराजाची ख्याती ऋषीमुनी जाणून होते आणि म्हणून त्यांनीही धर्मराजाच्या विनंतीचा लागलीच स्वीकार केला. देशोदेशींच्या राजांनाही खास व्यक्तिगत आमंत्रण करून बोलावण्यात आले. कृष्णाच्या सूचनेनुसार धर्मराजा हा स्वतः जातीने हस्तिनापूरला गेला आणि त्याने धृतराष्ट्र, गांधारी, भीष्म, विदूर व द्रोण अशा थोरामोठ्यांची भेट घेऊन त्यांना अत्यंत नम्रतापूर्वक व प्रेमपूर्वक निमंत्रण दिले. धर्मराजाच्या कर्तृत्वाने भीष्म, विदूर व द्रोण यांना अतिशय आनंद झाला. त्यामुळे पांडवांवरील प्रेमाने व कौतुकाने ते सर्वजण राजसूय यज्ञाच्यावेळी आवर्जून

उपस्थित राहिले. मग धृतराष्ट्राचाही नाईलाजच झाला. त्याच्या मनात पांडवांविषयी असलेला आकस लपवून ठेवणे धृतराष्ट्रालाही भागच पडले आणि वरकरणी पांडवप्रेमाचा आव दाखवीत तोही त्या यज्ञाच्या वेळी उपस्थित झाला. धर्मराजाने त्याच्या सज्जन स्वभावानुसार खुद्द दुर्योधनासह त्याच्या सर्वच कौरवबंधूंनाही व्यक्तिगत आमंत्रण केले. एवढेच नव्हे, तर त्याने कर्णालाही वेगळे न करता त्याला अत्यंत आपलेपणाने बोलावणे केले. धर्मराजाच्या या सुस्वभावाचे कर्णालाही कौतुकच वाटले आणि त्याने जाण्यासाठी नाराज असलेल्या दुर्योधनाची व्यक्तिशः समजूत घालून त्याला राजसूय यज्ञाच्या निमित्ताने घडणाऱ्या सोहळ्याला हजर रहाण्यासाठी उद्युक्त केले. कर्णाचे सांगणे आणि थोडेसे औपचारिकतेचे दडपण यामुळे मग नाईलाजाने का होईना, पण दुर्योधनही त्याच्या सर्व बंधूंसह इंद्रप्रस्थ नगरीला जाऊन पोहोचला.

हे लक्ष्मी, राजसूय यज्ञाच्या निमित्ताने जणू पांडवांनी प्राप्त करून घेतलेले सर्व ऐश्वर्यच प्रगट झाले. त्यामुळे तर सर्वांचे डोळे दिपूनच गेले. पांडवांकडूनही उत्साहाच्या भरात त्यांच्या वैभवाचे जरा जास्तच प्रदर्शन झाले, असेच म्हणावे लागेल. कृष्णाने सावधगिरीची सूचना देऊनही पांडवांना संयम राखता आला नाही. त्यामुळे पांडवांचे ऐश्वर्य जसे अनेकांच्या नजरेत भरले तसेच ते काहीजणांच्या नजरेत खुपलेही. त्याचा जो व्हायचा तो अनिष्ट परिणाम झालाच. अनेकांच्या मनात पांडवांविषयीचा मत्सर निर्माण होण्यास ते कारण झाले. मग दुर्योधनाची अवस्था विचारण्याची तर सोयच नव्हती. पांडवांचा नेहमीच दुस्वास करणाऱ्या दुर्योधनाच्या मनाची अस्वस्थता अधिकच वाढली. पांडवांचे ऐश्वर्य व त्यांचा होणारा नावलौकिक सहन करणे दुर्योधनाला केवळ अशक्यच झाले. काही झाले तरी व कोणत्याही भल्याबुऱ्या मार्गाने पांडवांना त्यांच्या वैभवासह धुळीत मिळवण्याचा एकीएक निश्चय करूनच दुर्योधन हस्तिनापूरला परत आला होता.

हे लक्ष्मी, खरे तर चांगल्या कामाला उशीर करू नये असे म्हटले जाते. परंतु दुर्योधनाची मनोवृत्ती मुळातच उफराटी असल्यामुळे त्याला पांडवांचा नायनाट करण्याची इतकी घाई झाली की त्यासाठी त्याला अजिबात वेळ दवडायचा नव्हता. त्यामुळे त्याने कपटकारस्थानात तरबेज असलेला त्याचा मामा शकुनी याला ताबडतोब बोलावून घेतले आणि त्याच्यापाशी आपले मन मोकळे केले. शकुनीने दुर्योधनाला चार समजुतीच्या गोष्टी सांगावयाच्या ऐवजी दुर्योधनाच्या दुष्प्रवृत्तीला प्रोत्साहनच दिले आणि जंगलात पेटलेल्या वणव्याला जोरदार वाऱ्याची साथ मिळाल्यासारखेच झाले. दुर्योधनाच्या मनातील द्वेषाग्नी अधिकच भडकल्यासारखा झाला. त्याने तर शकुनीच्या मागे सारखा तगादाच लावला. शेवटी शकुनीने त्याची सर्व दुर्बुद्धी पणाला लावली आणि एक कपट योजना आखली. काहीतरी निमित्त काढून धर्मराजाला हस्तिनापूरला द्युत खेळण्यासाठी म्हणून बोलवायचे आणि



त्याला द्युतामध्ये हरवून त्याचे सर्व ऐश्वर्य व वैभव त्याच्यापासून हिरावून घ्यायचे. शकुनी कपट द्युत खेळण्यात कुशल होताच. त्यामुळे धर्मराजाला हरवण्यात काहीच अडचण आली नसती हे दुर्योधनाच्या लक्षात आले. त्याचप्रमाणे धर्मराजाला द्युत खेळण्याची केवळ आवडच नव्हती तर त्याला त्याचा नादच होता ही गोष्टही दुर्योधन जाणून होता. धर्मराजा द्युत खेळण्याचे आमंत्रण कोणत्याही परिस्थितीत नाकारणे शक्यच नाही याची खात्रीही दुर्योधनाला होतीच. त्यामुळेच दुर्योधनाने शकुनीच्या कपट कारस्थानाला तात्काळ संमती दिली.

दुर्योधनाने त्याच्या मनातील दुष्ट हेतू उघड न करता धृतराष्ट्राकरवी धर्मराजाला द्युत खेळण्याचे आमंत्रण पाठवले. त्याबरोबर धर्मराजाने ते आमंत्रण स्वीकारण्याचा लागलीच निर्णय घेतला. आतापर्यंत धर्मराजाने एखादी गोष्ट ठरवली की त्याविरूद्ध कोणीही काहीही बोलत नसे. सर्वांनाच तशी जणू सवयच झालेली होती. परंतु या वेळेस प्रथमच द्रौपदीने धर्मराजाशी बोलण्याचे थोडेसे धाडस केले. 'धर्मराजासारख्या सज्जन वृत्तीच्या व्यक्तीने असे द्युतासारखे निंद्य कर्म करणे योग्य नाही' हे द्रौपदीने धर्मराजाला समजावून सांगण्याचा बराच प्रयत्न केला. पण तिच्या बोलण्याला धर्मराज काही बधला नाही. 'द्युत हा केवळ खेळ आहे; त्यामध्ये अयोग्य असे काही नाही. त्याच्याकडे जास्त गांभीर्याने न पहाता केवळ एक मौज म्हणूनच पहाण्याचे करावे' असे त्याचे म्हणणे होते. एवढेच नव्हे, तर 'द्युत खेळणे हे क्षत्रियांना आवश्यकच आहे आणि द्युत खेळण्याचे आलेले आमंत्रण स्वीकारणे हा तर क्षत्रियांचा धर्मच आहे' असा कोणत्यातरी शास्त्राचा आधारही धर्मराजाने सांगून त्यामध्ये गैर असे काहीच नसल्याचे सर्वांना पटविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मग धर्मराजापुढे कोणाचेच काही चालले नाही. कोणत्याही परिस्थितीत द्युत खेळण्याचा धर्मराजाच्या मनाचा हट्टच झालेला आहे हे द्रौपदीसह सर्वांच्याच लक्षात आले आणि मग सर्वांनाच धर्मराजापुढे नाईलाजाने गप्प बसावे लागले. एवढेच नव्हे तर, 'धृतराष्ट्राच्या आमंत्रणाचा आदर करणे हे आपले सर्वांचेच कर्तव्यकर्म आहे' असे म्हणून धर्मराज सर्व बंधू व द्रौपदी यांच्यासह हस्तिनापूरला जाऊन पोहोचला.

*****

# धर्मराजाची द्युतात हार

पांडवांचे स्वागत व आदरातिथ्य करण्यामध्ये दुर्योधानाने कोणतीही कसर ठेवली नाही. त्याने बाह्यांगाच्या चांगुलपणाचा देखावा अत्यंत छानपणे थाटला होता. परंतु त्याच्या मनामध्ये त्याला होत असलेली खुशी मात्र, वेगळयाच कारणास्तव होती. त्याच्या दृष्टीने शिकारीचे सावज योग्य टप्प्यात आलेले होते आणि आता फक्त त्या सावजाचा नेम साधणे तेवढेच बाकी राहिलेले होते. परंतु वरकरणी तसे न दाखवता आणि कोणालाही कसलाही संशय येणार नाही याची काळजी घेत दुर्योधन योग्य वेळ येण्याची अत्यंत आतुरतेने वाट पहात, नाईलाजाने स्वस्थ बसून राहिला होता. मनातून मात्र दुर्योधन अत्यंत उतावीळ व बेचैन झालेला होता आणि शकुनीमामाबरोबर त्याची सारखी खलबते चालू होती. पांडव द्युतात पूर्णपणे हरून नामोहरम झालेच पाहिजेत याची तो शकुनीला सारखी आठवण करून देत होता. दुर्योधनाने त्याचा हा कुटिल डाव त्याच्या काही मोजक्याच अशा जवळच्या व अत्यंत विश्वासाच्याच व्यक्तींच्या कानावर घातला होता. कर्णाला मात्र त्याने जाणूनबुजून विश्वासात घेतले नव्हते. कारण कर्ण हा त्याच्या असल्या दुष्कर्मांना व कारस्थानांना कधीच पाठिंबा देणार नाही, उलट विरोधच करील याची खात्री दुर्योधनाला होती. म्हणूनच त्याने कर्णाला जाणूनबुजूनच या सर्वांविषयी अंधारातच ठेवलेले होते.

हे लक्ष्मी, शेवटी द्युत खेळण्याचा तो दिवस उजाडला आणि ती वेळही जवळ येऊन ठेपली. धृतराष्ट्र आसनस्थ झाल्यावरती भर दरबारात हा द्युताचा खेळ सुरू झाला. त्यासाठी खास निर्माण केलेले फासे वापरण्याचे ठरलेले होते. त्याप्रसंगी भीष्म, द्रोण व विदूर यांच्यासारखे मान्यवर तर उपस्थित होतेच, परंतु नगरीतील अनेक उत्साही जनही हा खास सामना पहाण्यासाठी हजर झालेले होते. दरबार पूर्णपणे भरलेला होता आणि सर्वांचीच उत्सुकता शिगेला पोहोचून ताणली गेली होती. प्रत्यक्ष खेळ सुरू होण्यापूर्वी खेळाचे नियम ठरवण्यात आले. एकेकाने आळीपाळीने काहीतरी ‘पणा’ला लावून दान बोलायचे आणि फासे टाकायचे. दान अनुकूल पडले तर तो जिंकला नाहीतर तो हरला, असा साधा व सरळ नियम ठरवण्यात आला. पांडवांच्या वतीने धर्मराज खेळणार होता आणि कौरवांच्या वतीने दुर्योधन खेळणार होता. सर्वात महत्त्वाची असलेली फासे टाकण्यची कामगिरी दुर्योधनाने शकुनीकडे जाणूनबुजून दिली आणि धर्मराजाने त्याला काहीच विरोध न करता संमती दिली. त्याचा हा जादा चांगुलपणाच पुढे पांडवांना नडला ही गोष्ट खरीच आहे.

प्रत्यक्ष द्युताच्या खेळाला जेव्हा सुरूवात झाली तेव्हा धर्मराज पहिल्या डावापासून हरू लागला आणि दुर्योधन प्रत्येक डाव जिंकतच गेला. शकुनीच्या



कपटामुळे धर्मराजाला एकही दान अनुकूल पडलेच नाही. सुरूवातीला धर्मराज हत्ती, घोडे, रथ यासारख्या गोष्टी ‘पणा’ला लावून हरला. पुढे पुढे सोन्या-चांदीचे दागिने, आभूषणे यासारख्या अधिक मौल्यवान वस्तू हरला. त्यानंतर राज्याच्या खजिन्यातील हिरे, मोती, माणके यासारखी अमूल्य रत्ने ‘पणा’ला लावून तीही हरता हरता धर्मराजाने हट्टाला पेटून, शेवटी त्याचे सर्व राज्यच पणाला लावले आणि त्याचा शेवट म्हणजे एका दानात व एका क्षणात तो सर्वस्व गमावून बसला.

थोडावेळ काय झाले हे कोणालाच कळले नाही. पण जेव्हा लक्षात आले तेव्हा दरबारातील सर्वजण सुन्नच झाले. खेळाची परिणती अशा तऱ्हेने होईल याची कोणालाच कल्पना नव्हती. तसा विचारही कोणाच्या मनाला शिवणे शक्यच नव्हते. भीष्म, द्रोण व विदूर यांच्यासारखी थोर मंडळी तर मनातून अतिशय अस्वस्थच झाली पण बसली मात्र स्वस्थच. पांडवांविषयी असूया बाळगून असलेला धृतराष्ट्र मात्र मनातून अत्यंत सुखावला. परंतु त्याने बाह्यांगाने तसे दर्शवू दिले नाही. दुर्योधनाला मात्र अगदी हर्षोन्माद झाला आणि त्याने तो अजिबात लपवला नाही. मोठमोठ्याने हास्याचा गडगडाट करीत दुर्योधन धर्मराजाला उद्देशून कुत्सितपणे म्हणाला,

“अरे धर्मराजा, आम्हा कौरवांचा विजय झालेला आहे आणि तुम्ही पांडव पूर्णपणे हरलेले आहात. आता या राज्यामध्ये क्षणभरही थांबण्याचे तुम्हाला काहीही कारणच नाही. तो हक्क तुम्ही पूर्णतः गमावलेला आहे. तुमच्या राज्यातीलही कोणत्याही व्यक्तीवर वा वस्तूवर तुमचा आता काहीही अधिकार उरलेला नाही. तेव्हा आता क्षणाचाही विलंब न लावता तुम्ही सर्व पांडवांनी हे राज्य सोडून निघणे, हेच आवश्यक आहे. तुमच्या नशिबी आता वनाचे राज्य आहे असेच दिसते. त्याचा निमूटपणे स्वीकार करा आणि वनवासातील सर्व सुखांचा अगदी निःसंकोचपणे अनुभव घ्या. त्यासाठी काहीही अनमान करू नका. अर्थात कुंतीदेवी या आम्हाला मातेसमान असल्यामुळे आम्ही त्यांना त्यांची इच्छा असल्यास आमच्या राजवाड्यात ठेवून घेऊ शकतो. तुमच्या दुर्दैवाचा त्रास कुंतीदेवींना व्हावा असे आम्हाला खरेच वाटत नाही. तुमची इच्छा असल्यास द्रौपदीही आमच्याकडे राहू शकेल. तिच्या नाजूक व कोमल देहाला वनवासाचे कष्ट झेपणार नाहीत. द्रौपदीवर तसे कष्ट भोगण्याची वेळ यावी असे आम्हालाही खरेच अगदी मनापासून वाटतच नाही. नाहीतरी द्रौपदीचे सौंदर्य त्या वनवासात वृथा कोमेजून जाणार आणि तुमच्यासारख्या कफल्लकांच्या संगतीत तिचे सर्व जीवनच फुकट जाणार. तेव्हा द्रौपदीने आमच्यासह रहाण्यानेच तिच्या सौंदर्याचे व गुणांचे चीज होणार आहे.

आम्हीही तिला उदार मनाने आमच्या दासीगृहात ठेवून घेऊ आणि तिच्याकडून योग्य ती सेवाही करून घेऊ."

असे म्हणून दुर्योधन छद्मीपणाने व मोठमोठ्याने हसू लागला. त्याच्या सर्व कौरव बंधूंनीही करतालीचा मोठा आवाज करून व मोठ्याने हसून दुर्योधनाला साथ व दाद दिली. धर्मराजासह सर्व पांडव मात्र लाजेने मान खाली घालून स्वस्थ बसले होते. धर्मराजाचा चेहरा अगदी म्लान झाला होता, तर भीमाचा चेहरा रागाने अगदी लालबुंद झाला होता. पण त्यालाही स्वस्थ बसण्यावाचून दुसरे गत्यंतरच नव्हते. अर्जुनाचा चेहरा अत्यंत गंभीर झाला होता; काय करावे हे त्यालाही सुचतच नव्हते. अशा वेळी अर्जुनाला कृष्णाचे तीव्रतेने स्मरण झाले खरे, परंतु नाईलाजास्तव स्वस्थ बसण्यावाचून तोही काहीच करू शकत नव्हता आणि ही अगतिकताच अर्जुनाच्या मनाला जास्त सतावीत होती. नकुल व सहदेवही अत्यंत कावरेबावरे झाले होते आणि केविलवाण्या नजरेने त्यांच्या ज्येष्ठ बंधूकडे आळीपाळीने केवळ पहात राहिले होते. द्रौपदी मात्र शांत दिसत होती. अचानक निर्माण झालेल्या या संकटाचा ताण तिच्याही मनावर निश्चितच होता आणि अशा वेळी कृष्णाची अनुपस्थिती तिला अधिकच जाणवू लागली होती. अशा परिस्थितीत तिला एकच गोष्ट करता येणे शक्य होते आणि ती म्हणजे अत्यंत मनापासून व आर्ततेने कृष्णाचा धावा करणे आणि द्रौपदी तीच गोष्ट करीत होती.

तेवढ्यात अचानक विदूर त्याच्या आसनावरून उठून उभा राहिला आणि सर्व दरबाराला उद्देशून थोड्याशा उच्च रवाने बोलू लागला.

"अहो सभाजनहो, या दरबारात धृतराष्ट्र, भीष्म व द्रोण यांच्यासारखे अनेक मान्यवर आणि तुमच्यासारखी सज्जन मंडळी उपस्थित असताना त्यांच्या साक्षीने हा जो प्रकार येथे घडत आहे, तो खरोखरीच लांच्छनास्पदच आहे. त्याची आपल्या सर्वांनाच लाज वाटली पाहिजे. कौरव व पांडव या भावाभावांमध्ये केवळ मौज म्हणून सुरू झालेला हा द्युताचा खेळ केवळ एक पोरखेळ न रहाता, तो एक क्रूर खेळच ठरावा ही या दरबाराच्या दृष्टीने खचितच भूषणास्पद गोष्ट नाही. कौरव पांडव एकमेकांचे बंधू आहेत, एकमेकांचे शत्रू निश्चितच नाहीत. मला पूर्ण खात्री आहे की पांडवांविषयी सर्वांच्याच मनात तीच आपलेपणाची भावना आहे, जी माझ्याही ठिकाणी आहे. त्यामुळे त्यांच्यावर हा जो दुर्धर प्रसंग ओढवू घातला आहे त्याची आपल्या सर्वांनाच अत्यंत काळजी लागून राहिलेली आहे आणि त्यातून लवकरात लवकर योग्य तो मार्ग काढून पांडवांची या भावी संकटातून सुटका व्हावी, असेच माझ्याप्रमाणे सर्वांनाच वाटत असणार.



अहो धृतराष्ट्र महाराज, तुमच्याही मनात पांडवांविषयी अत्यंत प्रेमाची व आपलेपणाचीच भावना आहे याची मला पूर्ण खात्री आहे. आपला बंधू पंडू याच्या निधनानंतर तुम्हीच या पांडवांना स्वतःच्या पुत्रांसारखेच प्रेमाने वाढवलेले आहे. यातून तुमच्या मनाचा मोठेपणाच व्यक्त झालेला आहे. त्यामुळे आताच्या परिस्थितीतही तुम्ही स्वस्थ बसून केवळ बघ्याची भूमिका घेणार नाही, याची मला पूर्ण खात्री आहे. तरीही या दरबारातील सर्वांच्याच मनातील भावना मी तुम्हाला विदीत करतो. तुम्हाला सर्वांच्याच वतीने अशी विनंतीही करतो की तुम्ही राजा या नात्याने हा चालू असलेला सर्व गैर प्रकार थांबवावा आणि द्युतामध्ये हरलेल्या सर्व गोष्टी पांडवांना पुन्हा परत कराव्यात. एवढेच नव्हे, तर त्यांना सन्मानाने त्यांच्या स्वगृही परत पाठवण्याची व्यवस्था करावी.”

विदुराचे बोलणे संपत असतानाच दरबारात उत्स्फूर्तपणे उच्च करतालीनाद झाला आणि जवळ जवळ सर्वांच्याच मुखातून ‘वाहवा, वाहवा’ असे शब्द निघून, त्याचाच एकीएक आवाज बराच वेळ घुमत राहिला. भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य इत्यादी ज्येष्ठांनीही मान डोलावून विदुराच्या बोलण्याला त्यांचे अनुमोदन दर्शविले. सर्वांनीच व्यक्त केलेल्या या प्रतिक्रियेमुळे खरा नाईलाज झाला, तो धृतराष्ट्राचाच. पांडवांच्या झालेल्या पराभवामुळे खरे तर धृतराष्ट्र मनातून अत्यंत खूष झाला होता. परंतु तसे तो बाह्यांगाने दाखवू शकत नव्हता. त्यातूनच विदुराच्या बोलण्याने आणि त्याला सर्वांकडूनच मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे तर धृतराष्ट्राची चांगलीच पंचाईत झाली. शेवटी त्याला दुर्योधनाचा राग व रोष पत्करण्याची मनाची तयारी करून चांगुलपणाचा आव आणणे भागच पडले आणि धृतराष्ट्राने सर्व दरबाराला उद्देशून बोलण्यास सुरूवात केली.

“अहो सभाजनहो, माझा धाकटा बंधू विदूर याच्या बोलण्याने माझ्या मनाला अत्यंत संतोषच झालेला आहे. त्याने सर्वांच्या मनातील सद्भावनेलाच शब्दरूप दिलेले आहे याची मला पूर्ण खात्री आहे. माझा बंधू पंडू याच्या निधनानंतर मी सर्व पांडवांकडे माझ्या पोटच्या मुलांसारखेच पाहिले आहे आणि तसेच वाढवलेही आहे हे आपण सर्वजण जाणून आहातच. पांडवांकडे पहाण्याची माझ्या मनाची ती दृष्टी अजूनही तशीच कायम आहे आणि त्यामध्ये कधीही बदल होणे शक्यच नाही. दुर्योधन हा हस्तिनापूरचा युवराज आहे आणि धर्मराजाकडे मी इंद्रप्रस्थ नगरीचे राज्य स्वाधीन केलेले आहे ही गोष्ट खरीच आहे. हीच व्यवस्था यापुढेही तशीच चालू राहील. कौरव व पांडव यांनी वेगळे राहून एकोप्याने रहावे, हीच आपल्या सर्वांचीच इच्छा आहे आणि माझेही त्यांना तेच सांगणे आहे. तेव्हा धर्मराजाने

द्युतामध्ये हरलेले त्याचे सर्व राज्य व वैभव त्याला परत दिले जावे असा आदेश, मी राजा या नात्याने आपणा सर्वांच्या साक्षीने देत आहे.”

धृतराष्ट्राच्या या बोलण्याचे दरबारातील सर्वांनीच करतालीचा प्रचंड नाद करून स्वागत केले. एवढा वेळ अधोमुख करून बसलेला धर्मराज त्याच्या जागेवरून उठून धृतराष्ट्राच्या जवळ आला आणि त्याने नम्रभावाने धृतराष्ट्राला पदस्पर्श करून वंदन केले. धृतराष्ट्रानेही थोडेसे औपचारिकरित्या का होईना पण धर्मराजाच्या मस्तकावर हात ठेवून धर्मराजाने केलेले वंदन स्वीकारल्याचे सूचित केले. त्यानंतर धर्मराजाने भीष्म, द्रोण, कृप व विदूर यांनाही अभिवादन करून त्यांचे आशीर्वाद घेतले. धर्मराजाच्या पाठोपाठ भीम, अर्जुन, नकुल व सहदेव यांनीही त्याचे अनुकरण केले आणि सर्व थोरामोठ्यांना अभिवादन केले. धर्मराजाने हात जोडून दुर्योधनालाही नमस्कार केला. एवढा वेळ कसाबसा संयम धरून असलेल्या दुर्योधनाच्या मनाचा तोल शेवटी सुटलाच आणि धर्मराजाकडे न पहाताच रागाने काहीतरी पुटपुटत आणि दणादण पावले टाकीत दुर्योधन दरबारातून चालता झाला. त्याचे सर्व बंधू व शकुनी मामा यांनीही त्याचेच अनुकरण केले.

अपमानित व अवमानित झालेले पांडव अत्यंत दुःखित अंतःकरणाने इंद्रप्रस्थ नगरीला परत गेले. घडलेल्या प्रसंगातून जो मानसिक धक्का त्यांना बसला होता तो एवढा जबरदस्त होता की त्यातून सावरण्यासाठी त्यांना बराच वेळ लागणे अगदी साहजिकच होते. परंतु घडलेला सर्व साद्यंत वृत्तांत जेव्हा कृष्णाच्या कानापर्यंत पोहोचला, तेव्हा तो त्वरेने धावतच इंद्रप्रस्थ नगरीला जाऊन पोहोचला. कृष्णाच्या आगमनाने सर्वांच्याच मनाला बरेचसे हलके वाटले. कृष्णाने सर्वांशी बोलून त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर कृष्णासह सर्व पांडव, कुंती व द्रौपदी हे एकत्र बसले असता कृष्णाने सर्वांना व विशेषतः धर्मराजाला उद्देशून बोलावयास सुरुवात केली.

“खरोखरी त्या ईश्वराची कृपा म्हणूनच तुम्ही एवढ्या मोठ्या घोर संकटातून बचावला आहात. त्याबद्दल जेवढी म्हणून त्या ईश्वराविषयी कृतज्ञता व्यक्त करावी तेवढी कमीच आहे. त्या ईश्वराची अशीच कृपा तुम्हा सर्वांवरती नित्यच असावी, हीच त्या ईश्वराचरणी माझी प्रार्थना आहे. परंतु या प्रसंगातून केवढे तरी शिकण्यासारखेही आहे असे मला तरी निश्चितपणे जाणवते. दुर्योधनासारख्या दुर्जनांनी बाह्यांगाने चांगुलपणाचा कितीही जरी आव आणला तरी त्यांची दुष्ट वृत्ती ही कायमच रहाते ही गोष्ट आपण नेहमीच लक्षात ठेवली पाहिजे आणि त्याच्यापासून नित्य सावध राहिले पाहिजे. आपण कोणाचे वाईट चिंतायचे नाही किंवा कोणाला फसवायचे नाही हे योग्यच आहे. पण त्याचबरोबर आपले कोणी वाईट चिंतीत नसतील असे गृहीत धरून रहाणे, हेही तेवढेच चुकीचे आहे. कोणी



आपल्याला फसवणार नाही याची काळजी घेऊन आपण नित्य सावध रहाणे, हेही अत्यंत आवश्यकच आहे.

हे धर्मराजा, याबाबतीत तुझी जबाबदारी अधिक आहे असे मला वाटते आणि ही गोष्ट तूही मनातून निश्चितपणे जाणून आहेस याची मला खात्री आहे. तुझ्या सज्जन स्वभावामुळे तुला या जगात काहीच व कोणीच वाईट दिसत नाही. परंतु तशी वस्तुस्थिती नाही ही गोष्ट खरी आहे. त्या दुर्जन दुर्योधनाची गोष्ट अगदी उलट आहे. त्याच्या दृष्टीला या जगात काहीच व कोणीच चांगले दिसत नाही. अर्थात वस्तुस्थिती तशीही नाही. कारण या जगात बरे-वाईट, गुण-दोष यांची सरमिसळच आहे. परंतु जे वृत्तीने तुझ्यासारखे सज्जन आहेत त्यांच्या गुणांची त्यांच्या दोषांवर नेहमीच मात होते आणि ते या जगात नेहमीच चांगुलपणाने प्रगट होतात. दुर्योधनासारखे जे वृत्तीनेच दुर्जन आहेत त्यांच्याठिकाणचे दोषच नेहमी उफाळून वरती येत असतात आणि त्यांच्याठायीचे गुण खाली राहून अप्रगटच रहातात. परंतु जगामध्ये प्रत्यक्ष प्रगट गोष्टींचाच बरावाईट अनुभव येत असतो. म्हणूनच या सृष्टीचे यथार्थ ज्ञान असणे आवश्यक आहे आणि जगातील चांगले व वाईट यांच्याकडे सम्यक दृष्टीने पहाता आले पाहिजे. एवढेच नव्हे तर, चांगल्या गोष्टींना जवळ करीत असताना वाईट गोष्टींपासून प्रयत्नपूर्वक दूर रहाण्याचे किंवा वेळप्रसंगी त्या वाईट गोष्टींना पराक्रमाने दूर करण्याचे मनोबळ आपल्या ठिकाणी असावयासच हवे. तरच आपला या जगात निभाव लागू शकेल आणि आपल्याला आपले जीवन तरी शांतीने व सुखासमाधानाने जगता येईल. धर्मराजा, मी जे काही तुला आता सांगत आहे ते सर्व काही तू जाणून आहेसच. मी तुला काहीही मुद्दाम सांगण्याची आवश्यकताच नाही. केवळ तुझ्यावरील आपलेपणापोटीच मी तुला त्याचे फक्त स्मरण करून देत आहे, एवढेच!"

कृष्णाच्या बोलण्यातील यथार्थता सर्वांनाच पटली आणि त्यांच्या मनाला ती भावलीही. परंतु त्यावर बोलले मात्र कोणीच नाही. इतर पांडवांची, कुंतीची व द्रौपदीचीही नजर धर्मराजाकडेच होती. परंतु धर्मराजानेही बोलून अशी काही प्रतिक्रिया व्यक्त केलीच नाही. फक्त त्याने कृष्णाकडे पाहून मंदस्मित केले आणि हलकेच मान डोलवली. त्यातून 'कृष्णा, तुझे म्हणणे योग्यच आहे. मी त्याच्यावरती निश्चितच विचार करीन.' एवढेच धर्मराजाला सूचित करायचे होते, हे सर्वांच्याच लक्षात आले. त्यानंतर धर्मराज सर्वांचा नजरेनेच निरोप घेऊन तेथून निघून गेला. भीम, नकुल व सहदेवही तेथून अदबीने बाहेर पडले. मग कुंतीही तेथे थांबली नाही आणि तेथे राहिले फक्त अर्जुन, द्रौपदी व कृष्ण. थोडावेळ त्यांच्यापैकीही कोणी काहीच बोलले नाही. परंतु शेवटी न राहवून अर्जुनाने बोलावयास सुरुवात केली.

“हे कृष्णा, खरोखरीच तुझे बोलणे एवढे सरळ, स्पष्ट व सत्य होते की त्याविषयी काही दुमत होणे शक्यच नाही. मला नेहमी एकच कोडे पडत असते की हे सर्व बोलणे तुला जमते कसे आणि मुळात ते तुला सुचते कसे? मुख्य म्हणजे, तुझ्या सांगण्यात मला केवळ तुझी बुद्धीची चमक किंवा ज्ञान दिसत नाही, तर त्यामध्ये एक प्रकारची आमच्याविषयीची असलेली कळकळ दिसते आणि त्यामागे असलेला आमच्याविषयीचा आपलेपणाही जाणवतो. माझ्या दृष्टीने तीच गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. कारण या जगात, न मागताही फुकटचा सल्ला देणारे अनेकजण आहेत. त्यांचा तो आपलेपणाचा आव तेवढाच व तेवढ्या पुरताच मर्यादित असतो. परंतु प्रत्यक्ष प्रसंगात मदतीला धावून येणे आणि साथ देणे हाच खरा आपलेपणा आहे. असा खरा आपलेपणा मला तरी तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाच्याही ठायी अनुभवाला आलेला नाही. अर्थात द्रौपदीच्या ठिकाणीही माझ्याविषयी आपलेपणा आहेच आणि तो तुझ्यामुळेच आहे, हे मी जाणून आहे. तुझा माझ्याविषयीचा आपलेपणाच द्रौपदीच्याठायी प्रतिबिंबित झालेला आहे असे मला जाणवत असते आणि ते अगदी खरेही आहे.

कृष्णा, पण माझी खरी अडचण वेगळीच आहे. तुझे सांगणे मला पटत असूनही त्याप्रमाणे वागणे मात्र मला जमत नाही. विशेषतः जेव्हा आमच्या कौटुंबिक गोष्टी असतात तेव्हा तर तुझ्या सांगण्याप्रमाणे निर्णय घेणे मला शक्यच होत नाही आणि याच गोष्टीचे मला अत्यंत वाईट वाटते. परंतु माझाही नाईलाजच होत असतो. त्यामुळे द्रौपदीचीही कुचंबणा होत असते, हे माझ्याही लक्षात येते. पण त्यावरती मला तरी काही इलाज सापडत नाही. कारण धर्मराज हा ज्येष्ठ बंधू या नात्याने आमच्या कुटुंबाचा प्रमुख असल्यामुळे, आम्हा सर्वांना त्याचे म्हणणे बंधनकारक ठरते आणि त्याप्रमाणे वागावेही लागते. मग यावरती उपाय काय? ही परिस्थिती तर अशीच कायम रहाणार आहे आणि धर्मराजाचा स्वभावही आहे तसाच रहाणार आहे. तू म्हणतोस त्याप्रमाणे धर्मराज सज्जन स्वभावाचा आहे ही गोष्ट खरीच आहे. परंतु काहीवेळा या सज्जनपणाचा अतिरेक होतो आणि स्वतःवर स्वतःहूनच संकटे ओढवून घेतल्यासारखे होते. बरे, धर्मराजाला कोणी काही सांगायची सोय नसतेच. अर्थात तो सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतो खरे, पण शेवटी त्याला जे करायचे तेच तो करतो.

कृष्णा, आताच तू धर्मराजाशी किती आपलेपणाने बोलून त्याला कितीतरी गोष्टी योग्यप्रकारे समजावून सांगितल्यास. पण तू त्याची त्यावरील प्रतिक्रिया पाहिलीस ना? काहीही न बोलता तो अगदी शांतच राहिला. तुझा आपलेपणा व तुझे वेगळेपण त्यालाही निश्चितच जाणवते. तुझे सांगणेही त्याला पटलेले आहे.

परंतु म्हणून तुझ्या सांगण्याप्रमाणे तो त्याच्या वागण्यात काही बदल करेल अशी शक्यता मात्र मुळीच नाही. कारण त्याने त्याची एक विचारसरणी निश्चित करून ठेवलेली आहे आणि तीच विचारसरणी आचरणात आणण्याचा तो प्रयत्न करीत असतो. त्यातूनही त्याचे आराखडे जर यदाकदाचित चुकले तर सर्वांची क्षमा मागण्याचा मानभावीपणाही त्याच्याठायी आहे. परंतु स्वतःची मुळातील विचारसरणी मात्र तो कधीच बदलणार नाही. त्याची काही ठाम मते झालेली आहेत आणि त्या मतांनाच तो नेहमी धरून रहातो. अशा परिस्थितीत मी व द्रौपदीनेही कसे वागावे व काय निर्णय घ्यावे, हेच मला कळत नाही. माझ्या मनाची तर नेहमी ओढाताणच होत असते. तेव्हा मी काय करावे व कसे वागावे याविषयी, आता तूच काय ते मला समजावून सांग बरे."

कृष्णाशी बोलल्यावरती अर्जुनाचे मन मोकळे झाले आणि त्याच्या मनावरील सुप्त ताणही बराचसा हलका झाला. अर्जुनाची अगतिकता पाहून कृष्णालाही त्याची दयाच आली. त्याने अर्जुनाच्या जवळ जाऊन त्याच्या खांद्यावर हलकेच थोपटले आणि तो अर्जुनाशी सांत्वनपर वचने बोलू लागला.

"अरे अर्जुना, तुझ्या मनाची होणारी कुचंबणा मी समजू शकतो. परंतु त्याला जशी बाह्य परिस्थिती कारणीभूत आहे, तशीच तुझी मनःस्थितीही तितकीच कारणीभूत आहे. तुमच्या कुटुंबाचा धर्मराज हा ज्येष्ठ बंधू या नात्याने प्रमुख आहे ही गोष्ट तर खरीच आहे आणि ती मान्य करावयासच हवी. परंतु तूही त्या कुटुंबाचा एक तेवढाच महत्त्वाचा घटक आहेस हेही खरेच ना? त्याचप्रमाणे एखादा केवळ नात्याने व वयाने मोठा आहे म्हणजे त्याचे सर्वच वागणे व बोलणे हे नेहमी योग्यच असेल, असे कसे म्हणता येईल बरे? ज्ञानाचे मोठेपण हेही खरेच नाही. अनुभवाने आलेले मोठेपण हेच खरे मोठेपण होय. व्यक्ती ही तिच्या अनुभवानेच मोठी होते, म्हणजे मोठे होते ते त्या व्यक्तीचे मन! मन मोठे होते म्हणजेही ते मन निर्विकार, निर्मळ व निर्मोही होऊन शुद्ध होते. त्यामुळेच योग्य अयोग्य जाणण्याची पात्रता आणि त्याप्रमाणे निर्णय घेऊन जीवनात तसे वागण्याची सबळता प्राप्त होते. त्या शुद्ध मनाचे हेच मुख्य लक्षण आहे. पण जेव्हा त्याच मनाला आतून व्यक्ती वा कर्तव्यकर्म यांच्याविषयीच्या मोहाची पुटे चढतात आणि अहंकाराने ती घट्ट होतात, तेव्हा ते मन अत्यंत संकुचित होते. अशावेळी त्या मनाची विचारदृष्टीसुद्धा अत्यंत कोती होते आणि म्हणूनच ते मनही दुर्बलच होते. त्या दुर्बलतेची फळे मग त्या मनाला भोगणे भागच पडते. मनाच्याठायी अत्यंत नैराश्य वा कमालीची उद्विग्नता निर्माण होऊन मनाला अत्यंत क्लेश होतात आणि दडपणाखाली मनाठायीचा मोकळेपणाच पूर्णपणे हरवला जातो.

अर्जुना, म्हणूनच मनावरील कर्तव्यकर्माचे व नात्याचे असलेले वृथा दडपण बाजूला करणे शक्य व्हावयास हवे. त्यासाठी मनाच्या ठायी हिंमतच असावी लागते. त्याकरीता सत्य-असत्य, योग्य-अयोग्य व आवश्यक-अनावश्यक यांचा निवाडा करणारा विवेकच प्राप्त करून घ्यावयास हवा आणि बुद्धीच्याठायी त्याचा कृतनिश्चयच करावयास हवा, जो प्रत्यक्ष कृती करण्यासाठी प्रेरणा देऊन उद्युक्त करतो. असा विवेक हा सत्पुरूषांच्या सहवासात त्यांचे प्रत्यक्ष जीवनात मार्गदर्शन घेऊन आणि त्यांच्याशी संवाद केला असताच प्राप्त होऊ शकतो. परंतु त्यांचा सहवास घडण्यासाठी त्यांच्यावर अलोट प्रेम हवे आणि त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे प्रत्यक्ष जीवनात वागण्यासाठी त्यांच्यावरती अतूट श्रद्धा ही हवीच. त्याशिवाय ते शक्य होणार नाही. त्यांच्यावरती पूर्ण श्रद्धा निर्माण होण्यासाठी एखादेवेळी जरी वेळ लागला तरी त्यांच्या माहात्म्याची जाणीव दृढपणे अंतरात ठेवून, त्यांचे चरण मात्र कायमचे धरूनच ठेवले पाहिजेत.

अर्जुना, जेव्हा तुला तुझ्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव होईल, तेव्हाच तुला माझे सांगणे कळेल आणि पटेलही. एका कुटुंबात निरनिराळया नात्याने व योगायोगाने एकत्र आलेल्या व्यक्ती या प्रत्येक जीव म्हणून स्वतंत्रच असतात, ही महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव. सर्व कुटुंबाचे जसे आपण लागतो तसेच आपण आपलेही लागतो आणि त्याही आधी खरे तर आपण त्या ईश्वराचे लागतो हे सत्य आहे. त्या ईश्वराच्या कृपेने आपल्याला हा जन्म व हे जीवन लाभलेले आहे आणि ते सर्व आधी त्याचे व त्याच्यासाठी आहे याचे कधीही विस्मरण होऊ देऊ नकोस. आता तर तू द्रौपदीचीही जबाबदारी स्वीकारलेली आहेस. पती-पत्नी या नात्याने तुम्ही एकमेकांना मनापासून जोडीदार म्हणून निवडलेले आहे आणि जीवनात तुमची जोडी जमायची आहे. एकमेकांना साहाय्यभूत होऊन जीवनातील खरा आनंद प्रत्येकाने अनुभवायचा आहे. हाच तर पती-पत्नी या नात्याचा खरा हेतू आहे. हेच नाते तुझ्या जीवनात मूलभूत आहे याची नित्य जाणीव ठेव. इतर नाती ही दुय्यम व पूरक आहेत. ती नाती जर तुमच्या पती-पत्नीच्या नात्याच्या आड येऊ लागली तर वेळप्रसंगी, त्या नात्यांना बाजूला करण्याचे धैर्यबळच तुझ्या मनाठायी हवे. त्यासाठी तुला क्वचित प्रसंगी वेगळी, पण योग्य अशी भूमिकाही घ्यावी लागेल. तेव्हा मात्र तुझे मन मुळीच कचरू देऊ नकोस म्हणजे झाले. योग्य कारणासाठी व योग्यवेळी तू जर द्रौपदीच्या पाठीशी किंवा तिच्या प्रत्यक्ष साथीला उभा राहू शकलास तर त्यातच द्रौपदीला सर्वकाही पावले असेच तिला वाटेल आणि मीही अत्यंत आनंदीतच होईन."

बोलता बोलता कृष्णाचे मन प्रेमाने भरून आले आणि त्याचा परिणाम त्याच्या आवाजावरतीही झालाच. कृष्णाचाही कंठ दाटून आला आणि त्यातून बाहेर



येणारा शब्दप्रवाह अत्यंत सहजगत्या थांबलाच. कृष्णाची ती अवस्था पाहून द्रौपदीला तर भरून आलेच, पण अर्जुनाचेही मन जरासे हेलावलेच. कृष्णाने लगेचच स्वतःला सावरले आणि त्याने अर्जुन व द्रौपदी यांच्या मस्तकावर थोपटले आणि त्यांच्या खांद्यावर हात ठेवून प्रेमाने त्यांना आपल्याजवळ घेतले. कृष्णाच्या प्रेमस्पर्शाने अर्जुन व द्रौपदी या दोघांचेही मन जसे सुखावले तसेच ते कृष्णप्रेमाने भरूनही राहिले आणि ते दोघेही कृष्णाच्या अधिक जवळ आले. क्षणभराने कृष्ण त्या दोघांमधून सहजपणे बाजूला झाला आणि त्यामुळे साहजिकच एकमेकांच्या अधिक जवळ आलेल्या अर्जुन व द्रौपदी यांच्याकडे कृष्णाने अत्यंत कौतुकाने डोळे भरून पाहिले. पुढच्याच क्षणाला तेवढ्याच सहजतेने तो तेथून निघूनही गेला. कृष्णाच्याकडे प्रेमाने नेत्र भरून पहात असलेल्या अर्जुन व द्रौपदी यांनी जेव्हा एकमेकांकडे पाहिले तेव्हा त्यांना परस्परांच्याठायी एकीएक कृष्णप्रेमच दिसले आणि त्याच प्रेमाने त्या दोघांनी एकमेकांना जवळ घेतले.

अशाच अवस्थेत बराच वेळ कधी गेला हे अर्जुन व द्रौपदी या दोघांच्याही लक्षातच आले नाही. काही वेळाने ते दोघे एकमेकांपासून शरीराने अलग झाले खरे, परंतु त्यांचे मन मात्र अजूनही पूर्वीच्या प्रेमावस्थेतच बुडालेले होते. दोघेही एकमेकांकडे अत्यंत आपलेपणाने पहात होते आणि दोघांनाही काहीतरी बोलावे असे वाटत होते. पण कोणीच बोलत नव्हते. प्रत्येकाला वाटत होते की दुसरा काहीतरी बोलेल आणि म्हणून दोघेही स्वस्थच राहिले होते. शेवटी न राहवून अर्जुनाने बोलावयास सुरुवात केलीच.

“अगं द्रौपदी, या कृष्णाच्या प्रेमात काहीतरी जादू आहे हे निश्चित. बघ ना, त्याच्या थोड्यावेळच्या थोड्याशा प्रेमाच्या अनुभवाने मनाला किती हलके व किती बरे वाटत आहे. कृष्ण जरी आता येथे नसला तरी माझ्या मनात त्याचे अनुभवलेले प्रेम अजूनही रेंगाळत आहे आणि माझ्या मनाला एकदम ताजेतवाने व अत्यंत उत्साही वाटत आहे. एवढेच नव्हे, तर त्याच प्रेमाने तुझ्याकडे पहात असताना तूही कितीतरी वेगळी व अधिकच आकर्षक दिसत आहेस. हा माझ्या मनावर झालेल्या कृष्णप्रेमाचा परिणाम आहे, की हे तुझ्यावर झालेल्या कृष्णप्रेमाच्या प्रभावाचे द्योतक आहे हेच मला समजू शकत नाही आणि ते समजून घेण्याची मला आवश्यकताही वाटत नाही.”

असे म्हणून अर्जुन अत्यंत मोकळेपणाने हसला आणि द्रौपदीनेही तेवढ्याच मोकळेपणाने हसून त्याला दाद दिली. हास्याचा फुललेला फुलोरा थोडासा कमी झाल्यावरती अर्जुनाने पुन्हा बोलावयास सुरुवात केली.

"पण द्रौपदी, कृष्ण जे काही मला गंभीरपणे सांगत होता त्याचा विचार करणे मला तरी थोडेसे जडच जात आहे. अर्थातच कृष्णाचे सांगणे माझ्या बुद्धीला निश्चितच पटते. परंतु ते माझ्या मनाला झेपणे मात्र कठीणच आहे. एकत्र कुटुंबात राहून पुन्हा काही वेगळी भूमिका घेणे, मला तरी शक्य होणार नाही. कुटुंबातील माझ्या इतर नात्यांपेक्षा माझे तुझ्याशी असलेले नाते हे वेगळेच आहे हे कृष्णाचे म्हणणेही अगदी बरोबरच आहे. परंतु आपले हे नाते इतर नात्यांपेक्षा वरचढ न ठरता ते त्या नात्यांना पूरक व पोषक ठरावे असेच मला वाटते. कारण ज्या कुटुंबात मी जन्मलो व लहानाचा मोठा झालो त्या कुटुंबापेक्षा काही मी वा आपले नाते मोठे असू शकत नाही, अशी माझ्या मनाची ठाम धारणा आहे. लहानपणापासून माझ्यावर असेच संस्कार झालेले आहेत की कुटुंब माझ्यासाठी नसून मी कुटुंबासाठी आहे. कारण आधी माझे कुटुंब होते आणि मग त्यानंतर मी आहे, ही तर वस्तुस्थितीच आहे. त्यामुळे सर्व कुटुंबाच्याच हिताचा जेव्हा प्रश्न निर्माण होईल तेव्हा त्याग हा माझ्याकडूनच घडावयास हवा, हे तर स्पष्टच आहे. त्यात जराही संदेह नाही. मग कुटुंबात राहूनच आपले जीवन वेगळेपणाने जगणे माझ्यासाठी तरी अशक्यच आहे. पण कृष्णाच्या सांगण्याचा सूर व मतितार्थ असाच काहीसा होता असे मला तरी जाणवते. त्यामुळे कृष्णाच्या बोलण्याचे माझ्या मनावरती थोडेसे दडपण आलेले आहे हे मला कबूल करावयास हवेच.

द्रौपदी, कृष्णाच्या बोलण्यातून आणखीन एक गोष्ट माझ्या लक्षात आली की तुझ्यासंबंधी कृष्णाच्या माझ्याकडून काही विशेष अपेक्षा आहेत. त्याने माझ्यावरील मोठ्या विश्वासाने तुला माझ्याकडे सोपवले आहे ही गोष्ट मी जाणून आहे. अर्थात त्याचे माझ्या मनावरती मोठे दडपण आहे असे नाही. कारण माझ्यावरील त्या जबाबदारीची जाणीव मलाही आहे. माझे ते केवळ कर्तव्यकर्म आहे म्हणूनच नव्हे, तर तुझ्यावरील प्रेमापोटी माझ्याकडून तसे अगदी सहजपणे घडणारच. तुझ्या मनाची अवस्था सांभाळण्याची काळजी मात्र मला मुळीच वाटत नाही. कारण तू तर मनाने माझ्यापेक्षा जास्तच सबळ आहेस आणि तुझ्यावर असलेल्या कृष्णाच्या प्रभावाचेच हे फळ आहे, हेही निश्चितच आहे. काही वेळा, प्रसंगी तूच माझ्याशी बोलून माझ्या मनाला बळ देत असतेस, ही गोष्टही खरीच आहे. परंतु कृष्णाच्याठिकाणी तुझ्या प्रेमापोटी तुझ्याविषयी अतिशय काळजी आहे आणि म्हणूनच त्याला माझी जास्त काळजी वाटत असावी. तो तसे वारंवार दर्शवीतही असतो. अर्थात त्याचा माझ्यावरही पूर्ण विश्वास आहे. परंतु काही वेळा प्रत्यक्ष प्रसंगात मी मनोबळाने कमी पडेन की काय अशी काळजी कृष्णाच्या मनात कोठेतरी असावी असे मला वाटते. परंतु जर यदा कदाचित तसा प्रसंग खरेच आला



तर मी कृष्णाचीच मदत घेईन आणि कृष्णही आपल्या मदतीला निश्चित धावून येईल याची मला पूर्ण खात्री आहे. तुलाही तशी खात्री आहे ना? मग झाले तर!”

अर्जुनाच्याठायी प्रश्न विचारण्यामागे कृष्णाविषयी अर्थातच कोणतीही शंका नव्हतीच, तर त्याच्याविषयीचा पूर्ण विश्वास होता आणि तोच विश्वास द्रौपदीच्या बोलण्यातूनही तेवढ्याच सहजतेने साकार होऊ लागला.

“अहो नाथ, तुमच्याप्रमाणे माझ्याही ठिकाणी त्याची पूर्ण खात्री आहे. तसा तर प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही. परंतु मुख्य प्रश्न असा आहे की खरोखरीच जर असा अनावस्था प्रसंग आपल्या जीवनात आला तर आपल्याला कृष्णाला हाक मारण्याची संधी तरी मिळेल का? आणि कृष्णालाही असे बाह्यांगाने नेहमीच धावून येणे खरेच शक्य होईल का? कारण बाह्य अडचणी या आपल्याप्रमाणेच कृष्णालाही असू शकतात. संकटे किंवा अडचणी या काही आधी सांगून येत नसतात. अर्थात हे आपणही जाणून असतो, पण आपण ते विसरत असतो. नेमके त्याचेच स्मरण आपल्याला करून देऊन सावध करण्याचा प्रयत्न कृष्ण करीत आहे आणि अशा प्रसंगासाठी आवश्यक असणारे मनोबळ आपल्यालाच प्राप्त व्हावे, हाच तर कृष्णाच्या सर्व सांगण्यामागील हेतू आहे. ही गोष्ट तुमच्या लक्षात येत आहे ना? कृष्णाच्या प्रेमाने, त्याच्या भेटीत किंवा त्याच्या बोलण्यामुळे हे बळ आपल्याला निश्चितच मिळते. पण ते तेवढा वेळच असते. ते बळ आपल्या मनाचे कायमचे होऊन राहू शकत नाही. कारण मनाची मूळची दुर्बलता कायम असते आणि त्याचीच पुन्हा मनावर मात होत असते. त्या मनाच्या दुर्बलतेची जी मूळ कारणे आहेत ती दूर केल्याशिवाय मन कायमचे सबळ होणार नाही ही गोष्ट आपल्या मनावर बिंबवण्याचा कृष्ण प्रयत्न करीत आहे. मनाच्या दुर्बलतेची ही मूळे मनाठायी असलेल्या सुखाच्या वासनेत, मोहात आणि मन वृथा वहात असलेल्या कर्तव्यकर्मांच्या ओझ्यात आहेत हे कृष्ण जाणून आहे आणि त्याकडेच कृष्ण निर्देश करीत आहे हे लक्षात घ्या. कृष्णाचा हेतू आधी आपण जाणला की मग कृष्णाच्या बोलण्याचे कारण आपल्याला कळेल आणि ते कारण कळले की मग आपल्याला कृष्णाच्या बोलण्याचा अर्थ लागेल. त्यानंतरचा प्रयत्न करण्याचा पुढील भाग हा आपल्यावरती अवलंबून आहे.

हे नाथ, आपले हित हाच कृष्णाच्या मनातील शुद्ध हेतू आहे आणि त्याचे आपल्यावरील निरपेक्ष व निष्काम प्रेम हेच त्याच्या सर्व बोलण्यामागील कारण आहे. खरे तर, कृष्णाचे प्रेम आपणा सर्वांवरती सारखेच आहे. परंतु त्याच्या प्रेमाला प्रत्येकाकडून मिळणारा प्रतिसाद मात्र वेगवेगळा आहे. त्याला कृष्णाचाही

नाईलाजच आहे. परंतु आपणा दोघांचे कृष्णाशी प्रेमाचे विशेष संबंध आहेत ही गोष्ट खरीच आहे. कृष्णाच्यात व आपल्यात विशेष सख्य आहे आणि त्याचा आनंद कृष्णालाच जास्त होत असतो. पण म्हणूनच कृष्ण आपल्याशी एवढ्या मोकळेपणाने बोलण्याचे स्वातंत्र्य घेत असतो आणि साहजिकच त्याला आपल्याकडून प्रतिसाद मिळण्याची अपेक्षाही जास्त असते. त्यासाठीच तो आपल्याशी वारंवार संवाद साधण्याचा प्रयत्न करीत असतो. अर्थात आपण आपल्या मनाच्या दुर्बलतेमुळे आपल्या आचरणाने त्याला तेवढा प्रतिसाद देऊ शकलो नाही, तरी कृष्ण आपल्यावरती कधीच रागावणार नाही. पण त्याला वाईट मात्र निश्चितच वाटेल आणि तेही आपल्यावरील आपलेपणापोटीच. परंतु कृष्ण त्याचे ब्रीद मात्र कधीच सोडणार नाही. त्याचे आपल्यावरील प्रेम जराही कमी न होता ते आपल्याला नेहमीच मिळत राहील आणि आपल्या हितासाठी कृष्ण नेहमीच झटत राहील.

हे नाथ, भाग्याने आपल्याला मिळत असलेल्या कृष्णप्रेमाला पात्र होण्याची जबाबदारी मात्र आपलीच आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे आणि त्यासाठीच आपल्या मनाची दुर्बलता आधी गेली पाहिजे. म्हणजे आपण ती प्रयत्नपूर्वक घालवली पाहिजे. त्याचाच उपाय कृष्ण सांगत होता की जीवनात सत्पुरूषांचे मार्गदर्शन घेऊन्न विवेक प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. परंतु एक महत्त्वाची गोष्ट तुमच्या लक्षात आली आहे का, की कृष्णाच्या रूपानेच आपल्याला असा सत्पुरूषच नव्हे तर महापुरूषच भेटलेला आहे. व्यास व भीष्म यांच्यासारखी थोर मंडळीही, म्हणूनच कृष्णाची थोरवी जाणून त्याचा आदर करीत असतात. राजसूय यज्ञाच्या वेळी घडलेला एक प्रसंग तुमच्या लक्षात आहे ना? यज्ञाच्या सुरुवातीला धर्मराज अग्रपूजेचा मान व्यासमहर्षींना देत होते. परंतु स्वतः त्यांनीच, तो अग्रपूजेचा मान कृष्णाला द्यावा असे धर्मराजांना अत्यंत आग्रहपूर्वक सांगितले आणि भीष्मांनीही त्याला अनुमोदन दिले. तेव्हा मग धर्मराजांनी कृष्णाचीच अग्रपूजा केली. माझ्या दृष्टीने तरी ही गोष्ट साधी नाही. कृष्णाला यथार्थ जाणणारे तर त्याला 'पुरूषोत्तम' असेच संबोधीत असतात आणि ते अगदी सार्थच आहे. हे नाव कृष्णाला सर्वांगाने व सर्वार्थाने शोभून दिसते, हेही खरेच आहे. असा हा कृष्ण आपला केवळ सखाच नव्हे तर गुरूही आहे आणि आपल्यासाठी तोच ईश्वरही आहे अशी माझी दृढ श्रद्धा आहे. तुम्हीही त्याच दृष्टीने व तशाच भावाने कृष्णाकडे पहाल तर तुम्हालाही तशीच प्रचिती येईल याची मला पूर्ण खात्री आहे."

द्रौपदी तिचे बोलणे थांबले तरी अर्जुनाकडे एकटक नजरेने पहातच राहिली होती. तिच्या नजरेतील आपलेपणा व अपेक्षा या दोन्ही गोष्टी अर्जुनाच्या लक्षात आल्या. आधी थोडावेळ तो काहीच बोलला नाही. परंतु नंतर अर्जुनाने द्रौपदीच्या

जवळ येऊन तिचे दोन्ही हात त्याच्या हातात घेतले आणि तिच्या नजरेत त्याची नजर मिळवली. द्रौपदीने लाजून तिची नजर खाली झुकवली असता अर्जुनाने तिची हनुवटी धरून तिचे मुख हळुवारपणे वर उचलले आणि तिच्याशी बोलावयास सुरुवात केली.

“द्रौपदी, तुझ्याठायी भावनात्मकता व बुद्धीमत्ता यांचा अत्यंत सुरेख संगम झालेला आहे यात जराही शंका नाही. त्यामुळेच तुझे बोलणे जसे मनाला स्पर्शित करून भावते, तसेच ते बुद्धीलाही पटते. माझ्यातील कमतरतेची जाणीव मला आहे आणि त्यातून बाहेर पडायचे असेल तर कृष्णाशी जवळीकता साधणे हाच त्याच्यावरील एकमेव उपाय आहे, हेही माझ्या लक्षात येते. पण त्यासाठी माझी कृष्णाकडे पहाण्याची दृष्टी बदलली पाहिजे, हेही मला जाणवत आहे. त्यासाठी कृष्णाची थोरवी खऱ्या अर्थाने मी जाणून घेणे आवश्यक आहे आणि ती तुझ्या सहवासातच हळूहळू मला कळेल, याची मला खात्री आहे. कारण कृष्णाचे माहात्म्य तू यथार्थपणे जाणून आहेस ही गोष्ट तुझ्या शब्दाशब्दांतून अगदी सहजपणे प्रगट होत असते. कृष्णाला तुझ्या अंतरात तू नेहमीच अत्यंत जवळ पहातेस आणि तसा अनुभव घेण्याचा तुझा ध्यास व तसा प्रयत्नही असतो असे मला अगदी स्पष्टपणे दिसत असते. माझ्यासाठी तीच अत्यंत जमेची बाजू आहे. कारण त्यामुळेच मला तुझ्याकडून कारणाकारणाने किंवा काहीवेळा अकारणही, पण कृष्णाविषयी ऐकण्याची संधी मिळत असते. त्यावरती माझ्याकडून विचारही निश्चितपणे घडत असतो. त्या आड येणाऱ्या माझ्या कौटुंबिक अडचणी या मूलतः मानसिकच आहेत हे मलाही ठाऊक आहे आणि तसेच ते तुलाही ठाऊक आहे. एक दिवस मी माझ्या मनातील कर्तव्यकर्माच्या भावनेच्या गुंत्यातून सुटेन असा माझा विश्वास आहे. तोपर्यंत मात्र, तू मला अशीच साथ देत रहा आणि कृष्णाची थोरवी सांगत रहा म्हणजे झाले. अर्थात तुला हे मी सांगण्याचीही अजिबात आवश्यकता नाही. तुझ्याकडून ते सहजपणे घडत रहाणारच याची, मला पूर्ण खात्री आहे. कारण कृष्ण व मी असे आम्ही दोघेही तुझ्या अत्यंत प्रेमाचे आहोत ही गोष्ट अगदी खरी आहे. होय ना?”

अर्जुनाच्या बोलण्यावरती द्रौपदी अत्यंत मोकळेपणाने हसली व म्हणाली,

“होय, अगदी बरोबर! परंतु कृष्णाचे जे प्रेम आपल्यावरती आहे तेच खरे आहे. कारण त्याच्या प्रेमामध्ये आपले सर्व जीवनच घडवण्याचा विचार, प्रेरणा व सामर्थ्य आहे. ही गोष्ट जशी जशी व जेवढी जेवढी आपल्या लक्षात येईल आणि जेव्हा तसा तसा व तेवढा तेवढा प्रतिसाद आपल्याकडून कृष्णाला दिला जाईल, तेव्हाच त्याचे फळ आपल्याला मिळायला सुरुवात होईल. पूर्ण फळ मिळायला जरी वेळ लागला तरी कृष्णाप्रेमाचा जो काही अनुभव आपण घेत राहू त्यामुळे आपल्या मनाला

स्वस्थता, शांतता व समाधान यांचा मात्र निश्चितच लाभ होत राहील. पण त्यातूनच जर भाग्याने व योगायोगाने आपल्या मनात कृष्णाविषयीच प्रेम निर्माण झाले तर आपल्या मनात कृष्णाविषयी विचार येण्यास आधी सुरुवात होईल आणि मग ते वाढत रहातील. त्यामुळे आपल्याला हळूहळू कृष्णाचे मन व त्याच्या मनातील आपल्याविषयीचे व्यवधान कळू लागेल. त्या व्यवधानांच्या आधारानेच आपल्याला कृष्णाचे मन जाणणे शक्य होईल. कृष्णाचे मन व त्याची आपल्याविषयीची व्यवधाने हीच प्रमाण मानून ती राखण्याचा प्रयत्न आपल्याकडून कृष्णप्रेमामुळे सहजपणे घडत राहील. सुरुवातीला कधीतरी आपल्या प्रेमाचे बळ कमी पडून आपल्यावर इतरांच्या विचारांची मातही होऊ शकेल. परंतु अशावेळी आपल्याला सावरण्यासाठी सुदैवाने प्रत्यक्ष कृष्णच आपल्याबरोबर असल्यामुळे आपल्याला काळजी करण्याचेही मुळीच कारण नाही. आपल्या प्रेमाने सदैव युक्त असलेला कृष्ण तत्परतेने आपल्या मदतीला धावून येईलच. परंतु अशी वेळ कृष्णावर वारंवार येऊ न देण्याची जबाबदारी मात्र आपलीच आहे. कारण कृष्ण कधीच तक्रार करणार नाही किंवा तो नाराजही होणार नाही. परंतु प्रसंगात आपण मनाच्या दुर्बलतेमुळे कमी पडलो याचे मात्र कृष्णाला नक्कीच वाईट वाटेल आणि त्याच्या मनाला क्लेशही होतील. अशावेळी आपल्या मनाला सबळ करणारे कृष्णप्रेम आपल्या मनात जागवून ते वाढवणे आणि आपल्या मनाला दुर्बल करणारी इतर अनावश्यक कर्तव्यकर्मे व त्यांचे मोह हे झटकून बाजूला करणे, हाच एकमेव मार्ग आपल्यासाठी आहे.

अहो नाथ, आपल्या मनातील हे दोष पूर्णपणे जायला वेळ हा लागणारच आहे. कधी आपल्या मनाठायीच्या कृष्णप्रेमाची मात होईल तर कधी आपल्या मनाठायीच्या दोषांची मात होईल. परंतु निराश न होता व कृष्णाच्या आपल्यावरील प्रेमाचा भरवसा धरून ठेवून आपण मनापासून प्रयत्न करीत राहिले पाहिजे. कृष्णप्रेम वाढण्यासाठी त्याचाच सहवास अधिकाधिक करून त्याचे मार्गदर्शन घेत राहिले पाहिजे. त्याचप्रमाणे इतर जनांचा आपल्या मनावरील प्रभाव कमी होऊन तो पूर्णपणे दूर होण्यासाठी, एकतर त्यांचा सहवास आपण टाळला पाहिजे किंवा त्यांच्या सांसारिक दृष्टीतून घडणाऱ्या वागण्याबोलण्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून आपण आपली स्वतंत्र, पण योग्य अशी भूमिका घेतली पाहिजे. एवढेच नव्हे, तर त्या भूमिकेनुसार वागण्याचे धैर्यही आपणाठायी हवे. अशामुळेच आपल्या मनातील दोष समूळ नाहीसे होतील आणि मन एकीएक कृष्णप्रेमाने भरून राहील. मग त्या मनाला योग्य काय व अयोग्य काय हे कोणीही समजावून सांगण्याची वेळच येणार नाही आणि त्या मनाकडून खऱ्या स्वधर्माचे आचरण अगदी सहजपणे घडेल. हाच आपल्या मनातील कृष्णप्रेमाचा झालेला खरा विजय होय!"



द्रौपदीच्या बोलण्यावरती कौतुकाने मान डोलवीत अर्जुन म्हणाला, “अगं द्रौपदी, एक गोष्ट मला कबूल करावयासच हवी की माझे भाग्य तुझ्यापेक्षा जास्त आहे. कारण मला जसा कृष्णासारखा खरा मित्र मिळाला तशीच मला खऱ्या अर्थाने जीवनाची जोडीदार म्हणून तुझ्यासारखी पत्नी मिळाली. मला तू प्रसंगात केवळ साथच देतेस असे नव्हे तर माझ्याशी मोकळेपणाने बोलून माझ्याशी संवादही साधत असतेस. मुख्य म्हणजे, त्या तुझ्या सांगण्यामध्ये कोणताही अभिनिवेश नसतो, तर माझ्याविषयीचा आत्यंतिक आपलेपणाच असतो. त्यामुळे तुझे सांगणे माझ्या मनाला सुखवितेही आणि मला विचारही करायला लावते. अर्थात तुझ्या बोलण्याची सुरुवातही कृष्णापासूनच होते आणि तुझे बोलणे अखेर कृष्णापर्यंतच येऊन थांबते. एवढा कृष्ण तुझ्या ध्यानीमनी वसलेला व ठसलेला आहे. म्हणूनच तुझ्याकडून सतत व सहजपणे एकीएक कृष्णाची थोरवीच प्रगट होत असते. त्याचा मला अतिशय उपयोग होत असतो. कृष्णाची थोरवी जरी मला अजून पूर्णपणे कळली नसली तरी ती थोरवी आकलन होण्यासाठी त्याच्याकडे पहाण्याची जी दृष्टी हवी, ती दृष्टी मात्र तुझ्यामुळे मला हळूहळू प्राप्त होत आहे, हे मात्र निश्चित. म्हणूनच माझ्याठायी तुझ्याविषयीचा भरवसा जास्त आहे. कारण तुझी व माझी साथ ही नित्याची आहे. त्यामुळे तुझ्या सहवासात व संगतीतच मला कृष्णाची थोरवी तुझ्या मुखातून नेहमीच ऐकता येईल, एवढेच नव्हे, तर ती तुझ्याठायी मला नित्य पहाताही येईल. मग तुझ्याद्वारे, त्या कृष्णाची थोरवी मलाही एक दिवस निश्चितपणे जाणवेल, याची मला तरी पूर्ण खात्री आहे. म्हणून तू एकच गोष्ट माझ्यासाठी कर की तूही माझा भरवसा धर आणि मला अशीच साहाय्यभूत होत रहा, म्हणजे झाले.”

अर्जुनाच्या बोलण्यावरती द्रौपदी अत्यंत समाधानपूर्वक हसली आणि तिने अर्जुनाचे हात प्रेमाने आपल्या हातात धरून ठेवले. परस्परांकडे पहात असता एकमेकांच्या नजरेतील परस्परांविषयीचा विश्वास त्या उभयतांना जाणवला आणि त्यांची मने व नेत्र प्रेमाने भरून आले.”

* * *

बराच काळ बोलत असलेल्या नारदाचे बोलणे जरी थांबले, तरी ते लक्ष्मीच्या लक्षात येण्यास मात्र जरा वेळच लागला. कारण ती श्रवणामध्ये एवढी तल्लीन झाली होती की नारदाचा शब्दप्रवाह थांबला तरी त्याचा नाद लक्ष्मीच्या कानात व मनात घुमतच होता. पण जेव्हा तो नाद हळूहळू पूर्णपणे विरला, तेव्हा मात्र लक्ष्मी भानावर आली आणि आश्चर्याने थोडीशी चमकून नारदाकडे पाहू लागली. तेव्हा तिच्या लक्षात आले की नारद तिच्याकडे सहेतूक नजरेने पहात होता. नारदाला

त्याच्या सांगण्यावर लक्ष्मीची नुसती प्रतिक्रिया नको होती, तर लक्ष्मीच्याठायी श्रवणातून घडलेले मनन-चिंतन जाणून घेण्यासाठी नारद अधिक उत्सुक होता. नारदाची तशी जरूरीही होती. कारण लक्ष्मीच्या मननाद्वारे प्रगट झालेली लक्ष्मीच्या मनाची अवस्था हीच नारदाच्या पुढील कथनाला प्रेरणा देणारी ठरणार होती. लक्ष्मीकडून श्रवण घडत असतानाच तिच्याकडून मनन व चिंतन तिच्या नकळत सहजपणे घडत असणार याची खात्री नारदाला होती. कारण तेच श्रवणभक्तीचे सहज लक्षण आहे, हे नारद स्वानुभवाने जाणून होता. त्याच्या अंतरातील स्वानुभवाठायीची भावपूर्णता दाटून आल्यामुळे शब्दरूपाने त्याच्या मुखातून प्रगट होत असे आणि त्याचे श्रवण सर्वात प्रथम नारदाकडूनच घडत असे. त्यातील प्रेमभाव मनाठायी, तर ज्ञान बुद्धीठायी स्थिर राहून, भक्तीभाव चित्ताठायी स्फुरत असे. अर्थात प्रेम, ज्ञान व भक्ती यांच्यातील ही वेगळेपणाची अवस्था जाणवण्याच्या आधीच ते भाव सहजपणे व त्वरित एकरूप होऊन लय पावत असत आणि नारदाच्या अंतरात एकीएक स्वानंदाची अनुभूतीच रहात असे. सागराठायी स्वयंस्फूर्तीने सतत व एकापाठोपाठ एक अशा निर्माण होऊन तेथेच विलीन पावणाऱ्या असंख्य लहरींप्रमाणेच, नारदाच्या अंतरातील स्वानंद सागरात प्रेमलहरी निर्माण होत असत आणि शब्दरूपाने प्रगट होऊन काही काळ खेळून, पुन्हा त्याठायीच विलीन होत असत. अशा स्वानंदात रमणाऱ्या नारदाठायी भक्तिगायनाचा छंद मात्र जडून राहिला होता आणि म्हणूनच त्याच्याठायीचा निर्गुण निराकार आनंद हा सगुण साकार होत असे. या त्याच्या छंदासाठी आवश्यक असलेली लक्ष्मीच्या श्रवणभक्तीची अजोड साथ नारदाला मिळालेली होती आणि म्हणूनच नारद लक्ष्मीच्या श्रवणभक्तिभावाची जोड घेण्यासाठी अत्यंत आतुर झालेला होता.

नारदाची ही अंतःकरणाची अवस्था लक्ष्मीला जाणवत होती. पण तिच्याठायी मात्र नारदाविषयी जसा आदर व श्रद्धा होती, तसाच कृतज्ञताभावही होता. कारण एक गोष्ट ती जाणून होती की नारदाच्या अंतरातील दाटून राहिलेले सगुण प्रेमच भक्तिगायनाच्या रूपाने प्रगट होत आहे आणि म्हणूनच लक्ष्मीच्या श्रवणभक्तीला ते कारण व आधार आहे. त्या श्रवणभक्तीचे फळ म्हणजे जे नारायणाच्या सगुणप्रेमाचे व त्याच्या माहात्म्याचे स्मरण व मनन, ते नारदाला अर्पण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळेच नारदाचे मन संतुष्ट होऊन उत्साहित होईल आणि त्याच्याकडून सगुण प्रेमभक्तीचा आनंद कृष्णचरित्राच्या गायनाद्वारे प्रगट होत राहील. तेव्हा क्षणाचाही विलंब न लावता लक्ष्मीने नारदाच्या भावाचे निमित्त करून स्वतःचा भाव व्यक्त करण्यास सुरूवात केली.



"हे नारदा, पांडव केवढ्यातरी कठीण प्रसंगातून निभावून गेले हा तर एक चमत्कारच म्हणावा लागेल. संकट जेवढ्या अचानकपणे आले होते, खरे तर ते धर्मराजाने स्वतःहूनच ओढवून घेतले होते असेच म्हणावे लागेल, पण पांडव त्यातूनही तेवढ्याच अकल्पितपणे व अगदी सहजतेने सुटले हे तर नवलच घडले, यात शंकाच नाही. पण त्या दोन्ही गोष्टींमागील कारणे हा निश्चितच जाणण्याचा व अभ्यासाचाच विषय आहे. धर्मराज हा सज्जन वृत्तीचा असूनही द्युत खेळण्याच्या क्षणिक मोहाला बळी पडला आणि त्याने स्वतःवरती आणि त्याच्याशी निष्ठ असलेल्या त्याच्या बंधूंवरती व सर्वच कुटुंबावरती दुर्धर प्रसंग ओढवून घेतला. पण बाह्यांगाने धर्मराजाला आकर्षित करणारा मोह, हा त्याच्या मनातील दोषांना व त्यामुळे आलेल्या मनाच्या दुर्बलतेलाच उघड करणारा ठरला आणि ही निश्चितच खरी काळजीची गोष्ट आहे. कृष्णालाही नेमकी तीच काळजी वाटली आणि त्याने त्याच्या परीने धर्मराजाला सावध करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. धर्मराजावर त्याचा किती परिणाम झाला, याची मला तरी शंकाच आहे. बहुधा धर्मराजावरती त्याचा काहीच परिणाम झाला नसावा असा माझा केवळ कयासच नव्हे, तर तशी माझी अगदी खात्रीच आहे. धर्मराजाच्याठायी असलेला त्याच्या सज्जनत्वाचा अहंकार आणि त्याला असलेली लौकिक व मोठेपणाची चाड हेच त्याचे मूळ कारण आहे, हे अगदी स्पष्ट आहे.

नारदा, पांडवांना त्या संकटातून सोडवायला कारणीभूत झालेला विदूर याचे मला मात्र विशेषच कौतुक वाटत आहे. विदूर केवळ धर्मराजासारखा सज्जन नव्हता तर त्याच्या ठिकाणी सद्भाव होता आणि म्हणूनच त्याच्याकडून योग्यवेळी त्याचा स्पष्टवक्तेपणा व त्याची तेजस्विता प्रगट झालीच.

विदुराठायी असलेल्या कृष्णभक्तिमुळेच त्याला हे बळ प्राप्त झाले असणार आणि त्याच्याकडून योग्य ती वचने प्रगट झाली असणार हे तर नक्कीच आहे. कारण ते तर भक्तिभावाचेच लक्षण आहे. विदुराच्या बोलण्याचे योग्य ते दडपण धृतराष्ट्रावरती आले म्हणून बरे झाले आणि मुख्य म्हणजे, पांडवांची मोठ्या संकटातून सुटका झाली ही गोष्ट महत्त्वाची आहे. पण तरीही ज्यांचा अभ्यास करावा अशा कितीतरी गोष्टी, या प्रसंगाच्या निमित्ताने प्रगट झाल्या. त्यामध्ये धृतराष्ट्राच्या मनाचे प्रगटलेले कोतेपण आणि पुत्रमोहामुळे पांडवांविषयीच्या द्वेषमत्सराने मलीन झालेले त्याचे मन, हा भाग तर पूर्णपणे त्याज्यच आहे. त्याचा अभ्यास करणे म्हणजे केवळ चिखल चिवडीत बसण्यासारखेच आहे. त्यातून हाती तर काहीच लागणार नाही, फक्त हात मात्र चिखलाने बरबटून रहातील एवढेच!

नारदा, धर्मराजाच्या मनोवृत्तीचा अभ्यास करणे ही गोष्टही माझ्या दृष्टीने काळाचा अपव्ययच आहे. त्याविषयी बोलून काही निष्पन्न होणे शक्यच नाही याची मला अगदी खात्रीच आहे. कारण कुत्र्याचे शेपूट सरळ करण्याचा कितीही जरी प्रयत्न केला, तरी ते शेवटी वाकडे ते वाकडेच रहाणार. अर्थात कृष्णाची धर्मराजाकडे पहाण्याची दृष्टी वेगळी म्हणजे आपलेपणाची होती. म्हणून त्याने धर्मराजाला सावध करण्याचा प्रयत्न केला. त्याचा धर्मराजावरती किती व काय परिणाम झाला हे एक तर त्या ईश्वरालाच माहीत आणि दुसरे तुलाच माहीत. मला तर वाटते की ते फक्त तुलाच माहीत आहे आणि ते तू मला पुढे सांगणार आहेसच. पण काही वेगळे ऐकायला मिळेल असे मला तरी वाटत नाही. असो.

पण नारदा, कृष्णाने अर्जुनाची योग्य समज करून देण्याचा जो प्रयत्न केला तो आणि त्यानंतर अर्जुन व द्रौपदी यांच्यात झालेले बोलणे, हा माझ्यासाठी अत्यंत मननीय व चिंतनीय असा विषय आहे. त्यातून जसा कृष्णाचा अर्जुनाविषयीचा आत्यंतिक आपलेपणा व्यक्त झाला तसाच त्याद्वारे जो गहन विषयही प्रगट झाला तो अत्यंत महत्त्वाचा आहे. नात्यानात्यामधील नाजूक धागे व त्यातून मनाठायी निर्माण होणारी गुंतागुंत, हा विषय खरे तर सर्वांसाठीच आहे. कारण तो तर सर्वांचाच अनुभव आहे. एकीकडे नाती ही जीवनात आवश्यक आहेत तर दुसरीकडे त्यांचे बंधनही पडते. नाती हवीत तर त्यामध्ये कर्तव्यकर्मे ही आहेतच. पण त्यामध्ये मोह व आसक्ती यांचे बंधन नसावे, तर त्यासाठी त्या मनाला मोठी कसरतच करावी लागणार आणि नेमकी तीच सर्वसामान्याला झेपत नाही. त्यामुळे आहे ते जीवन तसेच ढकलत ढकलत चालू ठेवण्याकडेच सर्वांचा कल असतो. अर्जुनही त्याला अपवाद नव्हताच. त्याची पाळेमुळे कुटुंबात खोलवर रूतलेली असल्यामुळे त्यापलीकडे जाऊन काही विचार करणे हे अर्जुनाला शक्यच होत नव्हते. त्यामुळे तसा विचार करण्याची जर वेळ आली तर अर्जुनाच्या मनाला तो ताण सहनच होत नसे आणि कृष्ण तर नेमके तेच करीत होता. तो तर अर्जुनाला जीव म्हणून असलेल्या त्याच्या स्वतंत्र अस्तित्वाचा विचार करायला लावत होता. इतर सर्व नात्यांपेक्षा पती-पत्नी हे नाते केवळ वरचे आहे असेच नव्हे तर ते मूलभूत आहे हे कृष्णाचे सांगणे, अर्जुनाच्या बुद्धीला जरी पटत होते तरी त्याच्या मनाला ते मुळीच मानवत नव्हते. तसे तो प्रांजळपणे कबूल करून त्याची अगतिकताही व्यक्त करीत होता. अर्जुनाठायी द्रौपदीविषयी प्रेम होतेच पण त्यासाठी वेळप्रसंगी नातेसंबंधांना दूर करण्याचे धैर्य मात्र अर्जुनाच्याठायी नव्हते. त्याची खंतही त्याला होती, पण त्याचा नाईलाजही होता. कृष्णप्रेमाचा लाभ अर्जुनाला सहजतेने मिळत होताच. त्याच्याठायीही कृष्णाविषयी व्यक्तिगत प्रेम होते. परंतु कृष्णाचे माहात्म्य जाणत नसल्यामुळे अर्जुनाच्याठायी कृष्णाविषयीचा अनन्य भाव नव्हता. त्यामुळे कर्तव्यकर्म व प्रेम यामध्ये कोणाला प्राधान्य द्यावे यासाठी अर्जुनाचे मन प्रसंगात

नेहमीच दोलायमान होत होते असे दिसते. त्यावरचा उपायही अर्जुनाला माहीत होता. तो उपाय म्हणजे एकीएक कृष्णाचेच मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणेच वागणे हाच होता. परंतु त्यासाठी जे धाडस करणे आवश्यक होते ते करण्यासाठीच अर्जुनाचे मन राजी होत नव्हते.

परंतु नारदा, अर्जुन व द्रौपदी यांच्यातील बोलणे मात्र माझ्या मनावरती अधिक परिणाम करून राहिलेले आहे. त्याचे कारण म्हणजे ते दोघे काय बोलले याप्रमाणेच ते ज्या पद्धतीने एकमेकांशी बोलत होते, त्याचेच मला अत्यंत कौतुक वाटून राहिले आहे. त्यांच्या बोलण्यामधून एकमेकांविषयीचा जो आपलेपणा व जिव्हाळा प्रगट होत होता, तोच माझ्या मनाला अतिशय भावला. तसे पाहिले तर कोणत्याही नात्यामध्ये तो महत्वाचा गुण आहे, परंतु पती-पत्नी या नात्यामध्ये तो गुण विशेषत्वाने आवश्यक आहे. त्या नात्याचा तो मूलभूत असा पायाच आहे. अर्जुन व द्रौपदी बोलत असताना त्यांच्याठायी नात्यातील 'मी'पणाचा अजिबात गंधही नव्हता. कोणी कोणाला काही ज्ञान समजावून सांगत आहे असा आविर्भाव तर त्यांच्या बोलण्यात जराही नव्हता. म्हणूनच त्यांच्यामध्ये असे बोलणे व संवाद होऊ शकला. एकमेकांना परस्परांठायीचे गुणही माहीत होते आणि एकमेकांची कमसरसताही माहीत होती. परंतु बोलत असताना उभयतांचा निर्देश व जोर एकमेकांच्या गुणांवर होता हे सर्वात महत्त्वाचे.

नारदा, अर्जुन व द्रौपदी यांच्या अवस्थेतील फरकही माझ्या चांगलाच लक्षात राहिलेला आहे. अर्जुनाठायी असलेला कृष्णाविषयीचा प्रेमभाव हा निश्चितच कौतुकास्पद आहे. त्याचे बाह्य फायदे त्याला सहजगत्या मिळत राहिले असणारच. कृष्णाचा प्रेमळ व सुखद सहवास त्याला नेहमीच उपलब्ध होता. प्रेमाच्या हक्काने कृष्ण अर्जुनाला त्याच्या जीवनाविषयी स्वतःहून नेहमी सांगतच असणार. परंतु त्या व्यक्तिगत प्रेमाला श्रद्धाभावाची जोड नसल्यामुळे अर्जुन कृष्णाच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागू शकत नसणार. त्याचीच परिणती म्हणून अर्जुनाच्या मानसिकतेत काहीच बदल व सुधारणा न होता, त्याची मानसिक स्थिती आहे तशीच राहिली असणार. अर्थात अर्जुनाच्या हे लक्षात येऊनही स्वतःच्याच स्वभावाच्या बंधनात अडकल्यामुळे अर्जुनाचा काहीच इलाज चालला नसणार. परंतु कृष्णाकडे बघण्याची आपली दृष्टी बदलली पाहिजे, हे मात्र अर्जुनाच्या लक्षात आले होते आणि त्यासाठीच द्रौपदीने आपल्याला कृष्णाचे माहात्म्य सांगत रहावे असे अर्जुनाने द्रौपदीला अगदी आवर्जुन सांगितले. ही गोष्ट मला अधिक महत्त्वाची वाटते. कारण त्यावरून माझ्या एकच गोष्ट लक्षात आली की अर्जुन द्रौपदीकडे केवळ त्याची पत्नी म्हणून बघत नव्हता, तर तो तिच्याकडे कृष्णाच्या प्रेमाची व त्याची थोरवी जाणणारी व्यक्ती म्हणून पहात होता. एखाद्या पतीने त्याच्या पत्नीकडे अशा

वेगळया नजरेने पहाणे आणि तिच्याकडून अशी आगळीवेगळी अपेक्षा धरणे ही गोष्ट माझ्यासाठी तरी अत्यंत नवलाईची तर आहेच, तशीच ती अतिशय कौतुकाचीही आहे.

नारदा, द्रौपदीच्याठायीचा भक्तिभाव मात्र अगदी विशेष व खासच आहे आणि तोच माझ्या मनात अगदी घर करून राहिला आहे. तिच्याठिकाणी असलेल्या कृष्णावरच्या व्यक्तिगत प्रेमाला नितांत श्रद्धेची जोड आहे आणि कृष्णाच्या माहात्म्याचे अखंड स्मरण तिच्याठायी आहे. मुख्य म्हणजे, हे सर्व तिच्या वागण्याबोलण्यातून अगदी सहजतेने प्रगट होताना दिसत आहे. म्हणूनच अर्जुनाशी बोलत असताना द्रौपदी कृष्णाविषयी अगदी भरभरून बोलत होती. परंतु त्याचबरोबर अर्जुनावर कोणत्याही प्रकारचे दडपण येणार नाही याचीही अत्यंत काळजी द्रौपदी घेत होती. कृष्णाविषयी भक्तिभाव असूनही किंबहुना, तो असल्यामुळेच द्रौपदीचे अर्जुनावरचे पती या नात्याचे प्रेम कायम होते. त्याच प्रेमाला जागून द्रौपदी अर्जुनाला कृष्णाचे माहात्म्य पुन्हा पुन्हा समजावून सांगत होती आणि अर्जुनाठायी त्याचा निश्चय होण्यासाठी त्याला साहाय्यभूतही होत होती. पतीविषयीचे कर्तव्यकर्म व आपलेपणा आणि कृष्णाविषयीचा प्रेमभाव व भक्तिभाव यांची गल्लत द्रौपदीच्याठायी अजिबात दिसत नव्हती. कारण तिचे मन स्वच्छ व निर्मळ होते आणि मुख्य म्हणजे तिची बुद्धी ही अत्यंत शुद्ध होती.

नारदा, श्रवण करताना मला एक गोष्ट विशेषत्वाने जाणवत होती की तुझ्या बोलण्यातून ‘पुढील प्रसंगात सावध रहाण्याचा’ सूचक उल्लेख येत होता. सावधगिरीची सूचना म्हणून ते योग्यच आहे. परंतु तसा प्रसंग पुढे कधीच आला नसेल असा विश्वास माझ्याठायी आहे. निदान तसा प्रसंग पुन्हा कोणावरतीच येऊ नये असे मला अगदी मनापासून वाटत आहे. अर्थात ईश्वराच्या नियतीत कोणतीही गोष्ट घडणे जरी अशक्य नसले तरी पांडवांच्या बाबतीत, विशेषतः द्रौपदीच्या बाबतीत तरी असे काही घडणे मला बरोबर वाटत नाही. तिच्याठायी असलेल्या कृष्णावरच्या प्रेमाची व श्रद्धेची अशी वारंवार कसोटी लागणे योग्यच नाही. द्रौपदीच्याही सहनशक्तीची काहीतरी मर्यादा ही असणारच ना? मला तरी असे अगदी मनापासून व खात्रीपूर्वक वाटते की द्रौपदीच्या व पांडवांच्या दुर्दैवाचे सर्व भोग आता संपले असणार आणि त्यांच्या जीवनात आता भाग्योदय होऊन आत्यंतिक सुखाचा सुकाळ झाला असणार, होय ना? ते सर्व तुझ्या मुखातून साद्यंतपणे ऐकण्यासाठी मी अत्यंत आतुर झालेली आहे. ती माझी आतुरता तू आता लवकरात लवकर पूर्ण कर बघू.”



लक्ष्मीच्या बोलण्याने नारदाला जरी समाधान झाले तरी त्याच्या मुखावरती मात्र गंभीरताच दिसत होती. लक्ष्मीच्या बोलण्यातून तिच्याठायीचे जे मननचिंतन प्रगट झाले त्यावरून नारदाच्या एक गोष्ट निश्चितच लक्षात आली की लक्ष्मीच्या मनातील विचारसरणी व तिची दिशा अगदी योग्य आहे. त्यामुळे नारदाला त्याचे कौतुक तर वाटलेच, परंतु त्याचबरोबर लक्ष्मीच्याकडून द्रौपदीच्या पुढील जीवनाविषयीची जी सुखाची अपेक्षा व्यक्त झाली त्यामुळे मात्र, नारद जरासा गंभीर झाला. नारदाची ती गंभीरता लक्ष्मीच्या लक्षात आल्यावाचून राहिली नाही. तिच्या मनात संशयाची पाल थोडीशी चुकचुकलीच आणि ती श्रवणासाठी अधिकच सतर्क झाली. लक्ष्मीची ती अवस्था नारदालाही जाणवलीच. त्यामुळे लक्ष्मीला जास्त काळ तशा अवस्थेत न ठेवता नारदाने बोलावयास सुरूवात केली.

“हे लक्ष्मी, तुझे बोलणे अगदी संयुक्तिकच आहे. तुझ्याकडून योग्य मनन व चिंतन घडत असल्याचेच ते लक्षण आहे. तसे पाहिले तर प्रत्येक जण त्याच्या वेगळया स्वभावामुळे इतरांपेक्षा वेगळा असतोच. त्याप्रमाणे अर्जुन, द्रौपदी व धर्मराजासह इतर पांडव हे एकमेकांपेक्षा वेगळे वेगळे होतेच. त्याचमुळे ते कृष्णापासूनही कमी अधिक वेगळे म्हणजे दूर व जवळ होते. इतरांना तर त्या वेगळेपणाची जाणीवही नव्हती. त्यामुळे त्यांचा काही प्रश्नच नव्हता. धर्मराजाला ते वेगळेपण नक्कीच लक्षात आलेले होते. परंतु त्याला त्याचे वेगळेपण तसेच राखायचे होते आणि तसे ते प्रयत्नपूर्वक राखून तो कृष्णापासूनही जाणूनबुजून वेगळा रहातही होता. त्यामुळे त्याच्याविषयी काहीही प्रश्नच नव्हता. पण अर्जुनाची कृष्णाशी मित्रत्वाच्या नात्याने पहिल्यापासून जवळीक होती. तरीही तो त्याच्या स्वभावामुळे कृष्णाच्या अंतःकरणापासून वेगळाच रहात होता. अर्जुनाच्या ते लक्षातही आले होते, परंतु त्याचाही नाईलाज होता आणि त्याने तो वेगळेपणा मान्य केला होता. त्यामुळे अर्जुनाकडून कृष्णाच्या अंतःकरणाशी जवळीकता साधण्याचा मुद्दामहून प्रयत्न असा काहीच घडत नव्हता. कारण त्याला तशी काही आवश्यकताही जाणवत नव्हती. कृष्णाच्या बाह्यांगाच्या जवळीकतेतून मिळणारे प्रेम व सुख यामध्ये अर्जुन पूर्णपणे समाधानी होता.

द्रौपदीची गोष्ट मात्र अत्यंत वेगळीच होती. कृष्णाच्या बाह्यांगाच्या मिळालेल्या प्रेमामधून व जवळीकतेतून एक महत्त्वाची गोष्ट द्रौपदीच्या लक्षात आली होती की कृष्ण म्हणजे कृष्णाचे अंतःकरणच! त्यामुळे ‘कृष्णाच्या अंतःकरणाशी साधलेली जवळीकता हीच खरी कृष्णाशी साधलेली जवळीकता आहे’ हे द्रौपदीने अगदी बरोबर ओळखले होते. कृष्णाच्या अंतःकरणापासून ती पुष्कळच वेगळी, म्हणजे दूर आहे हे द्रौपदीला नेहमीच जाणवत असे आणि तो दुरावाच तिला

सहन होत नसे. म्हणूनच द्रौपदीचे वेगळेपण हे इतरांच्या वेगळेपणापासून वेगळे होते आणि तिचे हे वेगळेपण हेच तिचे विशेषत्व होते. कृष्णाच्या अंतःकरणापासून असलेली ही विभक्तता द्रौपदीला जाणवत असे आणि कृष्णावरील प्रेमामुळे तिला ती विभक्तता सहनही होत नसे. कृष्णाच्या माहात्म्याची पूर्ण जाणीव असल्यामुळेच ही विभक्तता दूर करण्याचा भक्तिभाव द्रौपदीच्या ठिकाणी निर्माण झाला आणि कृष्णाच्या अंतःकरणाशी जवळीकता साधण्याचा एकमेव ध्यासच द्रौपदीला जडला. त्यासाठी द्रौपदी कृष्णाचे मन ओळखून ते राखण्याच्या नित्य प्रयत्नात असे. ती तिची जशी आवश्यकता होती तशीच ती तिची आवडीही झाली होती.

हे लक्ष्मी, अशी ही द्रौपदी अर्जुनाला पत्नी म्हणून लाभली हे त्याचे भाग्यच होते आणि त्याची जाणीव अर्जुनालाही होती हे महत्त्वाचे. कारण अर्जुनालाही कृष्ण अत्यंत प्रियच होता. कृष्णाचे वेगळेपण त्याच्याही लक्षात आले होते आणि अर्जुन त्याचा अनुभवही घेत असे. द्रौपदीच्याकडून कृष्णाचे विशेषत्व ऐकणे अर्जुनालाही आवडत असे आणि त्यामुळे त्याची कृष्णाकडे पहाण्याची दृष्टीही हळूहळू बदलत राहिली आणि त्यालाही कृष्णाचे माहात्म्य थोडे थोडे जाणवू लागले होते. अर्थात अर्जुनाच्या मनात त्याविषयी अजून पूर्ण निश्चय झाला नव्हता. त्यामुळे कृष्ण सांगेल तसेच वागण्याचे धैर्य त्याला होत नव्हते. मनात घट्ट रुतून बसलेल्या कर्तव्यकर्माच्या कल्पनाच अर्जुनाच्या आड येत होत्या. परंतु 'एक दिवस या सर्व मानसिक अडचणींवरती मात करू शकू' असा विश्वास अर्जुनाच्या ठायी होता. त्यासाठीच कृष्णावरचे प्रेम कायम ठेवून अर्जुन द्रौपदीच्या सहवासाचा योग्य तो उपयोग करून घेत होता. पुढे त्याचा प्रत्यक्ष लाभ अर्जुनाला कसा व किती झाला हे जाणून घेणे हा विषय, अभ्यासाचा तर आहेच पण त्याचबरोबर तो विषय चिंतनीयही आहे. पण भक्तिभावाचा उदय होण्यासाठीची ती अत्यंत आवश्यक अशी अवस्था आहे.

* * * * *



# पुनःश्च द्युत

हे लक्ष्मी, पांडवांच्या व द्रौपदीच्या जीवनात पुढे काय घडले आणि सुखाचे व स्वास्थ्याचे जीवन त्यांनी अनुभवले की नाही हे जाणून घेण्याची जेवढी उत्सुकता तुझ्याठायी आहे तेवढीच, ते सांगण्याची आतुरता माझ्याठायीही आहे. कारण सुखाची इच्छा करणे हे केव्हाही योग्यच आहे. परंतु ते लाभण्यासाठी ईश्वरी नियतीची अनुकूलताही हवीच. खरे तर, ईश्वराची नियती ही कोणाच्या बाजूनेही नसते किंवा कोणाच्या विरूद्धही नसते; ईश्वरी नियती ही केवळ सत्तामात्र आहे. त्यामध्ये ज्याच्या त्याच्या प्रारब्धानुसार प्रसंग घडत असतात आणि त्याची मानलेली सुखदुःखे सर्व जीवमात्र अनुभवीत असतात एवढेच! पण प्रारब्ध हे जीवाच्या कर्मानुसार घडत असते आणि त्याचे मन हेच त्याला कर्माला प्रवृत्त करीत असते. त्यामुळेच मनाच्या अवस्थेनुसार कर्मे घडत असतात. अज्ञान, वासना, अहंकार या दोषांनी युक्त असलेल्या मनाकडून कुकर्मेच घडतात तर सद्भावना, सद्विचार व नम्रभावाने युक्त असलेल्या मनाकडून केवळ सत्कर्मेच घडतात. ईश्वराच्या नियतीत जशी कर्मे तशी फळे मिळत असतात आणि मनाला त्या फळांचा भोग घ्यावा लागतो. अर्थात मन जर ईश्वरीप्रेमाने भरलेले असेल तर मात्र ते मन अत्यंत शुद्ध व निर्मळ असते आणि त्या मनाकडून ईश्वराच्या भक्तीसाठीच कर्मे घडतात. त्यामुळे ईश्वराच्या भक्तीचे फळ म्हणजे जो आनंद, त्याचाच अनुभव मन घेत रहाते हे सत्य आहे.

हे लक्ष्मी, पांडवांचे आणि विशेषतः धर्मराजाचे मन हे काही सांसारिक विकार व विचार यांच्यापासून पूर्णपणे मुक्त झालेले नव्हतेच. त्यामुळेच धर्मराजाकडून द्युत खेळण्याचे वाईट कर्म घडले आणि त्याचे फळ भोगण्याची वेळ त्याच्यासह सर्व पांडवांवरती आलेली होती. सुदैवाने तो प्रसंग जरी टळला तरी दुर्योधन स्वस्थ बसणे शक्यच नव्हते आणि तसा तो बसलाही नाही. त्याने ताबडतोब शकुनी व दुःशासन यांच्याशी खलबते करून पांडवांना जीवनातून कायमचे उठवण्याचे कारस्थान चालूच ठेवले. शकुनीच्या सल्ल्यानुसार धर्मराजाची द्युताविषयीची दुर्बलता जाणून त्याला पुन्हा काहीतरी समारंभाचे निमित्त करून द्युतच खेळण्यासाठी बोलवायचे ठरले. पण या वेळेस दुर्योधनाने धृतराष्ट्राला सक्त बजावून सांगितले की धृतराष्ट्र जर पांडवांच्या दयेने मागच्या वेळेसारखा पुन्हा मध्ये पडला तर ते कधीही मान्य होणार नाही. त्यातूनही जर तसेच पुन्हा घडले तर दुर्योधन राज्य सोडून कायमचा निघून जाईल. एवढेच नव्हे, तर स्वतःच्या जीवाचे बरेवाईट करून घेईल. पुत्रमोहाने अंध झालेल्या धृतराष्ट्राने त्या गोष्टीला संमती दिली आणि दुर्योधनाच्या सांगण्यावरून धृतराष्ट्रानेच धर्मराजाला द्युत खेळण्यासाठी हस्तिनापूरला येण्याचे पुन्हा आमंत्रणही पाठवले.

धृतराष्ट्राचे द्युत खेळण्याचे आमंत्रण पांडवांना मिळाले मात्र, धर्मराजाने त्याची संमती लागलीच व परस्पर कळवूनही टाकली. त्यामुळे पांडवांच्यामध्ये एकच खळबळ निर्माण झाली. परंतु धर्मराजाशी बोलण्याचे धारिष्ट्य मात्र कोणालाच होत नव्हते. सर्वच जण जरी गप्प बसले होते तरी मनातून मात्र ते अत्यंत अस्वस्थच झालेले होते. अर्जुन व द्रौपदी यांना स्वस्थ बसणे अशक्यच होत होते. त्यांनी दोघांनी मिळून धर्मराजाशी बोलण्याचा प्रयत्न केला. अर्जुनाने तर धर्मराजाला कृष्णाच्या बोलण्याचे स्मरण करून दिले आणि कृष्णाने दिलेल्या सावधगिरीच्या इशाऱ्याचीही आठवण करून दिली. परंतु एक नाही आणि दोन नाही! धर्मराज कोणाचे काहीही ऐकण्याच्या मनःस्थितीतच नव्हता. एवढेच नव्हे, तर बोलण्याच्या भरात धर्मराज अर्जुनाला थोडासा चिडून म्हणाला,

“अर्जुना, माझे वागणे हे क्षत्रिय धर्माला धरूनच आहे याविषयी माझी पूर्ण खात्री आहे. त्यासाठी मला कोणाच्याही कोणत्याही सल्ल्याची व मार्गदर्शनाची मुळीच आवश्यकता नाही. माझा मी निर्णय घेण्यास समर्थ आहे. खरे तर, मागच्या वेळेस माझा जो पराभव झाला होता त्याचे शल्य अजूनही माझ्या मनाला टोचत आहे. तुम्ही ती गोष्ट सहजपणे विसरून गेला असालही. परंतु मला ती गोष्ट विसरता येणे कदापिही शक्य नाही. त्या पराभवाचा वचपा काढल्याशिवाय माझ्या मनाला स्वस्थता लाभणे कधीही शक्य नाही. त्यामुळे ही हातची आलेली संधी मी गमावू देणार नाही. त्यासाठी तुम्हा सर्व बंधूंची साथ मला नेहमीप्रमाणे मिळावी अशी माझी अपेक्षा जरूर आहे, परंतु माझी इच्छा मी तुमच्यावर लादू इच्छित नाही. तुम्हाला माझी साथ देणे शक्य नसेल तर माझा तुमच्यावर मुळीच राग नाही, परंतु माझा निर्णय मात्र कायम व ठाम आहे.”

बोलता बोलता धर्मराजाचा बदललेला व वेगळा लागलेला सूर सर्वांच्याच लक्षात आला. धर्मराजाची अगदी टोकाची भूमिका झालेली होती. ती सर्वांनाच जरी थोडीशी खटकली तरी धर्मराजाच्या बोलण्याचा त्याला अपेक्षित असलेला परिणाम सर्वांच्याच मनावर झाला आणि तो म्हणजे सर्वांच्या मनावरती एक प्रकारचा दबावच आला. त्यामुळे अर्जुनाशिवाय त्याचे इतर बंधू काहीही न बोलता धर्मराजाबरोबर जाण्यास तयार झाले. परंतु अर्जुनाने काहीही न बोलता मनातून मात्र धर्मराजाबरोबर न जाण्याचे ठरवले आणि तसे त्याने फक्त द्रौपदीला बोलून दाखवलेही. परंतु समजूतदार द्रौपदीने अर्जुनाची समजूत काढली आणि ती त्याला म्हणाली,

“अहो, धर्मराजांचा निर्णय चुकीचा आहे यात जराही शंका नाही. परंतु हस्तिनापूरला जर काही मागच्यासारखा अनावस्थेचा प्रसंग गुदरला तर साथ



देण्यासाठी आपण धर्मराजांबरोबर असणे अत्यंत आवश्यक आहे. बरे, प्रत्यक्ष द्युत धर्मराजच खेळणार आहेत. ते काही तुम्हाला खेळायचे नाही. त्यामुळे तुम्हाला काहीच दोष लागणार नाही. मुख्य गोष्ट म्हणजे धर्मराजांच्या द्युत खेळण्याने जे काही परिणाम होतील ते आपल्याला भोगावे लागणारच आहेत. मग त्यासाठी आपण येथे असलो काय किंवा तेथे असलो काय त्यामुळे काहीच फरक पडणार नाही. परंतु आपण जर प्रत्यक्ष प्रसंगात हजर राहिलो, तर मात्र आपला काहीतरी उपयोग धर्मराजांना होण्याची शक्यता आहे. निदान आपल्या उपस्थितीमुळे त्यांना थोडासा तरी मानसिक आधार किंवा दिलासा मिळू शकेल. धर्मराजांचा स्वभाव आपल्याला ठाऊक आहे. ते त्यांचा निर्णय बदलतील अशी सुतराम शक्यता नाही. तेव्हा मनाची लवचिकता दाखवण्याची जबाबदारी आपली आहे. तुमच्या तेथे हजर रहाण्यामुळे कुंतीदेवींना सुद्धा बरे वाटेल. नाहीतर त्यांच्या मनाला धर्मराजांची केवढी तरी काळजी लागून राहील. कुंतीदेवी तुमचा पराक्रम जाणून आहेत. त्यामुळे तुम्ही धर्मराजांच्या बरोबर असल्यावर कुंतीदेवींनाही अगदी निर्धास्त वाटेल आणि त्यांच्या मनाची मोठी काळजीही दूर होईल.”

द्रौपदीच्या बोलण्यातून प्रगटणारा समजूतदारपणा आणि तिच्याठायी असलेली सर्वच कुटुंबाची काळजी पाहून अर्जुनाला तिचे अत्यंत कौतुक तर वाटलेच, परंतु त्याचबरोबर तिच्या बोलण्यामागील तिची भूमिकाही अर्जुनाला अगदी मनापासून पटली. त्याने द्रौपदीच्या म्हणण्याला लागलीच होकार दिला आणि तोही धर्मराजाबरोबर हस्तिनापूरला जाण्यासाठी तयार झाला. अर्थात अर्जुनाला व सर्व पांडवांनाही अनुसरण्यासाठी सदैव तत्पर असणारी द्रौपदीही त्याच्याबरोबर होतीच. सर्व पांडवांमध्ये एकवाक्यता राखण्याची जबाबदारी, पत्नी या नात्यामुळे द्रौपदीवरतीच होती आणि त्यासाठी अत्यावश्यक असलेला शांत स्वभाव, मनाचा समजूतदारपणा, बुद्धीची समयसूचकता आणि वाक्चातुर्य हे सर्व गुण द्रौपदीच्या ठायी होते. हे सर्व तर त्या कृष्णप्रेमाचेच गुणधर्म आहेत जे प्रेम द्रौपदीच्या अंतरात सदैव जागृत असे आणि प्रसंगा-प्रसंगानुसार द्रौपदीकडून ते गुण प्रगट होत असत. त्याची जाणीव द्रौपदीच्या ठायी असल्यामुळे तिच्याठायी जराही अहंकार तर नव्हताच, पण कृष्णाच्या त्या प्रेमगुणाचा अनुभव मात्र द्रौपदीला येत असे. त्यामुळे तिचे अंतःकरण नेहमी आनंदी व प्रसन्न असे आणि तिचा तो आनंद व तिची ती प्रसन्नता तिच्या व्यक्तिमत्त्वातून पूर्णपणे प्रगट होत असे.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने सर्व पांडवांचे आगमन हस्तिनापुरला झाले आणि त्यामुळे दुर्योधन मनातून अत्यंत खूश झाला. कोणत्याही परिस्थितीत धर्मराजा द्युताचे आमंत्रण नाकारणे शक्यच नाही याची दुर्योधनाला पूर्ण खात्री होती आणि नेमके तसेच झालेही होते. त्यामुळे दुर्योधनाने औपचारिक का होईना पण सर्व पांडवांच्या स्वागताची जोरदार तयारी केली होती. त्या स्वागतात निष्कपट

धर्मराजाला दुर्योधनाचा आपलेपणा जाणवला आणि त्याच्या मनाला अत्यंत संतोषही झाला. परंतु त्याचे इतर बंधू मात्र, मागील अनुभवाने मनातून सावध होते. त्यामुळे ते तटस्थ वृत्तीनेच सर्व पहात होते. अर्जुनही त्याठिकाणी सतर्कपणेच वावरत होता. द्रौपदीही गंभीरच होती पण तिच्या मनावर कोणताही ताण नव्हता. तिचा भरवसा फक्त कृष्णावर होता आणि नेमका तोच त्याठिकाणी हजर नव्हता. अर्थात कृष्ण त्याठिकाणी हजर रहाण्याचा प्रश्नच निर्माण होत नव्हता. त्याला दुर्योधनाकडून आमंत्रण मिळण्याची तर शक्यताच नव्हती आणि धर्मराजालाही कृष्णाला काही कळविण्याची जरूरीच वाटत नव्हती. कारण त्याच्यादृष्टीने ती त्याची वैयक्तिक व कौटुंबिक बाब होती. परंतु द्रौपदीने मात्र अर्जुनाला सांगून दुताकरवी सर्वकाही गुप्तपणे कृष्णाला कळविले होते. अर्थात कृष्णाला तो निरोप पोहोचेपर्यंत काहीवेळ जाणारच होता. बरे, निरोप मिळाल्यावर कृष्ण तरी काय करणार होता? प्रत्यक्ष काही करणे त्यालाही शक्यच नव्हते. पण कृष्णाच्या मनालाही व्यवधान व काळजी लागून राहिलीच. ईश्वरी नियतीत काय घडते याची वाट पहात कृष्ण बाह्यांगाने स्वस्थ, पण मनातून सावध व सचिंत होता.

हे लक्ष्मी, त्यानंतर मुद्दामहून योजलेल्या समारंभाचा जणूकाही एक भाग म्हणून भर दरबारात द्युत खेळावयास सुरुवात झाली. धृतराष्ट्र राजसिंहासनावर तर भीष्म, द्रोण, कृप आदी मान्यवर उच्चासनावर बसल्यानंतर, धर्मराजा व दुर्योधन असे पुन्हा एकदा समोरासमोर ठाकले. कपट द्युत खेळणाऱ्या शकुनीने फासे टाकण्यास सुरुवात केली. पण यावेळेस शकुनीने एक खासी युक्ती केली. त्याने सुरुवातीला धर्मराजाला अनुकूल अशी दाने टाकून त्याला थोडावेळ जिंकू दिले. त्यामुळे धर्मराज अत्यंत खुशीत येऊन उत्साहित झाला. सुरुवातीला ‘पणा’ला लावलेल्या गोष्टी विशेष मूल्यवान नव्हत्या. परंतु त्यामुळे धर्मराज जिंकण्याच्या इर्षेने अधिकाधिक मूल्यवान गोष्टी ‘पणा’स लावू लागला आणि मग शकुनीने त्याची कूट चाल खेळावयास सुरुवात केली. शकुनीच्या हातचलाखीमुळे धर्मराजाला अनुकूल दान पडेनासेच झाले. त्यामुळे धर्मराज अधिकच इरेस पेटला आणि एका डावात सर्व राज्य पणाला लावून ते हरवूनही बसला. घडलेल्या प्रसंगापासून काहीच न शिकलेल्या धर्मराजाकडून मागील इतिहासाचीच पुनरावृत्ती झाली होती. परंतु खरा अनर्थ तर अजून पुढेच घडावयाचा होता.

हे लक्ष्मी, हतबल झालेल्या धर्मराजावर पूर्ण कुरघोडी करण्याची संधी दुर्योधनाला मुळीच सोडायची नव्हती. निराश झालेल्या धर्मराजाला शकुनीने खोटी आशा दाखवली. ‘एक डाव असा खेळूया की त्यात जो हरेल त्याने बारा वर्षे वनवासात व एक वर्ष अज्ञातवासात रहावे. कालावधी पूर्ण होण्याच्या आधीच प्रगट



झाल्यास पुन्हा बारा वर्षांचा वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास पत्करावा लागेल' असे जेव्हा शकुनीने सुचवले, तेव्हा इतर पांडव दचकलेच आणि धर्मराजाकडे आशेने पाहू लागले. आता तरी धर्मराजाला जाग येईल आणि तो हा जीवघेणा खेळ थांबवील अशी त्यांची त्याच्याकडून अपेक्षा होती. परंतु धर्मराजाने त्याच्या बंधूंचा अपेक्षाभंग करून त्यांना निराशच केले. धर्मराजाच्या मनातील आशा पुन्हा पल्लवीत झाली आणि त्याने तो डाव खेळण्यास संमती दिली. अर्थात धर्मराजाला दान अनुकूल पडू शकलेच नाही आणि तो डावही धर्मराज पुन्हा सपशेल हरलाच. अशा तऱ्हेने पूर्णपणे पराजित झालेला धर्मराज नैराश्याने व उदासीन होऊन मान खाली घालून बसला. धर्मराजाला त्याच्या बंधूंकडे वर बघून नजर मिळवण्याची हिंमतच होत नव्हती. कौरवांच्याठिकाणी साहजिकच अत्यंत उत्साहच निर्माण झाला होता आणि त्यांचे चेहरे हर्षाने फुलून गेले होते. परंतु दुर्योधनाचे मात्र अजूनही समाधान झाले नव्हते. कारण पांडवांना जीवनातून पूर्णपणे उठवण्याचा चंगच त्याने बांधलेला होता. त्यामुळे दुर्योधन मनातून अजूनही अस्वस्थच होता. त्याने शकुनीकडे पाहून सूचक नेत्रपल्लवी केली. शकुनीला त्याचा अर्थ लागलीच कळला. त्याने धर्मराजाशी समजुतीच्या सुरात बोलावयास सुरुवात केली.


"अरे धर्मराजा, असा निराश होऊ नकोस. हार व जीत ही दोन्हीही खेळाचीच अंगे आहेत. खरे तर, तुझ्या खेळाची सुरुवात तर छानच झालेली होती. एका मागून एक डाव तू जिंकत होतासच ना! पण खेळामध्ये वरती खालती असे होणारच. यामध्येच तर खेळाची खरी गंमत असते आणि दैवाचे चक्र तर सतत फिरतच असते. अनुकूलतेनंतर जशी प्रतिकूलता येते, तशीच प्रतिकूलतेनंतर पुन्हा अनुकूलता ही येतेच. फक्त त्याची वाट पहात आपण प्रयत्न मात्र करीत राहिले पाहिजे. असे नको व्हायला की दैव आपल्याला अनुकूल असेल आणि नेमके त्याचवेळी आपल्याकडून प्रयत्न घडले नाहीत. कोणत्याही परिस्थितीत प्रयत्नांची कास सोडणे हे खऱ्या पुरूषाचे लक्षणच नव्हे; त्यात काहीच पुरूषार्थ नाही. तू जरी सर्व वैभव व तुझे राज्यही खेळामध्ये हरला असलास तरी अजूनही एक मूल्यवान गोष्ट तुझ्यापाशी आहे. त्याचे तू विस्मरण होऊ देऊ नकोस. ती गोष्ट म्हणजे तू स्वतःच होय. जोपर्यंत तू आहेस तोपर्यंत तुझे राज्य व तुझे सर्व वैभव तू निश्चितपणे परत मिळवू शकशील, याची मला तर पूर्ण खात्री आहे. तेव्हा तू स्वतःवरचा विश्वास जागव आणि आता स्वतःलाच 'पणा'ला लाव. या वेळी तुझ्या दैवाचे चक्र फिरून ते पुन्हा तुला अनुकूल होणार आहे, असे मला अत्यंत स्पष्टपणे दिसत आहे."

शकुनीच्या गोड बोलण्यामागील कावा धर्मराजाच्या स्वभावानुसार त्याच्या लक्षात आला नाही म्हणा किंवा त्याच्या मनात पुन्हा आशेचा किरण त्याला दिसू

लागला म्हणा, परंतु शकुनीच्या बोलण्याचा धर्मराजा गंभीरपणे विचार करीत असावा, असे त्याच्या थोड्याशा उजळलेल्या चेहऱ्यावरून दिसत होते आणि ते खरेच ठरले. विवेकहीन झालेल्या धर्मराजाला शकुनीच्या बोलण्यावर विश्वास ठेवायला मुळीच वेळ लागला नाही. कारण त्याने पुढील डाव खेळण्यासाठी ताबडतोब संमती दिली आणि स्वतःच स्वतःला ‘पणा’ला लावले. शकुनीने छद्मी हास्य करून फासे टाकले आणि आधीच ठरल्याप्रमाणे ते दान धर्मराजाला प्रतिकूल पडले. क्षणार्धात धर्मराज स्वतःचे स्वत्व गमावून बसला आणि हरल्यामुळे तो कौरवांचा म्हणजेच पर्यायाने दुर्योधनाचा दास होऊन बसला. दुर्योधन हर्षोन्मादाने अत्यंत मोठ्याने आवाज करून हसला. पण त्याच्या मनाचे समाधान झाले नव्हतेच. त्याने शकुनीला नेत्रपल्लवीने खूण केली आणि शकुनीने पुन्हा धर्मराजाशी मिठ्ठास वाणीने बोलून त्याच्या मनाला भुरळ पाडली. शकुनीने धर्मराजाला जिंकण्याची खोटी आशा दाखवून त्याच्या सर्व बंधूंनाही ‘पणा’स लावण्यासाठी उद्युक्त केले. संमोहित झाल्याप्रमाणे धर्मराज शकुनीच्या मायाजालात अधिकाधिक गुरफटून अडकत गेला. त्याने काहीही विचार न करता क्रमाक्रमाने भीम, अर्जुन, नकुल व सहदेव यांनाही ‘पणा’स लावले आणि तेवढ्याच सहजतेने तो हरलाही. धर्मराजाचे सर्व बंधू पराभूत मुद्रेने त्यांचे आसन सोडून धर्मराजाच्या शेजारी लज्जेने मान खाली घालून बसले. त्रिभुवनातही अद्वितीय पराक्रमाने प्रसिद्ध असलेले पाच पांडव आज केवळ दैवयोगाने नव्हे तर त्यांच्या अविवेकी कर्मामुळे दुर्योधनाचे दास होऊन तेजोहीन अवस्थेत, जणू लाचार होऊन बसले होते. त्यांची ती असहाय्य अवस्था पाहून दरबारातील सर्व सज्जनांची मने हळहळली आणि त्यांच्या मुखातून ‘हाय, अरेरे’ असे दुःखोद्गार सहजतेने प्रगट झाले. पांडवांचा दुःस्वास करणारे त्यांचे प्रतिस्पर्धी मात्र अत्यंत खूश झाले आणि त्यांची ती खूशी त्यांच्या मुखातून स्पष्टपणे उमटली. आता पुढे काय होणार याचा ताण मनामध्ये ठेवून सर्व सभाजन अत्यंत स्तब्ध होऊन राहिले होते.

* * *

हे लक्ष्मी, परंतु या दुःखद खेळाचा शेवट अजून झालेला नव्हता. पांडवांवरील संकटाचा व दुःखाचा कडेलोट व्हायचा अजूनही शिल्लक राहिला होता आणि तो झाल्याशिवाय दुर्योधनाच्या मनाला चैन पडणे कदापिही शक्य नव्हते. द्रौपदीची सल त्याच्या मनाला टोचत होती आणि त्याच्या नजरेतून ती शकुनीच्या लक्षात आलीच. त्यासाठी शकुनीला दुर्योधनाने काहीही सांगण्याची जरूरी भासलीच नाही. दुर्योधनाच्या मनातील दुष्ट हेतू ओळखून शकुनीने धर्मराजाशी बोलण्यास सुरुवात



केली. आवाजात प्रयत्नपूर्वक हळुवारपणा आणून आणि आपलेपणाचा आविर्भाव करीत शकुनी कावेबाजपणे धर्मराजाशी बोलू लागला.

“अरे धर्मराजा, तुझ्यावरील ओढवलेल्या दुःखद प्रसंगाची मला जाणीव आहे. परंतु त्याचबरोबर अशा दुःखांच्या भीतीने तू गांगरून जाणार नाहीस, याचीही मला खात्री आहे. कारण तू जातिवंत क्षत्रिय आहेस हे मी जाणून आहे आणि खरा क्षत्रिय हा पराभवामुळे कधीच खचून जात नाही. शेवटची संधी असेपर्यंत तो प्रयत्न करीत रहातो आणि पराभवाचे रूपांतर शेवटी विजयामध्ये निश्चयपूर्वक करतोच करतो. संकटांमुळे जरी क्षत्रियाचा पराक्रम थोडावेळ झाकोळल्यासारखा दिसला, तरी त्याचा पराक्रम पुन्हा तेजाने झळाळून निघतो आणि तो हातातून निसटून चाललेली विजयश्री पुन्हा स्वतःकडे परत वळवून घेतो. अशाच क्षत्रियाला शेवटी विजयश्री माळ घालत असते. तुझ्या क्षत्रिय वृत्तीवरती माझा पूर्ण विश्वास आहे. पण तू मात्र स्वतःवरील विश्वास अजिबात गमावू देऊ नकोस. फक्त त्यासाठीचा मार्ग आधी तुझ्या दृष्टीक्षेपात आला पाहिजे आणि नंतर हिमतीने त्या मार्गाचा तू अवलंब केला पाहिजेस.


धर्मराजा, तू स्वतः व तुझे सर्व बंधू तू दुर्दैवाने गमावून बसला आहेस ही गोष्ट खरी आहे आणि वाईटही आहे. परंतु दैवाने तुला असे सर्वस्वी वाऱ्यावर सोडलेले नाही. दैव तुझी अजूनही पाठराखण करावयास सज्ज आहे. म्हणूनच त्या दैवाने तुझ्यासाठी एक शेवटची आणि अत्यंत सरस अशी चीज बाकी ठेवली आहे आणि ती म्हणजे तुझी पत्नी द्रौपदी ही होय. तुझी भाग्यरेषा बदलण्याचे सामर्थ्य आता फक्त द्रौपदीच्या हातात आहे. कुरू कुळातील तुम्हा पांडवांना जी गोष्ट जमली नाही, ती गोष्ट द्रौपदीच्या भाग्यामुळेच तुम्हाला सहज प्राप्त होईल. तेव्हा पराभूत होऊन हा खेळ सोडून जाण्याची नामुष्की पत्करण्यापेक्षा भाग्याचे अनुकूल दान मिळवण्याची प्राप्त झालेली ही सुवर्णसंधी हातची घालवू नकोस. त्यासाठी दैवाने नेलेल्या गोष्टी पराक्रमाने पुन्हा प्राप्त करून घेण्याचा तुझ्या मनाठायी निश्चय कर. तुझ्या बंधूंवरती जेवढा तुझा हक्क आहे तेवढाच तुझा हक्क पती या नात्याने द्रौपदीवरतीही आहे. तो हक्क गाजवून घे. त्यासाठी कोणतेही अनमान आता करू नकोस. धैर्याने पाऊल पुढे टाक, अंतिम विजय तुझाच आहे.”

शकुनीच्या नकली प्रेमाचा आविर्भाव धर्मराजाच्या लक्षात येण्याएवढे त्याचे मन जागृत नव्हतेच. मनाच्या अशा बेसावध अवस्थेमुळेच शकुनीच्या बोलण्याचा प्रभाव धर्मराजाच्या मनावर झाला. त्याच्या मनावरील निराशेची काजळी शकुनीच्या बोलण्यामुळे झटकली गेली आणि मनामध्ये आशेची ज्योत पुन्हा तेवू लागली. धर्मराजाच्या मनात होत असलेला हा बदल त्याच्या इतर बंधूंच्या लक्षात यायला वेळ लागला नाही आणि त्यांच्या मनात भीतीने शिरकाव केला.

धर्मराजाच्या बंधूंच्या मनातील शंका अखेर खरीच ठरली. कारण धर्मराज नव्या उमेदीने पुन्हा खेळण्यासाठी पुढे सरसावला. सर्व दरबारात एक भीषण शांतता पसरली आणि वातावरणातील तणाव वाढून तो सर्वांनाच असह्य होऊ लागला. त्याचे भान धर्मराजालाही आले. परंतु आता 'उचललेले पाऊल मागे टाकायचे नाही' या एकाच निर्धाराने धर्मराज युक्त झाला होता. त्याने मागचा पुढचा काहीही विचार न करता द्रौपदीला 'पणा' ला लावले आणि शकुनीला फाशांचे दान टाकावयास सांगितले. दुर्योधनालाही कधी नाही तो ताण जाणवू लागला आणि तो अत्यंत बेचैन झाला. पांडवांना पूर्णपणे नेस्तनाबूत करण्यासाठी शेवटचा एकच टोला देणे शिल्लक राहिले होते आणि त्यांना तो शकुनीच्या हाताने मिळालाही. दुर्योधनाच्या बाजूने खोटे दान पाडण्याची शकुनीची चाल पुन्हा एकदा यशस्वी ठरली आणि सर्व खेळच खलास झाला. धर्मराजा द्रौपदीलाही हरवून बसला आणि पराभूत व लज्जित मुद्रेने त्याच्या जागेवर जेमतेम कसाबसा जाऊन बसला. स्वतःच्या बंधूंकडे मान वर करून बघण्याची हिंमतही त्याच्याठिकाणी राहिली नव्हती. धर्मराजाचे सर्व अवसानच गळाले होते आणि परिस्थितीला पूर्णपणे शरण जाणे त्याला भागच पडले होते. बाकीच्या पांडवांचीही विमनस्क अवस्थाच झाली होती. त्यांच्या अगतिकतेचाच त्यांच्या मनाला जास्त त्रास होत होता आणि धर्मराजाविषयीच्या संतापानेही ते सर्वजण मनातल्या मनात धुमसत होते. भीमाच्या मनाचा उद्रेक तर कोणत्याही क्षणी होईल अशी धास्ती सर्वांनाच वाटत होती आणि अर्जुनालाही मनाचा संयम राखणे कठिण होत होते. नकुल व सहदेवही मनाच्या उद्विग्न अवस्थेतून हतबल होऊन बसले होते. आता पुढे काय होणार असा प्रश्न व ताण सर्वांच्याच ठिकाणी होता आणि तो त्यांच्या आपापसातील व मोठ्या आवाजातील कुजबुजण्यातून व अस्वस्थ अशा हालचालीतून व्यक्त होत होता.

दुर्योधनाला झालेला हर्षोन्माद मात्र लपवणे त्याला शक्य होत नव्हते आणि त्याने तसा प्रयत्नही केला नाही. 'जीतम् मया'च्या अभिनिवेशात दुर्योधनाने त्याचे दोन्ही हात उंचावून आकाशाकडे झेपावले आणि छद्मीपणाने तो हसू लागला. पुढे होऊन त्याने शकुनीशी हात मिळवून त्याचे अभिनंदन केले आणि त्याला दृढालिंगन दिले. दुर्योधनाच्या इतर बंधूंनीही त्यांच्या आवळलेल्या मुठी उंचावून त्यांचा हर्ष जल्लोषाने व्यक्त केला. त्यातही दुःशासन धावतच पुढे आला आणि त्याने हस्तांदोलन करून दुर्योधनाचे अभिनंदन केले. दुर्योधनानेही दुःशासनाच्या पाठीवर जोराने थोपटले आणि सर्वांना ऐकू जाईल अशा मोठ्या आवाजाने तो दुःशासनाशी बोलू लागला.

"अरे दुःशासना, आपण जिंकलो आणि पांडव हरले. एवढेच नव्हे, तर द्युतामध्ये पांडव स्वतःही हरल्यामुळे ते आता आपले दास झाले आहेत. त्यांना त्यांचे



स्वतंत्र अस्तित्व उरलेले नाही. आपले सेवक हीच त्यांची आता ओळख आहे आणि आपली सेवा करून आपल्याला संतुष्ट करणे, एवढेच आता त्यांचे जीवन आहे. सर्व पांडव आता आपले आश्रित आहेत. तेव्हा त्यांच्या अंगावरील ही सर्व भरजरी वस्त्रे व आभूषणे पहिल्याप्रथम त्यांना उतरावयास सांग. त्यांना म्हणावे की आता तुमचा वेष सामान्य सेवकाप्रमाणे करा आणि चेहऱ्यावरती नम्रतेचे भाव ठेवा. आम्ही विचारल्याशिवाय काहीही बोलायचे नाही आणि आम्ही सांगितल्याशिवाय काहीही करायचे नाही. या मर्यादेचे उल्लंघन जर यदाकदाचित तुमच्याकडून चुकूनही झाले तर त्याची जबरदस्त शिक्षा तुम्हाला भोगावी लागेल, याची सदैव आठवण ठेवा.

अरे दुःशासना, आणखी एक महत्त्वाची व छान गोष्ट घडली आहे आणि ती म्हणजे द्रौपदी आता आपली दासी झालेली आहे. स्वतःच्या सौंदर्याचा सदैव अभिमान बाळगून असलेल्या द्रौपदीला आता स्वतःचे अस्तित्वच उरलेले नाही हे तिला कळू द्या. स्वतःच्या पतींविषयी व त्यांच्या पराक्रमाविषयी सदैव घमेंड असणाऱ्या द्रौपदीला खुद्द तिच्याच एका पतीने एक मूल्यवान 'वस्तू' समजून तिला 'पणा'ला लावले आणि तिची खरी लायकी तिला दाखवून दिली. निराधार द्रौपदीच्या पाठीशी उभे रहाण्याचे बळ पांडवांच्या ठिकाणी आता नाही. कारण त्यांचा कणाच पूर्णपणे मोडून गेलेला आहे.

दुःशासना, प्रश्न असा आहे की जर खुद्द पांडवांनीच द्रौपदीला एखाद्या वस्तूसारखे वागवले आहे तर आपणही तिला वेगळी वागणूक देण्याचे काय कारण आहे बरे? काहीच नाही. आपल्यासाठीही द्रौपदी आता एखाद्या किरकोळ भोग्य वस्तूसारखीच आहे. आपण आपल्याला पाहिजे त्या वेळी व पाहिजे त्या ठिकाणी द्रौपदीला बोलवू शकतो आणि तिच्याकडून आपल्याला पाहिजे ती सेवा हक्काने करून घेऊ शकतो. आपला आणि केवळ आपलाच तिच्यावर पूर्ण अधिकार आहे. याचे प्रत्यंतर आताच आपण सर्वांच्या देखतच अनुभवूया, म्हणजे सर्वांनाच त्याची खात्री पटेल. दुःशासना, तू आताच्या आता अंतःपुरात जा आणि तेथे असलेल्या द्रौपदीला या दरबारात घेऊन ये. मला तिच्याकडून बरीच काही सेवा करून घ्यायची आहे. तेव्हा मुळीच वेळ फुकट न घालवता तू येथून त्वरित निघ. ही माझी तुला आज्ञाच आहे, असेच तू समज. जा, निघ लवकर."

दुर्योधनाच्या बोलण्यातील हेतू दुःशासनाच्या लक्षात यायला अजिबात वेळ लागला नाही. कारण त्याच्या मनातही तसेच दुष्ट विचार येत होते. दुष्ट लोकांची मते लागलीच जुळतात कारण त्यांची मने नेहमीच दुष्ट विचारात पूर्णपणे बुडालेली असतात. त्यामुळे दुर्योधनाचे बोलणे ऐकून दुःशासनाला हर्षच झाला आणि पडत्या फळाची आज्ञा समजून तो जवळ जवळ धावतच अंतःपुरात गेला. त्याठिकाणी राज

घराण्यातील अनेक स्त्रियांसमवेत द्रौपदी बसलेली होती खरी, पण तिचे मन मात्र त्याठिकाणी नव्हते. त्याठिकाणी चाललेल्या गप्पागोष्टी वा थट्टामस्करी यामध्ये तिचे अजिबात लक्ष नव्हते. तिच्या मनाला अत्यंत धाकधूक वाटत होती आणि तिचे मन दरबारात चालू असलेल्या द्युत खेळाकडे पूर्णपणे लागले होते. द्रौपदीच्या मनाला एक अनामिक भीती वाटत होती. प्रयत्न करूनही मनाला सावरणे द्रौपदीला शक्य होत नव्हते. अशावेळी तिला कृष्णाचे स्मरणही तीव्रतेने होत होते. परंतु त्यामुळे कृष्णाची अनुपस्थिती अधिकच जाणवून द्रौपदीचे मनही अधिकच अस्वस्थ होत होते. काहीतरी घोर संकट ओढवणार असल्याची चाहूल द्रौपदीच्या मनाला लागत होती आणि तिच्या मनाची बेचैनी सारखी वाढत होती. शेवटी द्रौपदीची भीती खरीच ठरली. दुःशासनाने आल्या आल्या 'धर्मराज पूर्णपणे हरल्याची आणि द्रौपदी तसेच सर्व पांडवही आता कौरवांचे आजन्म दास झाल्याची' विजयी घोषणा केली. द्रौपदीकडे पाहून छद्मीपणाने हसत दुःशासनाने दुर्योधनाची आज्ञा द्रौपदीला सांगितली.

दुःशासनाच्या बोलण्याने द्रौपदी अवाक् झाली आणि नंतर अत्यंत भयचकित होऊन दिङ्मूढच झाली. तिची विचारशक्ती एकदम पूर्णपणे गोठल्यासारखीच झाली आणि थोडावेळ तिच्याठिकाणी निर्विकार अशी शून्यावस्थाच निर्माण झाली. परंतु दुःशासन एवढा उतावीळ झाला होता की तो थांबायला तयारच नव्हता आणि त्याच्याकडे तेवढा वेळही नव्हता. त्याने पुढे होऊन आवेगाने द्रौपदीचा हात घट्ट धरला आणि तो तिला खेचून नेण्याचा प्रयत्न करू लागला. परंतु द्रौपदीने एक जोरदार हिसका देऊन तिचा हात दुःशासनाच्या हातातून सोडवून घेतला आणि जळजळीत नजरेने ती दुःशासनाकडे पहात राहिली. द्रौपदीचा तो आवेश पाहून क्षणभर दुःशासनही गांगरलाच. परंतु द्रौपदीचा हात धरण्यासाठी पुन्हा तो त्वेषाने पुढे सरसावला. द्रौपदीने तिचा हात वर करून त्याला तेथेच रोखले आणि ती म्हणाली,

"दुःशासना, याद राख, एकही पाऊल पुढे टाकण्याचे धाडस दाखवशील तर तुझ्यावर पश्चात्तापाची पाळी येईल हे विसरू नकोस. माझे पाच पराक्रमी पती माझे रक्षण करण्यासाठी समर्थ आहेत हे लक्षात ठेव. पण आज काही कारणाने माझे पतीही जर असमर्थ झाले असतील तरी माझे रक्षण करण्याएवढी सबळ मी नक्कीच आहे. एक स्त्री म्हणून मी जरी अबला असले आणि देहाने दुर्बल असले तरी माझे मनोबळ भरभक्कम आहे याची खात्री बाळग. स्वतःचे स्वत्व राखण्याएवढे तेज माझ्यापाशी निश्चितच आहे. त्याची परीक्षा घेण्याचा वेडेपणा तू करू नकोस. नाहीतर तुला त्याची फळे भोगावी लागतील. दुर्योधनाने मला दरबारात बोलावले आहे आणि त्याचा निरोप मला सांगण्याचे काम तू केलेले आहेस. दुर्योधन युवराज



असल्यामुळे त्याची आज्ञा मला मान्यच आहे आणि मी स्वतःहूनच दरबारात येण्यासाठी तयार आहे. त्यामुळे माझ्यावर जबरदस्ती करण्याचे कारणच नाही. मलाही तेथे निश्चित काय घडले हे जाणून घ्यायचेच आहे. मग तेथेच काय तो न्यायनिवाडा होईल.”

द्रौपदीच्या अशा तेजस्वी बोलण्याने अंतःपुरातील इतर स्त्रियाही चकित झाल्या. त्या द्रौपदीकडे सहानुभूतीच्या व कौतुकाच्या नजरेने आणि दुःशासनाकडे रागाच्या व तिरस्काराच्या नजरेने पहात होत्या. अर्थात त्या स्त्रियांची पर्वा करण्याचे दुःशासनाला काहीच कारण नव्हते. स्त्रियांविषयीचा आदर व मान असल्या सभ्य गुणांचाही त्याच्याकडे पूर्णच अभाव होता. परंतु दुःशासनाला तेथे सर्वांच्या देखत विशेषतः राजघराण्यातील ज्येष्ठ स्त्रियांच्या देखत काही निंद्य प्रकार करण्याची हिंमत झाली नाही म्हणा किंवा त्याने थोडासा धोरणीपणा दाखवला असे म्हणा, परंतु दुःशासन दोन पावले मागे सरला आणि द्रौपदीबरोबर योग्य अंतर ठेवून चालत तिच्यासह दरबारात आला.

द्रौपदीने दरबारात आल्यावर प्रथम ‘धृतराष्ट्र महाराजांचा विजय असो’ असे म्हणत धृतराष्ट्राला प्रणाम केला. औपचारिकरित्या का होईना पण धृतराष्ट्राला हात वर करून द्रौपदीच्या शुभचिंतनपर शब्द उच्चारणे भाग पडले. द्रौपदीने दरबारात सर्वत्र नजर फिरवून पाहिले. त्यामध्ये जेव्हा तिने पाचही पांडवांना अगतिकतेने मान खाली घालून बसलेले पाहिले तेव्हा तिला सर्व परिस्थितीचाच पूर्ण अंदाज आला आणि ती मनातून अत्यंत सावध झाली. तिच्यावर ओढवलेल्या परिस्थितीचे गांभीर्य द्रौपदीच्या लगेचच लक्षात आले आणि साहजिकच तिचे मन काळजीने युक्त झाले. पण थोड्याच वेळात तिने स्वतःला सावरले. प्रत्यक्ष कृष्णही येथे हजर नाही या जाणिवेने तिचे मन सुरूवातीला जरा घाबरलेच. परंतु ‘आता आपले आपणच प्रयत्न करायला हवेत आणि येणाऱ्या संकटाला आपल्यालाच सामोरे जायला हवे,’ हे द्रौपदीच्या लक्षात आले. क्षणभर अंतर्मुख होऊन द्रौपदीने कृष्णाचे मनःपूर्वक स्मरण केले आणि सर्व धैर्य एकवटून तिने भर दरबारातच, थोड्याशा मोठ्या आवाजाने बोलावयास सुरूवत केली.

“अहो धृतराष्ट्र महाराज, मला तुमच्याकडून न्याय हवा आहे. या दरबारात आज भीष्माचार्य व द्रोणाचार्य यांच्यासारखी वयोवृद्ध, ज्ञानसमृद्ध आणि धर्मशास्त्र जाणणारी अनेक मान्यवर मंडळी उपस्थित आहेत. त्या सर्वांच्या साक्षीने मी तुमच्याकडून योग्य न्यायाची अपेक्षा करीत आहे आणि तुम्ही तो कराल याची मी खात्री बाळगून आहे. माझे पती धर्मराज यांनी मला द्युतामध्ये ‘पणा’ला लावले आणि त्यात ते हरले आहेत ही गोष्ट जर खरी असेल, तर मला येथे उपस्थित

असलेल्या सर्व ज्ञानी व सूज्ञ लोकांना एकच प्रश्न विचारायचा आहे की द्युतात 'पणा'ला लावायला मी काय हत्ती-घोडे, रत्ने-माणके, सोने-चांदी यासारखीच एक वस्तू आहे का? मी स्त्री आहे म्हणजे एक मानवच आहे ना? तेव्हा अशा तऱ्हेने मला 'पणा'ला लावण्याचा अधिकार माझ्या पतींना कोणत्या धर्मशास्त्राने दिला आहे ते मला येथील शास्त्री पंडितांनी समजावून सांगावे. मीही एक हाडामासाचीच माणूस आहे. मग मलाही सुख-दुःख, स्वाभिमान-अवमान, इत्यादी भावना आहेतच ना? का मी केवळ एक भोग्य वस्तूच आहे? आज माझे पाचही पती कर्तृत्वहीन होऊन असहाय्य झालेले आहेत. त्यामुळे माझ्या पाठीशी उभे रहाण्यासाठी ते असमर्थ ठरत आहेत. पण मी केवळ पांडवांची पत्नी नसून सर्व कुरूकुळाचीच स्नुषा आहे आणि कुरूकुळाच्या स्नुषेची लाज व अब्रू राखण्याची जबाबदारी सर्व कुरूकुळावरतीच आहे ही गोष्ट लक्षात घ्या. जर माझ्या केसालाही जरासाही धक्का लागला तर ती अप्रतिष्ठा सर्व कुरूकुळाचीच आहे. त्यामुळे कलंक सर्व कुरूकुळालाच लागणार आहे आणि त्या कुळाचीच नाचक्की होणार आहे ही गोष्ट खरी आहे ना? मग माझी व सर्व कुरूकुळाचीच अब्रू अशा तऱ्हेने कलंकित करणे हे योग्य आहे का? कुरूकुळातील भीष्माचार्यांसारख्या मान्यवर जनांना माझा हा प्रश्न आहे आणि त्यांच्याकडून मला समाधानकारक उत्तराची अपेक्षा आहे."

द्रौपदीचे बोलणे थांबले तरी तिच्या बोलण्यातील त्वेष अजूनही तिच्या मुखावर स्पष्टपणे दिसत होता. द्रौपदीच्या बोलण्यातील तिचे म्हणणे एवढे सुस्पष्ट व बिनतोड होते की सर्व सभा स्तब्धच होऊन राहिली. द्रौपदीची होत असलेली अवहेलना कौरवांशिवाय इतर कोणालाच मान्य होत नव्हती. परंतु तसे बोलण्याची हिंमत कोणाकडेही नसल्यामुळे सर्वजण नाईलाजाने स्वस्थच बसून राहिले होते. भीष्म, द्रोण इत्यादी मान्यवरांनीही तटस्थ भूमिका घेणेच स्वीकारले होते. परंतु सज्जन वृत्तीच्या विदुराला मात्र स्वस्थ बसणे शक्य झाले नाही. तो धैर्याने उभा राहिला आणि त्याने स्पष्टपणे बोलण्यास सुरूवात केली.

"अहो धृतराष्ट्र महाराज, द्रौपदीचे म्हणणे अगदी यथार्थ आहे. द्रौपदी आपल्या कुरूकुळाची स्नुषा आहे ही गोष्ट सत्यच आहे. तेव्हा तिची अब्रू ही आपल्या कुळाचीच अब्रू आहे आणि ती कोणत्याही परिस्थितीत राखणे, हे आपले सर्वांचेच कर्तव्यकर्म आहे. आपल्याच स्नुषेला आपणच दासी म्हणून वागवणे यासारखे दुसरे निंद्य कर्म नाही. या निंद्य कर्माचा निषेध व्यक्त करण्याएवढेही धैर्य आपल्या कुळातील लोकांकडे शिल्लक राहिलेले नाही, याचे मला अत्यंत वाईट वाटते. आपल्या कुळाची एवढी अधोगती झालेली आहे का की या कुळात साधे सज्जनत्वही उरलेले नाही?



खरे तर, पांडव हेही आपल्या कुळातील राजपुत्रच आहेत. त्यांनाही दास म्हणून जीवन जगायला लावणे म्हणजे आपणच आपल्या हाताने आपल्या कुळाला बट्टा लावण्यासारखे आहे. यामध्ये आपला पराक्रम तो  काय आणि यामध्ये आपला नावलौकिक तरी काय?

महाराज, मला आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा मांडायचा आहे, ज्याचा निवाडा केवळ धर्मशास्त्रातील ज्ञानी व पंडीतच करू शकतील. ज्यावेळेस धर्मराजा हा स्वतःच द्युतामध्ये हरला त्यावेळेसच त्याचा त्याच्या बंधूंवरील व पत्नीवरील सर्व हक्क संपुष्टात आला. मग असे असताना धर्मराजाला, त्याच्या बंधूंना व पत्नीला ‘पणा’ला लावण्याचा अधिकार कसा असू शकेल? माझ्या दृष्टीने व माझ्या मतीनुसार तरी याचे उत्तर ‘नाही’ असेच आहे. त्यामुळे धर्मराज हरल्यानंतर हा खेळ तेथेच थांबावयास हवा होता. त्यानंतर झालेला खेळ हा आपसूकच रहित होतो. त्यानंतरच्या खेळाला काहीही अर्थच उरत नाही आणि म्हणूनच त्या खेळात घडलेल्या सर्व गोष्टीही निरर्थकच आहेत.”

* * * * *

## द्रौपदीची अवहेलना आणि तिचे लज्जारक्षण

तेवढ्यातच दुर्योधन आपल्या आसनावरून ताडकन् उठला आणि विदुराचे बोलणे मध्येच थांबवीत त्याने चिडून मोठ्या आवाजात बोलण्यास सुरुवात केली.

“अहो विदुरजी, आपले हे धर्मशास्त्रावरील प्रवचन कृपा करून आता थांबवा. त्याविषयी उलटसुलट चर्चा करून उगाचच स्वतःला शिणवू नका आणि येथील लोकांना फसवू नका. त्याचा आता कोणावरही काहीही परिणाम होणार नाही. माझ्यावरती तरी बिलकुलच नाही. कारण तुमच्यामध्ये जो पांडवांविषयीचा पक्षपातीपणा आहे तो सर्वांनाच ठाऊक आहे. पांडवांच्या विरूद्ध काही गोष्ट घडायला लागली की तुम्हाला लागलीच धर्मशास्त्रातील नियमांची आठवण होते. हा आमचा अनुभव आजचाच नाही तर नेहमीचाच आहे. तुम्ही नात्याने माझे चुलते असलात तरी आमचे एक आश्रित आहात हे विसरू नका. आम्ही तुमच्या नात्याचा मान करीत असतो याचा अर्थ असा नव्हे की तुम्ही आमचा अवमान करावा आणि आम्ही तो मुकाटपणे सहन करावा. स्वतःचा मान स्वतः राखून घ्या नाहीतर मग अपमान सहन करण्याची मनाची तयारी ठेवा. कुरूकुळासारख्या थोर कुळाचे नाव लावता खरे, परंतु तुमच्या क्षुद्र मनोवृत्तीने तुम्ही खरे मूळचे दासीपुत्रच आहात हे तुम्ही स्वतःच सिद्ध करीत आहात आणि म्हणूनच अनैतिक संबंधातून जन्मलेल्या पांडवांविषयी तुम्हाला एवढी सहानुभूती आहे. पांडव म्हणजे फक्त सर्व चांगुलपणा आणि कौरव म्हणजे केवळ सर्व वाईटपणा असा तुम्हीच तुमच्या मनाचा कायमचा व सोयीचा ग्रह करून घेतलेला आहे. त्यामुळे त्याचदृष्टीने पहाताना तुम्हाला कौरवांची सर्वच कृत्ये निंदनीय वाटतात आणि पांडवांनी काहीही केले तरी कौतुकास्पदच वाटते. म्हणूनच तुम्ही मीठ खाता कौरवांचे, पण तुमची निष्ठा मात्र पांडवांकडेच आहे. आता ही गोष्ट कोणत्या धर्मशास्त्रात बसते व ती कोणत्या नीतीशास्त्राला धरून आहे याचे उत्तर आधी द्या आणि मगच आम्हाला धर्माचे व नीतीचे धडे द्या.

अहो विदुरजी, तुम्हाला एवढा जर पांडवांविषयी पुळका होता तर तुम्ही तुमच्या प्रिय पांडवांना द्युत खेळण्याच्या आधीच आवरावयास हवे होते. तेव्हा पांडव जिंकतील ही आशा मनात बाळगून तुम्ही जाणूनबुजून स्वस्थ बसलात आणि आता पांडव हरल्यावर मात्र तुम्हाला धर्माची व शास्त्राची अत्यंत सोईस्करपणे आठवण झाली का? धर्मशास्त्राचा तुमच्या सोयीनुसार अर्थ लावताना ही गोष्ट जराही विसरू नका की त्याचे थोडेबहुत ज्ञान आम्हालाही आहे. खरे तर, धर्मराज हरल्यानंतर खेळ तेथेच संपला होता हे तुमचे म्हणणे अगदी बरोबर असून ते आम्हालाही पटते. कारण धर्मराज आमचा दास झाल्यानंतर त्याच्या सर्व गोष्टी व त्याचे सर्वच जीवन आमचे व आमच्यासाठीच झाले. त्याचे स्वतंत्र अस्तित्वच



संपल्यानंतर त्याच्या सर्व गोष्टी या साहजिकच आमच्या झाल्या, त्यानंतर 'पणा'ला लावण्यासाठी त्याच्याकडे काहीच उरले नव्हते ही गोष्ट अगदी खरी आहे. तरीही आम्ही थोडावेळ तो खेळ सर्वांच्या मनोरंजनासाठी चालू ठेवला. सर्वांचे चांगलेच मनोरंजनही झाले आणि धर्मराजाचा ढोंगीपणाही सर्वांना पहावयास मिळाला. धर्मराजाचा सज्जनत्वाचा मुखवटा सर्वांच्या समक्ष तेव्हाच गळून पडला, जेव्हा त्याने स्वतःच्या स्वार्थासाठी खुद्द स्वतःच्याच बंधूंना व पत्नीलाही ' पणा'ला लावावयास कमी केले नाही. धर्मराजाच्या स्वार्थीपणाचा कळस पाहूनही तुम्हाला त्याची किळस वाटत नसेल, तर तुम्ही डोळे असूनही अंध, तोंड असूनही मुके व कान असूनही बहिरेच आहात. या निमित्ताने तुमच्या निःपक्षपातीपणाच्या मागे लपलेला तुमचा पक्षपातीपणाही उघड झाला, हे बरे झाले. अर्थात ती गोष्ट आम्ही आधीपासूनच जाणत असल्यामुळे आमच्यासाठी तरी ती नवीन नव्हती.

अहो, या द्रौपदीचा कळवळा येण्याचे काहीच कारण नाही. तिच्या पांडवांशी जुळलेल्या पत्नीच्या नात्याला मुळातच अधर्माचा पाया आहे. पत्नी म्हणून पाच पतींशी संबंध ठेवणाऱ्या स्त्रीने पतीव्रतेचा आव आणण्याचा प्रयत्न करू नये आणि धर्मशास्त्राची भाषाही करू नये. पाच पुरूषांशी एका स्त्रीचा विवाह लावताना धर्मशास्त्राचे नियम सोयीनुसार जरी वाकवले गेले, तरी लोक काही फसत नाहीत आणि अधर्म काही लपून रहात नाही. अशा कुलटा स्त्रीला कुरूकुळाचे नाव लावण्याचाच काय, पण नाव सांगण्याचाही अधिकार नाही. तेव्हा सोयीस्करपणे स्वतःला कुरूकुळाची स्नुषा म्हणवून घेऊन द्रौपदीला तिची चारित्र्यहीनता झाकता येणार नाही. द्रौपदी आता आमची बटीक झालेली आहे आणि तिच्यावर तिचाही अधिकार राहिलेला नाही. केवळ आमचाच अधिकार तिच्यावर चालेल आणि केवळ आमच्या सेवेसाठीच आता तिचे अस्तित्व आहे. आम्ही म्हणू ती गोष्ट, म्हणू त्यावेळेला व म्हणू त्याठिकाणी तिला करावीच लागेल. मी जर आताच या ठिकाणी द्रौपदीला माझ्या मांडीवर बसावयास सांगितले तर द्रौपदीला माझी आज्ञा मानावीच लागेल."


असे म्हणून दुर्योधन अत्यंत छद्मीपणाने हसला आणि त्याने स्वतःच्या मांडीवरती त्याचा हात ठेवून द्रौपदीला तेथे येऊन बसण्याची खूण केली. सर्वत्र तणावपूर्ण शांतता पसरली आणि द्रौपदीचे अवसानही हळूहळू गळायला लागले. शेवटचा उपाय म्हणून द्रौपदी दरबारातून अंतःपुराच्या दिशेने धावू लागली. दुर्योधनाने दुःशासनाला खूण करून द्रौपदीला रोखावयास सांगितले असता दुःशासनही द्रौपदीच्या मागे धावून गेला आणि त्याने तिची वाट अडवून धरली. अगतिक झालेली द्रौपदी परत फिरली आणि पांडवांसमोर येऊन उभी राहिली. या संकटातून तिचे पराक्रमी पतीच तिला वाचवतील अशी पूर्ण खात्री द्रौपदीच्याठायी

होती. परंतु पाचही पांडव मान खाली घालून स्वस्थ बसून राहिले होते. भीम त्याच्या मुठी आवळून पुढे येण्यास सरसावत होता. परंतु धर्मराजाने भीमाचा हात धरून त्याला थोपवले. अर्जुनाला तर स्वतःला आवरणे अशक्यच होऊ लागले होते. दोन तीनदा तरी तो आपल्या जागेवरून अर्धवट उठून उभा राहिला. पण शेवटी असहाय्यपणे पुन्हा खाली बसला. नकुल व सहदेवही अगतिक होऊन बसले होते. पती रक्षण करू शकत नाही असे पाहिल्यावर द्रौपदी अधिकच व्याकूळ झाली आणि तिच्या नेत्रातून प्रथमच अश्रू बाहेर आले. निकराचा प्रयत्न म्हणून द्रौपदी आसरा मागण्यासाठी धृतराष्ट्रासमोर जाण्याचा प्रयत्न करू लागली असता तिच्या मागोमाग धावत जाऊन दुःशासनाने तिचे हात धरून तिला मागे खेचले. त्याच्या हातातून कशीबशी स्वतःची सुटका करून घेऊन द्रौपदीने शेवटचा प्रयत्न केला आणि तिने सर्व सभाजनांसमोर आपले दोन्ही हात जोडून मदतीसाठी विनवणी केली. परंतु कोणाला तिची दया आली नाही आणि ज्यांना मनातून दया आली त्यांना पुढे येण्याचे धैर्य झाले नाही.

अशा तऱ्हेने पूर्णपणे असहाय्य झालेल्या द्रौपदीने स्फुंदून स्फुंदून रडावयास सुरूवात केली आणि तिच्या मुखातून निर्वाणीचे शब्द आले.

“अरे कृष्णा, मला वाचव. आता मला केवळ तुझाच आधार आहे आणि फक्त तुझाच भरवसा आहे. भक्तांचे रक्षण करणे हे जर तुझे ब्रीद आहे तर आता माझ्या रक्षणासाठी जेथे असशील तेथून धावत ये. तुझ्या भक्ताची लाज सर्व जनांसमक्ष अशा तऱ्हेने जात असताना तू स्वस्थ कसा बसू शकशील? तसे घडणे कदापिही शक्य नाही. याठिकाणी जर काही लज्जास्पद प्रसंग घडला तर त्यामुळे तुझीच लाज जाणार आहे, हे लक्षात ठेव. जगात ज्याचा कोणी नाही त्याच्यासाठी तूच एकीएक आहेस, असा तुझा नावलौकीक आहे. तो राखण्याची जबाबदारी तुझी आहे आणि ती वेळ आता आलेली आहे, नव्हे ती वेळही आता निसटून जात आहे. आतापर्यंत केवळ तुझ्यावरतीच श्रद्धा ठेवून तुझ्यावरील प्रेमाने व तुझ्या मार्गदर्शनाने मी जीवन जगत आले. पण आता खरेच तुझ्या प्रत्यक्ष प्रेमदर्शनाची व तुझ्या साहाय्याची जरूरी आहे. अशावेळी दूर राहून माझा अंत पाहू नकोस. जिवंतपणी मरणप्राय यातना होण्यापेक्षा तुझ्या या प्रेमी जीवाला पुन्हा तुझ्या प्रेमाचे संजीवन दे आणि तुझी भक्ती घडण्यासाठी नवजीवन दे. कृष्णा, कृष्णा, धाव, धाव.”

अशा तऱ्हेने कृष्णाची आळवणी करीत द्रौपदी मोठ्याने आक्रोश करू लागली. रडून रडून तिचा घसाही कोरडा झाला आणि तिला रडणेही अशक्य होऊ लागले. द्रौपदीच्या मुखातून अत्यंत हळू आवाजात जेमतेम फक्त ‘कृष्णा, कृष्णा’ एवढेच शब्द अत्यंत अस्पष्टपणे बाहेर येत होते.




द्रौपदीचा तो आक्रोश ऐकून सर्वांचीच अंतःकरणे पिळवटून निघाली. तिची असहाय्यता पाहून सर्वांचीच मनेही द्रवली आणि त्यांना द्रौपदीची दयाच येऊ लागली. परंतु कठोर अंतःकरणाच्या दुर्योधनावर मात्र त्याचा काहीच परिणाम झाला नाही. उलट द्रौपदीच्या त्या अवस्थेने त्याच्या मनाला हर्षच झाला. त्याने दुःशासनाकडे पाहून पुन्हा स्वतःच्या मांडीवर थोपटले आणि द्रौपदीला त्याच्या मांडीवर आणून बसवण्याचा इशारा केला. निष्ठूर मनाचा दुःशासनही उत्साहाने पुन्हा द्रौपदीच्या जवळ येऊन तिचा हात धरू लागला. तशाही अवस्थेत द्रौपदीने त्याचा प्रतिकार केला आणि दुःशासनाचा हात झटकून देत ती बाजूला होऊ लागली. पण दुर्दैवाने द्रौपदीने नेसलेल्या साडीच्या पदराचे टोक दुःशासनाच्या हातात सापडले आणि दुःशासनाने ते साडीचे टोक त्याच्या हातात घट्ट धरून ठेवले. द्रौपदी अडखळून जागच्या जागीच थबकली आणि साडीचा पदर दुःशासनाच्या हातातून सोडवण्याचा निकराचा प्रयत्न करू लागली. परंतु दुःशासनाच्या शारीरिक बळापुढे तिचा निभाव लागणे शक्यच नव्हते. दुःशासनाच्या ठिकाणी सभ्यता तर नव्हतीच, पण त्याच्याठायीची नीतीमत्ताही पूर्णपणे ढासळली होती. त्याने जेव्हा खांद्यावरून पदर पूर्णपणे ढळलेल्या अवस्थेत द्रौपदीला पाहिले, तेव्हा तर तो अत्यंत उत्तेजितच झाला आणि त्याच्याठायी एक प्रकारचा उन्मादच निर्माण झाला. दुःशासन द्रौपदीच्या पदराचे टोक धरून अधिकाधिक खेचू लागला आणि त्यामुळे द्रौपदीच्या कमरेची साडीच सुटू लागली. द्रौपदी साडी सावरण्याचा प्रयत्न करू लागली तर तिच्या पदराचे टोक तिच्या हातातून सुटू लागले. अशा अनावस्थेच्या प्रसंगात द्रौपदीच्या मनाचा धीर तर पूर्णपणे सुटलाच होता. परंतु तरीही सर्व बळ एकवटून द्रौपदी प्रतिकार करीत होती आणि कृष्णाला अंतःकरणातून आळवीत होती. त्यावेळेस दुसऱ्या कोणालाही हाका न मारता द्रौपदीच्या मुखातून एकीएक फक्त कृष्णाचेच नाव येत होते.

हे लक्ष्मी, तेवढ्यात भर दरबारात ‘द्रौपदी, घाबरू नकोस’  असा उच्च स्वरातील आवाज घुमला. द्रौपदीला तर तो आवाज कृष्णाचाच जाणवला. त्या आवाजापाठोपाठ भीष्म सरसावून पुढे झाले आणि ते वेगाने द्रौपदीच्या जवळ आले. सर्वप्रथम त्यांनी आपल्या अंगावरील शेला द्रौपदीच्या खांद्यावर ठेवून तिचे सर्व अंग झाकून टाकले आणि नंतर दुःशासनाकडे अशा तीव्र नजरेने पाहिले की त्याचा सर्व जोर व अवसान क्षणार्धात गळून पडले. द्रौपदीचा पदर दुःशासनाच्या हातातून केव्हा सुटला हे त्यालाही कळले नाही. भीष्मांनी अंगुलीचा निर्देश करून दुःशासनाला त्याच्या जागेवर परत जाऊन बसण्याचा इशारा केला असता मान खाली घालून दुःशासन त्याच्या आसनाकडे परतला. भीष्मांकडे वळून पहाण्याचेही धैर्य त्याच्याकडे नव्हते. भीष्मांनी द्रौपदीकडे वळून तिच्या मस्तकावर हात ठेवून हलकेच थोपटले. द्रौपदीने अश्रुपूर्ण नयनांनी आणि कृतज्ञता भावाने दोन्ही हात

जोडून भीष्मांना वंदन केले आणि त्यांना खाली वाकून नमस्कार केला. भीष्मांनी द्रौपदीला प्रेमाने हात धरून वर उठवले आणि तिला स्वतः अंतःपुराच्या प्रवेशद्वारापर्यंत नेऊन पोचवले. द्रौपदीने पुन्हा एकदा भीष्मांना हात जोडून वंदन केले. भीष्मांनी तिला अंतःपुरात जाण्याची खूण केली आणि ते स्वतः धिमी पाऊले टाकीत पुन्हा दरबारात येऊन त्यांच्या आसनावर बसले."

द्रौपदीच्या जीवनातील अत्यंत दुःखद व कसोटीच्या प्रसंगाचे वर्णन करीत असताना नारदाच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या होत्या, तर लक्ष्मीलाही तिचे हुंदके आवरणे अशक्यच झाले होते. लक्ष्मीच्या अस्फुट रडण्याच्या हलक्याशा आवाजानेही नारद देहभानावर आला आणि अश्रुपूर्ण नजरेने लक्ष्मीकडे पहात राहिला. लक्ष्मीच्या ठिकाणच्या भावनांचा आवेग नारदाच्या लक्षात आला आणि तो आवेग ओसरण्याची वाट पहात नारद मुद्दामच स्वस्थ बसून राहिला. लक्ष्मीच्या मनातील दाटून आलेल्या भावना मोकळया होणे अत्यंत आवश्यक आहे ही गोष्ट नारद जाणून होता. परंतु त्याला हेही माहीत होते की केवळ अश्रूपाताने मन खऱ्या अर्थाने कधीच मोकळे होणार नाही, तर मनातील भावना शब्दरूपाने व्यक्त करणेही तेवढेच आवश्यक आहे. म्हणून लक्ष्मीला बोलण्यासाठी उद्युक्त करावे या हेतूने नारदाने लक्ष्मीशी बोलावयास सुरुवात केली.

"हे लक्ष्मी, तुझ्या मनातील भावनावेग मी समजू शकतो आणि तसे होणे हे अगदी साहजिकच असते असे नव्हे, तर ते तसे अत्यंत आवश्यकही असते. कारण तू द्रौपदीच्या दुःखाशी पूर्णपणे समरस झाल्याचेच ते लक्षण आहे. त्यातून तुझ्या मनाची संवेदनशीलताच प्रगट झाली आणि ती निश्चितच महत्त्वाची गोष्ट आहे. परंतु द्रौपदीच्या दुःखाचा कडेलोट होत असतानाच तिला आधार व रक्षण मिळाले याचाही आनंद व्हावयास हवा आणि तोच शिल्लकही रहावयास हवा. द्रौपदीने आर्ततेने केलेली कृष्णाची आळवणी तिला शेवटी फळली आणि ज्या अत्यंत अनपेक्षित रीतीने द्रौपदीची संकटातून सुटका झाली, तो तर एक मोठा चमत्कारच म्हणावा लागेल. द्रौपदीच्याठायी असलेल्या कृष्णभक्तीचेच ते फळ होते, हेच खरे. कृष्णाची ती द्रौपदीवरील कृपाच होती हे तुझ्या लक्षात आले आहे ना? मग त्याचाच विचार अधिकतेने कर आणि त्याचाच ठसा तुझ्यावर पूर्णपणे ठसवून घे. अर्थात याला द्रौपदीवर कोसळलेल्या अतीव दुःखाची पार्श्वभूमी आहे आणि ती आपल्याला विसरता येणे शक्यच नाही. त्या बिचारीच्या तर अब्रूवरतीच घाला पडण्याची वेळ आली होती आणि एका स्त्रीच्या दृष्टीने तिच्या अब्रूपेक्षा मूल्यवान अशी कोणती गोष्ट असू शकते बरे? बेअब्रूचे जीवन हे तिच्यासाठी प्रत्यक्ष मृत्यूपेक्षाही भयंकर आहे. परंतु तशा कठीण व प्रतिकूल परिस्थितीलाही द्रौपदीने शेवटपर्यंत अत्यंत धैर्याने तोंड दिले, हीच गोष्ट महत्त्वाची आहे आणि त्यामागील कारणही द्रौपदीच्याठायी



असलेली कृष्णावरील अलोट श्रद्धा व विश्वास हेच आहे. म्हणूनच द्रौपदीवरील कठीण प्रसंगात प्रत्यक्ष काय व कसे घडले याचप्रमाणे त्या प्रसंगातून शेवटी निष्पन्न काय निघाले याचाही विचार करणे, तेवढेच आवश्यक आहे. खरे तर, तोच विचार करणे अधिक योग्य आहे. कारण तो विचार पूर्णपणे होकारात्मक आहे. होय की नाही?”

नारदाचे बोलणे ऐकत असताना लक्ष्मीचे मन हळूहळू सावरले जात होते आणि शांत होत होते. नेत्रांतून वहाणाऱ्या अश्रूधाराही लक्ष्मीने प्रयत्नपूर्वक आवरल्या. मन स्वस्थ होण्यासाठी तिने थोडा वेळ जाऊ दिला आणि शेवटी धीर करून तिने बोलावयास सुरूवात केली.

“नारदा, तुझे म्हणणे अगदी खरे आहे. द्रौपदीवर गुदरलेल्या दुःखद प्रसंगाने मी जास्तच हादरून गेले होते. कारण दुःख म्हटले तरी त्यालासुद्धा काहीतरी मर्यादा असतेच ना? पण द्रौपदीवरील या प्रसंगात त्या दुःखाची तर परिसीमाच झाली. भर सभेत सर्व लोकांच्या डोळयादेखत एखाद्या स्त्रीवर असा भीषण प्रसंग ओढवणे, यासारखी दुसरी घृणास्पद गोष्टच नाही आणि तेही त्या स्त्रीचे एक नाही, दोन नाही तर अगदी पाच पती तेथे हजर असताना असे घडले, हे तर अत्यंत लज्जास्पदच आहे. असे पुरूषार्थहीन पती त्या स्त्रीचे केवळ कुंकवाचे धनीच ठरले की! आणि ते पती कोण, तर अत्यंत पराक्रमी असे पांडव की ज्यामध्ये भीमासारखा बलाढ्य गदायोद्धा आणि अर्जुनासारखा सव्यसाची धनुर्धर होता. या गोष्टीचे मला केवळ वाईटच वाटत नाही तर मला त्याची अत्यंत चीडच येत आहे. माझ्या मनाचा तर नुसता संतापच होऊन राहिलेला आहे. आपल्या पत्नीच्या शीलाचे रक्षण करण्याचा साधा प्रयत्नही ज्यांच्याकडून घडत नाही, त्यांना पुरूष म्हणणेही माझ्या अगदी जीवावर येते आहे. हे तर पुरूष आहेत फक्त बाह्यांगाच्या देहानेच, पण खरे तर ते पूर्णतः नामर्दच आहेत. कारण पराक्रमी असूनही कोणत्यातरी काल्पनिक धर्माचा बाऊ करून ते त्याच्या बंधनात अडकून बसले होते. द्युत काय, द्युताचा खेळ काय, त्यामध्ये हरणे काय? या सर्व गोष्टी त्यांच्या पत्नीच्या अब्रूपुढे क्षुल्लकच नाहीत का? पण सर्व पांडवांवर त्याचीच मात व्हावी आणि माना खाली घालून त्यांनी स्वस्थ बसावे म्हणजे काय? बाकीच्या पांडवांना एक वेळ क्षमा करता येईल. पण अर्जुनाला क्षमा करता येणे शक्यच नाही. त्याची जबाबदारी अर्थातच जास्त होती. त्यामध्ये तो एवढा कमी पडला की जागेवरून धड उठलासुद्धा नाही. मग पुढे होऊन द्रौपदीच्या मदतीसाठी धावणे हे तर दूरच राहिले. स्वतःला कृष्णाचा मित्र म्हणवून घेणारा हा अर्जुनही शेवटी सामान्य मातीचाच घडलेला होता हे सिद्ध झाले. द्रौपदीवरचे त्याचे प्रेम म्हणजे तर केवळ पोकळ भाषाच होती, असेच म्हणावे लागेल. अशा या

अर्जुनाविषयी माझ्या मनात अत्यंत रागच भरून राहिलेला आहे. बिचारी द्रौपदी! सर्वांनीच तिला असे एकटे पाडले असताना तिच्या पतींनी, अगदी अर्जुनानेही तिला साथ दिली नाही याचेच दुःख मला जास्त वाटत आहे आणि मला अगदी खात्री आहे की द्रौपदीलाही त्यावेळी त्याचेच दुःख जास्त झाले असणार.

नारदा, शेवटी ज्यावेळेस द्रौपदी पूर्णपणे हवालदिल झाली आणि कृष्णाचा धावा करू लागली तेव्हा मात्र मला तिची अत्यंत दयाच आली. प्रत्यक्ष कृष्ण तेथे हजर नव्हता आणि द्रौपदी जीवाच्या आकांताने कृष्णाच्या नावाने त्याला हाका मारत होती. मला तर क्षणभर असेच वाटले की निश्चित काहीतरी चमत्कार होणार आणि कृष्ण तेथे प्रगट होऊन द्रौपदीची त्वरित सुटका करणार. अर्थात असे बाह्यांगाचे काल्पनिक चमत्कार घडू शकत नाहीत ही गोष्ट मीही जाणून आहे. पण माझ्या वेड्या मनाला क्षणभर तसे वाटले खरे आणि मला नक्की खात्री आहे की द्रौपदीच्या मनातही त्यावेळेस तसेच आले असणार. ‘काहीतरी चमत्कार घडेल आणि कृष्ण असेल तेथून धावून येऊन तिला वाचवेल’ अशी आशा द्रौपदीच्या मनात निर्माण झाली असेल तर त्यात तिला अजिबात दोष देता येणार नाही. पूर्णपणे असहाय्य व अगतिक अवस्थेत मनाने काहीतरी आधार शोधण्याचा प्रयत्न करणे अगदी साहजिकच आहे ना? द्रौपदीच्या जागी दुसरी कोणीही व्यक्ती असती तर तिनेही काहीतरी चमत्काराची अपेक्षा केलीच असती. कारण एखादा चमत्कारच द्रौपदीला त्या संकटातून सोडवू शकला असता. पण जे झाले तेही एखाद्या चमत्कारासारखेच झाले की! अनपेक्षितरित्या व अचानकपणे एकदम भीष्म मध्ये पडले आणि एका क्षणात त्यांनी द्रौपदीची सुटका करून सर्व चित्रच पालटून टाकले. द्रौपदीच्या अंगावरती स्वतःचा शेला ठेवून भीष्मांनी प्रथम ताबडतोब तिचे जे लज्जारक्षण केले, तो प्रसंग तर मला अत्यंत भावपूर्णच जाणवतो. स्त्रीची लज्जा व शील यांच्या रक्षणाची जबाबदारी पुरूषांवरतीच आहे आणि तोच पुरूषार्थ जेव्हा भीष्मांकडून प्रगट झाला तेव्हा तर माझे अंतःकरण अगदी भरूनच आले.

नारदा, द्रौपदीने कृष्णासाठी केलेली आळवणी जणू त्याच्यापर्यंत पोहोचली आणि जणूकाही कृष्णच भीष्मांच्या रूपाने द्रौपदीला पावला असेच मला वाटते. परंतु एवढ्या भर सभेत भीष्मच का उभे राहिले याचे मात्र माझ्या मनाला कोडे पडत आहे. त्याचबरोबर भीष्मांनाही मध्ये पडण्यासाठी एवढा वेळ का लागला, हाही प्रश्न माझ्या मनात उभा राहिलाच आहे. कारण तेवढ्या वेळेपर्यंत द्रौपदीला ज्या मानहानीला व अवहेलनेला तोंड द्यावे लागले त्याची भर कशानेच होऊ शकणार नाही. मागच्या वेळच्या प्रसंगात विदूर सत्त्वशील वृत्तीने पांडवांच्या बाजूने उभा राहिला होता आणि त्याने धृतराष्ट्रालाही पांडवांच्या बाजूने निर्णय द्यायला



भाग पाडले होते. परंतु या वेळचा प्रसंग अधिकच गंभीर होता. धर्मराज द्युतामध्ये केवळ त्याचे सर्वस्वच हरला नव्हता तर तो स्वतःसकट सर्व पांडवांना आणि अगदी द्रौपदीलाही हरवून बसला होता. एवढेच नव्हे, तर त्या गोष्टीचा गैरफायदा उठवून दुर्योधनाने भर दरबारात जाहीरपणे दुःशासनाकरवी द्रौपदीच्या अब्रूवरच घाला घातला होता. या वेळेस मात्र विदूर काहीच करू शकला नाही. परंतु खरोखरीच एखादा चमत्कार घडावा तसे भीष्म त्या कठीण प्रसंगात उभे राहिले आणि त्यांनी अत्यंत समर्थपणे व अगदी सहजतेने द्रौपदीला रक्षण दिले. त्याहीपेक्षा भीष्मांनी जेव्हा स्वतः द्रौपदीला अंतःपुराच्या द्वारापर्यंत नेऊन पोचवले तेव्हा भीष्मांची जी उदात्तता प्रगट झाली, त्याला तर तोडच नाही. त्यावरून माझ्या एक गोष्ट लक्षात आली की भीष्म केवळ पराक्रमीच नव्हते तर ते एक अत्यंत थोर व्यक्तीच असले पाहिजेत. नारदा, मला वाटते मागे एकदा बोलताना तू भीष्मांचा थोडासा व ओझरता उल्लेख केला होतास. परंतु आता त्यांच्याविषयी अधिक जाणून घेण्याची आतुरता माझ्याठायी निर्माण झालेली आहे. मला असे खात्रीपूर्वक वाटते की तूही भीष्मांविषयी सांगण्यासाठी तेवढाच उत्सुक असावास, होय ना?”

नारदाने मंदस्मित करून मान डोलवली. खरे तर द्रौपदीवरील प्रसंगाचे वर्णन करताना नारदही अत्यंत भावूकच झाला होता. पण भीष्मांचा उल्लेख करताना त्याचा चेहरा विशेषत्वाने उजळला होता. त्याचे कारणही नारदाला ठाऊक होते आणि ते सांगण्याचा भाव त्याच्या अंतरातही दाटलेलाच होता. त्यामुळे लक्ष्मीने जेव्हा भीष्मांविषयीचा नेमका प्रश्न विचारला तेव्हा नारदही थोडासा उत्तेजितच झाला आणि त्याने उत्साहाने बोलावयास सुरुवात केली.

“हे लक्ष्मी, दुर्योधनाच्या आज्ञेने व प्रेरणेने जे अश्लाघ्य कृत्य दुःशासनाने केले त्यातून त्या दोघांचाही अधमपणाच प्रगट झाला हे निश्चित. त्यांनी तर पापकर्माचीही परिसीमाच गाठली. त्याविषयी जास्त व पुन्हा पुन्हा बोलणे म्हणजे स्वतःच्या हाताने चिखल चिवडीत बसण्यासारखेच आहे. त्यातून स्वतःचेच हात घाणीने बरबटण्याशिवाय दुसरे काय निष्पन्न होणार आहे बरे? तेव्हा त्याविषयी काही बोलून आपली वाचा विटाळण्याचे मुळीच कारण नाही. बरे, धर्मराज, इतर पांडव व अगदी अर्जुनाच्या सुद्धा वागण्याचे विश्लेषण करीत रहावे तर त्यातूनही पुन्हा तेच निष्पन्न निघणार जे आता आपल्याला माहीत झालेलेच आहे. धर्मराजाच्या सज्जनपणातही असलेली दोषास्पदता, कर्तव्यकर्माच्या काल्पनिक ओझ्यामुळे दुर्बल झालेले अर्जुनाचे मन आणि परिस्थितीपुढे अगतिक झालेले इतर सर्व पांडव याशिवाय दुसरा काहीच निष्कर्ष निघू शकत नाही. तेव्हा तोच तोच निष्कर्ष पुन्हा पुन्हा काढीत बसण्यामध्ये काहीच अर्थ नाही.

लक्ष्मी, या घडणाऱ्या ‘महाभारता’तील सगुणप्रेमभक्तीचे माहात्म्य प्रगट करणारे जे ‘भागवत’ आहे तेच खरे आनंददायी आहे. कारण त्यामध्येच ईश्वराच्या सगुणप्रेमाचा रस पूर्णपणे भरलेला आहे. बाकी सर्व केवळ नीरस म्हणूनच शुष्क व अगदी कोरडे आहे. या दृष्टीने या प्रसंगातील भीष्मांचे व्यक्तिमत्त्वच अधिक उठून व शोभून दिसले हे अगदी खरेच आहे आणि ते तेवढेच साहजिकही आहे. या भीष्मांविषयी माझ्या मागील बोलण्यात एखादेवेळेस मी ओझरता उल्लेख केलाही असेल. त्याचा तपशील आता तरी माझ्या लक्षात नाही. पण ते काहीही असो, आता मात्र त्यांच्याविषयी बोलणे आवश्यकच आहे. भर दरबारात जी गोष्ट करण्याचे धैर्य कोणालाच झाले नाही ती गोष्ट भीष्मांनी केली असेच केवळ म्हणण्यापेक्षा, त्यांच्याकडून ज्या सहजतेने व परिणामकारकरित्या घडली त्याचा विचार केला असता, म्हटले तर तो एक चमत्कारच होता. अशा चमत्कारसदृश घटना ईश्वरी सत्तेमध्ये केवळ ईश्वरभक्तांकडूनच घडतात. ईश्वराची शक्ती त्याच्या भक्तांच्या रूपानेच असते आणि त्यांच्याकडूनच ती शक्ती वेळप्रसंगी प्रगट होत असते. त्यामुळे ईश्वराचे अपेक्षित कार्य घडून जाते आणि त्या कार्याला निमित्त झाल्याचा आनंद मात्र, त्या निमित्तमात्र झालेल्या भक्तांच्याठायी कायमचा रहातो. अशी प्रसंगाद्वारे प्रगटलेली ईश्वरीलीला ही त्या भक्तांसाठी त्यांचा स्वानंद बाह्यांगाने अनुभवण्याचे कारण ठरते. कार्य संपते व त्याचे कारणही बाजूला होते. ते भक्त पुन्हा त्यांच्या आत्मानंदात रममाण होतात आणि त्यांच्या अंतःकरणात स्थापित झालेल्या ईश्वराच्या सगुणमूर्तीच्या प्रेमामध्ये पूर्णपणे बुडून रहातात.

* * * * *



# कृष्णभक्त भीष्म

हे लक्ष्मी, भीष्मांनी आजन्म ब्रम्हचारी राहून आणि राज्यासनाचा त्याग करून, कुरूकुळाची एक सेवक या नात्याने, सेवा व रक्षण करण्याची प्रतिज्ञाच केलेली होती आणि त्याचे पालन ते एखाद्या व्रतासारखेच करीत असत. त्यांनी अंगिकारलेले जीवन ही जणू त्यांची एक तपस्याच होती आणि त्यासाठी लागणारे धैर्य व पराक्रम त्यांच्याठायी अत्यंत प्रबळ होते. अशा तपस्वी जीवनामुळेच भीष्मांच्याठायी तेजस्विता निर्माण झालेली होती आणि त्यामुळेच सर्वांना त्यांच्याविषयी आदर व एक प्रकारचा धाकही वाटत असे. त्यांच्यापुढे मान वर करून बोलण्याची कोणाचीच हिंमत होत नसे आणि त्यांच्या कृतीला व शब्दाला मान देऊन तो अंतिमच मानला जात असे. परंतु 'प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष राज्य करणार नाही वा त्याची इच्छाही करणार नाही' असे वचन भीष्मांनी त्यांच्या पित्याला दिले होते आणि त्यानुसार भीष्म प्रत्यक्ष राज्यकारभारात काहीच सहभाग घेत नसत किंवा दरबारातही विचारल्याशिवाय काही सल्लाही देत नसत. भीष्म हे एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणे जीवनात घडणाऱ्या सर्व गोष्टी वेगळेपणाने व शांतपणाने पहात असत. त्यासंबंधीची प्रतिक्रियाही त्यांच्याकडून आपणहून अशी कधीच व्यक्त होत नसे. बाह्यांगाने असे अत्यंत तेजस्वी असलेले जीवन जगण्याचे आत्मबळ भीष्मांच्याठायी होते. त्यासाठी लागणारे आत्मज्ञान भीष्मांनी थोर अवतारी अशा साक्षात् परशुरामांना अनन्यभावे शरण जाऊन आणि त्यांचीच भक्तिभावाने सेवा करून प्राप्त करून घेतले होते. त्यामुळेच जीवनातील सर्व प्रसंगात शांत चित्ताने व समदृष्टीने राहून ते केवळ त्यांचे कर्तव्यकर्म, फळाची अपेक्षा न करता तटस्थपणे पार पाडत असत.

हे लक्ष्मी, परंतु या सर्व गोष्टींपेक्षाही एक अत्यंत महत्त्वाची व वरचढ अशी गोष्ट भीष्मांच्याठायी होती आणि ती म्हणजे त्यांच्याठिकाणी असलेला कृष्णाविषयीचा पराकोटीचा भक्तिभाव! आत्मज्ञानी असल्यामुळे भीष्म कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य पूर्णपणे जाणून होते आणि मुख्य म्हणजे त्यांच्याठिकाणी कृष्णाच्या अवतारकार्याचीही जाणीव होती. कृष्णाच्या सगुणरूपाचा व व्यक्तिमत्त्वाचा ठसा भीष्मांच्या अंतःकरणात पूर्णपणे ठसला होता आणि त्यांच्या अंतःकरणाच्याठायी कृष्णाचीच सगुणमूर्ती अधिष्ठित झालेली होती. भीष्मांच्या चित्तामध्ये नित्य कृष्णाचाच ध्यास असे आणि त्यांचे मनही सदैव कृष्णाच्या ध्यानातच असे. भीष्मांचा बाह्यांगाने कृष्णाशी सहवास तसा जवळ जवळ होतच नसे. परंतु ते अंतरंगात मात्र कृष्णाला त्यांच्या अत्यंत जवळ अनुभवीत असत आणि ते कृष्णप्रेमातच सदैव रंगलेले असत. आत्मज्ञानाच्या पूर्ण अवस्थेनंतरही, किंबहुना त्या

अवस्थेमुळेच, भीष्मांच्या अंतरातील कृष्णाच्या सगुणभक्तीची असलेली ही ओढ व आर्तताच त्यांना आत्मानंदाच्या अनुभवात ठेवीत असे. अशा तऱ्हेने 'आत्मज्ञान व सगुणभक्ती' ही एकमेकांना आवश्यक व पूरक असलेली भीष्मांच्या अंतःकरणातील अवस्था, हेच भीष्मांचे विशेषत्व होते आणि त्याचीच परिणती म्हणजे भीष्मांकडून उत्स्फूर्तपणे घडलेली ती आगळीवेगळी, पण अत्यंत यथायोग्य असलेली कृती होय.

हे लक्ष्मी, भीष्मांच्या अंतःकरणाची ही अवस्था जाणून घेतल्यावरतीच आता त्या घडलेल्या प्रसंगाकडे योग्य दृष्टीने पहाणे आपल्याला शक्य होईल आणि त्या प्रसंगातील भीष्मांच्या भूमिकेचा व त्यांच्याकडून घडलेल्या कृतीचा अन्वयार्थ व भावार्थ आपल्या पूर्णपणे लक्षात येईल. त्यासाठी आधी आपण द्रौपदीच्या अंगाने विचार करायला सुरुवात करूया. द्रौपदीच्याठायी कृष्णाविषयी आत्यंतिक प्रेम व श्रद्धा होती ही गोष्ट तर सत्यच आहे. त्याविषयी काहीही बोलण्याची आवश्यकताच नाही, एवढी ती गोष्ट सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट आहे. पण तरीही द्रौपदीच्याठायी अजूनही कृष्णाविषयी पूर्णपणे भक्तिभाव निर्माण झालेला होता, असे म्हणता येणार नाही. कारण अगतिक झालेल्या द्रौपदीने आधी मदतीची अपेक्षा तिच्या पतींकडून आणि विशेषतः अर्जुनाकडूनच धरली. तेथे पूर्ण निराशा झाल्यानंतर द्रौपदीने मग, धृतराष्ट्र व दरबारातील इतर मान्यवरांकडून मदतीची याचनाच सुरू केली. अर्थात यामध्ये द्रौपदीची काही चूक होती असेही म्हणता येणार नाही. कारण एखाद्या स्त्रीने तिच्या पतीकडून आधाराची अपेक्षा करणे किंवा राजा व राज्यकर्त्याकडून न्याय मागणे, हे तर अगदी साहजिकच आहे. परंतु पराक्रमी असले तरी कर्तव्यकर्माच्या खोट्या कल्पनेने दुर्बल झालेल्या पांडवांकडून किंवा मोहाने अंध झालेल्या नादान राज्यकर्त्यांकडून मदतीची अपेक्षा करणे, हे मुळातच चूक होते. कारण त्या खोट्या आशेचा जेव्हा भंग झाला तेव्हा द्रौपदी नैराश्याने पूर्णतः ग्रासून गेली आणि त्याचे ओझे पेलणे तिला कठीण होऊ लागले. त्याहीपेक्षा मुख्य गोष्ट म्हणजे तेवढा काळ फुकट गेला आणि त्यामुळे द्रौपदीवरील संकटाचा काळही उगाचच लांबला. तेवढा वेळ द्रौपदीला आत्यांतिक मानसिक क्लेश सहन करावे लागले. शेवटी द्रौपदीला जेव्हा कृष्णाचे स्मरण तीव्रतेने झाले आणि कृष्णाशिवाय कोणीही अन्य तिचा रक्षणकर्ता नाही असा तिचा अनन्यभाव झाला, तेव्हाच द्रौपदी पूर्णपणे आर्त झाली. द्रौपदीठायीच्या या आर्ततेतूनच तिच्याठायीचा कृष्णाविषयीचा भक्तिभाव उत्कट झाला आणि तिच्याकडून अत्यंत कळकळीने कृष्णाची आळवणी सुरू झाली. कृष्णाचा धावा करीत असताना तिच्या मुखातून शेवटी काहीच शब्द फुटेनासे झाले तरी 'कृष्णा, कृष्णा' एवढे शब्द मात्र तिच्या ओठातून सातत्याने व आर्ततेने बाहेर येत राहिले आणि तिचा भाव कृष्णापर्यंत पोहोचून पुढील अद्‌भूत चमत्कार घडला.



हे लक्ष्मी, कृष्ण त्यावेळेस त्या दरबारात हजर नव्हता ही वस्तुस्थिती आहे आणि कृष्ण काही आकाशमार्गाने वा वायूच्या वेगाने तेथे जाऊन पोहोचणे, हेही शक्यच नव्हते. कारण कृष्ण हा ईश्वरी अवतार असला तरी तो मानवरूपाने होता आणि त्यामुळे साहजिकच मानवी देहाच्या सर्व मर्यादाही त्याच्याठायी होत्याच. अर्थात भावनेच्या भरात संकटात सापडलेले दुःखग्रस्त जन तशी अपेक्षा करतातही. परंतु ईश्वरी नियतीला मान्य नसलेली ती गोष्ट घडणे कधीही शक्य नाही. ईश्वर ही शक्ती आहे आणि मानवी देहातील ईश्वरी शक्ती अंतःकरणाच्या पूर्ण शुद्ध अवस्थेमध्ये आहे. त्या अंतःकरणाठायीच आत्मबळ असते, कळवळा असतो, दया असते आणि प्रत्यक्ष कार्य करण्याची वृत्तीही असते. परंतु हे सर्व सुप्त अवस्थेमध्ये असते आणि काही कारणाने व निमित्तानेच ती अंतःकरणाची अवस्था प्रगट होऊन कार्यान्वित होते. अंतःकरणातील ईश्वरी अनुभवाची अवस्था प्रगट होण्याचे एकमेव निमित्तकारण म्हणजे, भक्तिभाव होय.

हे लक्ष्मी, ज्यावेळेस द्रौपदी कृष्णाची अत्यंत आर्ततेने आळवणी करीत होती त्यावेळेस काहीतरी चमत्कार घडावा आणि कृष्णाने प्रत्यक्ष धावून यावे असे तिलाही वाटले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण प्रसंगच असा होता की केवळ तिच्या भावबळाने ती त्या प्रसंगातून तरून जाणे शक्यच नव्हते, तर तिला बाह्यांगाच्या प्रत्यक्ष मदतीचीही नितांत जरूरी होती. नाही तर, त्या प्रसंगातून द्रौपदीची सुटका होणे कधीही शक्यच झाले नसते. अशा वेळी कृष्ण तेथे कोणाच्या तरी रूपानेच प्रगट होणे आवश्यक होते आणि कृष्ण हा तर त्याच्या भक्तांच्या रूपानेच नेहमी प्रगट असतो. कृष्णाचे अस्तित्व म्हणजे केवळ त्याचे रूप नव्हेच, तर कृष्ण म्हणजे त्याचे अंतःकरणच होय. कृष्णाविषयीच्या भक्तिभावाने जेव्हा त्याचा भक्त कृष्णाशी ऐक्य पावतो तेव्हा त्या भक्ताचे संपूर्ण अंतःकरणच कृष्णमय होऊन रहाते. त्यामुळे त्याचे अंतःकरणही कृष्णाच्या अंतःकरणासारखेच झालेले असते. द्रौपदीच्या परमभाग्याने कृष्णाचा एक परमभक्त त्या प्रसंगात त्या वेळेस, भीष्मांच्या रूपाने हजर होता. आत्मज्ञानी असलेले भीष्म सुरुवातीला जरी तटस्थ वृत्तीने बसलेले होते तरी जेव्हा द्रौपदीने कृष्णाचा धावा सुरू केला, तेव्हा तिची आर्तता भीष्मांच्या कृष्णमय झालेल्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोहोचली आणि द्रौपदीचा भाव कृष्णाला म्हणजेच भीष्मांच्या अंतःकरणाला तात्काळ पावलाच. मग एवढा वेळ स्वस्थ बसलेले भीष्म अचानक व अनपेक्षितरित्या त्यांच्या आसनावरून त्वरित उठले. सर्वप्रथम त्यांनी द्रौपदीचे लज्जारक्षण करून नंतर तिला सुखरूप व सुरक्षित स्थळी नेऊन पोहोचवले. दुःशासनाकडे केवळ नजरेचा एक तेजस्वी व तीव्र कटाक्ष टाकून त्याची रग व त्याचा मद तात्काळ उतरवला. दुःशासनाला तर भीष्मांकडे पहाण्याचेही धाडस झाले नाही आणि दुर्योधनही वरमला. परत एवढे करून भीष्म शांतपणे त्यांच्या आसनावर जाऊन स्वस्थ बसले.

त्यानंतर ना भीष्मांना काही बोलण्याची जरूरी वाटली ना कोणाला भीष्मांसमोर काही बोलण्याची हिंमत झाली.

हे लक्ष्मी, तुझ्या बोलण्यात विदुराचाही उल्लेख आलेला होता. त्यासंबंधीही जाणून घेणे आवश्यक आहे. विदुर हा सुद्धा कृष्णाचे माहात्म्य जाणून होता आणि तोही कृष्णाचा प्रेमीभक्त होता. नित्य कृष्णस्मरणात असलेला विदुर त्याच्या सात्त्विक स्वभावाने युक्त होता. परंतु विदुराला आत्मज्ञान झालेले नव्हते ही गोष्ट खरीच आहे. ईश्वरस्वरूपाचा बुद्धीच्याठायी निश्चय करून व चित्ताठायी त्याचा ध्यास धरून आत्मरूपाने असलेल्या ईश्वराची प्रत्यक्ष अनुभूती विदुराच्याठायी नव्हती. त्यामुळे विदुराकडून प्रत्यक्ष काही कृती होऊन द्रौपदीला मदत होणे शक्यच झाले नसते. मागील प्रसंगात त्याने योग्य वचने प्रगट करून धृतराष्ट्राचे मन कौशल्याने वळवले होते. परंतु यावेळेस प्रत्यक्ष मदतीची जरूरी होती आणि विदुर तर स्वतःच असहाय्य होऊन राहिल्यामुळे तोही स्वस्थ बसून रहाण्यापलिकडे दुसरे काहीही करू शकत नव्हता. भक्तिभावानेही पराक्रम घडण्यासाठी आत्मज्ञानाच्या तेजाची आवश्यकता असतेच. ते आत्मतेज भीष्मांच्याठायी होतेच आणि त्याला कृष्णाच्या भक्तीचीही जोड होती. त्यामुळेच कृष्ण ज्याच्या रूपाने प्रगट व्हावा अशा अवस्थेतील एकच व्यक्ती तेथे होती आणि ती म्हणजे कृष्णाचे परमभक्त भीष्म होत. भीष्मांच्या अंतरातील कृष्ण तसा प्रगट झालाही आणि भक्तरक्षणाचे त्याचे कार्यही घडून राहिले.”

बोलता बोलता नारदाचे लक्ष लक्ष्मीकडे गेले असता तिच्या मुखावरील प्रश्नार्थक भाव नारदाच्या लक्षात आले आणि नारद बोलायचा थांबला. ‘बोलावे की न बोलावे’ अशा मनाच्या द्विधा स्थितीत असलेल्या लक्ष्मीने शेवटी मनाचा निश्चय केला आणि बोलावयास सुरुवात केली.

“नारदा, मला माहीत आहे की जसे प्रत्येक प्रश्नाला उत्तर आहे तसेच काही वेळेला त्या प्रश्नाच्या उत्तरातूनही काही प्रश्न निर्माण होऊ शकतात. अर्थात ही गोष्ट माझ्यापेक्षा तूच अधिक जाणून आहेस. कारण माझ्याप्रमाणे तुझाही तो अनुभव असणारच. मनाच्या अशा या प्रश्नोत्तर अवस्थेमुळेच मनाकडून संवाद घडतो. त्यामुळे प्रतिपाद्य विषयातील गूज अधिकाधिक स्पष्ट होत रहाते आणि विषयातील गाभा मनामध्ये ठसत रहातो. त्यातूनच मग मनाचा निश्चयही दृढ होत रहातो. आपला विषय तर एकीएक नारायणाच्या सगुण प्रेमभक्तीचे माहात्म्य हाच होऊन राहिलेला आहे. त्यामुळे त्याविषयी जेवढे अधिक बोलणे व संवाद होईल तेवढी ती गोष्ट माझ्यासाठी चांगलीच आहे. कारण त्यामुळेच माझे मन अधिकाधिक खुलत राहील आणि त्यामध्ये सगुणभक्तीचे माहात्म्य अधिकाधिक शिरत राहील.



नारदा, तू भीष्मांच्या कृष्णभक्तीविषयी थोडक्यात उल्लेख केलास. त्यांच्याकडून द्रौपदीसाठी घडलेल्या आणि एखाद्या चमत्काराप्रमाणेच जाणवलेल्या पराक्रमाविषयी तू जेव्हा सांगितलेस तेव्हा मलाही अत्यंत सुखद असा धक्काच बसला. तसे म्हटले तर भीष्मांकडून घडलेली कृती तशी लहानच होती. परंतु त्यांच्या त्या समयोचित व उत्स्फूर्त कृतीनेच द्रौपदीवरचे अत्यंत कठीण असे संकट, एका क्षणात कुठच्याकुठे लयाला गेले. त्याहीपेक्षा भीष्मांच्या कृतीतून त्यांची जी तेजस्विता व्यक्त झाली तीच माझ्या दृष्टीने जास्त लक्षणीय आहे. भीष्मांच्या आत्मशक्तीचेच ते तेज होते हे रहस्यही तू प्रगट केलेस. त्यामुळे मला भीष्मांची थोरवी निश्चितच लक्षात आली. परंतु भीष्मांचे विशेषत्व सांगताना तू सहजपणे बोलून गेलास की भीष्म हे कृष्णाचे परमभक्त होते. ते ऐकल्यावर मात्र मी थोडीशी चकितच झाले आणि साहजिकच माझ्या मनात प्रश्न येऊ लागले. ‘कृष्णाचे भक्त व्हायचे तर कृष्णाची प्रत्यक्ष भक्ती घडणे आवश्यक आहे. कृष्णाची भक्ती घडायची तर कृष्णाविषयी अंतरात त्याच्या माहात्म्याची जाणीव हवी आणि मनात त्याच्याविषयी अपरंपार प्रेमही!’ एकवेळ कृष्णाचे माहात्म्य ऐकून माहीत असणे शक्य आहे. पण त्या माहात्म्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय ते स्वतः जाणता येणे शक्यच नाही आणि मनात कृष्णप्रेम निर्माण होण्यासाठी कृष्णाचे प्रेम केवढेतरी प्रत्यक्ष अनुभवणे आवश्यक आहे. असा प्रेमाचा अनुभव येण्यासाठी कृष्णाचा प्रत्यक्ष सहवास व अंगसंगच घडावयास हवा. कारण तरच ते शक्य आहे. संधी साधून सहवास करावयास हवा आणि सहवासातच संधी साधून प्रेम अनुभवले पाहिजे.

हे सर्व जर खरे आहे तर मग प्रश्न असा निर्माण होतो की असा कृष्णाचा प्रत्यक्ष सहवास त्या भीष्मांनी केला तरी केव्हा आणि कसा? कारण तुझ्या सांगण्यावरून तर मला असे जाणवते की भीष्म कृष्णापेक्षा वयाने फार मोठेच होते. तू सांगितलेल्या आतापर्यंतच्या कृष्णचरित्रात भीष्मांचा व कृष्णाचा कधी काही संबंध आल्याचा उल्लेखही आलेला नाही. तेव्हा कृष्णाचे प्रत्यक्ष प्रेम न अनुभवताच भीष्मांच्याठायी कृष्णाविषयी एवढा भक्तिभाव कसा काय निर्माण झाला? भीष्मांना जरी कृष्णाचे माहात्म्य जाणवले असले तरी भक्तिभाव निर्माण होण्यासाठी ते कारण पुरेसे आहे का? त्या माहात्म्याच्या जाणिवेला सगुण प्रेमाची जोड आवश्यक आहेच ना? असे असतानाही भीष्म हे कृष्णाची भक्ती कशी करत होते आणि त्यांचा भक्तिभाव कृष्णापर्यंत कसा पोहोचत होता बरे? कारण कृष्णापर्यंत भक्तिभाव जाऊन व पावून त्याला आनंदीत करणे हेच तर कृष्णभक्तीचे एकमेव लक्षण आहे ना? पण ज्या अर्थी तू भीष्मांचा उल्लेख ‘कृष्णाचे परमभक्त’

असा केलास त्याअर्थी हे सर्व घडत असले पाहिजे हे निश्चित. आता एकच प्रश्न शिल्लक रहातो की हे सर्व कसे घडले? अर्थात असे घडले असणार हे निश्चित. पण कसे घडले ते तू मला सांग. माझी आतुरता तर वाढून अगदी पराकोटीची होऊन राहिली आहे."

लक्ष्मीची आतुरता पाहून नारदही उत्तेजित झाला आणि बोलण्यासाठी थोडासा पुढे सरसावला.

"लक्ष्मी, तुझी विचार करण्याची दिशा अत्यंत योग्यच आहे आणि त्याचेच मला कौतुक वाटते. कारण श्रवण करताना मनाला योग्य दिशेने विचार करायला लावणे आणि विचारांची योग्य दिशा राखणे अत्यंत आवश्यक असते. नाहीतर, एका विचारातून दुसरा विचार आणि दुसऱ्या विचारातून तिसरा विचार असे होता होता मनात विचारांचा एक गुंताच निर्माण होऊन त्या गुंत्यात मन केव्हा अडकून रहाते, हे लक्षातच येत नाही. असे स्वतःच्याच विचारात गुंतलेले मन मग त्याच्या नकळतच श्रवणाच्या मुख्य विषयापासून केवढे तरी दूर जाते आणि श्रवणाचा आनंद घेण्यापेक्षा मनातील कल्पनेच्या सुखातच रमून जाते. परंतु तुझ्याकडून मात्र खऱ्या अर्थाने श्रवणभक्ती घडत असल्यामुळे श्रवण करताना तू मनातून सहजपणाने सावधही असतेस. त्यामुळे मनात प्रश्न निर्माण होणेही साहजिकच आहे. पण तुझे प्रश्न केवळ काल्पनिक किंवा चिकित्सकही नाहीत, तर तुझे प्रश्न हे तुझ्या श्रवणभक्तीतील अडथळा दूर करण्यासाठी आहेत. म्हणूनच त्या प्रश्नांना उत्तरांच्या द्वारा तुझ्या मनातून त्वरित हटवणे अत्यंत आवश्यक आहे. अर्थात तुझ्या प्रश्नांचे उत्तर देण्याच्या निमित्ताने ईश्वराच्या भक्तीचे आणखीन एक विशेष अंग प्रगट होणार आहे आणि तेच माझ्या आनंदाचे निमित्तकारण होणार आहे.

हे लक्ष्मी, मुळात भक्तीची व्याख्या 'जेथे मुळीच विभक्ती नाही ती भक्ती' अशीच आहे. त्याचाच अर्थ भक्ती म्हणजे पूर्ण व नित्याचे ऐक्य. असा भक्तिभाव हा केवळ ईश्वराविषयीच संभवतो आणि म्हणून तो फक्त ईश्वराशीच निगडीत आहे. त्यामुळे ईश्वराची भक्ती म्हणजे त्या ईश्वराशीच संपूर्ण ऐक्य होय. सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी आत्म्याच्या रूपाने असलेल्या अंशात्मक ईश्वराचे ज्ञान ज्याला झाले आणि त्या ज्ञानाचा निश्चय ज्याच्या बुद्धीच्याठायी झाला त्याला त्याच्या स्वतःच्याठायीच्या ईश्वराचीही जाण येते. त्या निश्चयातूनच त्या ईश्वराची भेट घ्यावी, म्हणजेच स्वतःठायीच्या ईश्वराशी ऐक्य पावावे आणि त्याच्याशी कायमचे एकरूप होऊन रहावे असा ध्यासच चित्ताठायी निर्माण होतो. ईश्वराशी ऐक्य पावण्याच्या या ध्यासालाच भक्तिभाव असे म्हटले जाते. कारण त्यामध्ये ईश्वराशी असलेली विभक्तता पूर्णतः व कायमची दूर करण्यासाठीची आर्तता असते. या



आर्ततेमुळेच ईश्वराशी ऐक्य पावण्यामधील सर्व आंतरिक अडथळे दूर होतात आणि सर्व विभक्तता दूर होऊन ईश्वराशी ऐक्य साधल्याचा अनुभव घेता येतो. ईश्वराशी एकरूपता झाली तरी हा अनुभव मानव देहातील असल्यामुळे देहाचे बाह्य वेगळेपण शिल्लक रहाते खरे, पण ते केवळ बाह्यांगाचेच असते. मानवी देहातील ईश्वराचे अस्तित्व हे चैतन्यरूप आहे आणि देहामध्ये हे ईश्वरी चैतन्य नित्य स्फुरत असते. त्यालाच मानवी देहातील प्राण असे म्हणतात. हे चैतन्य जसे अचानकपणे व अकारण स्फुरायला लागलेले असते तसेच ते तेवढ्याच अचानकपणे व अकारण स्फुरायचे थांबतेही. देहातील स्फुरणाऱ्या या चैतन्यामुळेच श्वासाश्वासाबरोबर भक्ती-विभक्तीचा अनुभव येत रहातो. श्वासामुळे विभक्ती तर उच्छवासामुळे भक्ती असा हा चैतन्याचा खेळ चालूच असतो. अंतःकरणामध्ये चालू असलेला हा सहजसुंदर खेळ अत्यंत आनंददायी असतो. त्या खेळामध्ये रमता रमताच स्वानंद सुखाचा अनुभव येत रहातो.

हे लक्ष्मी, ईश्वराशी ऐक्य पावण्याचे व एकरूपतेचा आनंद नित्य नाविन्याने अनुभवण्याचे हे वर्णन जरी केवळ तात्त्विक व शाब्दिक वाटत असले, तरी अरूप व निराकार अशा त्या अनुभवाला शब्दरूपाने साकार करण्याचा हा केवळ अल्पसा प्रयत्न आहे. त्यामुळे मुळात शब्दातीत असलेल्या त्या अनुभवाचे वर्णन करण्यासाठी मर्यादा या येणारच, ही गोष्ट मात्र नीट लक्षात ठेव. शब्द हे केवळ निर्देशच करतात हे एकदा कळले की मग शब्दांकनामध्ये गुंतून न रहाता, पण त्या शब्दांचा आधार घेऊनच शब्दांतील गाभ्याकडे म्हणजे भावाकडे लक्ष वेधले जाईल. हे सर्व सांगण्यातील मुख्य मुद्दा हाच आहे की भक्तिभावाची निर्मिती ही चित्ताच्याठायी आहे तर एकरूपतेचा अनुभव हृदयाच्याठायी आहे आणि एकरूपतेच्या अनुभवातूनही भक्तिभाव हा चित्ताठायी नित्य स्फुरतच असतो. असा चित्ताठायी ध्यास लागण्यासाठी बुद्धीठायी आत्मज्ञानाचा निश्चय व त्याहीआधी मनाच्याठायी संसारभावातून पूर्णपणे विरक्ती ही अत्यंत आवश्यक आहे. मनाठायी संसाराची पूर्ण विरक्तता असल्यावरतीच बुद्धीच्याठायी आत्मज्ञानाचा निश्चय होणे शक्य आहे. प्रश्न असा आहे की आधी मन की आधी बुद्धी?

हे लक्ष्मी, मनाचे वैराग्य हा एक मोठा गूढ विषयच आहे आणि त्याला कारण म्हणजे मन हेच एक मोठे गूढ आहे. खरे तर, संसाराचा नाशिवंतपणा व सांसारिक सुखाचा फोलपणा जाणवून मनाला संसाराची विरक्ती सहजपणे यावयास हवी. संसारात सुखप्राप्तीसाठी अतिशय धडपड करूनही प्रत्यक्ष अनुभव मात्र अनन्वित दुःखाचाच येतो हे स्वानुभवाने कळूनही, मनातून संसाराची आशा नाहीशी होत नाही आणि सांसारिक विचार, कर्मे व त्यांची फळे यामध्येच गुरफटून गेलेले मन संसाराच्या मोहात कायमचे गुंतून रहाते. त्यामुळे शब्दाने कितीही ईश्वराचे ज्ञान

जरी झाले तरी मन मात्र संसाराचाच अनुभव घेत रहाते. ईश्वरभेटीचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा हा विचारही मनाच्या ठिकाणी शिरूच शकत नाही. मग तसा निश्चय होणे हे तर दूरच राहिले. अशावेळी ईश्वराचे सगुण रूप व चरित्र हेच त्या मनाला आकर्षित करू शकते. ईश्वरी अनुभवाने युक्त असणारे महापुरूष जर अत्यंत भाग्याने भेटले, तर मात्र त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व जीवनाचा प्रभाव सामान्य जीवांच्या मनावर होऊ शकतो. त्या महापुरूषांच्या अंतःकरणापासून प्रगटणाऱ्या ईश्वरी प्रेमाचा लाभ त्यांच्या सहवासात आलेल्या सर्वच जीवांना मिळत असतो. त्या प्रेमाचा झालेला सुखद स्पर्श मनाला सुखवून शांत करतो. मन हळूहळू त्या महात्म्यांच्या चरणी स्थिर होते आणि त्यांच्याकडून नित्य व सहजपणे प्रगट होत असलेले ईश्वराचे माहात्म्य त्या मनाला कळू लागते. मनाचा हळूहळू तसा निश्चयही होतो आणि मन संसारापासून थोडे थोडे विन्मुख होऊ लागते.

हे लक्ष्मी, अशा प्रेमळ महात्म्यांचा सहवास मग मनाला अधिकाधिक आवडू लागतो आणि मन त्यांच्याठायीच जडू लागते. त्यातूनच त्या महात्म्यांचा नित्य सहवास व सेवाही घडू लागते आणि त्यांच्या अंतःकरणाशी जवळीकता साधण्याची संधी मिळते. या जवळीकतेतूनच त्या महात्म्यांशी घनिष्ट प्रेमाचे संबंध निर्माण होतात आणि या संबंधाचीच परिणती म्हणजे, मनाठायी ईश्वरी प्रेमाचे मूळ धरले जाते. मनात निर्माण झालेल्या त्या ईश्वरी प्रेमाच्या अनुभवाने ईश्वरी माहात्म्याचा निश्चय व्हायला जराही वेळ लागत नाही आणि त्या प्रेमाचा नित्य अनुभव घेण्याचा ध्यास त्या चित्ताठायी केव्हा लागतो, हे वेगळेपणाने सांगताही येत नाही. हाच तो प्रेमातून निर्माण झालेला भक्तिभाव होय, ज्यामध्ये ईश्वराची प्रेमभेटी कायमची व्हावी अशी आर्तता असते. या आर्ततेची पूर्तता ईश्वराच्या सगुण भक्तीने होते आणि ईश्वर नित्य भेटीसाठी हृदयांतरी आल्याची खूण कळते. ईश्वराच्या त्या प्रेमभेटीतून येणाऱ्या आनंदाच्या नित्य अनुभवातून हृदयातील ईश्वराच्या अस्तित्वाची खात्री पटते. मग त्या आनंदाच्या अनुभवानेच जीवन सहजपणे जगले जाते आणि जीवन हे त्या सर्वश्रेष्ठ आनंदाच्या अनुभवाचे केवळ माध्यम होऊन रहाते.

हे लक्ष्मी, परंतु भीष्मांची गोष्टच वेगळी होती. त्यांचे जीवन हे पहिल्यापासून सर्वसामान्यांसारखे नव्हतेच. पित्याच्या सुखासाठी व कुरूकुळाच्या हितासाठी त्यांनी भर तारूण्यातच, आजन्म ब्रम्हचर्याचे पालन करण्याची प्रतिज्ञा केली होती. खुद्द पित्याच्या ठायीच सांसारिक सुखाच्या वासनेची झालेली मात पाहून, त्यांच्या मनामध्ये एकंदर संसाराविषयीच वैराग्य निर्माण झाले आणि त्यामुळे सांसारिक मोह हे त्यांच्या मनाला कधीही स्पर्शसुद्धा करू शकले नाहीत. भीष्मांच्याठायी असलेल्या जन्मजात पराक्रमामुळे त्यांनी नेहमीच कुरूकुळाचे रक्षण करून प्रत्येक युद्धात जयही प्राप्त करून दिला. असे असतानाच भाग्यवशात भीष्मांची गाठ साक्षात् परशुरामांशी पडली. परशुराम त्यांचे अवतारकार्य पूर्ण करून एकांतवासात




रहात होते. परशुरामांठायी असलेला सात्त्विक तेज व शांती यांचा संयोग पाहून भीष्म अत्यंत प्रभावित झाले आणि ते अनन्यभावाने परशुरामांना शरण गेले. परशुरामांच्या आश्रमात राहून भीष्मांनी त्यांचा दीर्घकाळ सहवास व सेवा केली असता परशुरामांनी संतुष्ट होऊन भीष्मांवर अनुग्रह केला आणि भीष्मांना सर्वश्रेष्ठ असे ईश्वराचे आत्मज्ञान देऊन त्यांना धन्यच केले. वैराग्यातून झालेल्या शुद्ध मनामुळे त्या आत्मज्ञानाचा निश्चय भीष्मांच्या बुद्धीठायीही तात्काळ झाला आणि त्यांच्या चित्तामध्ये आत्मप्राप्तीचा ध्यासच निर्माण झाला. त्या ध्यासामुळेच भीष्मांकडून सद्‌गुरूभक्ती घडली आणि भीष्मांच्या हृदयात नित्य स्फुरत असलेल्या ईश्वरी अस्तित्वाची जागृती त्यांच्याठायी निर्माण झाली. या जागृतीतूनच भीष्मांना त्यांच्याठायीच्या ईश्वराची प्रचिती आली आणि हृदयातील ईश्वराचे अस्तित्व हा त्यांचा कायमचा स्वानुभव होऊन राहिला.

हे लक्ष्मी, मानव देहातील आत्मस्वरूप हे प्रेमस्वरूप अवस्थेत असल्यामुळे भीष्मांचे मन हे एकांतात असताना, आत्मप्रेमात रमलेले असे. अर्थात भीष्मांच्या बाह्य जीवनात ते अत्यंत कार्यरत असल्यामुळे जरी त्यांना एकांत कमीच मिळत असला, तरी एकांत मिळाल्यावर त्यांचे मन बाह्य जीवनापासून त्वरित अलग होत असे आणि क्षणार्धात आत्मप्रेमात रमून जात असे. त्यांच्या चित्ताठायी आत्मभेटीचा सततचा ध्यास असल्याचेच ते लक्षण होते. आत्मानुभवाच्या अशा सहजावस्थेत असतानाच भीष्मांच्या जीवनात कृष्णभेटीचा योग आला. कृष्णाचे बालपणापासूनचे गोकुळातील चरित्र भीष्मांना ऐकून माहीत होते आणि त्यांच्याठायी कृष्णाविषयी एक अनामिक आपलेपणा व ओढ निर्माण झालेली होती. अर्थात त्यांनी कृष्णभेट घेण्यासाठी मुद्दामहून काहीच प्रयत्न केले नाहीत आणि तसे प्रयत्न करण्यासाठी त्यांना काहीही कारण नव्हतेच. कारण भीष्म त्यांच्या आत्मानुभवामध्ये पूर्णपणे तृप्त होते. त्यामुळे त्यांच्याठायी कोणत्याही प्रकारची कमतरता अशी नव्हतीच. परंतु कृष्णचरित्रातील गोकुळात घडलेले काही विशेष प्रसंग व लीला जेव्हा भीष्मांच्या कानावर आल्या तेव्हा त्यांच्या मनाला एका वेगळयाच प्रकारचे सुख लाभते आहे हे त्यांच्याही लक्षात आले. साहजिकच भीष्मांच्या ठायी कृष्णाविषयी एक कुतूहल व एक जबरदस्त आंतरिक आकर्षण निर्माण झालेले होते. काही कारणांमुळे जेव्हा भीष्मांची कृष्णाशी प्रत्यक्ष भेट झाली, तेव्हा तर भीष्म कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाने भारावूनच गेले. स्वतःठायीच्या आत्मानुभवामुळे भीष्मांना कृष्णाठायीची त्याची आत्मानुभवाची अवस्था सहजपणे जाणवली आणि कृष्णाच्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे रहस्य त्यांना लागलीच उलगडले.

हे लक्ष्मी, भीष्मांची कृष्णाकडे पहाण्याची दृष्टीच बदलली असे म्हणण्यापेक्षा, ते कृष्णाकडे खऱ्या व योग्य दृष्टीने पाहू लागले हेच खरे! त्यामुळे कृष्णाचे रूप व चरित्र भीष्मांना अधिकच प्रिय झाले. कृष्णाकडे आत्मानुभवाच्या आत्मदृष्टीने पहाताना भीष्म कृष्णाला त्यांच्याचठायी ऐक्यभावाने पाहू लागले आणि त्यांना त्याचा विशेष आनंद होऊ लागला. कृष्णाच्या सगुण रूपाची प्रेमळ प्रतिमा त्यांच्या मनात जेवढ्या सहजपणे भरली, तेवढ्याच सहजतेने कृष्णाची प्रेममूर्ती भीष्मांच्या हृद्यात स्थापित झाली. त्यांच्या अंतरात आत्म्याच्या निर्गुणस्वरूपाठायी कृष्णाची सगुणमूर्ती अधिष्ठित झालेली होती. त्यामुळे भीष्म जेव्हा जेव्हा एकांतात अंतर्मुख होत तेव्हा त्यांना त्यांच्या हृदयातील कृष्णमूर्तीचेच दर्शन होई. त्यांचे मन कृष्णाच्याच ध्यानात मग्न होऊन राही आणि आत्मप्रेमात रमणारे त्यांचे मन कृष्णप्रेमात रंगून राही. कृष्णाचा बाह्यांगाने सहवास करणे भीष्मांना जसे शक्य नव्हते, तसे ते त्यांना आवश्यकही नव्हते. किंबहुना भीष्मांना बाह्यांगाने कृष्णाच्या भेटीत त्याचे प्रेम प्रत्यक्ष अनुभवणे शक्यच झाले नसते. कारण त्याला बाह्यांगाच्या केवढ्यातरी मर्यादाच पडल्या असत्या. भीष्म व कृष्ण यांची बाह्यजीवने व परिस्थिती अत्यंत वेगळीच होती. त्यामध्ये सामाईक असे काहीच नव्हते. त्यामुळे भीष्म व कृष्ण यांचा सहवासच काय, तर भेट घडणेही शक्य नव्हते. त्यामुळे भीष्मांठायी असलेला कृष्णाविषयीचा भक्तिभाव हा त्यांच्या अंतरातीलच होता आणि भीष्म त्या ठिकाणीच कृष्णभेटीचा आनंद अनुभवीत असत. आत्मस्वरूपाचा आनंद अनुभवण्यासाठी भीष्मांना कृष्णरूपाचे माध्यम मिळाले. आत्मप्रेमाचे रूपांतर कृष्णप्रेमामध्ये झाले आणि आत्मानंदाचे रूपांतर कृष्णानंदात झाले.

हे लक्ष्मी, भीष्मांच्याठायी असलेला हा कृष्णाविषयीचा भक्तिभाव हा त्यांचा त्यांचा व्यक्तिगत होता. त्याठिकाणी भीष्मांना कोणाही दुसऱ्याची म्हणजे अगदी खुद्द कृष्णाचीही आवश्यकता नव्हती. त्यांचा भक्तिभाव बाह्यांगाने प्रत्यक्ष कृष्णापर्यंत पोचण्याची जरूरीही भीष्मांना जाणवत नव्हती आणि भीष्म, कृष्णभक्तीचे ऐक्य त्यांच्या त्यांच्याच हृदयात नित्य व सहजपणे अनुभवीत होते. बाह्यांगाची कोणतीही गोष्ट भीष्मांठायीच्या त्या ऐक्य अनुभवाला बाधीत करू शकत नव्हती. परंतु या ऐक्याच्या अनुभवात कृष्ण हा बाह्यांगाने प्रत्यक्षपणे सहभागी नव्हताच. त्यामुळे भीष्मांची भक्ती हा काही कृष्णाचा अनुभव जरी नव्हता, तरीही भीष्मांचा हा भाव कृष्णाच्या अंतःकरणापर्यंत त्याच्याही नकळतपणे पावलेला होता. कारणाकारणाने घडलेल्या काही प्रसंगांमुळे कृष्णालाही त्याची प्रचिती आली आणि त्या त्या वेळेस भीष्मांच्या या भक्तिभावाचा आनंद कृष्णानेही अनुभवलाच. त्यातील द्रौपदीच्या लज्जारक्षणाचा प्रसंग हा भीष्मांच्या कृष्णभक्तीचा द्योतकच ठरला. पुढे जेव्हा कृष्णाला ही हकीगत प्रत्यक्ष द्रौपदीकडून कळली तेव्हा कृष्णाचाही ऊर भरून आला. भीष्मांकडून ज्या अर्थी कृष्णाचेच कार्य




घडले त्याअर्थी त्याचे कारण भीष्मांठायी असलेला कृष्णभक्तीचा भाव हेच होते आणि तो भाव कृष्णाच्या अंतःकरणाला अतिशय आनंदित व प्रसन्न करणारा होता. कृष्णभक्तांचे अंतःकरण हे कृष्णाच्या अंतःकरणासारखेच प्रेमळ, कोमल व सबल झालेले असते आणि म्हणूनच कृष्णभक्तांकडूनच कृष्णाचे कार्य घडते. भीष्मांसारखे असे आत्मज्ञानी कृष्णभक्त कृष्णाच्या अंतःकरणात सहजपणे स्थान घेऊन राहिले यात नवल ते काय?

हे लक्ष्मी, अंतःकरणात कृष्णाविषयी भक्तीभाव असूनही, भीष्मांचे बाह्यजीवन मात्र कृष्णाच्या जीवनापासून अतिशय वेगळेच राहिले. किंबहुना त्या उभयतांच्या जीवनात पुष्कळच अंतर होते, असेच म्हणावे लागेल. त्यांच्या बाह्य जीवनात काहीच साम्य नव्हते. अंतःकरणाठायी कृष्णाविषयी असलेला भक्तिभाव बाह्यांगाने अनुभवणे भीष्मांना जसे शक्य नव्हते तसेच त्यांनी ते शक्य करण्याचा मुद्दामहून कधी प्रयत्नही केला नाही, हेही खरेच होते. कारण कृष्णाच्या भक्तिभावाचा आनंद स्वतःच्या अंतःकरणात अनुभवणे, हीच त्यांची वृत्ती होती. आत्मधर्माची जाणीव असूनही भीष्म बाह्यांगाने मात्र त्यांनी अंगिकारलेले कर्तव्यकर्म निष्ठेने करीत राहिले. त्यासाठी अत्यंत आवश्यक असलेले आत्मबळ त्यांच्याठायी होते. प्राप्त कर्तव्यकर्म निरहंकारीपणाने करून त्याचे फळ भीष्मांकडून, अत्यंत सहजपणे ईश्वरार्पण होत असे. त्यामुळे त्या कर्मांचा जरासाही लेप भीष्मांच्या मनाला लागत नसे आणि त्यांच्या अंतःकरणाची विशुद्ध अवस्था अबाधित रहात असे. भीष्मांच्या आत्मानुभवाचेच ते लक्षण होते.

हे लक्ष्मी, परंतु आत्मधर्माची जाणीव असलेल्या कृष्णाचे जीवनकार्य मात्र सज्जनांना रक्षण व आधार देऊन दुर्जनांचा निःपात करणे आणि सज्जनांच्याठायी सद्धर्माची स्थापना करणे हे होते. त्यामुळेच कृष्ण हा सदैव पांडवांच्या बाजूने त्यांचा पाठीराखा म्हणून उभा रहात असे आणि त्यांना वेळप्रसंगी सक्रिय साहाय्यही करीत असे. भीष्मांनी जरी कौरवांची बाजू मुद्दामहून घेतली नव्हती तरीही कौरवांचे सेनापती म्हणून कर्तव्यकर्माच्या भावनेने पहिल्यापासूनच कुरूकुळाच्या बाजूनेच असलेले भीष्म मात्र, शेवटपर्यंत त्याच बाजूला राहिले. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यानी कुरूकुळाला सोडले नाही आणि त्यांची प्रतिज्ञा राखली. कौरव व पांडव यांच्या द्युत खेळण्याच्या प्रसंगीही भीष्म सुरूवातीपासून स्वस्थच बसून राहिले होते. त्यांनी ना काही सूचना केली ना काही त्या खेळामध्ये स्वतःहून प्रत्यक्ष हस्तक्षेप केला. त्यासंबंधी दुर्योधनाने तर त्यांना विचारले नव्हतेच, पण धर्मराजानेही भीष्मांचे मार्गदर्शन घेतले नव्हतेच. पितामह म्हणून भीष्मांकडे केवळ एक आदरणीय व्यक्ती म्हणूनच पाहिले जात होते. त्यापेक्षा त्यांच्या सहभागाची जास्त अपेक्षा कोणालाही नव्हती. हे जाणून असलेले भीष्म म्हणूनच एखाद्या

स्थितप्रज्ञासारखे स्वस्थ बसले होते. परंतु भर दरबारात जेव्हा द्रौपदीच्या स्त्रीत्वाचाच अवमान व अवहेलना होऊ लागली आणि नीतीच्या सर्व मर्यादांचे उल्लंघन होऊन दुःशासन द्रौपदीच्या अब्रूवरतीच घाला घालू लागला, तेव्हा मात्र भीष्मांच्याठायीचे क्षात्रतेज जागृत झाले, तरीही त्यांनी स्वतःला संयमाने आवरले होते. त्यानंतर द्रौपदीने जेव्हा आर्ततेने कृष्णाचा धावा सुरू केला, तेव्हा मात्र द्रौपदीच्या कृष्णावरील भक्तिभावाचा स्पर्श भीष्मांच्या अंतःकरणाला झाला आणि त्यांच्याठायीचा कृष्णाविषयीचा भक्तिभाव उठला. मग भीष्मांकडून पुढील कृती एका क्षणात व सहजतेने घडली. त्यासाठी त्यांना काहीही विचार करावाच लागला नाही. द्रौपदीचे रक्षण करून पुन्हा ते तेवढ्याच सहजतेने त्यांच्या आसनावर येऊन बसलेसुद्धा! एखादी वीज चमकावी तसेच सर्व घडले. कोणालाही कसलाही विचार करायला किंवा काही प्रतिक्रिया व्यक्त करायला अवधीच मिळाला नाही.

हे लक्ष्मी, भीष्मांचा असा कृष्णभक्तीचा भाव आगळा वेगळाच होता. खरे तर, भक्तिभाव हा एकीएकच असतो. तो व्यक्त होण्याची बाह्यांगाची कृती ही व्यक्ती, परिस्थिती, काळवेळ व स्वभाव यानुसार वेगळी वेगळी असते. परंतु त्याद्वारे तो भाव ईश्वरापर्यंत म्हणजे ईश्वरस्वरूप असलेल्या महापुरूषांच्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोहोचतो आणि त्यांना आनंदित करतो, हे मात्र सत्य आहे. त्या भक्तिभावाचाच अनुभव ईश्वराचे सर्व भक्त नित्य घेत असतात. भीष्मांच्या जीवनात खरा आव्हानात्मक प्रसंग आला, जेव्हा पुढे कौरव व पांडव यांच्यात महायुद्ध झाले तेव्हा! कृष्णाच्या प्रेरणेनेच घडलेले हे युद्ध म्हणजे धर्मयुद्धच होते. युद्धामध्ये कृष्ण अर्थातच पांडवांच्याच बाजूनेच उभा राहिला आणि भीष्मांनी त्यांचा मूळ पक्ष मुद्दामहून सोडण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे प्रत्यक्ष युद्धात भीष्म व कृष्ण हे तर प्रतिपक्षातून समोरासमोर उभे ठाकले. दोघेही त्यांच्या त्यांच्या धर्माने युक्त होऊन त्यांच्या भूमिकेला दृढतेने धरून राहिले. कृष्णाने युद्धामध्ये प्रत्यक्ष सहभाग न घेता केवळ अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करण्याची कामगिरी स्वीकारली. कृष्ण सारथी, अर्जुन रथी आणि समोर कौरवांचे सेनापती म्हणून त्यांचे कर्तव्यकर्म करीत असलेले महावीर व प्रतापी असे खुद्द भीष्म. एका बाजूला कोणत्याही परिस्थीतीत अर्जुनालाच विजय प्राप्त करून देण्याचा कृष्णाचा कृतनिश्चय तर दुसऱ्या बाजूला कुरूकुळाचे रक्षण करण्याचा निर्धार करून समोर उभे राहिलेले भीष्म. अर्जुन कृष्णाचा परममित्र व अत्यंत प्रेमाचा तर भीष्मांठायी आत्मज्ञान व कृष्णभक्ती यांचा संयोग! कृष्ण सज्जन अशा पांडवांच्या बाजूने उभा, तर भीष्म जाणूनबुजून पण स्वतःचे कर्तव्यकर्म व दिलेले वचन प्रमाण मानून, दुर्जन कौरवांच्या बाजूने लढायला तयार. खरेच, प्रसंग मोठा बिकट होता व अत्यंत रोमहर्षकही होता.”



एवढा वेळ शांतपणे ऐकणाऱ्या लक्ष्मीला, आता मात्र स्वस्थ बसणे शक्य झाले नाही. उत्स्फूर्तपणे ती जागच्या जागीच उठून उभी राहिली आणि किंचितशा उच्च स्वरात नारदाला म्हणाली,

"अरे नारदा, थांब. जरा थांबशील की नाही? तू ज्या वेगाने कथा पुढे नेत आहेस तो वेग माझ्या मनाला सहन होणे शक्यच नाही. आधी केलेले श्रवण मनाने पूर्णपणे स्वीकारल्याशिवाय पुढील श्रवण घडणे अशक्यच आहे. केवळ तुझ्या बोलण्याचा वेग वाढला म्हणून मी हे म्हणत नाही, परंतु तू तर एकदम वेगळाच विषय सुरू केलास. तुझ्याकडून ते बोलण्याच्या ओघात सहजपणे घडले असेलही. परंतु मला मात्र, तो विषय श्रवण करण्यासाठी, माझ्या मनाची थोडीशी तयारी करणे अत्यंत आवश्यकच आहे. कौरव पांडव यांच्यात युद्ध घडले हे ऐकून मात्र मला तेवढेसे नवल वाटले नाही. कारण त्यांच्यात वारंवार घडणारे संघर्षाचे प्रसंग बघता ते युद्ध घडणे अटळच होते, ही गोष्ट माझ्या लक्षात आलीच होती. परंतु त्याला धर्मराज कसा काय तयार झाला आणि त्यामागे कृष्णाची प्रेरणा होती म्हणजे काय? त्यातही कृष्णाने अर्जुनाचे सारथ्य केले हे नवल घडले तरी कसे? माझ्या मनाला भीष्मांची भूमिका स्वीकारणेही जरा कठीणच जात आहे. आत्मज्ञानी व कृष्णभक्त असे भीष्म दुर्जनांच्या बाजूने आणि तेही कृष्णाच्या विरूद्ध उभे राहिले, ही गोष्ट तर मनाला पटणे शक्यच नाही आणि तरीही भीष्मांची कृष्णभक्ती अबाधित राहिली असे कसे बरे म्हणता येईल? अर्थात ज्या बाजूला कृष्ण त्याच बाजूला विजयश्रीने माळ घातली असणार, याबाबत माझ्या मनात तीळमात्रही शंका नाही. तरीही हे सर्व जाणून घेण्याची तीव्र इच्छा आता माझ्या मनात निर्माण झालेली आहे. परंतु तू सर्व काही जरा सावकाशपणे व नीटपणे मला समजावून सांगण्याचे कर पाहू. त्यामुळेच माझे मन शांत होईल व समाधान पावेल."

लक्ष्मीच्या बोलण्यातून प्रगटलेली तिच्या मनाची अस्वस्थता नारदाला जाणवली. अर्थात् ती अस्वस्थता नाहीशी करण्याचा खात्रीलायक उपायही नारद जाणून होता. त्यासाठी लक्ष्मीशी जरा अधिक विस्ताराने बोलणे आवश्यक होते. त्यामुळेच प्रसंगातील भाव अधिकाधिक स्पष्टपणे प्रगट झाले असते आणि लक्ष्मीचे मनही तसे तसे अधिकाधिक मोकळे होऊन भावपूर्ण झाले असते. प्रसंगातील गुज हे बुद्धीपेक्षाही भावपूर्ण अवस्थेतील मनाला अधिक उमजते हे रहस्य नारदाला माहीत असल्यामुळे, नारदाने कथाप्रसंगाच्या आधारानेच लक्ष्मीशी बोलावयास सुरुवात केली.

"हे लक्ष्मी, भक्तिभावाविषयी सर्वसाधारण बोलणे हे तसे सोपे असते. कारण मुळात भक्तिभाव जरी आंतरिक असला तरी त्या भक्तिभावाची बाह्य लक्षणे ही सर्वमान्यच आहेत. परंतु एखाद्या व्यक्तीच्या भक्तिभावाविषयी बोलणे हे तेवढेसे सुलभ नाही, कारण त्यासाठी भक्तिभावाचे घडलेले प्रसंग हे उदाहरण म्हणून हाताशी घ्यावे लागतात. पण एखाद्या प्रसंगाला अनेक अंगे असल्यामुळे त्या प्रसंगाद्वारे भक्तिभाव प्रगट होण्याऐवजी, तो लपला जाण्याचीच शक्यता जास्त असते. अशा वेळी प्रसंगातील भक्तिभाव नेमका पहाण्यासाठी तशी भक्तिभावाची दृष्टीच हवी आणि अशी दृष्टी अंतरातील भक्तिभावामुळेच निर्माण होऊ शकते. भक्तिभाव हाच भक्तिभावाला ओळखू शकतो आणि त्याचा आनंद अनुभवू शकतो, हे सत्यच आहे. भक्तिभाव हा प्रसंगाच्या कोंदणात बसवल्यासारखा असतो. अनेक वेगवेगळ्या प्रसंगांची कोंदणे जरी बदलली, तरी भक्तिभावाचे सौंदर्य हे लपून न रहाता अधिकच खुलते आणि भक्तिभावाचा सुगंध सर्वत्र दरवळून रहातोच.

हे लक्ष्मी, भीष्मांच्या अंतरातील असलेल्या कृष्णभक्तिभावाला प्रगट करणारे प्रसंग कौरव व पांडव यांच्यातील युद्धाच्यावेळीच घडले. कारण त्या वेळेसच भीष्म व कृष्ण यांचा एकमेकांशी प्रत्यक्ष संबंध आला आणि तोही एकमेकांसमोर प्रतिपक्षांतून उभे राहिले असताना. तसे बघायला गेले तर युद्ध हे काही भक्तिभाव प्रगट होण्यासाठीचे योग्य वा अनुकूल कारण नव्हेच. परंतु तरीही ऐन युद्धातही असे काही कठीण व बिकट प्रसंग भीष्मांच्या बाबतीत घडले, की त्यामध्येही भीष्मांठायी कृष्णभक्तिभावच सदोदित राहिला आणि तोच सरस ठरला. त्या भक्तिभावाने तशा घोर प्रसंगातही कृष्णही भावपूर्ण झाला आणि त्याच्या अंतःकरणाला प्रसन्नता लाभली. त्यातून एकच गोष्ट सिद्ध झाली की भीष्मांच्याठायीचा कृष्णाविषयीचा भक्तिभाव हा बाधित तर होऊ शकलाच नाही, उलट त्याचीच मात होत राहिली. अर्थात हेच तर भक्तिभावाचे लक्षण आहे ही गोष्ट खरी आहे. पण युद्धासारख्या घनघोर प्रसंगातही भीष्मांचा भक्तिभाव वरचढ ठरला, ही गोष्ट म्हणूनच असामान्य आहे आणि त्यासाठीच भीष्मांचे विशेषत्व मान्य करावयासच हवे. भीष्मांच्याठायी असलेल्या आत्मज्ञानाला कृष्णप्रेमाची व कृष्णाच्या माहात्म्याची जोड होती म्हणूनच केवळ ही गोष्ट शक्य होऊ शकली, हेच खरे सत्य आहे.

हे लक्ष्मी, कौरव व पांडव यांच्यामध्ये युद्ध होणे अटळ होते हे तुझे म्हणणे अगदी बरोबर होते. खरे तर, धर्मराज व दुर्योधन यांच्यासाठी इंद्रप्रस्थ व हस्तिनापूर अशी वेगवेगळी राज्ये निर्माण केलेली होतीच. परंतु त्याचे दुर्योधनाला मुळीच समाधान नव्हते. साम्राज्याची स्वप्ने पहाणारा आणि पांडवांचा व्देषमत्सर करणारा दुर्योधन पांडवांना राज्यावर बसलेले पाहूच शकत नव्हता. शेवटी धर्मराजाला द्युताच्या सापळयात दुसऱ्यांदा पकडून दुर्योधनाने त्याचा डाव साधलाच.



भीष्मांच्या धीरोदात्त वागण्यामुळे द्रौपदीची लाज राखली गेली तेव्हा धृतराष्ट्रानेही परोपकार केल्याचा आव आणून, सर्व पांडवांना दास्यत्वातून मुक्त केले. परंतु सर्व पांडवांना बारा वर्षे वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास स्वीकारणे भागच पडले. त्याविषयी भीष्मांनीही तटस्थ भूमिकाच घेतली. जेव्हा गोष्टी मर्यादेच्या बाहेर गेल्या आणि द्रौपदीच्या अब्रूवरतीच घाला आला तेव्हाच आणि केवळ तेवढा वेळच भीष्म मध्ये पडले. त्यानंतर स्वस्थ रहाण्याची त्यांची भूमिका भीष्मांनी पुन्हा स्वीकारली. आता बोलण्यात काही अर्थ नाही हे जाणून विदुरानेही पांडवांच्यासाठी काहीही बोलणे केले नाही आणि धृतराष्ट्र तर जाणूनबुजूनच निमूट बसून राहिला. धृतराष्ट्राची पत्नी गांधारी हिने मात्र कुंतीला आग्रहपूर्वक हस्तिनापूरलाच ठेवून घेतले. अर्जुनाची दुसरी पत्नी सुभद्रा हिला अर्जुनाने तिच्या माहेरी म्हणजे द्वारकेला बलरामाकडे पाठवले. परंतु द्रौपदीने मात्र पांडवांबरोबर वनवासात जाण्याचाच निश्चय व्यक्त केला. अर्जुनाला व पांडवांना सर्व जीवनात नित्याची साथ देण्याचा द्रौपदीचा निर्धार कायम होता. तिने स्वीकारलेल्या भूमिकेला ती गोष्ट साजेशीच होती. त्यामुळे पांडवांनाही द्रौपदीला त्यांच्याबरोबर वनवासात नेणे भागच पडले.

* * *


हे लक्ष्मी, हस्तिनापूरला घडलेली हकीगत कृष्णाला कळल्यावरती तो त्वरित हस्तिनापूरला धावला खरा, परंतु तोपर्यंत उशीरच झाला होता. सर्व राज्य धृतराष्ट्राच्या स्वाधीन करून नेसत्या वस्त्रांनिशी धर्मराज, त्याच्या सर्व बंधूंसह व द्रौपदीसह वनवासाला निघूनही गेला होता. नाहीतरी तेथे रहाण्यासाठी पांडवांचे मनही घेत नव्हतेच आणि तसे काही कारणही नव्हते. मग कृष्णही हस्तिनापूरला जरासुद्धा थांबला नाही. त्यालाही तेथे थांबण्यासारखे काही नव्हतेच. क्षणाचाही विलंब न लावता कृष्ण वनवासात जाऊन पांडवांना भेटता झाला. कृष्ण आला हे बघून सर्वच पांडवांना थोडासा धीर मिळाला खरा, पण शरमेने त्यांच्या माना खालीच झुकलेल्या होत्या. कृष्णाकडे पहाण्याची त्यांना हिंमतच होत नव्हती. कृष्णाने स्वतः प्रत्येकाच्या जवळ जाऊन सर्वांचे व्यक्तिगत सांत्वन केले. धर्मराजाच्या मुखावरती अतिशय नैराश्य व उदासीनता पसरलेली होती. कृष्णाने त्याचे दोन्ही हात हातात घेऊन त्याला धीर दिला. हतबल झालेल्या भीमाचे मुख रागाने नुसते लाल झालेले होते. त्याच्या डोळ्यातून तर आगच बरसते आहे असे वाटत होते. कृष्णाने भीमाच्या खांद्यावर प्रेमाने हात ठेवून थोपटले आणि त्याला बरेचसे शांत केले. नकुल व सहदेव तर कृष्णाच्या कुशीत शिरले आणि मुसमुसून रडू लागले. कृष्णाने त्यांचे मस्तक कुरवाळून त्यांनाही धीर दिला. अर्जुनालाही कृष्णाच्या नजरेला नजर मिळवण्याचे धैर्य होत नव्हतेच. अर्जुनाकडून कृष्णाला पराक्रमाची अपेक्षा असणार हे अर्जुनाला ठाऊक होते. पण परिस्थितीपुढे शरणागती द्यायला लागल्यामुळे अर्जुन स्वतःच्याच नजरेतून उतरला होता. त्यामुळे कृष्णाच्या

जवळ येण्यासही अर्जुन धजावत नव्हता. अर्जुनाची ही अवस्था कृष्णाने ओळखली आणि तो स्वतःहून अर्जुनाच्या जवळ गेला. दुर्मुखलेल्या अर्जुनाला कृष्णाने आपल्या जवळ घेऊन मिठीत घेतले. कृष्णाच्या स्पर्शातून कृष्णाठायी असलेला अर्जुनाविषयीचा विश्वास, अर्जुनाला जाणवला आणि त्याचे मन बरेचसे सावरले.

द्रौपदी स्वतःहून कृष्णाच्या जवळ आली आणि अश्रुपूर्ण नेत्रांनी कृष्णाकडे केवळ पहात राहिली. तिच्या मुखातून हुंदक्यांशिवाय दुसरे काहीच बाहेर येऊ शकत नव्हते. द्रौपदीच्या नजरेतूनच कृष्णाला सर्वकाही कळले. ज्या दुर्दैवी व अत्यंत कठीण अशा प्रसंगातून द्रौपदीला जावे लागले होते त्याची सर्व व्यथा, द्रौपदीच्या नजरेत दाटून आली होती. तिचे दुःख कोणत्याही प्रकारचे सांत्वन करण्याच्या पलिकडचेच होते आणि कृष्णानेही तसा काही प्रयत्न केलाच नाही. कृष्णाने द्रौपदीचे दोन्ही हात त्याच्या हातात घेतले आणि त्याच्या नेत्रांतून घळाघळा अश्रू वाहू लागले. द्रौपदीच्या व्यथेशी कृष्ण पूर्णपणे एकरूप झाला असल्याचेच ते लक्षण होते. द्रौपदीची व्यथा कृष्णाची झाली तर कृष्णाठायीचे धैर्यबळ द्रौपदीचे झाले. तिने स्वतः पुढे होऊन अश्रुपूर्ण नेत्रांनी तिच्या पदराने कृष्णाचे अश्रू पुसले आणि कृष्णाचे सांत्वन केले. कृष्णानेही त्याच्या शेल्याने द्रौपदीचे अश्रू वहायचे थांबवले. तेव्हा मात्र द्रौपदीला राहवले नाही आणि ती कृष्णाच्या कुशीत शिरून अस्फुट आवाजात जेमतेम एवढेच म्हणाली, “कृष्णा, मी ठीक आहे. माझी काळजी करू नकोस.”

द्रौपदीच्या त्या शब्दांनी सर्वांचीच मने गलबलून आली. कारण खरे तर, द्रौपदीलाच सर्वाधिक शारीरिक त्रास व मानसिक क्लेश यांचा सामना करावा लागला होता. परंतु ते सर्व एखाद्या दुःस्वप्नासारखे विसरून द्रौपदी धैर्यबळाने पुढे आली होती. एवढेच नव्हे, तर पांडवांना साथसंगत देण्यासाठी ती त्यांच्याबरोबर वनवासातही आली होती. द्रौपदीची ही मानसिकता तर कौतुक करण्याच्याही पलिकडची होती. एक स्त्री म्हणून शरीराने अबला असलेली द्रौपदी, मनाने मात्र अत्यंत सबल असल्याचेच सिद्ध झाले होते. त्याचे कारण इतरांना कळणे जरी कठीण असले तरी ते कारण फक्त द्रौपदीच जाणून होती. तिच्याठायी असलेल्या कृष्णावरील अलोट श्रद्धेचेच ते सामर्थ्य होते. कृष्णावरील अविचल भावाचे फळ द्रौपदीला मिळाले होते. तिचा कृष्णच तिला भीष्मांच्या रूपाने पावला याची द्रौपदीला पूर्णपणे खात्री होती आणि तिच्या अंतरात नित्य ठाण मांडून बसलेल्या कृष्णाला द्रौपदी आता प्रत्यक्ष भेटत होती. त्या भेटीचा आनंद कृष्ण व द्रौपदी या दोघांनाच मिळाला आणि फक्त त्यांनाच तो कळाला.

सर्वांचीच मने आता बरीचशी शांत व स्थिर झालेली आहेत हे पाहून कृष्णाने सर्व पांडवांना उद्देशून बोलावयास सुरुवात केली. कृष्ण त्याच्या संयमी व आर्जवी स्वरात म्हणाला,



"हे पांडवांनो, ईश्वराच्या कृपेने तुम्ही खरोखरीच एका मोठ्या संकटातूनच वाचला आहात. प्रारब्धाचे भोग हे कोणालाच चुकलेले नाहीत हे खरेच आहे. दैवगती ही मोठी विचित्रच असते आणि तिचे आकलन ज्ञानी पंडीतांनासुद्धा होऊ शकत नाही. परंतु दैवाचे हे चक्र नित्य फिरत असते, हे लक्षात ठेवा. प्रतिकूलतेचा हा काळ हळूहळू का होईना पण निश्चितच निघून जाईल आणि अनुकूल काळही पुन्हा येईल याची खात्री बाळगा. परंतु तोपर्यंत मात्र सर्व धैर्यबळ मनामध्ये एकवटून मन शांत व स्थिर ठेवा. अंतर्मुख होऊन स्वतःठायीचे अवगुण शोधून ते घालवणे आणि सद्‌गुण पाहून ते वाढवणे, हाच परिस्थितीवर मात करण्यासाठीचा एकमेव उपाय आहे. मनाला नैराश्य व उदासीनता याचा स्पर्शही होणार नाही याची काळजी घ्या. कारण एकदा का या गोष्टींनी मनाला घेरले की मन त्याची सर्व उमेदच हरवून बसेल आणि प्रत्यक्ष जेव्हा काळाची अनुकूलता प्राप्त होईल, तेव्हा त्या मनाकडून काही प्रयत्न घडणेही शक्यच होणार नाही.


हे पांडवांनो, खरे तर सर्वात कठीण प्रसंग हा द्रौपदीवरतीच गुदरलेला होता हे तुम्हीही जाणून आहात. परंतु द्रौपदीठायीची ईश्वरावरील नितांत श्रद्धाच फळाला आली आणि तिला त्या पितामह भीष्मांच्या रूपाने तो ईश्वरच पावला. त्या ईश्वरानेच द्रौपदीला रक्षण व आधार दिला असेच म्हणावे लागेल. एवढे असूनही द्रौपदी त्या प्रसंगातून आता मनाने बाहेर आलेली आहे याबद्दल आपण खरेच तिचे कौतुक करावयास हवे. द्रौपदीच्या संकटकाळी तुम्ही तेथे प्रत्यक्ष हजर असूनही तिला काहीच मदत करू शकला नाहीत, याचा सल तुमच्या मनाला लागून राहिलेला असणे अगदी स्वाभाविक आहे. परंतु त्या प्रसंगात मनाने अडकून रहाण्यापेक्षा असा प्रसंग आयुष्यात पुन्हा कधीच येणार नाही, यासाठी मनाची तयारी करा. तुम्हाला त्यावेळी आलेली अगतिकता व असहाय्यता ही कशामुळे आलेली होती, याचा शांत मनाने विचार करा आणि विवेकाचे बळ घेऊन मनातील ते दोषच मुळासकट काढून टाका. भूतकाळाला विसरा आणि भविष्यकाळ उज्वल करण्यासाठी आताच्या वर्तमानकाळाचाच उपयोग करून घ्या. तुमच्याठायीचा विझलेला पराक्रमाचा अग्नी पुन्हा प्रज्वलित करा आणि भविष्यकाळ घडविण्यासाठी पुन्हा सज्ज व्हा.

हे पांडवांनो, तुमच्या मनात एखादे वेळेस असा विचार येईल की हे जे वनवासाचे संकट तुमच्यावर आलेले आहे एवढे संकट आजपर्यंत कधी कोणावरच आलेले नाही. पण इतिहास साक्षी आहे की याहीपेक्षा कठीणातील कठीण संकटे कित्येकांवर आलेली आहेत. परंतु स्वपराक्रमाने व जिद्दीने त्यांनी त्या संकटांवर मात केली आणि पुन्हा सर्व वैभव व ऐश्वर्य प्राप्त करून घेतले. तुमच्याकडे तर पराक्रमाची जराही कमतरता नाही. फक्त योग्य संधी मिळण्याची वाट पहात मनातील धीर

कायम धरून ठेवा. बारा वर्षांचा वनवासाचा काळ आणि एक वर्षाचा अज्ञातवासाचा काळ, काळाच्या ओघात हां हां म्हणता निघून जाईल आणि पुन्हा तुमची वेळ येईल. ती साधण्यासाठी आताचा काळ हा तपश्चर्येचा काळ म्हणून पहा आणि तुमची मनोधारणा व गेलेले मनोबळ पुन्हा प्राप्त करून घेण्यासाठी या काळाचा उपयोग करून घ्या. या प्रतिकूल काळातही एक अत्यंत महत्त्वाची अनुकूलता तुमच्यापाशी आहे. तुम्ही पाचही बंधू एकत्र आहात आणि तुमच्यातील ऐक्य कायम आहे. या तुमच्या ऐक्यबळामुळे या जगातील कोणतीही दुष्ट शक्ती तुम्हाला केव्हाच हरवू शकणार नाही अथवा नमवूही शकणार नाही. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे द्रौपदीसारखी सहधर्मचारिणी पत्नी तिच्या सर्व भावानिशी तुम्हाला साथ देण्यासाठी तुमच्याबरोबर आहे. तुमच्यासाठी द्रौपदीने केलेला त्याग हा अमूल्य आहे. द्रौपदीच्या या भावबळामुळे व तुमच्या ऐक्यबळामुळे तुमच्याकडून पराक्रमाने सर्व ऐश्वर्य प्राप्त करून घेणे हे निश्चितपणे घडणार आहे, याची मला पूर्ण खात्री आहे.”

कृष्णाच्या बोलण्याने धर्मराजासह सर्वच पांडवांचे आधी म्लान झालेले चेहरे बरेचसे उजळले आणि त्यांच्या मुखावरती तजेला दिसू लागला. त्यांची मने नैराश्याच्या जाळयातून सुटली असल्याची लक्षणे त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसू लागली. पांडवांची मने स्थिर झाली होती आणि ती आता होकारात्मक दिशेने विचार करू लागली होती. आपल्याकडे काय नाही यापेक्षा, आपल्याकडे आता काय आहे याची जाणीव पांडवांना झाली होती आणि प्राप्त परिस्थितीला धैर्याने सामोरे जाण्याचा निर्धारही त्यांच्याठिकाणी निर्माण झाला होता. परंतु अर्जुनावरती मात्र कृष्णाच्या बोलण्याचा विशेष परिणाम झालेला दिसत होता. तो थोडासा भावपूर्णही झालेला होता. त्याने कृष्णाच्या जवळ जाऊन कृष्णाचे दोन्ही हात प्रेमाने स्वतःच्या हातात घेतले आणि तो कृष्णाला उद्देशून बोलू लागला.

“अरे कृष्णा, तू आमच्या प्रेमाने धावत येऊन आमच्या भेटीसी आलास, यातच आम्हाला सर्वकाही मिळाले. तुझ्या बोलण्याने आमच्या मनावरील उदासीनता तर केव्हाच पूर्णपणे झटकली गेली आहे. प्रतिकूल परिस्थितीतही आम्हाला काय अनुकूलता आहे याची तू आम्हाला आठवण करून दिलीस खरी, परंतु आमच्यासाठी सर्वात मोठी अनुकूलता हीच आहे की आमचा कृष्ण हा आमच्या बरोबर आहे आणि हीच आमच्यासाठी सर्वात भाग्याची गोष्ट आहे. सुखदुःखाच्या सर्व प्रसंगात आम्हाला साथ देऊन आमच्या पाठीशी सदैव उभा रहाणारा असा तुझ्याशिवाय दुसरा कोणीही आमच्यासाठी नाही. असे असूनही आम्ही मात्र प्रसंगात तुला विसरतो, हीच खरी दुर्भाग्याची गोष्ट आहे. भावी संकटांपासून तू आम्हाला नेहमीच सावध करीत असताना, आम्ही मात्र स्वतःच्या बळाचा व ज्ञानाचा फाजील विश्वास



बाळगून तुझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतो आणि एखाद्या बेसावध क्षणी संकटाच्या दरीत जाऊन कोसळून पडतो. त्या दरीतून वर येऊन पुन्हा डोंगराच्या पठारावर येणे, ही वाटते तेवढी साधी व सोपी गोष्ट नाहीच आहे. केवळ आमच्या प्रयत्नांनी घडणारी ही गोष्ट नाही. त्यासाठी तुझी फक्त साथच आम्हाला नको आहे तर तुझे मार्गदर्शनही आम्हाला हवे आहे आणि मुख्य म्हणजे तुझे मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे वागण्याची बुद्धी आम्हाला हवी आहे. खरे तर, तेथेच आम्ही कमी पडतो, नव्हे फारच कमी पडतो. काही काही वेळा तर आम्ही एवढे कमी पडतो की संकटामध्ये अगदी खोलवर जाऊन पडतो. हेच जर आम्ही वेळीच तुझ्याकडून मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे वागू, तर असे घोर प्रसंग आमच्यावर कधीही येणारच नाहीत. परंतु आम्ही आधी आमची बुद्धी चालवून, आमच्या शहाणपणाने निर्णय घेऊन तसे वागायचे आणि आमच्याच कर्माची फळे म्हणून संकटात सापडलो, की मग मात्र तुझ्याकडून रक्षणाची अपेक्षा करायची ही गोष्ट चुकीचीच आहे. परंतु तू मात्र आमच्या सर्व चुकांकडे दुर्लक्ष करून अगदी सहजपणे आमच्या पाठीशी उभा रहातोस. यात तुझ्या मनाचा मोठेपणा नक्कीच आहे, पण त्यामुळे आमच्या मनाचा कोतेपणा व खोटेपणा काही लपून रहात नाही. उलट तो जास्तच प्रकर्षाने जाणवतो आणि मग आमचीच आम्हाला लाज वाटते.


हे कृष्णा, पण आतापर्यंत जे झाले ते पुरे झाले. आमचे अज्ञान हे आमच्या चुकांचे कारण सांगून त्यांचे समर्थन करणे, हे अधिक चुकीचे ठरेल. त्यापेक्षा आता नेहमी तुझे मार्गदर्शन घेऊनच आमचे जीवन जगण्याचा निश्चयच आम्ही करावयास हवा. केवळ आम्हा सर्व बंधूंचे ऐक्य आहे म्हणून त्याचे बळ आहे असे म्हणावे, तर प्रत्यक्ष प्रसंगात ते कामाला येऊ शकत नाही, हे तर आता सिद्धच झाले आहे. परंतु कृष्णा, आमच्या सर्वांच्या विश्वासाचा व प्रेमाचा असलेला तू जर आमच्यामध्ये असलास तरच आम्हाला मनोबळ मिळेल आणि आमच्याकडून पराक्रम घडू शकेल, याची मला तरी पूर्ण खात्री आहे. आज केवळ तुझ्यामुळेच ही द्रौपदी पुन्हा मनाने सावरली आहे. एवढेच नव्हे, तर तिच्या मनाने उभारीही घेतली आहे, ही साधी गोष्ट नाही. तिच्याठायी तुझ्याविषयी जे प्रेम व श्रद्धा आहे त्यानेच हे शक्य झाले, ही गोष्ट सत्य आहे. खरे तर, द्रौपदीच्या समोर जायलाही आम्हाला लाज वाटते. आमच्या असहाय्यतेमुळेच अधिकच अगतिक झालेल्या द्रौपदीच्या मुखातून त्या घोर प्रसंगात केवळ 'कृष्णा, कृष्णा' असेच नाव सतत येत होते, यातच सर्वकाही आले. तिच्या त्या आकांतानेच बहुधा एवढा वेळ स्वस्थ बसलेल्या भीष्म पितामहांच्या अंतःकरणाला अचानक पाझर फुटला आणि त्यांनीच पुढे होऊन द्रौपदीची अब्रू राखली. आम्ही मात्र नामर्दासारखे स्वस्थ बसून सर्व तमाशा केवळ बघत राहिलो होतो. धिःकार असो आमच्या पराक्रमाचा आणि आमच्या त्या केवळ नावाच्या

क्षत्रियधर्माचा! खरे तर, त्यासाठीच आम्हीच कोणत्याही शिक्षेला पात्र आहोत आणि ती आम्हाला आमच्याच कर्माचे फळ म्हणून आता मिळाली आहे. पण द्रौपदीला मात्र आमच्यामुळे नाहक शिक्षा भोगावी लागली आहे आणि त्याचेच मला अत्यंत वाईट वाटत आहे. द्रौपदीने आमच्याबरोबर वनवासात येण्याचे ठरवले आहे, हा तिच्या मनाचा मोठेपणा आहे आणि हेही तिच्यावरील तुझ्याच प्रभावाचे लक्षण आहे, ही गोष्टही मी जाणून आहे.

हे कृष्णा, ज्या विश्वासाने तू द्रौपदीला आमच्या कुटुंबात आणलीस त्या विश्वासाला आम्ही पात्र ठरलो नाही, ही गोष्ट खरी आहे. परंतु यापुढे मात्र असे होणार नाही असे मी तुला वचन देतो. द्रौपदीचे रक्षण करण्याच्या आड आता कोणतीच गोष्ट येणार नाही, म्हणजे मी तशी ती येऊ देणार नाही. एवढेच नव्हे, तर त्या दुर्योधनाकडून व दुःशासनाकडून द्रौपदीचा जो अवमान व अवहेलना झालेली आहे त्याचा वचपा मी काढीनच काढीन आणि त्याची फळे त्यांना भोगावयास, मी निश्चितच भाग पाडीन. त्यातून त्यांची सुटका होणे आता शक्यच नाही. एकदा का आमचा हा वनवास व अज्ञातवास संपला की मग ते आहेत आणि आम्हीही आहोतच. त्यांच्या प्रत्येक दुष्कृत्याची शिक्षा त्यांना दिल्याशिवाय तर आम्ही रहाणार नाहीच, पण आम्ही आमचे गमावलेले राज्य स्वपराक्रमाने पुन्हा परत मिळवूच मिळवू. हाच आमचा दृढनिश्चय आहे आणि हाच आता आमचा ध्यासही आहे. तोपर्यंत योग्य वेळ येण्याची आम्ही वाट पहात राहू. कृष्णा, त्यासाठी आम्हाला तुझ्याच मार्गदर्शनाची व प्रत्यक्ष साहाय्याची जरूरी आहे."

एवढा वेळ आवेगाने बोलणारा अर्जुन बोलता बोलता भावनाविवश झाला आणि त्याच्या नेत्रांतून अश्रूधारा वाहू लागल्या. सर्वांचीच अवस्था अर्जुनासारखीच झालेली होती आणि सर्वांचेच नेत्र भरून आले होते. कारण अर्जुनाच्या बोलण्यातून सर्वांच्याच भावना मोकळया झालेल्या होत्या. द्रौपदीला तर विशेषत्वानेच भरून आले होते. अर्जुनाठायी कृष्णाच्या माहात्म्याची जाणीव निर्माण होत आहे, या गोष्टीचे तिला विशेष महत्त्व वाटत होते. कृष्णाची अवस्थाही भावपूर्णच झाली होती. त्याच अवस्थेत कृष्ण सहजपणे अर्जुनाच्या जवळ गेला आणि त्याने अर्जुनाला प्रेमाने आपल्या जवळ घेतले. इतर पांडव व द्रौपदीही कृष्णाच्या सन्निध येऊन उभे राहिले. त्या सर्वांवर कृष्णाने आपली कृपादृष्टी प्रेमाने फिरवली आणि त्यांच्याकडे आश्वासनपूर्वक नजरेने पाहिले."

नारदाचे बोलणे पूर्णपणे संपायच्या आतच लक्ष्मीच्या मुखातून उत्स्फूर्तपणे उद्गार बाहेर आले,



“छान, छान! ही गोष्ट मात्र अत्यंत चांगली झाली. कारण काहीही असो, परंतु सर्व पांडव आणि विशेषतः अर्जुन, या निमित्ताने कृष्णाच्या अधिक जवळ आले. आपापसातील ऐक्य राखण्याच्या नादात खरे तर ते कृष्णाशी जवळीकता साधत नव्हते आणि त्याच्यापासून दूरच रहात होते किंवा दूर जात होते, असे म्हणा. परंतु आता खरोखरीच जर त्यांनी त्यांच्यामध्ये कृष्णाला घेतले असेल तर त्यांच्यातील ऐक्य हे खऱ्या अर्थाने साधेल आणि त्याचे बळ त्यांना प्रत्यक्ष अनुभवता येईल. कारण ऐक्यामध्ये केवळ एकत्र रहाण्यापेक्षा, मनाचे मनाशी ऐक्य होणे अत्यंत आवश्यक आहे आणि सर्वांच्या मनात जर एकच आदर्श व एकच प्रेमाची व्यक्ती असेल, तरच असे ऐक्य होणे शक्य आहे. कारण त्यामुळे सर्वांच्याच जीवनाचे ध्येयही एकच होऊन रहाते आणि ध्यासही एकच होऊन रहातो. एकालाच सांगायचे, एकाचेच ऐकायचे आणि त्या एकासाठीच सर्व करायचे या एकीएक भावातूनच खरे ऐक्य, आधी त्या एकाशीच साधले जाणार आणि मग त्याच ऐक्याचा अनुभव आपापसातही येणार. सर्व पांडवांच्या जीवनात कृष्णच असा एकीएक होऊन राहिला, हे तर मला एक शुभ लक्षणच वाटत आहे. काही वेळेला वाईटातून चांगले निघते ते असे! या निमित्ताने पांडवांच्या जीवनाला एक चांगली कलाटणी मिळाली असेल, याची मला तरी खात्री वाटते. परंतु तरीही पुढील सर्व कथाभाग प्रत्यक्ष तुझ्या मुखातून ऐकण्याची आतुरता मात्र माझ्याठायी अत्यंत वेगाने वाढत आहे. कारण तू काही नुसता इतिहास सांगत नसतोस तर त्या निमित्ताने त्या व्यक्तिरेखांचे माध्यम घेऊन, तुझ्याठायीचाच सगुण प्रेमभक्तिभाव साकार होत असतो आणि त्याचाच मला अत्यंत आनंद होत असतो. कारण त्यातूनच सगुणभक्तीचा मार्ग प्रगट होत रहातो आणि तीच गोष्ट मला सर्वात महत्त्वाची वाटते.”

नारद बोलत असताना मध्येच बोलण्याचे स्वातंत्र्य लक्ष्मीने ज्या प्रेमाच्या हक्काने घेतले त्याचा नारदाला अतिशय संतोष झाला. नारदाच्या अंतरातील सगुणप्रेमाच्या अखंड प्रवाहात तर खंड पडणे शक्यच नव्हते. त्यामुळे नारदाच्या मुखातून प्रगटणारा शब्दप्रवाहही अखंडीत असल्याप्रमाणेच पुन्हा सुरू झाला.

“हे लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. सर्वांच्याठायी एकाच प्रेमाचे अस्तित्व व जाणीव असेल तरच त्यांच्यामध्ये खरे आंतरिक ऐक्य साधले जाते. मग बाहेरची भिन्नता जरी राहिली तरी ती त्या ऐक्याच्या अनुभवाच्या आड न येता, तिला त्याची जोडच मिळते. बाह्यांगाची, रूपाची व अगदी स्वभावाचीसुद्धा भिन्नता ही रहाणारच. त्यामध्ये समानता असणे शक्यही नाही आणि तसे ते आवश्यकही नाही. तशी समानता आणण्याचा केलेला प्रयत्न हा केवळ व्यर्थच नसतो,

तर तो त्रासदायकही असतो. पण एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की असे सर्वांशी व सर्वांचे ऐक्य साधणारे प्रेम, हे केवळ ईश्वराचेच असू शकते. कारण एक ईश्वरी प्रेमच असे आहे की ते सर्वांचे, म्हणजे अगदी सर्वांचे आहे आणि सर्वांसाठी आहे. असे प्रेम इतर कोणत्याही सांसारिक नातेसंबंधामध्ये अजिबात संभवत नाही. अर्थात् ते ईश्वरी प्रेम महापुरूषांच्या व्यक्तिमत्त्वाद्वारेच प्रगट असते आणि सर्वांसाठी उपलब्ध असते ही गोष्ट मात्र, हजार हिश्श्यांनी खरी आहे. असे ईश्वरी प्रेम पांडवांना कृष्णाच्या रूपाने मिळालेले होते. त्यामधील ईश्वरी भाव त्या सर्वांनाच कळला होता असेही नाही. परंतु कृष्णाच्या ईश्वरी प्रेमाचा लाभ त्याच्या सर्व गुणधर्मानिशी पांडवांना होत होता, हे मात्र खरे. त्यामध्येही द्रौपदीच्याठायी कृष्णाच्या ईश्वरत्वाविषयी आत्यंतिक श्रद्धा होती आणि त्याच श्रद्धेने ती कृष्णावर अतिशय प्रेमही करीत होती. त्यामुळेच तिच्या मनामध्ये कृष्णाविषयीचा भक्तिभाव निश्चितपणे निर्माण झालेला होता आणि तो हळूहळू वृद्धिंगतही होत होता. अर्जुनालाही कृष्णाच्या प्रेमाचे वेगळेपण निश्चितच लक्षात आलेले होते आणि कृष्णाचे माहात्म्यही त्याला हळूहळू आकलन होऊ लागले होते. त्या दोघांचाही आंतरिक प्रवास पुढे कसा कसा झाला हे पुढील कथेच्या निमित्ताने जेव्हा प्रगट होईल, तेव्हा तुला ते कळेलच.

हे लक्ष्मी, तू जे म्हणालीस की काहीवेळा वाईटातून चांगलेही निघते, ते म्हणणे जरी बरोबर असले तरी ते यथार्थ मात्र नाही. कारण सर्वच जण त्या ईश्वराचेच अंश असल्यामुळे प्रत्येकाच्या ठिकाणी चांगुलपणा हा तत्वतः व मूलभूत आहेच. पुढे अज्ञानाने त्या चांगुलपणावर आवरण येऊन त्याचा लोप होतो. एवढेच नव्हे, तर अज्ञानाने घडलेल्या दुषित कर्मांमुळे त्यावर विकारांची पुटेही चढून ती अत्यंत घट्टही होऊन बसतात. असे असूनही, काहीवेळा विशेष प्रसंगात हा लुप्त झालेला चांगुलपणा जोर करून वर येतो आणि वाईटपणावर मात करतो. परंतु ही मात तेवढ्या वेळापुरतीच असते. मनाच्याठायी पुन्हा वाईट गुणांचा जोर होऊन तो चांगुलपणा झाकोळला जातो आणि वाईटपणा वरचढ होतो. त्यासाठीच तात्पुरता वर आलेला चांगुलपणा सांभाळून राखला पाहिजे आणि राखून वाढवला पाहिजे. त्याचबरोबर वाईटपणाचे मूळ असलेले अज्ञान याचे पूर्णतः निर्मूलन करून विकारांचेही उच्चाटन करावयास हवे, तरच त्या मूळच्या चांगुलपणातून वाईट असे केव्हाच निर्माण होणार नाही आणि मग वाईटातून काहीतरी चांगले आले, असे कौतुकाने सांगण्याची वेळच येणार नाही. तेव्हा वाईटातून चांगले वर आले आणि चांगल्याची वाईटावर मात झाली ही गोष्ट नक्कीच चांगली आहे. परंतु वाईट हे समूळ नष्ट होऊन केवळ चांगलेच टिकून रहाणे हा चांगल्याचा वाईटावरचा पूर्ण विजय आहे.”



नारदाचे बोलणे ऐकत असताना लक्ष्मी तर चकितच झाली होती. लक्ष्मीच्या बोलण्यातील एका साध्या वचनावर नारदाने एवढ्या गंभीरपणे बोलावे याचे तिला अत्यंत नवलच वाटत होते, हे तिच्या मुखावरील भाव पहाताच लक्षात येत होते. परंतु नारदाच्या बोलण्यातील सखोलता व भावार्थ मात्र, लक्ष्मीच्या लगेचच लक्षात आला आणि तिने काहीही न बोलता केवळ तिची मान संमतीदर्शक हलवली. कारण नारदाच्या यथार्थ व स्पष्ट बोलण्यापुढे काहीही बोलणे लक्ष्मीला शक्यच नव्हते, ही गोष्ट लक्ष्मीने ओळखली होती. म्हणून तिनेही काही बोलायचा प्रयत्नच केला नाही. खरे तर, लक्ष्मीला त्याची आवश्यकताही जाणवली नाही. लक्ष्मीची ही मनःस्थिती नारदाने बरोबर ओळखली. त्यानेही लक्ष्मीकडे पाहून केवळ मंदस्मित केले आणि पुढे बोलावयास सुरूवात केली.

“हे लक्ष्मी, तू म्हणालीस त्याप्रमाणे सर्व पांडवांच्याठायी पुन्हा सद्भाव जागा झाला होता आणि त्यांचे सद्‌गुणही पुन्हा सबल झाले होते. त्या दोन्हीच्या संयोगानेच त्यांच्याकडून पुन्हा पराक्रम घडणे शक्य होणार होते. परंतु त्याची योग्य वेळ येण्यासाठी बराच काळ जावा लागणार होता. कारण बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास एवढा काळ जाणे तर अटळच होते. अर्थात वनवासाचा काळ हाही अत्यंत खडतर असाच होता. राज्यवैभवाचा त्याग करून आलेल्या पांडवांना वनवासातील कष्टमय जीवन स्वीकारायला वेळ हा लागलाच. परंतु ते सर्व पांडवांनी मनाने स्वीकारलेले असल्यामुळे, प्राप्त परिस्थितीशी हळूहळू जुळवून घेणे त्यांना शक्य झाले. मुळात द्रौपदीनेच सर्व जीवन विनातक्रार व हसतमुखाने जगायला सुरूवात केल्यामुळे, इतरांना तक्रार करायला काही जागाच शिल्लक राहिली नाही. पांडवांची आपापसातील योग्य समज, द्रौपदीचा समजूतदारपणा व कृष्णाची प्रत्यक्ष मदत यामुळे त्या सर्वांचेच जीवन अत्यंत सुरळीत, स्वास्थ्याचे व समाधानाचे होण्यासाठी जास्त काळ जावा लागलाच नाही.

हे लक्ष्मी, पांडवांना वनवासात जावे लागले या गोष्टीनेही दुर्योधनाच्या मनाचे अजिबात समाधान झालेले नव्हते. वनवासात राहूनही पांडवांचे जीवन व्यवस्थित चालू आहे ही गोष्ट जेव्हा दुर्योधनाच्या गुप्त हेरांकडून त्याच्या कानावर आली, तेव्हा त्याचा अतिशय जळफळाटच झाला. त्याचे मन अत्यंत अस्वस्थ झाले. द्वेष मत्सराने पछाडलेल्या दुर्योधनाने पांडवांना त्रास देण्याच्या एकमेव दुष्ट हेतूने त्यांच्यावर अनेक संकटे आणली. पांडवांविरूद्ध अनेक छुप्या कारवाया करून दुर्योधनाने त्यांना नामोहरम करण्याचे आटोकाट प्रयत्न केले. परंतु कृष्णाच्या मार्गदर्शनानुसार नित्य सावध असलेल्या पांडवांनी मोठ्या हिकमतीने व कृष्णाच्या मदतीने सर्व संकटांवर मात केली आणि कृष्णाच्या कृपेने ते दुर्योधनाला पुरून उरले. तो सर्व इतिहास येथे सांगणे अनावश्यक व अप्रस्तुतही आहे. तेवढा आपला वेळ

फुकट गेल्यासारखेच होईल आणि ते आपल्याला परवडण्यासारखे नाही. कारण आपल्याला कृष्णचरित्रांतील प्रेमरसाचे जास्तीत जास्त सेवन करावयाचे आहे हे मुख्य आहे. त्यासाठी जेवढा जास्तीत जास्त वेळ आपल्याला मिळेल तेवढा कमीच आहे. तेव्हा उगाच इकडे तिकडे न करता व आजूबाजूला न जाता आपण पुढे जाण्याचे करावे, हेच योग्य ठरेल.

बारा वर्षांच्या वनवासानंतर पांडव अज्ञातवासात राहू लागले. त्यांनी विराट नगरातील राजाकडे वेषांतर करून व वेगळी नावे धारण करून गुप्तपणे आश्रय घेतला आणि राजाच्या सेवेत राहून वेगवेगळी कामे करू लागले. पांडवांनी त्यांचा आपापसातील नातेसंबंधही लपवूनच ठेवला होता. दुर्योधनाने पांडवांचा शोध घेण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. कारण एक वर्षाच्या आत जर पांडव प्रगट झाले असते तर आधीच ठरलेल्या अटीनुसार, त्यांना पुन्हा बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास करणे भाग पडले असते. त्यासाठीच दुर्योधन अगदी घायकुतीला येऊन प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होता. मात्र त्याच्या प्रयत्नाला यश काही येत नव्हते. परंतु दैवयोगाने एक विचित्र घटना घडली. द्रौपदी ज्या विराट राजाच्या राणीकडे तिची दासी म्हणून सेवा करीत असताना, राणीचा भाऊ कीचक याची द्रौपदीवरती वाईट नजर गेली आणि त्याच्या वासनेची पूर्ती द्रौपदीने करावी म्हणून तिच्यावरती दबाव आणून, तो तिला मानसिक त्रास देऊ लागला. द्रौपदीने ही गोष्ट राजवाड्यातच आचारी म्हणून काम करणाऱ्या भीमाच्या कानावर घातली. भीमाचा राग अनावर झाला. राजाचा एक सल्लागार म्हणून वावरणाऱ्या धर्मराजाने भीमाला काहीही प्रत्यक्ष कृती करण्यापासून थोपवून धरले. कारण अज्ञातवासाचा काळ संपण्यासाठी थोडेच दिवस शिल्लक राहिलेले होते. परंतु कीचकाचा जाच वाढतच चालला आणि गोष्टी द्रौपदीच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेल्या. मग भीमालाही धीर धरून रहाणे कठीणच होऊ लागले. त्याचाही नाईलाजच झाला आणि त्याने एका रात्री गुप्तपणे कीचकाची एकांतात भेट घेऊन केवळ मुष्टीचा वापर करून त्याचा वध केला. दुसऱ्या दिवशी ही बातमी जेव्हा सर्वांना कळली तेव्हा तर सर्वत्र एकच हलकल्लोळ माजला. परंतु कीचकाचा वध कोणी केला हे कोणालाच कळले नाही. अर्थात धर्मराजाने ती गोष्ट न सांगताच ओळखली. पण मोठ्या संयमाने तो स्वस्थ बसून राहिला.

हे लक्ष्मी, कीचकवधाची वार्ता जेव्हा दुर्योधनाच्या कानावर गेली तेव्हा तो सावध झाला. दुर्योधन अत्यंत चतुर होता. कीचकासारख्या बलाढ्य पुरूषाचा कोणत्याही शस्त्राचा वापर न करता वध झाला आहे हे कळल्यावर त्याची तर मनोमनी खात्रीच झाली, की ते काम भीमाशिवाय दुसरे कोणीही करणे शक्यच नाही. दुर्योधनाने ताबडतोब त्याचे गुप्तहेर विराट नगराला पाठवले आणि त्यांना त्याठिकाणी पांडवांचा शोध लागलाच. दुर्योधनाने स्वतः सैन्यानिशी जाऊन विराट



नगरीच्या राजाशी युद्ध पुकारले. अशा संकटप्रसंगी राजाला मदत करणे हे आपले कर्तव्यकर्म आहे असे वाटून अर्जुनाने वेष पालटून युद्धात भाग घेतला आणि राजाला युद्ध जिंकून दिले. युद्ध हरत असतानाही दुर्योधन अत्यंत खूश झाला. कारण वेषांतर करून लढणाऱ्या अर्जुनाला त्याने ओळखले होते. त्यामुळे सर्वांसमक्ष पांडवांना प्रगट होणे भागच पडले. दुर्योधनाचा आनंद गगनात मावेना. कारण पांडवांना आता पुन्हा बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास पत्करावा लागणार याची निश्चिती झाली होती. परंतु जेव्हा धर्मपंडितांनी असा निर्णय दिला की चांद्रमास गणतीनुसार बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास असा तेरा वर्षांचा काळ पूर्ण झालेला आहे, तेव्हा मात्र दुर्योधन अत्यंत चिडला. पंडितांचा निर्णय मान्य करण्यास त्याने नकार दिला आणि पांडवांनी पुन्हा वनवास व अज्ञातवास पत्करावा, असा हट्टच धरून बसला. परंतु सर्वच थोर मंडळींनी शास्त्राचा निर्णय मान्य केल्यामुळे धृतराष्ट्राला राजा म्हणून तो निर्णय स्वीकारणे भागच पडले. दुर्योधन मनातून अत्यंत चरफडला खरा, पण स्वस्थ बसण्याशिवाय दुसरे काहीही करता येणे त्यालाही शक्यच नव्हते.

* * * * *

# कौरव-पांडव युद्ध

हे लक्ष्मी, पांडवांना अनुकूल काळ सुरु झाला असे वाटले खरे. परंतु ते तेवढे सहज नव्हते. दुर्योधनाने धर्मराजाचे राज्य त्याला परत करण्यास स्पष्टपणे नकार दिला. दुर्योधन कोणाचेही ऐकण्यास तयारच होईना आणि त्याच्या हट्टाला तो घट्टपणे धरून बसला. त्याच्यापुढे धृतराष्ट्राचाही नाईलाज झाल्यासारखे धृतराष्ट्र दाखवीत होता खरे, परंतु मनातून मात्र तो दुर्योधनाला पाठिंबाच देत होता. धर्मराजाचा पवित्रा मात्र नेहमीप्रमाणे सामोपचाराचा होता. 'आम्हाला संपूर्ण राज्य मिळाले नाही तरी आमची हरकत नाही. आम्हा पाच जणांना पाच गावे मिळाली तरी चालतील' अशीही भूमिका धर्मराजाने घेतली. परंतु दुर्योधनाने त्यालाही कडाडून विरोध केला. धर्मराजाची ही कमीपणाची भूमिका इतर पांडवांना मुळीच मान्य काय पण सहनही होईना. आता युद्धाशिवाय दुसरा पर्यायच नाही याविषयी, धर्मराजा सोडून इतर पांडवांचे एकमत झाले होते. यावेळी मात्र त्या सर्वांनी कृष्णाला बोलावून घेतले आणि त्याचे मार्गदर्शन मागितले. कृष्णानेही यावेळी सक्रिय सहभाग घेतला आणि धर्मराजाशी स्वतः बोलणे करून त्याची समजूत घातली. धर्मराजाच्या निमित्ताने कृष्ण सर्व पांडवांनाच उद्देशून बोलू लागला.

"अरे धर्मराजा, तुझ्या सात्त्विक वृत्तीचे मला नेहमीच कौतुक वाटते व त्याविषयी आदरही आहे. पण सात्त्विक भाव म्हणजे जरी प्रारब्धातील सर्व दुःखे व संकटे सहन करणे असे असले, तरी अन्याय सहन करणे म्हणजे काही सहनशक्ती नव्हे. दुसऱ्यावरती अन्याय न करणे आणि आपल्यावरती अन्याय होऊ न देणे हाच खरा क्षत्रिय धर्म आहे. अन्याय करणे व सहन करणे हे दोन्हीही गुन्हेच आहेत. तेव्हा सात्त्विक वृत्ती ही मनाची दुर्बलता न ठरता ती मनाची सबलताच ठरावयास हवी. स्वतःवरच्या किंवा स्वकीयांवरच्या अन्यायाने ज्याचे रक्त सळसळून वर येते, तोच खरा क्षत्रिय आहे. खरे तर, क्षत्रिय हा कोणा परक्यावरही अन्याय होऊ देत नाही. पण याचा अर्थ असा नव्हे की तो स्वकीयांना वाऱ्यावर सोडतो. स्वकीयांच्याही पाठीशी जो स्वतःच्या सर्व शक्तीनिशी उभा रहातो, त्यानेच स्वतःला क्षत्रिय म्हणवून घ्यावे. दुसऱ्याच्या हक्काची गोष्ट त्याच्यापासून हिरावून घेणे हे जसे अयोग्य आहे तेवढेच, स्वतःच्या हक्काची गोष्ट दुसऱ्याला आपल्यापासून हिसकावून घेऊ देणेही तेवढेच अयोग्य आहे. म्हणूनच सात्त्विक भावाच्याठायी क्षात्रतेज असावयास हवे आणि वेळप्रसंगी ते क्षात्रतेज प्रगटही व्हावयास हवे. धर्मराजा, तुम्हा सर्व पांडवांचे हे क्षात्रतेज प्रगट होण्याची वेळ आता आलेली आहे. नाहीतर केवळ भ्याड व नामर्द अशीच तुमची संभावना होईल.



हे धर्मराजा, आतापर्यंत दुर्योधनाने तुमच्यावर केलेल्या सर्व अन्यायांचे स्मरण करा. त्याने वारंवार तुम्हाला नष्ट करण्यासाठी केलेली कट कारस्थाने आठवा. एकवेळ या गोष्टी विसरणे शक्य होईल. परंतु दुर्योधनाने व दुःशासनाने भर दरबारात केलेली द्रौपदीची विटंबना मात्र कधीही विसरू नका. त्या गोष्टीचे विस्मरण ज्याला होईल, त्याला मनुष्य म्हणणेही अशक्यच आहे. एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवा की हा लढा केवळ कौरव व पांडव यांच्यामधील नसून ही लढाई, दुर्जनत्व व सज्जनत्व यांच्यामधील आहे. आजच्या काळात जे काही थोडेफार सज्जन लोक आहेत, ते तुमच्याकडे मोठ्या आशेने डोळे लावून पहात आहेत. आज सज्जनांचा कोणीच वाली नाही अशी परिस्थिती निर्माण होऊ पहात आहे. त्यांचा कैवार घेऊन त्यांच्या वतीने लढणारा आणि त्यांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देणारा, असा कोणीही नाही. परंतु आज ही जबाबदारी तुम्ही स्वीकारण्याची वेळ आलेली आहे. ईश्वरी सत्तेमध्ये या ईश्वरी कार्यासाठी तुम्हालाच नियोजित केलेले आहे, अशी माझी मनोमन धारणा आहे. मला तरी तसेच ईश्वरी संकेत जाणवत आहेत. मला ही खात्री सुद्धा आहे की तुम्हालाही तुमच्या या कर्तव्यकर्माची जाणीव होईल आणि तुमच्याकडून हे ईश्वराचे कार्य निश्चितपणे घडेल.”

कृष्णाच्या बोलण्याने धर्मराजासह सर्व पांडव अत्यंत प्रभावित झाले होते. कृष्णाच्या बोलण्याने त्यांच्या अंतरातील विझून जात असलेले क्षात्रतेजाचे स्फुल्लिंग जणू पुन्हा जागे झालेले होते आणि कौरवांशी मुकाबला करून स्वतःचे गतवैभव पुन्हा प्राप्त करून घेण्याचा कृतनिश्चय, त्या पांडवांच्या मुखावरती स्पष्टपणे दिसत होता. त्या सर्वांच्याच मनातील हा दृढ भाव अर्जुनाच्या मुखातून शब्दरूपाने साकार होऊ लागला.

“हे कृष्णा, तुझ्या बोलण्याने आमच्या ठिकाणचे क्षात्रतेज पुन्हा जागृत झालेले आहे ही गोष्ट खरीच आहे. आता कोणत्याही परिस्थितीत आम्ही पराक्रमाने दुर्योधनासारख्या नीच स्वभावाच्या व खलप्रवृत्तीच्या दुर्जनाचा निःपात करूच करू, हे माझे वचन आहे आणि माझे वचन हे मला माझ्या प्राणांपेक्षाही प्रिय आहे, ही गोष्ट तूही जाणून आहेस. त्यामुळे माझे वचन हे काही झाले तरी माझ्याकडून खरे होणारच, ही गोष्ट आता स्पष्ट आहे. कृष्णा, ईश्वरी कार्य व ईश्वरी संकेत याविषयी तू जे काही बोललास ते मी जाणत नाही. परंतु हा पराक्रम आमच्याकडून घडावा ही तुझी इच्छा आहे, एवढीच गोष्ट आम्हाला कळते आणि तुझी इच्छा हीच आम्हाला प्रमाण आहे. तू तर तुझ्या सर्व शक्तीनिशी आमच्या केवळ पाठीशीच नव्हे, तर आमच्या बरोबरीने उभा रहाणार आहेस आणि त्यातच आपल्या विजयाची निश्चिती आहे.”

अर्जुनाच्या बोलण्यावरती सर्वांनीच संमतीदर्शक माना डोलावल्या खऱ्या, परंतु धर्मराजाने त्याच्या मूळ स्वभावानुसार थोडासा वेगळा सूर लावलाच. 'हे युद्ध टाळण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न आपल्याकडून शेवटच्या क्षणापर्यंत घडावा. त्यादृष्टीने दुर्योधनाला भेटून पुन्हा सामोपचाराची बोलणी करावीत' असे धर्मराजाचे मत पडले आणि त्याने ते तसे स्पष्टपणे मांडलेही. धर्मराजाच्या या बोलण्यावर सर्वचजण नाराज झाले आणि थोडेसे निराशही झाले. द्रौपदीचाही राग थोडासा अनावरच झाला आणि तिने तो तसा व्यक्तही केला. परंतु कृष्णाने त्या सर्वांना आवरले आणि धर्मराजाच्या समाधानासाठी स्वतः कौरवांकडे जाऊन बोलणी करण्याचे ठरवले. त्या गोष्टीत कृष्णाला जराही कमीपणा वाटला नाही, एवढे त्याचे पांडवांवरती प्रेम होते. धर्मराजाला दिलेल्या शब्दानुसार कृष्ण स्वतः कौरवांच्या दरबारात जाऊन दाखल झाला आणि त्याने पांडवांच्या वतीने कौरवांची समजूत घालण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु हट्टाला पेटलेला दुर्योधन दुसरे काहीही ऐकण्याच्या मनःस्थितीतच नव्हता. उलट पांडवांचा पक्ष घेऊन बोलणाऱ्या कृष्णाचाच दुर्योधनाला अत्यंत राग आला आणि त्याने कृष्णालाच सैनिकांकरवी पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु कृष्णाला असे पकडता येणे कोणालाही शक्यच नव्हते. कृष्ण पुन्हा पांडवांकडे परत आला आणि जेव्हा त्याने पांडवांना घडलेला साद्यंत वृत्तांत सांगितला, तेव्हा मग प्रत्यक्ष युद्धाशिवाय दुसरा कोणताही पर्याय शिल्लकच राहिलेला नाही, याची धर्मराजासह सर्वच पांडवांची खात्री झाली.

हे लक्ष्मी, कौरव व पांडव यांचे युद्ध होणार हे ठरल्यावर उभयपक्षी त्याची तयारी सुरू झाली. अनेक राजेमहाराजांना साम, दाम, दंड, भेद इत्यादी वापरून आपल्या बाजूला वळवण्याचा प्रयत्न उभय बाजूने सुरू झाला. युद्धाची रणनीती ठरू लागली आणि सर्व सैन्याची व त्यासाठीच्या आवश्यक गोष्टींची जमवाजमव सुरू झाली. त्यामध्ये मुख्य म्हणजे यादवांचे साहाय्य मिळवण्याचा प्रयत्न दोन्ही बाजूंनी जोरदारपणे सुरू झाला. कृष्ण तर उघडपणे पांडवांच्या पक्षाचा होता आणि ते सर्वांनाच माहित होते. परंतु बलरामाला मात्र, हीच गोष्ट मुळीच मानवत नव्हती. केवळ राज्यासाठी भावाभावांनी आपापसात युद्ध करावे ही गोष्टच मुळात बलरामाला मान्य नव्हती. 'अशा युद्धात कोणतीही बाजू न घेता यादवांचा कोणत्याही प्रकारचा सहभाग नसावाच' असेच बलरामाचे अत्यंत प्रामाणिक मत होते. परंतु युद्ध अटळ आहे ही गोष्ट निश्चित झाल्यावरती ते युद्ध स्वतः पहाण्याचा प्रसंग येऊ नये या हेतूने युद्ध सुरू होण्यापूर्वीच बलराम तीर्थयात्रेला गेला होता. हे युद्ध धर्म-अधर्माचे आहे हे न जाणल्यामुळे, ते युद्ध केवळ राज्यप्राप्तीच्यासाठी कौरव व पांडव या बंधूंमधीलच आहे अशीच समजूत बलरामाने करून घेतली होती. धर्म-



अधर्मातील फरक ना बलरामाला जाणता आला आणि ना धर्माच्या बाजूने उभे रहाण्याची हिंमत त्याच्या कमकुवत मनाला घेता आली. त्यामुळेच वस्तुस्थितीपासून दूर जाण्याचा पलायनवादी मार्ग स्वीकारणे बलरामाला भाग पडले. बलरामाच्या मोठेपणाला कमी करण्यासाठी मी असे सांगत नसून, बलरामाच्या मोठेपणातील कमतरतेकडेच या निमित्ताने मला निर्देश करावयाचा आहे एवढेच! परंतु ईश्वराची नियतीच श्रेष्ठ असते आणि दैवगतीही मोठी विचित्र असते. त्यामुळे प्रत्यक्ष युद्धसमाप्तीच्या वेळी बलरामाचे योगायोगाने पुनरागमन झाले आणि त्याला युद्धातील अंतिम प्रसंगाचे साक्षीदार हे व्हावे लागलेच.

हे लक्ष्मी, यादव सेनेची ताकद दुर्योधन जाणून होता. त्यासाठी यादव सैन्याला कौरवांच्या बाजूने वळवणे अत्यंत आवश्यक होते. म्हणून दुर्योधन प्रथम बलरामाला जाऊन भेटला होता. बलराम दुर्योधनाचा गदाविद्येतील गुरू असल्यामुळे दुर्योधनाच्या मनात मोठी आशा होती. परंतु बलरामाने तो कोणत्याच बाजूला नसल्याचे दुर्योधनाला स्पष्टपणे सांगितले. त्यामुळे सर्व निर्णय कृष्णाच्याच हातात गेले. दुर्योधनाने हार न मानता प्रयत्न करण्याचे ठरवले आणि तो कृष्णाच्या भेटीस गेला. त्यावेळेस कृष्ण विश्रांती घेत एका मंचकावर पहुडला होता. दुर्योधन कृष्णाच्या उशाशी असलेल्या आसनावर स्वस्थ बसून राहिला. नेमका त्याच वेळी योगायोगाने अर्जुनही कृष्णाच्या भेटीसाठी आला आणि मंचकावर पहुडलेल्या कृष्णाकडे पाहून तो अत्यंत नम्रतेने कृष्णाच्या पायाशी असलेल्या आसनावर बसून राहिला. एवढेच नव्हे, तर थोड्या वेळाने अर्जुन त्याच्या दोन्ही हातांनी कृष्णाचे चरण प्रेमाने व हळुवारपणे चुरू लागला. अर्जुनाच्या प्रेमाच्या व सेवाभावी स्पर्शाने कृष्ण थोड्याच वेळात देहभानावर आला. समोर बसलेल्या अर्जुनाला पाहून कृष्णाला अत्यंत हर्ष झाला आणि त्याने हसून अर्जुनाचे स्वागत केले. अर्जुन काही बोलणार त्याआधीच दुर्योधनाने कृष्णाचे लक्ष स्वतःकडे वेधून घेतले. कृष्णाने दुर्योधनाकडे पाहून मंदस्मित केले आणि कृष्ण त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पहात राहिला. दुर्योधनाने अर्जुनाकडे जराही न पहाताच कृष्णाला उद्देशून बोलावयास सुरूवात केली.

"कृष्णा, माझे येथे येणे हे प्रथम झालेले असल्यामुळे तू माझे बोलणे आधी ऐकून घेणे, हे अत्यंत उचित आहे. आम्हा कौरव व पांडव यांच्यात युद्ध सुरू होण्याची वेळ आता जवळ येऊन ठेपलेली आहे, हे तुलाही ठाऊक आहेच. तू पांडवांचा उघडपणे पक्षपाती असल्यामुळे आम्ही तुझी काही मदत मागावी, असा प्रश्नच उपस्थित होत नाही. परंतु यादवांचे व कुरूकुळाचे अत्यंत घनिष्ट असे संबंध आहेत आणि याच कारणासाठी मी यादवांच्या मदतीची रास्त अपेक्षा धरून आहे. त्यासंबंधी मी आधी मला गुरूसमान असलेल्या बलरामदादांची भेट घेतली असता

त्यांनी मला स्पष्टपणे सांगितले की यासंबंधी ते तटस्थ असून त्यांनी सर्व निर्णय तुझ्यावरती सोपवला आहे. त्यामुळेच मला तुझी अशी भेट घेणे भाग पडले आहे. ‘यादवांनी आतापर्यंतच्या प्रथेप्रमाणे त्यांच्या कुरूकुळाशी असलेल्या बांधिलकीला जागावे आणि युद्धात आम्हाला साथ द्यावी’ एवढेच माझे तुला सांगणे आहे. तेव्हा तू तुझी व्यक्तिगत मते व लोभ बाजूला ठेऊन निर्णय घ्यावास, एवढीच अपेक्षा मी तुझ्याकडून बाळगून आहे.”

दुर्योधनाचे बोलणे संपल्यावरती कृष्णाने अर्जुनाकडे एक सूचक कटाक्ष टाकला असता अर्जुन एवढेच म्हणाला, “कृष्णा, मी तुझी वा यादवांची मदत मागण्याच्या उद्देशाने येथे आलेलोच नाही. मी अगदी सहज प्रेमाने व मनात काहीही हेतू न बाळगता तुझ्या भेटीसाठी आलो होतो. तू मनापासून आम्हा पांडवांच्या बाजूला आहेस याची मला पूर्ण खात्री आहे आणि आमच्यासाठी त्यापेक्षा दुसरी काहीही मोठी गोष्ट नाही. आम्हाला मदतीसाठी संख्याबळाची मुळीच आवश्यकता नाही, तर आम्हाला भावबळाची आवश्यकता आहे आणि ते आमच्या पाठीशी तुझ्या रूपाने पूर्णपणे आहे म्हटल्यावरती मग आम्हाला आणखीन कोणाच्या व कसल्या मदतीची जरूरी आहे बरे?”

अर्जुनाच्या बोलण्यावरती कृष्णाने स्मितहास्य केले आणि तो म्हणाला, “तुम्ही दोघांनी तुमचे म्हणणे माझ्यासमोर मांडलेले आहे आणि त्यातील मतितार्थ व भावार्थ माझ्या लक्षात आलेला आहे. यादव कुळाचे कुरूकुळाशी अत्यंत जवळचे संबंध आहेत ही गोष्ट खरी आहे आणि माझे पांडवांशी व्यक्तिगत प्रेमाचे संबंध आहेत, ही गोष्टही खरीच आहे. त्यामुळे तुम्हा उभयतांना मदत करणे हे यादवांचे व माझे कर्तव्यकर्मच आहे आणि ते मी निश्चितच करीन. दोघांनाही ही मदत कशा प्रकारे करावी यासंबंधी माझ्या मनात एक योजना आहे. एका बाजूला पूर्ण यादवसेना व दुसऱ्या बाजूला फक्त मी स्वतः अशी विभागणी मी करतो. परंतु प्रत्यक्ष युद्धात मात्र मी हाती शस्त्र धरणार नाही अशी माझी प्रतिज्ञा आहे. त्यातील जो भाग तुम्हाला हवा असेल तो तुम्ही मागून घ्यावा.”

कृष्णाचे बोलणे पूर्ण होण्याच्या आतच दुर्योधन पटकन व थोड्याशा मोठ्याच आवाजात म्हणाला, “मला सर्व यादवसेनाच हवी आहे. कारण मला प्रत्यक्ष लढणाऱ्या सैन्याची जरूरी आहे. निःशस्त्र लोक युद्धात काय कामाचे? त्यासाठी तर बाजारबुणगे लोक असतातच की?” दुर्योधनाच्या बोलण्यातील छद्मीपणा कृष्णाच्या



लक्षात आला. परंतु त्यावर काहीही न बोलता कृष्णाने फक्त एक मिश्कील हास्य केले आणि वळून अर्जुनाकडे पाहिले. त्यावर अर्जुनही तेवढ्याच तत्परतेने म्हणाला, “कृष्णा, मला तर फक्त तूच आणि जसा असशील तसा हवा आहेस.” अर्जुनाच्या या बोलण्याचा कृष्णाला अत्यंत संतोष झाला. दुर्योधनाचे काम त्याच्या मनासारखे झाले होते. त्यामुळे त्याला तेथे थांबण्याची काहीच जरूरी नव्हती आणि दुर्योधनही तेथे न थांबता तेथून त्वरित निघाला. दुर्योधनाने जाताना केवळ औपचारिकता म्हणून कृष्णाला अभिवादन केले. परंतु त्याने अर्जुनाकडे मात्र ढुंकूनही पाहिले नाही. दुर्योधनाच्या त्या विचित्र, पण अपेक्षित वागण्याची कृष्ण व अर्जुन या दोघांनाही अतिशय गंमत वाटली आणि ते एकमेकांकडे पाहून मोकळेपणाने हसले. अर्जुन पुढे होऊन कृष्णाच्या अधिक जवळ आला आणि कृष्णाचे दोन्ही हात स्वतःच्या हातात घेऊन तो कृष्णाशी बोलू लागला.

“अरे कृष्णा, युद्धातच काय, परंतु तू आमच्या सर्व जीवनातच आमच्याबरोबर आहेस, हे आमचे परमभाग्यच आहे. तुझ्या मार्गदर्शनाने हे युद्ध आम्ही नक्कीच जिंकू. याविषयी कोणाच्याही मनात तिळमात्रही शंका असणे शक्य नाही. प्रत्यक्ष युद्धात हाती शस्त्र न धरण्याची तुझी प्रतिज्ञा खरी करण्याची जबाबदारी पूर्णपणे माझीच आहे. तशी वेळ मी तुझ्यावरती येऊच देणार नाही, हे माझे तुला वचन आहे. तुझ्या हाती शस्त्र येण्याच्या आधीच माझे प्राण या माझ्या देहातून निघून गेलेले असतील, हे माझे सत्य वचन आहे. पण कृष्णा, माझी तुला एक अत्यंत प्रेमाची विनंती आहे की प्रत्यक्ष युद्धात माझ्या रथाचे सारथ्य करण्याची कृपा तू माझ्यावर करावीस. एवढेच मागणे मी तुझ्याकडे प्रार्थनापूर्वक मागत आहे. कारण युद्धातही मला प्रत्यक्ष तू माझ्याजवळ हवा आहेस. तू माझ्या संगे असल्यावरती मला कृतकाळाचीही भीती नाही. माझ्या पराक्रमाचे प्रेरणास्थानही तूच आहेस. त्यामुळे तुझ्या प्रत्यक्ष उपस्थितीनेच माझा पराक्रम यशाची उंची गाठू शकेल याची मला खात्री आहे. एवढी माझी इच्छा तू पूर्ण करशील ना?”

बोलता बोलता अर्जुन एकदम भावपूर्ण झाला आणि त्याचे नेत्र पाणावले. कृष्णाने पुढे होऊन अर्जुनाला प्रेमालिंगन दिले आणि आश्वासनपूर्वक अर्जुनाच्या पाठीवर थोपटले. अर्जुन कृष्णाच्या मिठीत विसावला व सुखावलाही. त्याला जणू सर्व सर्व मिळाल्यासारखेच झाले होते.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने कौरव व पांडव या उभय बाजूंची युद्धाची पूर्वतयारी पूर्ण झाली. कौरवांच्या बाजूने अकरा अक्षौहिणी व पांडवांच्या बाजूने सात अक्षौहिणी असे एकूण अठरा अक्षौहिणी सैन्य युद्धासाठी समोरासमोर उभे ठाकले. कौरवांचे सेनाधिपती, अर्थातच स्वतः भीष्म होते आणि पांडवांच्या सेनेची धुरा

अर्जुनाकडे होती. युद्धाचे नगारे वाजू लागले आणि उभय बाजूंनी युद्ध सुरू करण्याचा इशारा देण्यासाठी शंखही फुंकले गेले. दोन्ही बाजूंनी सैन्याची व्यूह-रचना झाली आणि परस्परांच्या सैन्याची पहाणीही सुरू झाली. अशा वेळीच कृष्ण सारथ्य करीत असलेल्या रथात बसून अर्जुनाचे त्या रणांगणात आगमन झाले. अर्जुनाने रथ उभय सैन्यांच्या मध्यभागी घेण्याची कृष्णाला विनंती केली. त्याप्रमाणे कृष्णाने रथ उभय सैन्यांच्या मध्यभागी आणून उभा केला. कौरवांच्या सैन्याच्या अग्रभागी भीष्माचार्य होते आणि त्यांच्या बरोबरीने द्रोणाचार्य व कृपाचार्य यांच्यासह कुरूकुळातील अनेक योद्धे युद्धासाठी सज्ज होऊन उभे होते. अर्जुनाने रथातून उतरून व पुढे होऊन पितामह भीष्माचार्य यांना वंदन करून त्यांचे आशीर्वाद मागितले आणि त्यांनीही अर्जुनाला मनःपूर्वक आशीर्वाद दिले. त्यानंतर अर्जुनाने युद्धविद्येतील त्याचे गुरू द्रोणाचार्य व कृपाचार्य यांनाही अभिवादन करून त्यांचे आशीर्वाद घेतले. एवढेच नव्हे, तर अर्जुनाने कुरूकुळातील ज्येष्ठ नातलगांचेही आशीर्वाद व शुभेच्छा मागून घेतल्या आणि तो पुन्हा रथात बसून सैन्याच्या मध्यभागी आला. आता केवळ अर्जुनानेच शंख फुंकण्याचा अवकाश होता, की युद्धाला तोंड फुटणार होते. परंतु बराच वेळ झाला तरी एक नाही अन् दोन नाही, अर्जुनाकडून शंख फुंकला जाईच ना! कृष्णालाही नवल वाटले आणि त्याने मागे वळून पाहिले, तो अर्जुन रथात त्याच्या जागेवर अधोमुख होऊन बसला होता. कृष्ण त्वरेने रथातून खाली उतरला आणि अर्जुनाच्याजवळ जाऊन पहातो तो काय, अर्जुनाचा चेहरा घामाने पूर्णपणे डबडबलेला होता. कृष्ण जवळ आलेला आहे हे लक्षात येऊनही अर्जुन त्याच्या नजरेला नजर द्यायला तयारच होत नव्हता. अर्जुनाची तशी ती विचित्र अवस्था पाहून कृष्णालाही काही कळेना किंवा काही अंदाजही बांधता येईना. कृष्णाने आपल्या शेल्याने अर्जुनाच्या मुखावरील घाम पुसला आणि त्याला शेल्यानेच वारा घालू लागला. थोड्या वेळाने अर्जुन थोडासा सावरल्यासारखा वाटला खरा, पण अजूनही तो कावराबावराच दिसत होता.

* * * * *



# लेखक परिचय - श्रीपरमानंदस्वामी



श्रीपरमानंदस्वामी - श्री.अविनाश मोरेश्वर लिमये यांनी मुंबई विद्यापीठातून M.Sc. with Research ही पदवी घेतली. आय.आय.टी. पवई, मुंबई या सुप्रसिद्ध संस्थेत मेटॅलर्जिकल इंजिनिअरिंग या विभागात ते दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झाले आहेत.

गृहस्थाश्रमात राहूनच भक्तिमार्ग कसा साधता येतो व सद्गुरु कृपेने ईश्वरप्राप्ती कशी करून घेता येते याचा आदर्श त्यांच्या जीवनाद्वारे प्रत्यक्ष साकार झालेला आहे.

त्यांनी प्रदीर्घ काळ, अखंडपणे व प्रेमभावाने त्यांचे पूज्य पिता व सद्गुरु श्रीअवधूतस्वामी यांची सेवा, भक्ती व त्यांचे कार्य करून तसेच स्वतःची साधना करून सर्वश्रेष्ठ असा आत्मानुभव घेतला.

श्रीअवधूतस्वामी यांच्या महानिर्याणानंतर श्रीपरमानंदस्वामी यांनी तरुण वयातच या दत्तपरंपरेच्या कार्याची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली आणि सर्वसामान्यांना व भक्तांना अचूक मार्गदर्शन केले व आजही करीत आहेत.

श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेला प्रभूरामाच्या अंतःकरणाच्या अवस्थेचे दर्शन घडविणारा अनुभवसिद्ध ग्रंथ 'हा राम माझा' २००० साली व कृष्ण व राधा यांच्या भक्तिऐक्याचे स्वानुभूतीतून मनोहारी दर्शन घडविणारा ग्रंथ 'कृष्ण सखा माझा' २००४ साली प्रकाशित झाला. तसेच नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गूज प्रकटविणारा ग्रंथ 'कृष्ण परमात्मा' २००८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथास मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा 'मृत्युंजय' पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच दत्तात्रेयांच्या अवतार मालिकेतील चरित्रांचे रहस्य प्रकट करणारा ग्रंथ 'दत्त हाचि अवधूत' २०१० साली प्रकाशित झाला असून, श्रीपरमानंदस्वामी यांच्या भक्तिकाव्यांचा संग्रह 'आनंदाचे डोही' २०११ मध्ये प्रकाशित झाला आहे. 'दत्तात्रेय वामन भिडे - एक शोध आनंदाचा' ही आध्यात्मिक कादंबरी २०१४ साली प्रकाशित झाली, तर त्याच आध्यात्मिक कादंबरीचा पुढील भाग म्हणजे 'दत्तात्रेय वामन भिडे - एक प्रवास आनंदाचा' हा २०१५ मध्ये प्रकाशित झाला आहे. त्यापुढील भागाचे लेखन श्रीपरमानंदस्वामी यांचेकडून घडतच आहे.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाहीतुमच्या मोबाईलवर . आता हजार मराठी ईपुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा.

हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य